# १. 'कळप' (कादंबरी)

: राजन गवस

डॉ.गोविंद काजरेकर

# १

## कळप

**- राजन गवस**

**पाठ्यरचना :**

१.० अभ्यासाची उद्दिष्ट्ये
१.१ प्रास्ताविक
१.२ राजन गवस यांच्या साहित्यविषयी
१.३ 'कळप' कादंबरीचा आशय
१.४ 'कळप' कादंबरीची वैशिष्ट्ये
१.४.१ 'कळप' मधील लोककथा
१.४.२ देवदासींच्या जीवनव्यथांचे चित्रण
१.४.३ सामाजिक चळवळीमधील विकृतीचे चित्रण
१.४.४ साहित्यविषयक जाणिवांचे रेखाटन
१.४.५ शैक्षणिक आणि आर्थिक संस्थांमधील भ्रष्टाचाराचे दर्शन
१.४.६ गावगाडा कृषिसंस्कृतीचे चित्रण
१.४.७ 'कळप'कादंबरीतील लेखकाची जीवनदृष्टी
१.४.८ 'कळप'कादंबरीचे निवेदन
१.४.९ 'कळप' कादंबरीतील पात्रचित्रण
१.४.१० 'कळप'कादंबरीचा अवकाश
१.४.११ 'कळप' कादंबरी मधील भाषेचे ठळक विशेष
१.४.१२ कळप कादंबरीचे वाङ्मयीन महत्त्व

### १.० अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. 'कळप'कादंबरीचा वाङ्मयीन अभ्यास करणे.
२. 'कळप'कादंबरीचा आशयाला असलेले सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच भाषिक संदर्भ तपासून पाहणे.
३. 'कळप' कादंबरीतून लेखकाने व्यक्त केलेल्या भ्रष्ट व्यवस्थेचे विश्लेषण करुन विद्यार्थ्यांच्या मनात प्रतिरोधाची जाणीव निर्माण करणे.
४. समाजातील दुर्बल घटकांविषयी विद्यार्थ्यांच्या मनात आत्मीयता निर्माण करणे.
५. विद्यार्थ्यांचे भाषिक ज्ञान व आकलन क्षमता वाढविणे.

## १.१ प्रास्ताविक

राजन गवस यांच्या 'कळप' कादंबरीचा अभ्यास एक वाङ्मयकृती म्हणून करावयाचा आहे. कोणत्याही वाङ्मयकृतीचा अभ्यास करताना त्या वाङ्मयकृतीला असलेले सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच भाषिक संदर्भ विचारात घ्यावे लागतात. त्या वाङ्मयकृतीची निर्मिती कोणत्या काळात झाली, त्या काळात वाङ्मयीन वातावरण कसे होते याचाही विचार सारांशरुपाने करावा लागतो. तसेच साहित्यकृती ही लेखकाच्या विचारांतून, कल्पनेतून, जीवनविषयक आकलनातून निर्माण झालेली असते. हे घटक साहित्यकृतीत प्रगट झालेले असतात. या घटकांचाही विचार या अभ्यासात करावा लागतो.

## १.२ राजन गवस यांच्या साहित्याविषयी

राजन गवस यांनी कथा, कादंबरी, ललितगद्य, समीक्षा असे विविध लेखनप्रकार हाताळलेले दिसतात. तसेच त्यांच्या लेखनात आशयाची विविधताही दिसते. चौंडकं (१९८५) या पहिल्या कादंबरीचे धर्माच्या माध्यमातून होणारे देवदासी स्त्रीचे अमानुष शोषण हे मध्यवर्त्ती सूत्र आहे. तर भंडारभोग (१९८८) या दूसऱ्या कादंबरीत गवस यांनी जोगत्यांच्या जीवनव्यथेचे प्रभावी चित्रण केले आहे. देवदासीं प्रमाणे समाजाचा धर्मश्रद्धेचा बळी म्हणजे जोगता. त्यांच्या पुरुषत्वाचे खच्चीकरण करुन त्यांना बाईपणाचे रुप दिले जाते. धर्मबंधनांच्या ओझ्याने आयुष्य निरर्थक झाल्याचा त्यांना वारंवार प्रत्यय येतो. मराठीतील जोगत्यांच्या जीवनावरील ही पहिलीच कादंबरी आहे. समकालीन समाजातील सांस्कृतिक अध:पतनाचे चित्र गवस यांनी कळप (१९९१) या कादंबरीतून रेखाटले आहे. ऐंशीनंतरच्या काळात सामाजिक मूल्यभाव अधिक ढेपाळत गेला. तरुण पिढीसमोर कुणीही आदर्श राहिले नाहीत. त्यामुळे नवी पिढी दिशाहीन झाली. सामाजिक गटगटांतून आपमतलबी हितसंबंध जोपासले जाऊ लागले. याविषयीची प्रदीर्घ प्रतिक्रिया म्हणजे कळप ही कादंबरी होय. यानंतर १९९२ साली धिंगाणा ही कादंबरी लिहून गवस यांनी संसदीय राजकारणाचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम अधोरेखित केला. बेकारीच्या दिशाहीन अवस्थेतील तरुणांची ससेहोलपट ही कादंबरी प्रत्ययकारीरित्या चित्रित करते. ग्रामपातळीवरील महाराष्ट्रीय समाजातील राजकारणाचे इतके स्पष्ट चित्र मराठी कथनात्म साहित्यात क्वचितच आले असेल. तणकट (२००१) या त्यांच्या कादंबरीत ग्रामीण भागातील दलित-सवर्ण संघर्ष प्राधान्याने चित्रित झाला आहे. खेडी परिवर्तनाच्या प्रक्रियेने गतिमान होत असताना स्वार्थी राजकारणी आणि प्रसिद्धीलोलूप प्रवृत्तींनी जातीजातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु केले. याला शहरी, परिवर्तनवादी प्रवृत्तींनी पाठिंबा दिला. साहजिकच ग्रामीण भागातील जातीसमूहांमध्ये समन्वयाची प्रगतिशील भूमिका निर्माण न होता केवळ संघर्ष निर्माण होऊ लागला. या संघर्षामध्ये ग्रामीण दलितांसमोर अस्तित्वाचे प्रश्न अधिक जटिल होऊन उभे राहिले. हेच वास्तव तणकट कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. या शिवाय गवस यांनी काचाकवड्या हे ललित गद्य, रोकडे पाझर हे आस्वादक समीक्षेचे पुस्तक, भाऊ पाध्ये यांची कथा, मराठीचे आशययुक्त अध्यापन इ. ग्रंथ लिहिले आहेत.

साठोत्तर काळात मराठी साहित्य प्रवाहात आसय आणि रुपाच्या बाबतीत अनेक बदल झाले. विशेषतः या काळातल्या साहित्यामधून मध्यमवर्गीय चाकोरीबाहेरचे अनुभवविश्‍व प्राधान्याने चित्रित होऊ लागले. शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींनी समाजप्रबोधनाचे केलेले कार्य यांच्या एकत्रित परिणामातून आत्मभान आलेली लेखकांची नवी पिढी आपले अनुभवविश्‍व साहित्यातून व्यक्त करु लागली. विशेषतः दलित, ग्रामीण, आदिवासी जीवनाचा तत्कालापर्यंत अलक्षित राहिलेला अवकाश साहित्याच्या केंद्रस्थानी आला. आपल्या लेखनासाठी काहीशी अशीच भूमी निवडीत ऐंशीच्या दशकातील लेखकांनी आपल्या जाणिवा व्यक्त केल्या. बदलत्या सामाजिक वास्तवावर प्रखर भाष्य करताना साठोत्तरी काळातील साहित्यातून व्यक्त झालेल्या जाणिवांच्या पलीकडे जाऊन काही लेखकांनी जीवनानुभव व्यक्त केलेले दिसतात. गावगाडा, तेथील माणूस, त्याचे विचारविश्‍व, या गावगाड्यावर स्वातंत्र्योतर काळातील परिवर्तनवादी चळवळींचा आणि राजकारणाचा झालेला परिणाम, आधुनिकतेचा पडलेला प्रभाव, ग्रामीण भागातील संस्थात्मक जीवनव्यवहारांतील भ्रष्टता अशा अनेक गोष्टी तेथील भाषिक संदर्भासह गवस यांच्या साहित्यातून चित्रित झाल्या आहेत. हीच त्यांच्या लेखनाची प्रधान आशयसूत्रे म्हणता येतील.

त्यांच्या ‘कळप’ कादंबरीचा विचार आपण ऐंशीनंतरच्या काळातील लेखनकृती म्हणून करताना, या काळातील वाङ्मयीन आणि सांस्कृतिक पर्यावरणाचा थोडक्यात विचार करणे सयुक्तिक ठरेल. त्यामुळे या कादंबरीच्या निर्मितीमागील कारणांचा आणि कादंबरीच्या स्वरुपाचा विचार करणे काहीसे सोपे होईल अशी अपेक्षा धरता येईल. या काळातील साहित्यिकांच्या जाणिवांवर असलेले प्रभाव विचारात घेतल्यास असे दिसते की, सामाजिक बांधीलकीची भावना, स्वातंत्र्य, समता इ. मूल्यांवरची निष्ठा, वास्तव चित्रणावर भर, नैतिक जाणिवांचे प्रकटन आणि आत्मप्रकटीकरण हे काही ठळक पैलू या काळातल्या साहित्यातून दिसतात. विशेषतः भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरी या लेखनप्रकाराविषयी जी समीक्षणात्मक तत्त्वांची मांडणी केली त्यांचा प्रभाव या काळातल्या कादंबरी लेखनावर मोठ्या प्रमाणात जाणवतो. किंबहुना नेमाडे यांच्या वैचारिकतेचा आग्रह धरणारी एक पिढीच या काळात उदयाला आलेली दिसते. त्यातून कादंबरी या लेखनप्रवाहात काही भलबुरे निर्माण झालेले दिसते. गवस यांच्या कळप कादंबरीवरही वरील जाणिवांचे आणि नेमाडे यांच्या वैचारिकतेचे प्रभाव स्पष्टपणे जाणवतात. त्यांची इष्टानिष्टता विवेचनाच्या ओघात आपण पाहणारच आहोत.

## १.३ कळप कादंबरीचा आशय

गवस यांची १९९१ साली प्रसिद्ध झालेली कळप ही कादंबरी अनेक आशयसूत्रे व्यक्त करणारी आहे. रघू चिलमी या महाविद्यालयात शिकणाऱ्या तरुणाला केंद्रस्थानी ठेवून कादंबरीतील घटना प्रसंगाचे चित्रण झाले आहे. रघू हा कळप कादंबरीचा नायक आणि निवेदकही आहे. देवदासींच्या व्यथा, देवदासीप्रथा निमूलनाचे कार्य तसेच शिक्षण, साहित्य, सहकारी संस्था अशा सामाजिक संस्थात्मक व्यवहारांमध्ये आलेली विकृती गवस यांनी

प्राधान्याने चित्रित केली आहे. रघू चिलमी हा शिक्षणाच्या माध्यमातूनच सामाजिक कार्यात ओढला गेलेला या कादंबरीचा नायक आहे. मात्र त्याला नायक म्हणण्यापेक्षा पांडुरंग सांगवीकरच्या परंपरेतील प्रतिनायक म्हणणे योग्य ठरावे. तो निकोप समाजव्यवस्थेचा आग्रह धरतो. मात्र समाजव्यवहारातील विसंगती, कार्यकर्त्यांची दांभिक मनोवृत्ती, प्रसिद्धी लोलूपता, समाजातील जबाबदार घटकांची अर्थकेंद्री मानसिकता या विकृतींचा त्याला प्रत्यय आल्यानंतर त्याचे भावविश्व कोलमडून पडते. त्याचा भ्रमनिरास होतो आणि तो व्यवस्थेपासून परात्म होतो. असे या कादंबरीचे सारांशरुपाने वर्णन करता येईल.

## १.४ 'कळप' कादंबरीची वैशिष्ट्ये

'कळप' कादंबरीची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

या कादंबरीमध्ये ग्रामीण सस्कृंती, देवदासीची व्यथा, देवदासीची चळवळ अंतर्गत राजकारण, सामाजिक चळवळी, ग्रामीण भागातील शैक्षणिक चळवळ अशी विविध वैशिष्ट्य सांगता येतील.

## १.४.१ कळप मधील लोककथा

कळप या कादंबरीचा प्रारंभ लोककथेतून होतो. लोककथा आवाहक असतात. मानवी जीवनातील चिरंतर आशय व्यक्त करण्याची लोककथांना स्वभावतःच प्राप्त झालेली असते. रघू कादंबरीच्या प्रारंभीच आईने सांगितलेली लोककथा कथन करतो. त्या लोककथेत एका उपद्व्यापी तरुणाला घरातील माणसे कंटाळतात व त्याचे लग्न करतात. पण रात्री त्याच्या शरीराच्या अळ्या होतात. त्या अळ्यांची राखण करत त्याच्या बायकोला रात्रभर जागावे लागते. एक दिवस पाऊस पडल्यावर तो शेतातील गाईच्या खुरात साचलेल्या पाण्यात आपले हातपाय व तोंड धुतो. रात्री तेवढेच शरीर सोडून बाकी शरीराच्या अळ्या होतात. बायकोला हे कळल्यावर ती त्याला शेतात घेऊन जाते. तर गाईच्या खूरातील पाणी आटलेले असते. तरी ती दोघे हिंमतीने खणून पसाभर पाणी मिळवतात. ती आपला पदर त्या पाण्यात भिजवून त्याचे सर्व अंग पुसून काढते. त्या दिवसापासून त्याच्या शरीराच्या अळ्या होण्याचे थांबते. ही लोककथा कादंबरीत पुढे येणाऱ्या सामाजिक पातळीवरील सर्वव्यापी सखलनाचा प्रतीकात्म आशय व्यक्त करते. त्याचबरोबर शेतातील पाण्याच्या प्रतिमेतून कृषिसंस्कृतीच्या ठिकाणी असलेल्या सर्जकतेच्या सामर्थ्याचे सूचन करते. आजच्या ग्रामीण वास्तवात प्रागतिकतेतून उद्भवलेल्या सखलनाला कृषि संस्कृतीची मूळ सर्जशीलता पर्याय ठरु शकते. ही जाणीव या लोककथेतून व्यक्त होते. तसेच ही कथा ग्रामीण स्त्रीच्या जिद्दीचे, कष्टाचे, तिच्या कल्पकतेचे, संसार उभा करण्याच्या मनोवृत्तीचे रुपकच ठरते. म्हणूनच कादंबरीच्या प्रारंभीच भाषेद्वारे प्रकट झालेले लेखकाच्या जीवनदृष्टीचे हे प्रातिनीधिक रुप ठरते.

नायक व निवेदक असलेल्या रघू चिलमीला लोककथेच्या अनुषंगाने स्वतःविषयी आणि आपल्या भोवतालच्या विविध समाज व्यवहारा विषयी अनेक प्रश्न पडतात. या प्रश्नांतून तो

स्वतःची, स्वतःच्या संवेदनशीलतेची जाणीव वारंवार करुन देतो. निवेदनाच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपामुळे कादंबरीचा आशय प्रभावी बनलेला आहे. आईने सांगितलेली लोककथा आठवल्यावर रघू म्हणतो - "आता तिची गोष्ट आठवते. पण पुढं काही सुरुच होत नाही मेंदूत. एवढ भागदाड मेंदुला" (पृ.२) कादंबरीच्या सुरुवातीला आलेल्या या विधानाप्रमाणे कादंबरीच्या शेवटीही एक विधान येते ते असे - "जाऊ द्या. घडलं ते घडून गेलं. पण माझ्या मेंदूला कायमचंच भगदाड पडल. पण हे फक्त माझ्याबाबत घडल का माझ्या पिढीबाबत हे सांगण मात्र कठीणच." (पृ. २१६) ही दोन्ही विधाने लोककथेतील प्रतीकात्मतेला कादंबरीतील वास्तवाशी जोडून घेणारी ठरली आहेत. गावगाड्यातील कृषिसंस्कृतीपासून परात्म झालेल्या नव्या पिढीची मानसिकता येथे प्रकट होते. एका विशिष्ट काळातील विदारक सामाजिक वास्तवाच्या अनुभवामुळे आंतरिक भावविश्व कोलमडून पडलेला, हतबल, निराश झालेला तरीही कडकडीत पाण्याने आंघोळ करुन नव्या जीवनाला सिद्ध होणारा नायक रघूच्या रुपाने पिढीच्या प्रतिनिधी म्हणून उभा राहतो. हे या कादंबरीचे एक बलस्थान ठरते.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजन गवस यांच्या एकूण लेखनाविषयी थोडक्यात भाष्य करा.

---

---

---

२) कळप कादंबरीतील लोककथेचे विविध अर्थ सांगा.

---

---

---

## १.४.२ देवदासींच्या जीवनातील व्यथांचे चित्रण

देवदासींच्या जीवनातील दुःख भोग रेखाटणे आणि या अनिष्ट प्रथेच्या निर्मूलनासाठी चालवल्या जाणाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांच्या वर्तनातील विसंगती उघड करणे हे एक आशयसूत्र या कादंबरीत दिसते. रघू या नायक पात्राला प्रा. सनमाडीकर सरांनी देवदासींची शिरगणती करण्याचे काम सोपवले असा योगायोग निर्माण करुन त्याच्या दृष्टिकोनातूनच देवदासींचे दुःखभोग चित्रित केले आहेत. अजाणतेपणी देवीला अर्पण केल्यामुळे देवदासी स्त्रियांना शिक्षणाला मुकावे लागते. शिक्षणाच्या अभावामुळे त्यांची सारी प्रगतीच खुंटून जाते. परंपरागत जीवन सोडता येत नाही. विशेषतः आर्थिक कुचंबणेला सामोरे जावे लागते. या व्यवस्थेला दुरावल्यामुळे भौतिक सुखाच्या आणि व्यक्ति विकासाच्या इच्छा मनात जिरवून येईल त्या दिवसाला सामोरे जाण्याचे बळ त्यांना मनात आणावे लागते. अजाणत्या वयात हे देवत्वाचे

ओझे निमूटपणे स्वीकारावे लागते. पण पुढे मनात नसेल तरी आई बापाच्या छत्राखालून दूर व्हावे लागते. त्यामुळे घरातल्या माणसांना शिव्याशाप देत जोगतिणी आपले उर्वरित आयुष्य कंठतात. अशी त्यांची दु:खे कादंबरीतील काही घटनाप्रसंगातून व्यक्त केली आहेत. उदा. रघू समोर आपल्या जीवनातील दु:ख, वैताग व्यक्त करताना कळप कादंबरीतील एका प्रसंगात गोजाबाई ही जोगतीण आपल्या मनातल्या उद्वेग व्यक्त करताना म्हणते - "मी सत्यापाची लेक. आजी जोगतीण व्हती म्हणून गादी चालवाया मला सोडली. रांडा भ्याड्यांनी आपल चांगल कराया मला हेच्यात ढकलली, त्येंच्या तोंडात माती पडली. त्येंच्या कारणं सतरा उंबरं फिरायची पाळी आली. उटवा झाला त्येंचा...इस्तू लागला ह्या जलमाला. ह्यो कसला जलम? रांडा भाड्यांनी माझा उदोस केला." (पृ. १८, १९) गोजाबाई बरोबरच सत्तव्वा, बेबी, फुला, कमळाबाई इ. जोगतिणींच्या यातनामय जीवनाचे चित्र कळप कादंबरीचे उपकथानक ठरावे असे आहे. फसवणूक, सामाजिक अवहेलना, आर्थिक कुचंबणा यामुळे आक्रोश करणाऱ्या देवदासींची व्यक्तिचित्रे कादंबरीत येतात. देवदासींचा दु:खभाव हे या कादंबरीतील एक प्रभावी आशयसूत्र आहे.

## १.४.३ सामाजिक चळवळीमधील विकृतीचे चित्रण

देवदासी प्रथानिर्मूलनाच्या चळवळीच्या चित्रणातून ग्रामीण समाजातील कार्यकर्त्यांच्या मनोवृत्ती गवस यांनी रेखाटल्या आहेत. येथे वास्तवाच्या गतिशीलतेबरोबर गावगाड्यातील वृत्तिभिन्नतेचे चित्र लेखकाने मार्मिक शब्दांत उभे केले आहे. या कादंबरीतील प्रा. सनमाडीकर ही एका प्रामाणिक कार्यकर्त्यांची व्यक्तिरेखा आहे. ते आपल्या विद्यार्थ्यांच्या मदतीने ही चळवळ उभी करतात. देवदासी स्त्रियांना सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त करण्यासाठी चळवळ उभी राहावी अशी त्यांची ईच्छा असते. मात्र चळवळ राजकारणविरहीत ठेवून संघर्ष करणे चळवळीतील अन्य कार्यकर्त्यांना शक्य होत नाही. समाजवादी प्रवृत्तीचा बुरखा पांघरलेले राजकारणी नेते म्हणून या कादंबरीत आबा घोसरवाडकर व आबा चिंचवाडे या दोन व्यक्तिरेखा येतात. त्यांच्या सत्तेच्या, आर्थिक लालसेच्या आणि प्रसिद्ध लोलुपतेच्या प्रवृत्तीमुळे चळवळ क्रमशः दिशाहीन, पोकळ आणि उपचार प्रधान होते. कार्यकर्त्यांच्या मनातील ही ध्रुवात्मकता, विसंवाद हे वास्तव कादंबरीत मांडले गेले आहे.

चळवळ चालविणाऱ्यांकडे विशेष प्रकारची नैतिकता, सामाजिक बांधिलकीची भावना आणि परिवर्तनाविषयीचे सजग भान नसल्यामुळे चळवळ कशी फसत जाते यांचे संदर्भ अनेक घटना प्रसंगातून गवस यांनी दिले आहेत. विशेषतः शोषितांच्या मूळ प्रश्नांना बगल देऊन आत्मप्रतिष्ठा वाढणाऱ्या राजकीय कृत्यांमुळे चळवळ पोखरली जाते. अशा विकृत राजकीय वृत्तींचे दर्शन कळप मधील व्यक्तिचित्रणातून घडते. कळप कादंबरीतील शंकऱ्या रघू, दिलावर, सनमाडीकर ह्या व्यक्तिरेखा चळवळीला सामाजिक परीवर्तनाचा सदनशीर मार्ग मानतात आणि चळवळीची प्रतिष्ठा राखू पहातात. पण आबा घोसरवाडकर आणि आबा चिंचवाडे ह्या दोन व्यक्तिरेखा स्वतःच्या राजकीय अहंतेपोटी चळवळ स्वकेंद्री करण्याचा प्रयत्न करतात. चळवळीतील हे दोन परस्परभिन्न दृष्टिकोण वास्तवपूर्ण रितीने चित्रित झालेले आहेत. चळवळ

कुठल्यातरी राजकीय पक्षाच्या दावणीला बांधून मोर्चे, मेळावे, प्रसिद्धी अशा औपचारिकतेच्या चक्रात गरगरत ठेवली जाते. अर्थात हे मार्ग चळवळीचे हेतू साध्य करण्यासाठी योग्य मानले तरी तेच साध्य बनतात. यामुळे चळवळ सत्त्वहीन बनते. चळवळ देवदासींच्या व्यथेपर्यंत पोहोचू दिली जात नाही याविषयीची खंत रघूच्या विचारांतून व्यक्त केली जाते. "ही चळवळ कोणत्य पक्षाने चालवलेली चळवळ नाही. फुले-आंबेडकरवादी विचारानं चालवलेली चळवळ आहे." (पृ. ६१) असे रघू त्यांना सांगण्याचा प्रयत्न करतो. पण त्याच्या विचारांकडे कोणीच गंभीरपणे पाहात नाही. त्यामुळे तो क्रमशः हतबल होत जातो. या चित्रणातून चळवळीतील कार्यकर्त्यांची वर्तनभिन्नताच लेखकाने उघड केली आहे.

कार्यकर्त्यांच्या वर्तनविसंगतीतील विभूतिपूजेची प्रवृत्तीही गवस यांनी व्यक्त केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी व्यक्तीच्या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. सामाजिक प्रवृत्तीमध्ये झालेला हा बदल लेखकाने चळवळीच्या अनुषंगाने अचूकपणे टिपला आहे. रघू, शंकऱ्या, दिलावर यांना आबा घोसरवाडकर यांच्या राजकीय वृत्तीतून चळवळीचे श्रेय घेण्याच्या वृत्तीं संताप येतो. चळवळीत वावरणाऱ्या राजकीय नेतृत्त्वाची दांभिकता अनेक घटना-प्रसंगांतून व्यक्त झालेली दिसते. परिवर्तनासाठी प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात उभे न राहता राजकीय पुढारी लोकानुनय करण्याची प्रवृत्तीमुळे मूलतत्त्वदाला शरण जातात. सकारात्मक संघर्ष आणि परंपराबाबत बंडखोरी केल्याशिवाय चळवळीला सत्त्व आणि स्वरुप प्राप्त होत नाही. याचे नेमके भान या नेतृत्त्वाला येतच नाही. किंवा त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. मात्र प्रामाणिक कार्यकर्त्यांनी केलेल्या कार्याचे श्रेय प्राप्त करण्याची धडपड करणे हे या राजकीय व्यक्तिमत्त्वांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. वास्तविक चळवळीने गुलामगिरी, स्त्रीदास्य, शोषण, धार्मिक विषमता अशा कोणत्याही मानवताद्रोही कृत्यांच्या विरोधात ठामपणे उभे राहिले पाहिजे. तसेच समता, स्वातंत्र्य, आधुनिकता, विज्ञाननिष्ठा, आणि लोकशाही मूल्ये जतन केली पाहिजेत. चळवळींचे हे मूलहेतू आहेत. परंतु लोकानुनय करण्याच्या राजकीय पुढाऱ्यांच्या प्रवृत्तीमुळे चळवळी आपल्या या साध्यापर्यंत पोहोचत नाहीत. चळवळीचे श्रेय मिळविण्यासाठी राजकीय कार्यकर्ते स्वत्वाचा बळी देतात. कळप कादंबरीतील एका प्रसंगातून लेखक अशा राजकीय नेतृत्त्वातील विसंगती प्रकट करतो. देवदासी चळवळीतील एक सच्चा कार्यकर्ता बापू देशिलगार जोगतिणीच्या मुलीशी लग्न करण्याच्या निर्णय घेतो आणि प्रा. सनमाडीकरसरांना बोलून दाखवतो. मात्र चळवळीत संघर्षांचे आवाहन पेलण्याची मानसिकता नसल्यामुळे आबा घोसरवाडकर आपण उपस्थित राहण्यास नकार देतात. शेवटी चिंचवाडे, शंकऱ्या, सनमाडीकर यांनी देवळात जाऊन लग्न लावण्याचे निश्चित केल्यावर घोसरवाडकर बातमीदार, फोटोग्राफर यांच्यासह देवळात उपस्थित होतात आणि स्वतः लग्न लावल्याची बातमी दिवशीच्या वर्तमानपत्रात छापून आणतात. राजकीय प्रवृत्ती मधील ही विकृत्ती कळप मधील चित्रणाचा महत्त्वाचा भाग आहे. कागदी प्रसिद्धी आणि नेतृत्वाच्या हव्यासापोटी ही विकृती निर्माण झाली आहे. समकालीन वास्तवातील वृत्तींचे हे मार्मिक चित्रण आहे.

नेतृत्वातील अहमहमिका चळवळीला नेस्तनाबूत करते. त्यामुळे अंतर्गत कलह वाढत जाऊन चळवळी मूळ हेतू पासूनच फारकत घेतात. एकमेकांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी संघर्षाचा पावित्रा घेतला जातो. चळवळीवर स्वतःचे नियंत्रण ठेवून वर्चस्व सिद्ध करण्याची धडपड केली जाते. कादंबरीच्या शेवटी शंकऱ्या घोसरवाडकरांचे नेतृत्व अमान्य करतो. स्वतः सर्वपक्षीय पुढाऱ्यांना निमंत्रित करुन जटानिर्मूलनाचा कार्यक्रम आयोजित करतो. कार्यक्रमात घोसरवाडकरांवर टीका करतो चळवळींचे रुपांतर राजकारणात होते. चळवळीला राजकारणापासून वाचवण्यासाठी रघू चिलमी शंकऱ्याला राजकारणविरहित चळवळ उभी करण्याचा सल्ला देतो पण शंकऱ्या रघूच्या विचारानाही तिलांजली देतो. अशा राजकीय वृत्ती बरोबर चळवळीमध्ये शहरी वर्चस्ववादी वृत्तींचा शिरकाव कसा होतो हेही त्यांनी दाखवलेले आहे. त्यातून चळवळींची प्रगती होण्याऐवजी केवळ दिशाहीनता वाढत जाते, परीवर्तनापेक्षा प्रसिद्धी, संघटनेपेक्षा विघटन असे ध्रुवीकरण या चळवळीमध्ये होताना दिसते. विशेषतः या काळातील काही बाजारु लेखकांनी चळवळीचा लाभ उठवण्याचे स्वार्थी प्रयत्न केले. कादंबरीत प्रभाकर हळदूलकर या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून हे वास्तव गवस यांनी रेखाटले आहे. ग्रामीण भागातल्या चळवळींविषयी शहरी मध्यमवर्गीय माणसांनी आस्था दाखवून वर्तमानपत्राच्या आधारे परिवर्तनाचा आभास निर्माण करणे अशी विशिष्ट वर्गाची मानसिकता गवस उघड करतात.

देवदासी चळवळीच्या संदर्भातील हे वास्तव त्यांच्या समस्यांची मांडणी करुन चळवळीत वावरणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वर्तनातील विसंगती उघड करते. चळवळीत व्यक्त होणाऱ्या सत्तासंघर्षाची प्रतीकात्मक मांडणी करण्याच्या लेखकाचा हेतू येथे अनेक घटनाप्रसंगातून व्यक्त होतो. देवदासाया समस्यापेक्षा कार्यकर्त्यांना स्वतःचे अस्तित्व, स्वतःची प्रतिमा महत्त्वाची वाटते. त्यामुळे पोकळ विधाने, परिवर्तनाचा दिखाऊपणा यातच चळवळीची तीव्रता विरुन जाते. किंबहुना देवदासी प्रथो समूळ बिमोड करणे या कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या चळवळीला शक्य होत नाही. हे एक समाजशास्त्रीय सत्य येथे लेखक उघड करतो. कार्यकर्त्यांची मानसिकता आजच्या शहरी, वर्चस्ववादी, स्वार्थीवृत्तीने प्रभावित झाली आहे. हे वास्तव समकालीन सामाजिक वास्तवाचे प्रातिनीधिक चित्रण आहे. गवस यांचे सामाजिक भान येथे लक्षणीय स्वरुपात प्रकट झाले आहे. उपेक्षित समाजविषयीची आस्था हीच या लेखनाची प्रमुख प्रेरणा आहे. म्हणून भोवतालच्या वास्तवाला प्रतिसाद देताना लेखक व्यक्तीच्या वर्तनविसंगतीवर नेमके बोट ठेवताना दिसतो. गवस यांचा हा मूलविवक येथे दृष्टीआड करता येत नाही.

## १.४.४ साहित्यविषयक जाणिवांचे रेखाटन

समकालीन समाजातील साहित्यविषयक जाणिवांचे रेखाटन हे दुसरे महत्त्वाचे आशयसूत्र कळप मध्ये दिसते. सामान्यतः ऐंशीच्या दशकापासून लिहू लागलेल्या काही लेखकांचा कल सामाजिक बांधलकीपेक्षा प्रसिद्धी लोलुपतेकडे झुकू लागला. परंपरा आणि वास्तव यांचे नेमके भान विसरलेले लेखक व्यक्तिगत स्वार्थासाठी या व्यवस्थेला शरण गेले. प्रकाशन व्यवहारातील फसवणूक वाढत गेली. शुद्ध वाङ्मय व्यवहारापेक्षा ही व्यवस्था अधिक पैसा केंद्री

झाली. साहित्यिक उपक्रमांतही राजकीय प्रवृत्तींचा शिरकाव झाला. शहरी उच्चभ्रू मानसिकतेचे लेखक प्रसिद्धीच्या हव्यासापोटी शोषितांच्या प्रश्नांवर लिहू लागले. अशा बाजारु प्रवृत्तीविषयी रा. नेमाडे म्हणतात - "एकंदरीत आपल्या साक्षरप्रधान समाजात लिहिण्याच्या कलेचे गांभीर्य पाळले जावे तितके जात नाही. अर्धशिक्षित व इंग्रजी जेमतेम चार बुके वाचू शकणाऱ्या पोरकट विद्वानांनी वैचारिक व टीकाकूल लेखन करण्याचे फार मनावर घेतल्याने व थोडेफार बरे लिहिले, की आपण साहित्यात विशेष काही केले असे समजून लिहिण्याची धंदेबाजी सुरु करणारे कारकुनी लेखक फार झाल्याने वर्तमानपत्रात छापण्याच्या लायकीचे ते मासिकात छापून यावे व मासिकात विसरुन जावे ते पुस्तकातून पुढे यावे, अशी परिस्थिती सध्या आलेली आहे." (नेमाडे, भालचंद्र. हल्ली लेखकाच्या लेखकराव होतो का?, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आ. २ री, २००१, पृ. ३४). भालचंद्र नेमाडे यांनी व्यक्त केलेले वास्तव काही समकालीन लेखकांच्या बाजारु वृत्तीचे निदर्शक ठरते. पैसाकेंद्री व्यवस्थेला साहित्यिक स्वतःच बळी जातात. लेखन स्वातंत्र्य वा शिक्षणाचा प्रसार आणि आविष्कार स्वातंत्र्य यामुळे अभिव्यक्तींचे मार्ग मोकळे झाले तरी आपली स्वत्त्वाची जाणीव विसरणे हे कोणत्याही वाङ्मयीन संस्कृतीला, पर्यायाने समाज-संस्कृतीला पोषक नसते. मंचीय हव्यासापासून आपली सोडवणूक करुन घेणे, बाजारु मूल्यप्रणित तत्त्वांपासून साहित्य व्यवहाराला अलग ठेवणे, राजकीय, धार्मिक अशा दमनशील व्यवस्थांपासून वाङ्मयीन संस्कृतीला वाचवणे हे वाङ्मयीन संस्कृतीच्या निकोप वाढीसाठी पोषक असते. मात्र याचे भान नसलेल्या लेखकांच्या प्रवृत्तीचे प्रातिनिधिक ठरावे असे चित्र गवस यांनी कळपमधून रेखाटलेले दिसते.

साहित्यविषयीच्या वरील सामाजिक अभिसरणाची नोंद घेताना समाजात बोकाळत चाललेल्या वर्तमानपत्री प्रसिद्धी लोलुपता बाळगणाऱ्या मानसिकतो उपहास गवस यांनी केला आहे. शहरापुरते मर्यादीत असलेले वाङ्मयव्यवहार साठोत्तर काळात ग्रामीण भागात पोहोचले. ग्रामीण भागातील हे वाङ्मय व्यवहार गवस यांनी जवळून अनुभवल्यामुळे त्यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांनी आपल्या कथात्म साहित्यातून केले आहे. कळप कादंबरीतील महाजनसर ही व्यक्तिरेखा साहित्यविषयी आस्था असणारी आहे. ते आपल्या विद्यार्थ्यांना एकत्र करुन साहित्य चर्चा मंडळ स्थापन करतात. पण पुढे ही चळवळ मेळावे, संमेलने, प्रसिद्धी या उपक्रमांच्या दृष्टचक्रात अडकते. साहित्याचे वर्गीय मानसिकतेतून वर्गीकरण करणे, वाङ्मयीन चळवळीतही सवतेसुभे निर्माण करणे अशा विविध विषयांवर केवळ दिशाहीन चर्चा आणि दिशाहीन वक्तव्यें केली जातात. याविषयीची उपहासपूर्ण टीका कादंबरीत आली आहे.

साहित्य चळवळ व साहित्य व्यवहार यांच्या नावाखाली समाजात वाढत चाललेल्या अनेक वर्तनविकृती गवस यांनी रेखाटल्या आहेत. वाङ्मय व्यवहाराचे इतके स्पष्ट चित्र अन्य मराठी साहित्यात क्वचितच दिसते. प्रकाशन संस्थांकडून अनुदान घेऊन पुस्तके लिहिणारे लेखक, उपेक्षित समाजात जन्म घेऊनही स्वतःच्या समाजाकडे तिरस्काराने पाहणारे लेखक, नवोदित लेखकांचा आत्मविश्वास हिरावून घेणारे, स्वतःच्याच लेखनाच्या प्रेमात असणारे लेखक, साहित्याचा रुपवादाच्या आहारी जाऊन विचार करणारे साहित्यिक या चित्रणात दिसतात. या

कादंबरीतील प्रभाकर हळदुलकर, राघव गोविलकर, सदानंद शिरगावकर, आबासाहेब आर्य, कवी कर्णिक, समीक्षक कुंडलगावकर सूर्यभान बलुतेदार, सुरेश संकेश्वरी अशा व्यक्तिरेखा समकालीन लेखकांच्या विविध प्रवृत्तींचे प्रातिनीधिक नमुने आहेत. प्रभाकर हळदुलकर हा लेखक अनुदान संस्कृतीचा बळी ठरतो. सूर्यभान बलुतेदार हा प्राध्यापक आपल्याच कवितांच्या प्रेमात अडकून पडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या काव्य लेखनाकडे आस्थेने पाहू शकत नाही. वास्तवाच्या यथायोग्य आकलना अभावी या लेखकांनी केलेले साहित्य व्यवहार व त्यावरचे त्यांचे भाष्यही हास्यापद ठरते. मात्र हे साहित्यिक सभा-संमेलनातून मिरवतात. आविष्कार स्वातंत्र्यामुळे मिळालेल्या संधीचा आधार घेऊन मराठी वाङ्मयपरंपरेचे ज्ञान नसतानाही समीक्षा क्षेत्रात वावरतात. कथेत घटना-पात्र-प्रसंग, आरंभ, मध्य, शेवट हे पाळलंच पाहिजे. या फडकेप्रणित तंत्रवादाचा अकारण आग्रह धरणारे, वास्तवाचे आणि देशीयतेचे भान नसलेले, उथळ मानसिकतेचे, स्वतःला समीक्षक मानणारे असे अनेक लोक वाङ्मय व्यवहाराला विकृती आणतात. कित्येक लेखक म्हणवणाऱ्यांना आपल्या समाजसंस्कृतीची नीट ओळखही नसते असे लोक या काळात साहित्यक्षेत्रात वावरु लागल्याचे दिसते. अशा लेखकांच्या मानसिकतेचा उपहास गवस यांनी प्रस्तुत कथनातून केला आहे.

या काळातील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे साहित्यासारखी सांस्कृतिक व्यवस्था अर्थकेंद्री झाली. त्यामुळे मानधन, प्रवासखर्च घेतल्याशिवाय साहित्यिक उपक्रमांना उपस्थित न रहाणे, पैसे घेऊन पुस्तके प्रसिद्ध करणे, स्वतःचे कळप करुन राजकारण करणे अशा गोष्टी ऐंशीच्या दशकापासून साहित्य-संस्कृतीमध्ये वाढत गेल्या. ग्रामीण भागातील छोट्या-मोठ्या साहित्यिकांमध्येही अशा वृत्ती वाढीस लागल्या, याचे अनेक तपशील गवस यांच्या कथात्म साहित्यात आले आहेत. चळवळीच्या नावाखाली संपर्क दौरे आयोजित करणे, नवलेखक शिबिरे, चर्चासत्रे, मेळावे, परिषदा संमेलने अशा उपक्रमातून साहित्यापेक्षा साहित्यबाह्य, उत्सवी गोष्टीवर अधिक भर देण्यात येऊ लागला. साहित्याचे वर्गीकरण, साहित्यिक उपक्रम महानगरी, पांढरपेशा मानसिकतेतून करणे सुरु झाले. ग्रामीण समाजात या उपक्रमांचा वा चळवळींचा प्रसार सुरु झाला तेव्हा गावगाड्यातील कलाप्रकार, सांस्कृतिक भिन्नता विचारात घेतली गेली नाही. या समकालीन वास्तवाचा आविष्कार गवस यांच्या कळपमधून झाला आहे त्यामुळे अवकाशाचे अधिक वास्तव चित्रण येते. गावपातळीवरील वाङ्मय व्यवहारांचे अशा प्रकारचे चित्रण मराठी कादंबरीत फारसे आलेले नाही. बदलत्या गावगाड्यातील नव्या जाणिवांचे प्रकटन येथे होते. म्हणूनच गवस यांनी या समकालीन वास्तवाला कथात्म साहित्याच्या केंद्रस्थानी आणले असे म्हणता येइल.

## १.४.५ शैक्षणिक आणि आर्थिक संस्थांमधील भ्रष्टाचाराचे दर्शन

शैक्षणिक आणि आर्थिक संस्थांमधून वारणाऱ्या व्यक्तींच्या राजकीय आणि भ्रष्टाचारी वृत्तींचे दर्शन घडविणे असे आणखी एक आशयसूत्र कळपमध्ये आले आहे. सामाजिक मूलव्यवस्थेचे रक्षण करणारी शिक्षण व्यवस्थाच स्वातंत्र्योत्तर काळात भ्रष्टतेच्या विळख्यात सापडली. वरील भौतिक सुखकेंद्री मानसिकतेच्या प्रभावामुळे ती पोकळ, सत्वहीन आणि

अविश्वासार्ह वाटू लागली. या व्यवस्थेत वावरणाऱ्या, स्वतःला प्रतिष्ठित म्हणवून घेणाऱ्या व्यक्तींनी आपल्या अप्रामाणिक वर्तनाने या व्यवस्थेचे अवमूल्यन केले. प्राचार्य, प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचा जातीवरुन अवमान करणे, नोकरभरतीमध्ये, व्यवस्थापनामध्ये अधिकाराच्या बळावर शिक्षकांना वेठीस धरणे असे प्रकार या व्यवस्थेत सर्वत्र दिसू लागलेत. कळप कादंबरीतील प्राचार्य झेड. बी. साने कारकून म्हणून काम करणाऱ्या रघूला अकारण डिवचत राहातो. शाळा तपासणीच्या कामावेळी ग्रंथ खरेदीची, न केलेल्या आर्थिक व्यवहारांची खोटी देयके तयार करुन भ्रष्टाचार केला जातो. सरकारी अधिकाऱ्यांना पैशाची लालूच दाखवून अशा व्यवहारांना मंजुरीही मिळवली जाते. शिक्षणाप्रमाणे सहकारक्षेत्रातही राजकीय आणि भ्रष्ट मानसिकता कशी निर्माण झाली या विषयीचे वास्तव गवस यांनी एस. डी. या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून घडविले आहे. पतसंस्था स्थापन करणे, कर्ज वाटप करुन वसूलीसाठी सामान्य गरिबांचा मानसिक छळ करणे आणि संस्थेच्या आर्थिक व्यवहारात भ्रष्टाचार करणे या प्रवृत्ती आधुनिक गावगाड्यातील सहकार क्षेत्रातील विकृतीच आहेत. या विकृतींचे चित्रण कळपमधील काही प्रसंगातून झालेले दिसते.

## १.४.६ गावगाडा कृषीसस्कृंतीचे चित्रण

गावगाडा कृषिसंस्कृतीचे चित्रण करतात म्हणून राजन गवस यांना ग्रामीण लेखक संबोधणे योग्य आहे, पण ते केवळ ग्रामीण लेखक आहेत असे म्हणता येत नाही. कारण त्यांनी दलित जीवनापलिकडचे जीवन आपल्या समग्र कथात्म साहित्याच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. ग्रामीणता आणि दलितत्व ह्या गोष्टी वेगळ्या वाटत असल्या तरी दलितत्व हे ग्रामीणतेचे एक अंग ठरते, ही जाणीव यांच्या साहित्यातून यथायोग्य रीतीने प्रकटली आहे. मराठीत ग्रामीण साहित्य ही संकल्पना अनेकांनी एकांगीपणाने वापरली. अनेक ग्रामीण लेखकांच्या लेखनात गावगाडा एकांगी रुपात व्यक्त झालेला दिसतो. केवळ गावगाड्यातील मूठभर अभिजनांचे विश्व, त्यांच्या परंपरा, श्रद्धा-समजुती म्हणजे ग्रामीणता नव्हे. किंवा निसर्गाचा माणासांच्या जीवनावरील प्रभाव, जीवनाची अपूर्णता इतक्या माफक रुपात गावगाडा आकाराला आलेला नसतो. या सर्व गोष्टींबरोबर आणखी अनेक गोष्टीत गावाचे अस्तित्व असते. अभिजनांबरोबर देवदासी, जोगते, महार, मांग, परिट, न्हावी हे सारेच उपेक्षित गावगाड्याचे घटक आहेत. गावगाड्याच्या संस्कृतीमध्ये त्यांचे-त्यांचे असे स्थान आहे. ब्राह्मणी मानसिकतेने त्यांच्यामध्ये भेदाभेद करण्याचा प्रयत्न केला. ह्या कृत्याच्या निषेध गवस व्यक्त करतात आणि अनुभव व्यक्त करतात. गावगाड्यातील ब्राह्मण जातीमधील कोणत्याही व्यक्तीचे चित्रण गवस यांनी एकूण समाजव्यवस्थेवर, व्यवस्थेतील सर्व जाती-जमातींमधील व्यक्तींच्या मानसिकतेत ब्राह्मण्य ही वर्चस्ववादी प्रवृत्ती कशी असते याचे मात्र दर्शन मार्मिकपणे घडवले आहे. चळवळी, संस्थात्मक व्यवहार, साहित्य, सहकारक्षेत्रे अशा अनेक घटकांवर ह्याच मानसिकतेचा कसा प्रभाव आहे आणि तो कसा विघातक आहे त्यांचे तपशीलवार चित्रण गवस यांनी केले आहे. येथे अधिसत्ताविरोधी जाणीव म्हणून देशीयतेचे संदर्भ महत्त्वाचे ठरतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) गवस यांच्या कळप कादंबरीच्या आशयाचे विविध पैलू थोडक्यात सांगा.

## १.४.७ कळप कादंबरीतील लेखकाची जीवनदृष्टी

लेखकाच्या जीवन जाणिवेला लेखकाची नैतिकता असेही म्हणतात. अशी नैतिकता प्राधन्याने लेखकाने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियातून दिसते. कळप कादंबरीत लेखकाच्या जीवन जाणिवेचे प्रत्यंतर अनेक घटनाप्रसंगातून येते. तसेच कळप मध्ये रघू या नायकपात्राच्या माध्यमातून या प्रतिक्रिया व्यक्त केल्या जातात. रघू भोवतालच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवविषयी सजग असल्यामुळे जेथे जेथे विसंगती जाणवते. तेव्हा त्या वास्तवविषयी त्याच्या कडवट, नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होतात. गावगड्यातील वा शहरातील माणसांच्या वर्तनातील दांभिकता, प्रतिष्ठेच्या अवास्तव कल्पना, भौतिक सुखकेंद्री मनोवृत्तीला नकार देणे, अंधश्रद्धाळूपणा, शिक्षण, राजकारण, चळवळी, साहित्यव्यवहार अशा संस्थात्मक व्यवहारातील विकृती, आक्रमक शहरी मनोवृत्ती आणि अशा गोष्टींचा निषेध करुणे, स्त्रिया, उपेक्षित यांच्याविषयी आत्मीयता त्यांच्या स्थितीगतीविषयीच्या प्रतिक्रिया व्यक्त करणे तसेच गावगड्याविषयी आस्था व्यक्त करणे ही राजन गवस यांच्या नैतिक जाणिवेची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतात.

सामाजिक कार्यात वावरणाऱ्या व्यक्ती, शिक्षणक्षेत्रातील व्यक्ती, चळवळीतील कार्यकर्ते, पतसंस्था चालवणारे, लेखक-प्रकाशक अशा वरकरणी समाजात प्रतिष्ठा असणाऱ्या पण छुप्या मार्गांनी भ्रष्ट आचरण करणाऱ्या व्यक्तींच्या वर्तनातील अप्रामाणिकपणा व्यक्त करणे हा गवस यांच्या नैतिकतेचा महत्वाचा विशेष होय. कादंबरीतील तरुण आणि सभोवतालची माणसे यांच्या विचारात एकप्रकारचा मूल्यसंघर्ष जाणवतो. सामाजिक क्षेत्रांत वावरणाऱ्या अशा माणसांच्या दांभिक, अहंकारी, अप्रामाणिक वृत्तींचा उपहास हे नायक प्रकर्षाने करतात. कळप कादंबरीतील रघू चिलमी भोवतालच्या सामाजिक घडामोडीबाबत सतत सजग असणारा नायक आहे. त्याची ग्रामीण जीवनावर श्रद्धा आहे. त्यामुळे तो ग्रामीण वास्तवातील विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवतो. स्वतःला समाजसेवक किंवा राजकारणी समजणाऱ्या व्यक्तींच्या वर्तनातील विसंगतीकडे तो उपहासात्मक दृष्टीने पाहतो. कळप कादंबरीमधील आबा

घोसरवाडकर हे समाजवादी, स्वातंत्र्यसैनिक गाथी पक्ष व विद्यार्थी संघटना चालवतात समाज त्यांना समाजसुधारक म्हणूनच ओळखतो. परंतु इंग्रजांच्या काळात लुटलेला पैसा हडप करणे, नातेवाईकांना फसवणे, दादा कोतोलीकर या तरुणाच्या घराचा त्याच्या आईशी अनैतिक संबंध ठेवून विध्वंस करणे, सामाजिक कार्यासाठी मिळालेल्या पैशाचा अपहार करणे या त्याच्या आतल्या कटकारस्थांनाची माहिती मिळाल्यावर रघूला त्याची चीड येते. रघू त्याला उपहासाने 'गांधीनंतरचा महात्मा' असे संबोधतो. तसेच देवदासी चळवळ चालवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनातली वर्तमानपत्री प्रसिद्धीची हाव त्याला तिरस्करणीय वाटते. चळवळीतील कार्यकर्त्यांच्या वर्तनाला तो वैतागतो व कडवट प्रतिक्रिया व्यक्त करतो. स्वतंत्र विचारसरणी आणि बुद्धिमत्ता असूनही स्वतःला राजकीय व्यक्तींच्या दावणीला बांधून तरुणांची फसवणूक करणारे प्राध्यापक, तथाकथित बुद्धिवादी रघू चिलमीला दांभिक वाटतात. त्यांच्या या वर्तनामुळे रघू अस्वस्थ होतो. आदर्शवादाचे कातडे पांघरुन वावरणारी व समाजाची दिशाभूल करणारी माणसे रघूला वाळवीच्या किड्यासारखी वाटतात. त्यांच्या वर्तनातील शूद्रता त्याला परात्म बनवते.

लेखकाच्या देशी नैतिकतेचा प्रत्यय लेखकाने शहरी संस्कृतीवर, भौतिक सुखकेंद्री मनोवृत्तीवर जे भाष्य केलेले आहे त्यातून येतो. शहरी-पांढरपेश्या मनोवृत्तीचा उपहास करणे हे गवस यांच्या ग्रामीण, देशी नैतिक मूल्यदृष्टीचा महत्त्वाचा विशेष होय. शहरातील भौतिक सुखकेंद्री मनोवृत्तीचा तिटकारा आणि गावगड्याविषयीची आस्था या देशीयतेच्या जाणिवेमधून अशी जीवनदृष्टी लेखकाने अंगिकारलेली दिसते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर कृषिसंस्कृतीचे संस्कार बालपनापासून झाल्यामुळे भूमीविषयीचे प्रेम, मानवेतरांविषयीचा कळकळा ही मूल्ये त्यांच्या लेखनातून स्वभावातःच प्रतीत होतात. शहरी मानसिकतेला हास्यापद ठरवण्याची वृत्ती याच देशीपणाच्या संस्कारातून विकसित झाली असे म्हणता येते. काही शहरी लेखकांची बाजारु मनोवृत्ती, शहरात सामाजिक कार्याच्या आभासातून निर्माण झालेल्या चळवळी, गावगड्याकडे, तेथील संस्कृतीकडे तिरस्कृत नजरेने पाहण्याची मनोवृत्ती, दिखाऊपणा याविषयी लेखकाला चीड आहे. शहरातल्या भवितव्यलक्षी मनोवृत्तींचाही रघूला संताप येतो. शहरी तरुणांच्या मोठेपणाच्या कल्पनेविषयी रघूचे हे मत व्यवस्थेचा उपहास करणारे ठरते. अर्थात अशा दृष्टीमुळे लेखकावर व्यक्ती वा प्रदेशदोषाचा आक्षेप घेता येत नाही. शहरी पांढरपेशी, बाजारु, भौतिकसुखकेंद्री मनोवृत्ती नाकारतो कारण गावगड्यातील संस्कारामुळे त्याला गावगड्यातील समन्वयवादी, निसर्गाचा तोल सांभाळून धरणारी, अकृत्रिम जीवनशैली त्याला महत्त्वाची वाटते. याचा अर्थ असा नव्हे की, गावगड्यातील जे जे सर्व ते ते स्वाकारार्य आणि शहरातील सारेच निंदनीय, गवस फक्त शहरातील अतिरिक्त भौतिकसुखाच्या कल्पना नाकारताना दिसतात. लेखकाची ही स्वतंत्र मूलदृष्टी आहे, ती प्रस्थापित समाजाहून आलग आहे. त्यामुळे येथे प्रदेशतिरस्काराचा दोषारोप अप्रस्तु ठरेल.

कळप कादंबरीत देवदासींच्या जीवनावर कादंबरी लेखन करण्याच्या निमित्ताने आलेला प्रभाकर हळदूलकर हा लेखक जेव्हा देवदासींच्या मुलीशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. बाजारु लेखकांच्या लेखनापेक्षा कृषीजीवनातील कोणताही उद्योग श्रेष्ठ असतो असे रघू, शंकऱ्या यांना वाटते. काव्य वाचनाच्या कार्यक्रमाला स्त्री श्रोता म्हणून आयोजकांना अर्वाव्य शब्दांत

बडबडणारे कवी कर्णिक, कथाकथनासाठी मानधन प्रवास खर्चाचा आग्रह धरणारे शं. पी. साळोखे, दलित समाजातील असूनही ब्राम्हणी जीवनपद्धती अंगिकारणारे राघव गोविलकर या लेखकाच्या जीवनातील कृत्रिमता लेखकाने हास्यापद ठरवलेली आहे. मध्यमवर्गीय पांढरपेश्या मानसिकतेमुळे मराठी साहित्यात साचेबंदपणा निर्माण झाला. सामान्य लेखकांना श्रेष्ठ मानून त्यांच्या लेखनाचा अवास्तव गौरव केला गेला, याविषयी रघू कडवट प्रतिक्रिया व्यक्त करतो. लेखकांची वाचकानुनय करण्याची प्रवृत्ती रघूला तिरस्कारणीय वाटते. साहित्याकडे बघण्याच्या वास्तववादी दृष्टिकोणामुळे अशा प्रतिक्रिया उमटतात. ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे उदात्तीकरण करुन वाचकांना आकृष्ट करण्यासाठी हे रंजनप्रधान लेखन करणाऱ्या लेखकांच्या जीवनदृष्टीचा उपहास प्रस्तुत लेखकाने केला आहे.

साहित्याकडे जातीय आणि धार्मिक दृष्टीने पाहण्याच्या प्रवृत्तीचाही उपहास लेखकाने केला आहे. लेखकत्व सिद्ध करण्यासाठी जातधर्म नाकारणे हे त्यांना योग्य वाटत नाही. या काळात मुसलमानांना धर्मांध ठरवून त्यांचा द्वेष करण्याची प्रवृत्ती साहित्यक्षेत्रातही शिरली. धर्माच्या नावाखाली होणारे माणसांचे विभाजन रघूला मान्य नाही. तर भारतासारख्या बहुधर्मीय सामाजिक वास्तवात जगताना व्यापक सहभावाची गरज प्रत्येकानेच ठेवली पाहिजे. अशी भूमिका तो व्यक्त करतो. केवळ जातीय आणि धार्मिक द्वेष साहित्य वा अन्य सामाजिक संस्थांना बाधक ठरतो. अशा प्रवृत्तींबरोबर प्रकाशकांच्या मनमानी, मुजोर वर्तनाविषयी रघूला क्रोध येतो. लेखकांना लाचार बनवणाऱ्या प्रकाशकांच्या प्रवृत्तींचा तो निषेध करतो. लेखक हा प्रकाशकाहून श्रेष्ठ असायला हवा पण प्रकाशक लेखकांना स्वतःच्या दावणीला बांधून त्यांचे अवमूल्यन करतात. अशा मुजोर प्रकाशकांविषयी रघूचे वरील भाष्य उचित ठरते.

स्त्रियांकडे पहाण्याचा लेखकाचा दृष्टिकोण किती आत्मीयतेचा आहे. याविषयीचा अनेक खुणा कळप कादंबरीत दिसतात. रघूच्या व्यक्तिचित्रातून लेखकाने हा आपला दृष्टिकोण व्यक्त केला आहे. प्रा. समनाडीकर यांच्या बरोबर रघू देवदासीप्रथा निर्मूलन चळवळीत कार्य करतो. तेव्हा त्याला त्यांच्या जीवनाचे अनेक विदारक अनुभव येतात. देवदासींची मोजणी करताना कमळा नावाची जोगतीण आपल्या जन्माचे कसे मातेरे झाले त्याविषयी सांगते. तिची करुण कहाणी ऐकल्यावर रघू म्हणतो - "मला म्हातारीचा सुरकुतलेला चेहरा भलताच अस्वस्थ करायला लागला. सगळं खोपाट माझ्या भोतेभोरं फिराय लागलं." (पृ. १८) तिच्या वेदनांच्या जाणिवेमुळे रघू अस्वस्थ होतो. देवधर्माच्या नावाखाली होणाऱ्या स्त्रियांच्या शोषणामुळे त्याची मानसिकता विस्कटते व तो देवालाच शिव्या देऊ लागतो. त्यांच्या जगण्याविषयी प्रतिक्रिया देताना स्वतःशीच उदगारतो - "सारखंसारखं तेच ते ऐकणं कोण नवसासाठी यल्लमाला सोडलेली. तर कोण डोक्यात जट झाली म्हणून कोण गादी चालवायला तर कुणाचं लगीनहोत नव्हंत म्हणून. सगळ्यांच अतृप्त आणि कोंडलेल्या प्रत्येकीच्या डोक्यात नवं दुःख. नवी खदखद. त्यांच्या पदराआड लपलेल्या शरीराचे हुंदके. कुणाची निर्ढावून गेलेली मानसिकता तर कोण स्वतःच कुढत बसलेली. कुणाला चोरट्या सुखाची सवय लागलेली. तर कोण राजरोस पुरुष ठेवून जगणारी. कोण जगण्याची हिंमत हरलेली. तर कोण सूड म्हणून प्रत्येक गोष्ट बिनधास्त

करणारी. एक ना हजार प्रकारच्या बायका. चार दिवसात माझ्या मेंदूचा भुगा झाला आणि देव किळसवाणा वाटाय लागला. च्या मायला, किती होतो आपण अडाणचोट!" (पृ. १९) रघूला देवाच्या अस्तिवाचीही किळस येते आणि आपल्या संस्कृतीचीही. देवदासींचे हे विराट दुःख शोषणसत्तेतून आल्याचे समनाडीकर सांगतात. तेव्हाही रघूला दुःखाची तीव्रता अस्वस्थ करते. अशा स्त्रियांच्या दुःखाकडे तटस्थपणे पाहताना त्याला त्या साहित्याहूनही श्रेष्ठ वाटतात. ग्रंथातून जीवनविषयक सत्य मांडले जाते तेच सत्य उघड करण्याची ताकद देवदासीच्या जीवनव्यथातही असते हे रघूच्या भाष्यातून जाणवते. याच जीवनजाणिवेमुळे देवदासीकडे विकृत नजरेने पाहणाऱ्यांबाबत रघू चीड व्यक्त करतो. धार्मिक शोषणाचे स्वरुप कळून देवदासींना जगण्याचे नवे भान चळवळीमुळे येईल, यावर त्याचा विश्वास आहे. देवदासींच्या हतबलतेमुळे सुद्धा रघूला आत्मवेदना होतात. त्याला विविध प्रश्न पडतात. पण हे उत्तर नसलेले प्रश्न रघूला नवसर्जनाची प्रेरणा देतात. कारुण्यातून आलेली अस्वस्थता त्याला लेखनप्रवण बनवते. वास्तवाच्या प्रखर दर्शनाने रघू अस्वस्थ होतो.

'राजकारणी आणि भ्रष्टाचारी व्यक्तीपेक्षा जोगतिणी प्रामाणिक असतात' असे रघूला वाटते. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अनैतिक जीवनापेक्षा देवदासींचे स्वाभाविक वर्तन हे प्रामाणिक आणि स्वाभिमानपूर्ण आहे. असे रघूला वाटते. ह्या चित्रणात लेखक कोठेही लैंगिक व देहवर्णनापेक्षा त्यांच्या समोर उभ्या राहणाऱ्या समस्यांचे, त्या समस्यांतून आलेल्या दुःखाचे, वैतागाचे, भ्रमनिरासाचे गडद चित्र रेखाटले जाते. समाजात विधवा स्त्रियांविषयी, त्यातही तरुण विधवांविषयी आत्मीयतेची भावना असतेच असे नाही. अशा स्त्रिया आपले जीवन एकाकी, अभोगीपणातच घालवतात. गवस यांनी मात्र आपल्या लेखनातून अशा स्त्रियांविषयी केवळ सहानुभुतीची भावना व्यक्त न करता समजूतदारपणाची भावना व्यक्त केला आहे. कळप कादंबरीत विवाह होऊनही अभोगी राहिलेली बायना आपले दुःख रघूकडून पत्र लिहून घेऊन नवऱ्याला कळवते. लग्न होऊनही अभोग राहिलेली बायना जेव्हा शरीर भूक भागविण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करते तेव्हा मात्र ती रघूजवळ भावनाविवश होऊन कबूलही करते. "तिचं काय चुकलं? तिन तरी करायचं काय?" असे प्रश्न रघूला सतावत रहातात. एकटेपणाने, वैधव्यात जगणाऱ्या स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण अनुदार असतो. त्यामुळे तिच्यासमोर अस्तित्वाचे अनेक प्रश्न उभे रहातात. रघू बायना वहिनींची भावना तिचे प्रश्न समजून घेतो. अत्यंत त्रोटक संदर्भातून लेखकाने बायनावहिनीचे व्यक्तिचित्र रेखाटून अशा एकाकी स्त्रियांविषयीची आपली आस्था प्रकट केली आहे.

## १.४.८ 'कळप' कादंबरीचे निवेदन

गवस यांनी कथात्म साहित्यात निवेदनाचे वेगवेगळे प्रयोग केले आहेत. आशयाला सूचकतेची वेगवेगळी परिमाणे देणारे निवेदनतंत्र हे गवस यांच्या लेखनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. ही सूचकता निवेदनाच्या प्रारंभापासूनच येते. तशी ती कादंबरीच्या शेवटच्या निवेदनातही दिसते. कथात्म पातळीवर काढलेले एक सामाजिक व्यवहारांचे तात्पर्यात्मक भाष्य निवेदनाच्या शेवटी दिसते. कधी लेखकाला किंवा लेखकाच्या जीवनदृष्टीचे प्रतिनीधित्व करणाऱ्या पात्रांना

समाजव्यवहारांविषयी जाणवलेले सत्य, येथे कधी कृतीतून तर कधी उक्तीद्वारे अभिव्यक्त केले जाते. कधी संवेदनशील म्हणून जगताना विकृत समाज व्यवहारामुळे आलेली हतबलता, निराशा, वैताग अशा भावनांही व्यक्त केल्या जातात. अर्थात हे तात्पर्य निवेदनाला आकर्षक बनविण्यासाठी येत नाही तर ते कथाशयाचा एक अपरिहार्य भाग असते. त्याचा संबध लेखकाच्या नैतिकतेशी असतो. यादृष्टीने गवस यांच्या कादंबऱ्यांची सुरुवात व शेवट मुळातून पाहण्यासारखे आहेत.

निवेदनातून कथानकाला गती देणे, पात्ररेखाटन करणे, परस्परांतील संघर्ष व्यक्त करणे, जीवनदृष्टीचे प्रकटन करणे असे विविध हेतू साध्य केले जातात. गवस यांनी निवेदनात वक्तृत्वाचा, संवादाचा तर कधी साध्या कथनशैलीचा वापर केलेला दिसतो. पात्ररेखाटन, अवकाश वर्ण, भाष्य यासाठी निवेदनाचा वापर करताना गवस यांनी विविध तंत्रांचा वापर केलेला दिसतो.

## १.४.९ 'कळप' कादंबरीतील पात्रचित्रण

रघू हे कळप कादंबरीतील मध्यवर्ती पात्र आहे. या शिवाय शंकऱ्या, दिलावर, आप्पया असे रघूचे समकालीन मित्र, आबा घोसरवाडकर, आबा चिंचवाडे, प्रा. सनमाडीकर, प्रा. महाजन, प्रा. बलुतेदार, दादा कोतोलीकर, बायना वहिनी, मुख्याध्यापक साने, एस. डी. अशी पन्नासाहून अधिक पात्रे या कादंबरीत येतात. राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील पात्रचित्रण वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे चित्रण कादंबरीततील वास्तवाप्रमाणे बदलताना दिसते. लेखकाच्या नैतिकतेचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे विशिष्ट विचारसरणी घेऊन व्यक्त होतात. काही पात्रे लेखकाच्या उपहासप्रधान शैलीतून व्यक्त होतात. वर्णनातून, संवादातून, विशिष्ट मानसिकतेतून, पात्रांच्या प्रतिक्रियांतून आणि विशिष्ट कृतीतून पात्रांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रत्यय दिला जातो. कमीत कमी घटना-प्रसंगातून व्यक्त झालेले एखादे पात्र वाचकमनावर प्रभाव पाडणारे असते. (उदा. बायना वयनी, दादा कोतोलीकर) कारण लेखक आपल्या आस्थापूर्ण दृष्टीतून आणि नायकपात्राच्या भावजीवनाशी नाते सांगत अशा पात्राचे वर्णन करतो. अशा पात्रांच्या कौटुंबिक आणि सामाजिक अवस्थेविषयी वाचकांच्या मनात जिव्हाळा, प्रेम, सहानुभूती आणि करुणा निर्माण होते. गवस यांच्या कथात्म साहित्यात गावगाडा चित्रित होत असला तरी कादंबरीत शहरातील पात्रे सुद्धा भेटतात. विविध जीवनस्तरातील पात्रे त्यांच्या कथात्म साहित्यात येतात. त्यामध्ये देवदासी, जोगते या पंथातील स्त्री-पुरुष, महार, मांग अशा विविध जातीचे लोक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, बेकार तरुण, गावचे पाटील, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, समीक्षक, लेखक, प्रकाशक, लोककलाकार, शहरातील डॉक्टर, पत्रकार, शोषित स्त्रिया, नायक, नायकपात्रांचे आई-वडील, मित्र मंडळी, वतनदार, नव्या विचारांच्या तरुणी, गिरणी कामगार, बँक कर्मचारी अशी अनेकविध पात्रे येतात. गावगाडा हा गवस यांच्या लेखनाचा अवकाश आहे. ते जी नैतिक जीवनदृष्टी व्यक्त करतात त्यासाठी विशिष्ट पात्रांचा एक विशाल पट उभा करतात, कारण हे चित्रण एका व्यक्तीपेक्षा समूहाचे असते. ही माणसे त्यांच्या बाह्य रंगरुपापेक्षा आंतरिक रुपातून म्हणजेच प्रवृत्तींद्वारे चित्रित होतात. पात्रांच्या प्रवृत्तीप्रमाणे

त्यांची मन:स्थिती, मानसिकता, दु:ख, वेदना त्यांचे विचार, कल्पना, त्यांना वाटणारी विशिष्ट गोष्टींविषयीची आस्था वा अनास्था व त्यांची अंगभूत कौशल्ये यांचेही दर्शन पात्रचित्रणातून होते. या पात्रचित्रणाची काही ठळक वैशिष्ट्ये नोंदवता येतील.

गवस यांच्या कथात्म साहित्यातील पात्रचित्रणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या शोषित-पीडित, दु:खीकष्टी तसेच गावगाड्याचे रक्षण करुन समाजात सहकार्य, सांमजस्य निर्माण करु पाहणाऱ्या पात्रांविषयी लेखकाला आस्था आहे; त्यांचे वर्णन साध्या स्वाभाविक शैलीत वा शब्दांत केले जाते. उलट कृत्रिम जीवनशैली वा विकृत, विघातक मानसिकता घेऊन वावरणाऱ्यां पात्रांविषयी ते उपहासप्रधान वर्णनशैलीचा वापर करतात. पात्रांच्या दर्शनी रुपाविषयी मोजक्या शब्दांत वर्णन केले जाते, तरी त्या मागील लेखकाचा हेतू सहज लक्षात येतो.

आबा घोसरवाडकर खुर्ची टाकून काळ्या काचेच्या चष्म्यातून पाहत जीभल्या चाटत बसलेले. (पृ. ३२)

कुरळ्या केसाचे गरगरीत देहाचे गोरुले. (पृ.४०)

अशा प्रकारे एखाद दुसऱ्या विधानातूनही पात्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोण प्रत्ययाला देतो. उपहासप्रधान भाषेद्वारे केलेले पात्रांचे वर्णन लेखकाच्या जाणिवेशी नाते सांगणारे आहे. शहरी मानसिकतेत व ऐटबाजपणात वावरणाऱ्या व्यक्तिंविषयी रघूला तिटकारा आहे. पोषाखी, पांढरपेशी, अर्थकेंद्री मानसिकताच त्याला तिरस्करणीय वाटते. या जाणिवेतून त्यांचे व्यक्तिवर्णनही केले जाते. वरील व्यक्तीबरोबरच प्रभाकर हळदूलकर हा लेखक, मुख्याध्यापक झेड. बी. साने, क्लार्क मेवेकर यांची व्यक्तिचित्रे अशाच शैलीत रेखाटली आहेत. या चित्रणातून व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रणशैलीची आठवण होते. माडगूळकरांनी रेखाटलेली पात्रे अशीच मोजक्या शब्दांत पण ठसठशीतपणे उभी राहतात.

सामाजिक विकृतीचा, विसंगतीचा संवेदनशील पात्रांच्या मन:स्थितीवर परिणाम होतो. कळप मधील रघू, विकृत सामाजिक वास्तवाच्या अनुभवामुळे हतबल होतो. त्याच्या मनातील परात्मता, हतबलता व्यक्त होते. त्याला ही हतबलता झुगारुन देता येत नाही, नाकारताही येत नाही. आत्मवंचनेशिवाय तिला कोणताच पर्याय देता येत नाही. मेंदूत कोणतीतरी नशा चढवूनही सभोवतालच्या माणसांच्या खलप्रवृत्ती विसरता येत नाहीत अशी त्यांची अवस्था होते. साहजिकच रघू आपली हतबलता, परात्मता, वैताग अशा भावना आत्मसंवादातूनच व्यक्त करतो. या आत्मसंवादांचा सूर काहीवेळा आत्मटीकेचाही असतो. आपण निष्क्रिय आहोत, आपण परिस्थिती बदलण्यास अपुरे आहोत, आपण विनाकारणच ह्या सामाजिक कार्यात आलो याविषयीची खंत त्याला वाटते. त्यांची ही मानसिकता गवस यांनी सापेक्षतेने रेखाटली आहे. "च्या आयला, आपण चळवळ बिळवळ, लेखन-बिखन, तात्त्विकता फिकविकता असल्या फालतू लफड्यात फुकट अडकलो. भिकारचोट आपण. उद्योग भिकारचोट. एकदम डोकं औट." (पृ.२१६) रघू आत्मवंचना करतो. याचा अर्थ तो आपली संवेदनशीलता हरवून बसला आहे असे नव्हे उलट प्रखर संवेदनशीलतेमुळेच त्याला चीड, संताप येतो. खलप्रवृत्तीच्या सामाजिक कार्यकर्त्याविषयी चीड व्यक्त करणारा रघू शोषित स्त्रियांबाबत मात्र कमालीचा हळवा होतो.

सनमाडीकर हे पेशाने प्राध्यापक असले तरी ते एक कार्यकर्ता म्हणूनच चित्रित होतात. त्यांची मानसिकता त्यांच्या विचारातून दिसते. त्यांना देवदासी प्रथा निमूर्लन चळवळी विषयीची आस्था व तळमळ दिसते. सामाजिक कार्यकर्ता अशी त्यांची प्रतिमा या विचारांतून उमटते. पात्रांच्या उक्तीप्रमाणे बारीकसारीक कृतीसुद्धा पात्रचित्रणाला परिणामकारकता आणण्यासाठी गवस यांनी रेखाटल्या आहेत. सर्वसाक्षी निवेदनामध्ये पात्रांच्या कृतींचे अनेक तपशील त्यांची भावस्थिती व्यक्त करण्यासाठी दिले जातात. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथात्म साहित्यात अनेक पात्रे त्यांच्या कृतीतून, भावमुद्रातून रेखाटली आहेत. तशीच शैली येथेही प्रत्ययाला येते. पात्रांच्या कृतीतून त्यांच्या देहरुपापेक्षा त्यांचे मानसरुप अधिक प्रत्ययकारिरीत्या व्यक्त होते. गवस यांच्या साऱ्याच लेखनातून पात्रांच्या कृतींचे वर्णन येते उदा. "तू आणि तूझं नशीब म्हणत सुरेश हताशपणे चालाय लागला." (पृ. २२) अशा पात्रांच्या विविध कृतींच्या वर्णनातून पात्ररेखाटने करण्याची शैली प्रत्ययाला येते. येथे कृती-उक्ती, मानसिकता, शरीरदर्शन, विचारदर्शन अशा अनेक घटकांच्या सहाय्याने गवस यांनी पात्र रेखाटन केले आहे. नायक-नायिका, खलनायक असा पात्रचित्रणाचा पारंपरिक साचा न स्वीकारता साठोत्तर कालखंडात विकसित झालेली पात्रचित्रणाची नवी पद्धती गवस यांनी स्वीकारली. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील नायकपात्रांना रुढ दृष्ट्या सामाजिक प्रतिष्ठा आहे, असे दिसत नाही. पण त्यांच्याकडे समकालीन समाजाहून वेगळी अशी एक स्वतःची जीवनदृष्टी असलेली दिसते. गवस यांच्या कथात्म साहित्यात विकृत सामाजिक दृष्टिकोण, राजकीय प्रवृत्ती ह्या काळ्या रंगात रंगवल्या जातात. सामाजिक वास्तवाचे हे विनाशक रुप ठराविक पात्रांच्या मानसिकतेतून व्यक्त होत. त्यामुळे अशी संधीसाधू, स्वार्थी, राजकारणी प्रवृत्तीची माणसे आणि उच्चनैतिकता घेऊन जगणारे तरुण यामध्ये समाजात संघर्ष निर्माण होतो, असे दिसते. पात्रचित्रणाची ही एक महत्त्वाची विशेषता म्हणून सांगता येईल.

## १.४.१० 'कळप' कादंबरीचा अवकाश

गवस यांच्या कळप कादंबरीचा अवकाश हा कृषिसंस्कृतीचा अवकाश आहे. गावगाडा त्यातील अनेकविध संदर्भानी व्यक्त होतो. या अवकाशात गुरांचे गोठे, घरे-दारे, गावाच्या वेशी, गल्ल्या, वस्त्या, हॉटेल, गावाबाहेरच डोंगर, माणसांनी गजबजलेल्या जागा, शाळा महाविद्यालयाचे स्टाफरुम, मैदाने, संमेलने, मेळावे यासाठी मुद्दामहून तयार केलेल्या जागा, शेताचे बांध, वतनदारांची घरे, देवदासी-जोगत्यांच्या झोपड्या, महारवाडा, सुतारआळी, एस्.टी. स्टँड असे अनेक प्रकारचे अवकाश येथे उभे राहिलेले दिसतात. शेतीवर जाऊन राबणाऱ्या माणसांबरोबरच शाळा महाविद्यालयात शिकणारी आणि शिकविणारी माणसे येथे दिसतात. पारंपरिक सणा उत्सवा बरोबरच मेळावे, चर्चासत्रे, संमेलने असे आधुनिक समारंभ या अवकाशात आयोजित होतात. स्वातंत्र्योत्तर काळातील आधुनिकतेच्या प्रभावामुळे बदलत गेलेले खेडे गवस यांच्या कथात्म साहित्यातून प्रकटले आहे.

स्वार्थी, कृत्रिम, आणि अर्थकेंद्री जाणिवेने प्रभावित झालेल्या व्यक्ती व समूहांची मानसिकता कळप मधील खेड्याच्या पार्श्वभूमीवर व्यक्त होते. शहरी मानसिकतेने वावरणारी माणसे व ग्रामीण पारंपरिक विचारांची माणसे येथे एकत्र नांदताना दिसतात. या खेडेगावात चळवळी, शिक्षणसंस्था, पतसंस्था, सभा संमेलने यांचे म्होरके बाजारु कृत्रिम जीवनशैलीच्या आहारी गेलेले दिसतात. याच प्रवृत्तींचे चित्रण हा लेखनाचा मुख्य गाभा असल्यामुळे, साहित्यचर्चा, परिवर्तनाच्या चळवळी, मेळावे, मोर्चे यातून गावगाड्यात एक सांस्कृतिक वातावरण उभे राहते. मात्र आपल्या मूळ संस्कृतीचे, सांस्कृतिक परंपरांचे भान सुटलेले अनेकजण या अवकाशात वावरतात. या गाववाड्यात जातिसंस्थेची जागा नव्या सामाजिक संस्था घेतात. उदा. पतसंस्था, संघटना, शालेयसंस्था इ. अशा संस्था समाजाच्या विकासाचे चित्र उभ्या करीत असल्या तरी ते अंतिमतः शोषण करणाऱ्या व्यवस्था बनतात. या संस्थांचे चित्रण हेच अवकाश बनून येते. या खेडेगावाला कोणतेही गाव नाही तरी देवदासीप्रथेच्या अंमलाखाली असलेला प्रदेश म्हणून या अवकाशाचे नाते गवस यांच्या कळप, चौंडकं या कादंबऱ्यांतील अवकाशाशी आहे. शाळा, महाविद्यालय, हॉटेल्स, संमेलने-मेळाव्यांच्या जागा, व्यासपीठे असे अवकाश येथे प्रभावीपणे चित्रित झाले पण त्याहीपेक्षा या अवकाशात वावरणाऱ्या पात्रांच्या प्रवृत्ती महत्त्वाच्या ठरतात. अशा क्षेत्रीय प्रवृत्ती चित्रित झाले पण त्याहीपेक्षा या अवकाशात वावरणाऱ्या पात्रांच्या प्रवृत्ती महत्त्वाच्या ठरतात. अशा क्षेत्रीय प्रवृत्ती चित्रित करण्यासाठीच हे अवकाश येतात. अशा विविध अवकाशांशी नायकपात्र जोडलेले असते. विविध अवकाशांकडे नायकपात्र मूल्यव्यवस्था म्हणून पाहत असते. म्हणून या अवकाशांपेक्षा त्या मूल्यव्यवस्था प्रभावीपणे व्यक्त होतात. हेच कळप मधील अवकाशाचे व आशयाचे नाते होय. कळप मधील अवकाशाचे वर्णन अत्यंत त्रोटक शब्दात येते याबाबत पुढील उदाहरणे सांगता येतील.

"हुतात्मा पार्कावर आमच्या आधीच शिरगावकर हजर" (पृ. ३०) "दिलावर संध्याकाळी आमच्या गावच्या रस्त्यावरच येऊन थांबलेला" (पृ. ८४) अशा अनेक विधानांतून गावगाड्यातील विविध स्थळांचे संदर्भ येतात. त्याचबरोबर एखाद्या विधानातूनही अवकाशाची जाणीव करुन देण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत येथे दिसते. शेतीनिष्ठ लोकसमूह हे गवस यांच्या कथात्म साहित्यातील अवकाशाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) कळप कादंबरीत व्यक्त झालेल्या लेखकाचे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

२) कळप कादंबरीतील अवकाशाची वैशिष्ट्ये एका उदाहरणासह सांगा.

## १.४.११ 'कळप' कादंबरी मधील भाषेचे ठळक विशेष

गवस यांच्या साहित्याच्या भाषेचे काही ठळक विशेष नोंदवता येतील. गवस यांनी आपल्या कथात्म साहित्यात **उपहास-उपरोधप्रधान भाषा** वापरली. त्याचबरोबर साधी कथनाच्या अंगाने जाणारी अनलंकृत भाषाही योजली. रोजच्या दैनंदिन जीवनातील बोलभाषेचा प्रभावी वापरही त्यांनी केला. तसेच पारंपरिक लोककथेची शैली कथा-कादंबरीमध्ये आणण्याचाही त्यांचा प्रयत्न लक्षणीय आहे. त्यांच्या साहित्याची शैली अनुभवगणिक, पात्रांच्या जीवनस्तरानुसार व लेखकाच्या जीवनदृष्टीनुसार बदलती राहते. **उत्कटता, चित्रमयता, प्रतिमाप्रधानता, काव्यमयता, चिंतनशीलता, बोलीरुपता हे भाषेचे अन्य विशेष** त्यांच्या भाषेला सहज प्राप्त झालेले दिसतात. कळप कादंबरीची निवेदनशैली त्यांच्या अन्य कादंबऱ्यांहून अधिक प्रमाणात उपहासप्रधान आहे. समाजतल्या विविध व्यवस्थांकडे पाहताना कादंबरीचा नायक रघू चिलमी व त्यांचे समकालीन मित्र यांना जी जी विसंगती जाणवते त्याबाबतच्या त्यांच्या प्रतिक्रिया बहुतांश वेळा विनोदप्रधान असतात, चळवळी, शाळा-महाविद्यालयातील व्यवहार, शहरी पांढरपेशी मनोवृत्ती, स्वार्थी कार्यकर्त्यांचे वर्तन व त्यांची मानसिकता अशा अनेक गोष्टींविषयी या प्रतिक्रिया येतात. वर म्हटल्याप्रमाणे या उपहासाचा संबंध लेखकाच्या मूल्यजाणिवांशी असतो. येथे काही घटनाप्रसंगातील उपहासात्मक निवेदनशैलीची उदाहरणे पाहता येतील.

कथात्म साहित्यातील हा उपहास काही वेळा **विनोदी शैली**तही व्यक्त होतो. गवस यांच्या जीवनदृष्टीशी उपरोधिक शैली एकात्म झाली याचा प्रत्यय अनेक ठिकाणी येतो. साहित्यविषयीच्या चर्चामधूनही ही शैली प्रकटते. साहित्यातील कोणत्याही वर्चस्ववादी जाणिवांचा उपहास गवस यांनी केला आहे. कळप कादंबरीत महाविद्यालयाच्या वाङ्मयमंडळात दलित साहित्य, जातीव्यवस्थेची निर्मिती याविषयी चर्चा चाललेली असताना शिरगावकर कामावरुन वर्ण आले आणि बुद्धीची कामे करणारे ते ब्राह्मण असे आपले विचार सांगतो. तेव्हा त्याच्या विचारांवर रघूने केलेला हल्ला उपहासप्रधानशैलीचा उत्तम नमुना ठरावा. अर्थात रघूने केलेले हे विवेचन ऐतिहासिक सत्याच्या कसोटीवर उतरणारे नसले तरी लेखकाच्या नैतिकतेशी नाते सांगणारे आहे. लेखक ज्या बहुजनांच्या देशीयतेबाबतचे वास्तव मांडतो त्याला हे विवेचपूरक ठरते.

कळप कादंबरीछे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पात्रांचे वर्णन, स्वभावविशेष, त्यांचे संवाद, विचारविश्व हे विनोदी, उपहासगर्भ शैलीतून व्यक्त केले जाते. सामाजिक कार्यकर्ता आबा घोसरवाडकरांना 'गांधीनंतरचा महात्मा' असे संबोधणे किंवा "महाजन गेला वाड्याला समनाडीकराच्या मड्याला सनमू सनमू चळवळ महाजन तुझी चळवळ." (पृ. २११) अशी बडबडगीते म्हणून कार्यकर्त्यांच्या स्वभावाचा उपहास करणे असे कृत्य रघू कडून घडते. कळप कादंबरी मधील शाहीर हरीदो व्यक्तिमत्व समाजाचे हसता हसता दोष दाखवणाऱ्या कलावतांचे असल्यामुळे त्याच्या कवनांतून अनेक ठिकाणी उपहासाचे दर्श घडते.

**चिंतनशीलता** हे गवस यांच्या कथात्म साहित्याचा भाषेचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण होय. चिंतन म्हणजे जीवनाविषयी आणि समाजाविषयी केलेले विचारमंथन होय. समाजचिंतनाशिवाय कोणत्याही लेखकाला चांगली साहित्यनिर्मिती शक्यच नसते. समाज व्यवस्थेविषयी, मानवी जगण्याविषयी व्यक्त होणारी लेखकाची विशिष्ट भूमिका (आदर्श) हे त्याच्या जीवनविषयक चिंतनाचे फलीत असते. रंजन प्रधान साहित्यापेक्षा वास्तववादी साहित्यामधील जीवनचिंतन प्रभावी असते. गवस यांच्या साहित्यातून साध्या साध्या शब्दांतून जीवनविषयक चिंतन प्रकट झालेले दिसते. गवस यांच्या कळपमधून आलेले जीवनचिंतन मौलिक आहे. रघू हा तरुण जोगतिणींविषयी म्हणतो, - "एक जोगतीण एक कादंबरी. जोगतिणीचे डोळे एक कविता. जोगतिणीचा देव्हारा एक नाटक.

कशाला वाचायची पुसत्क ?

फक्त ही माणसं वाचता आली तरी चिक्कार!" (पृ. २३)

देवदासींच्या जीवनाविषयी आलेले हे चिंतन व्यापक मानवतेपोटी आले आहे.

भारतीय मुस्लिम समाजाकडे आस्थेने पाहण्याचा दृष्टिकोणही गवस यांच्या साहित्यातून व्यक्त होतो. भारतीय समाजातील गाववाड्यात मुस्लीम समाजालाही तितकेच महत्त्वाचे स्थान आहे. पण मुसलमान जातीयवादी धर्मांध ही आधुनिक समाजात राजकारणी व्यक्तिमत्वांनी स्वार्थासाठी रुजवलेली मानसिकता आहे. मात्र गावनिवाड्यात सल्लामसलतीसाठी गावगाड्याने मुस्लिमांनाही सामावून घेतले जात असे, हे वास्तव आहे. ग्रामवास्तवात मुस्लिमांचे व हिंदूचे सलोख्याचे, बंधुभावाचे असलेले संबध आधुनिक राजकारण्यांनी नष्ट करण्याचे प्रयत्न केले, ही वास्तविकता गवस यांनी सामाजिक मानसिकतेच्या आधारे रेखाटली आणि या मानसिकतेच्या उपहास गवस यांनी केला आहे. मुस्लिम लेखकांनी मुस्लिमत्व नाकारुन गवस यांनी मुस्लिम लेककांची प्रतिमा उभी करण्याचाप्रयत्न केला आहे. गवस यांच्या साहित्यातील सामाजिक विचारांचे संदर्भ लक्षणीय आहेत तसे देशीयतेचे हे भान महत्त्वाचे ठरते. ह्या मूल्यसंकल्पना आणि देशी भान यांना कथात्म साहित्यात स्थान देऊन गवस यांनी आपल्या साहित्याची वास्तवाशी असलेली नाळ अधिक घट्ट केली आहे.

## १.४.१२ 'कळप' कादंबरीचे वाङ्मयीन महत्त्व

गवस यांचे साहित्य दलित साहित्यातील विद्रोह, नकाराच्या तत्त्वांपेक्षा करुणा, दुःख, हतबलता, परात्मता ही तत्त्वे व्यक्त करण्यावर अधिक भर देते. फुले-आंबेडकरांच्या विचारधारांमधून आलेली मानवता, करुणा त्यांनी आपल्या लेखनातून अभिव्यक्त केली आहे. ही करुणा, मानवता लेखकाने उभ्या केलेल्या नायकातून दिसते. कळप कादंबरीतील रघू, हा लेखकाचा प्रोटॅगॉनिस्ट आहेत. रघू चिलमी संवेदनाशील आहे. तितकाच तो समाजव्यवहारांकडे सूक्ष्म नजर रोखून त्या व्यवहारांचे आपल्या नैतिकतेच्या आधारे कठोर मूल्यमपान करणारा आहे. त्याच्या जाणिवेतून स्वतःच्या वर्तनाचेही तितकेच कठोर मूल्यमापन होते. तो हळवा आहे. दलित-पिडितांच्या, हतबल स्त्रियांच्या दुःखाने तो व्यथित होतो. त्याच्या ठिकाणांची करुणा, दुखितांविषयीची जाण ही त्याच्या गावगाडा आणि वाङ्मयाच्या संस्कारातून तयार झालेली जाणीव आहे. पर संस्कृतीच्या आक्रमणाविषयी तो सजग आहे. त्यासाठी मात्र तो नकाराची भूमिका घेतो. यादृष्टीने तो देशीयतेचा पुरस्कर्ता ठरतो. त्यामुळे "रघू हा साठोत्तर कालखंडात निर्माण झालेल्या वाङ्मयीन चळवळीतून निर्माण झालेलं वाङ्मयीन अपत्य आहे. त्यामुळे ह्या सर्व गोष्टींकडे पाहण्याची रघू चिलमीची दृष्टी तेवढीच प्रगल्भ पण परकी, दुसऱ्याची आहे. त्यामुळे त्याला त्यातला फोलपणा, पोकळपणा जाणवतो. ही प्रगल्भ जाणीव रघू चिलमीमध्ये कशाप्रकारे विकसित झाली याचा आलेख वाचकांच्या समोर येत नाही." (ऐनापूरे, जी. के. स्वदेशी होण्याची धडपड, अनुष्टुभ, जुलै-ऑगस्ट, १९९८, वर्ष २२ वे, अंक १ ला, पृ.६०) हा जी. के ऐनापूरे यांनी घेतलेला आक्षेप तितकासा खरा नव्हे. कारण रघू चिलमी हा लेखकाचा Protagonist आहे. तसेच कादंबरीच्या प्रारंभी रघूच्या वाचनप्रेमाविषयीचे संदर्भ आलेलेच आहेत. तसेच कादंबरीकाराने वाचकांना अशी स्पष्टीकरणे कथात्म साहित्याच्या पातळीवर देण्याची आवश्यकता नसते. वाचक आपल्या भाषिक सांस्कृतिक जाणिवेच्या आधारेच कथात्म साहित्याचा आस्वाद घेत असतो. वाङ्मयीन परंपरेची ही जाणीव ठेवल्यास रघूची प्रगल्भता आकारण आली आहे, ती परकी आहे असे म्हणता येणार नाही. याला दुसरे आणखी एक कारण असे सांगता येईल की, समकालीन वास्वावकडे पाहताना काही लेखकांच्या लेखनात सारखेपणा संभवू शकतो. मात्र ते अनुकरण म्हणता येणार नाही. प्रत्येक लेखकाची अनुभव घेण्याची आणि ते व्यक्त करण्याची रीत भिन्न असते. सारखेपणा हा त्या काळाचा एक प्रभाव असू शकतो हे आपण प्रारंभीच नमूद केले आहे.

कळप कादंबरीत अस्तित्ववादाची जाणीव मध्यवर्त्ती असलेली दिसते. या जाणिवेमुळे गवस यांच्या कथात्म साहित्यातील संवेदनशील तरुण आजच्या भोवतालच्या ऱ्हासशील वास्तवात वैतागतात, अस्तित्वाच्या जाणिवेने हतबल होतात. आपल्या एकाकीपणाची तीव्र, क्लेशकारक जाणीव त्यांना सतावत राहते. यातून जीवन निरर्थक झाल्याचा प्रत्यय येतो. साठोत्तरी काळात ही अस्तित्ववादी जाणीव अनेक कथा-कादंबरीकारांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केली. पाश्चात्य समीक्षविचारांतून आलेली ही जाणीव आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या

कोसलामधून अत्यंत सक्षमपणे प्रकटलेली ही जाणीव नंतरच्या अनेक लेखकांच्या लेखनात प्रतिबिंबित झाली. ही जाणीव गवस यांनी सामान्य, ग्रामीण जीवन जगणाऱ्या पात्रांच्या संदर्भात आणि आपल्या सांस्कृतिक संचिताच्या आधारे व्यक्त केली. गवस यांच्या साऱ्याच कादंबऱ्यांतून चित्रित झालेली नायकपात्रांची मानसिकता अस्तित्वाची निरर्थकता व्यक्त करणारी आहे. कळप मधील रघू समाजातील अनिष्ट प्रवृत्तींशी निकराचा लढा देऊनही पराभूत होतो. प्रथम दारुच्या आहारी जाऊन शेवटी नव्याने जगण्याच्या निर्णय घेतो. या सर्व वास्तवाच्या चित्रणातून अस्तित्वाची निरर्थकता हे अस्तित्वभान राजन गवस यांनी सक्षमपणे व्यक्त केले आहे.

कोणताही लेखक समाजाच्या पोकळीत निर्माण होत नसतो. किंवा परंपरेच्या संस्कारांशिवाय लेखकाला आपले अस्तित्व निर्माण करता येत नाही. प्रत्येक लेखकावर आपल्या आधीच्या सक्षम, प्रथितयश अशा एका किंवा अनेक लेखकांचा कमी-अधिक प्रभाव पडलेला आहे. मात्र अशा प्रभावातून मुक्त होण्याचे प्रयत्न करणे हे त्या लेखकाच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी तितकेच महत्त्वाचे असते. राजन गवस यांच्या बाबतीत विचार करता त्यांच्या कथात्म साहित्यावर नेमाडे यांच्या साहित्याचा प्रभाव आहे. तसा तो आधीच्या माडगूळकर, भाऊ पाध्ये यांच्या लेखनातही आहे. मात्र हा प्रभाव म्हणजे पूर्वसूरी लेखकांचे अनुकरण नाही. "कोसला तल्या पुण्यात जे काही घडत होते ते आता लहान गावाच्या, तालुक्याच्या, जिल्ह्याच्या गावाच्या पातळीपर्यंत पोचलेले आहे. मुंबई-पुणे सारख्या नगरा-महानगरातच नव्हे तर कोणत्याही लहानसहान गावातल्या जगण्यातही व्यक्तीला उपरेपण परकेपण येऊ शकते याचे, बाह्य सामाजिक-राजकीय वास्तव दुर्बोध आणि अतर्क्य आहे याचे भान गवस यांच्या कळप कादंबरीतून व्यक्त झाले आहे." (डहाके, वसंत, आबाजी, मराठी साहित्याचा इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आ. १ ली, २००५, पृ. २१७) हा वसंत आबाजी डहाके यांचा अभिप्राय पाहिल्यास कळप मधील आशयावर कोसलाचा प्रभाव आहे तो अनुकरणातून आलेला नाही हे सिद्ध होते. तसेच या संदर्भात डॉ. महेंद्र कदम यांचे निरीक्षणही मार्मिक ठरते ते म्हणतात, - "कोसलाचा प्रभाव जाणवणारी गवस यांची कळप ही कादंबरी महत्त्वाची आहे. या कादंबरीचा नायक रघू चिलमी सामाजिक-सांस्कृतिक, वाङ्मयीन अराजकाच्या विरोधात उभा आहे. नकाराच्या भूमिकेत असणारा रघू देवदासी-डोंबाऱ्यांची चळवळ, वाङ्मयीन चळवळ यांच्यात सक्रीय होतो. गाव आणि शहर पातळीवरील सर्व समस्यांना सामोरा जातो. शक्त तेवढा विरोध करण्याचा प्रयत्न करतो. परंतु शेवटी हतबल होऊन लेखनाच्या वह्या जाळून कडकडीत पाण्याने आंघोळ करुन निवांत होतो. रघूची ही कृती आशादायित्व सुचविणारी आहे. रघूची वाढ, लोककथा, लोकगीते यांच्याविषयी असणारी त्याची ओढ, नेमाडे, दलवाई या लेखकांविषयीची त्याची मते, वर्तमानावर प्रभुत्व, व्यक्तिचित्रणाची पद्धती हे काही घटक कोसलाशी नाते प्रस्थापित करतात. परंतु तो प्रभाव पचवून मुक्त होऊ पाहणाऱ्या शक्यताही या कादंबरीत आहेत. रघू चिलमी अधिक कृतिप्रवण आहे. कळपची कथा गाव-शहर या दोन्ही मधील ताणतणाव नोंदवणारे आहे. तिसरी शक्यता म्हणजे रघू हा वर्तमानावर अधिक लक्ष केंद्रित करतो. पांडुरंग खुंट्यावर येतो तर रघू कडकडीत पाण्याने आंघोळ करुन पुन्हा नव्याने आयुष्याला सामोरा जाऊ पाहतो. रघूची कृतिनिष्ठता आणि भूमीसातत्य याही गोष्टी या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. एकूणच

कोसलाची देशीकरणाची परंपरा शेती परंपरेच्या अंगाने अधिक बळकट करुन राजन गवस कोसलच्या प्रभावातून मुक्त होऊ पाहतात. आणि हे मुक्त होणे तणकट या त्यांच्या कादंबरीतून अधिक प्रभावीपणे आले आहे." (कदम, महेंद्र. कोसला प्रभावातील कादंबरी, कादंबरी : सार आणि विस्तार, अक्षरदीप प्रकाशन, आ. १ ली, २००७, पृ. २७) गवस यांनी व्यक्त केलेले समग्रतेचे भानही लक्षणीय ठरते. कृषिसंस्कृतीच्या केंद्राभोवती फिरणारा समाज गवस रेखाटतात. त्यामुळे हे लेखन एकांगी होत नाही. कादंबरीच्या रुपाच्या बाबतीत गवस सजग आहेत, असे म्हटले तरी कळप कादंबरीच्या रुपाविषयी काहिसे असमाधान वाटत राहते. तरी प्रारंभी आलेली लोककथा आणि शेवटी येणारी रघू या नायकपात्राची मानसिकता यातून कादंबरीची संहिता जी प्रतिकात्मता व्यक्त करते ती लक्षणीय आहे. कादंबरीतल चित्रित झालेल्या वास्तवाविषयी आपल्या मनात काही शंका येत नाही. वास्तव तुकड्या तुकड्यांतून मांडले गेल्यामुळे निवेदनात खंडितताही येत राहते. तरी कळप कादंबरी म्हणजे एक कालवाचक विधान आहे.

**स्वाध्याय :**

१) समकालीन समाज व्यवहारातील भ्रष्टतेचे चित्रण कळप ह्या कादंबरीतून कशाप्रकारे झाले आहे ते साधार सांगा.

२) कळप कादंबरीतील नायकपात्रासह पात्रचित्रणाची विशेषता विविध उदाहरणासह सांगा.

३) कळप कादंबरीत व्यक्त झालेला लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

४) कळप या कादंबरीत भाषेचे विविध प्रयोग केलेले दिसतात ते उदाहरणासह सांगा.

५) कळप कादंबरी हे एक कालवाचक विधान आहे, कसे ते सोदाहरण सांगा.

❖❖❖❖

# २. भाकरी आणि फूल (कादंबरी)

: मधू मंगेश कर्णिक

प्रा. दौलत कांबळे

# २

# भाकरी आणि फूल

**- मधू मगेंश कर्णिक**

**पाठ्यरचना :**

२.० अभ्यासाची उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ भाकरी आणि फूल या कादंबरी विषयी मधू मगेंश कर्णिक यांचा परिचय
२.३ 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचे कथानक
२.४ 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील व्यक्तिरेखा
२.५ 'भाकरी आणि फूल' या मधील घटना प्रसंग
२.६ 'भाकरी आणि फूल' मधील भाषाशैली
२.७ 'भाकरी आणि फूल' मधील दलित जीवन
२.८ समारोप
२.९ प्रश्नावली

## २.० अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. 'भाकरी आणि फूल' कादंबरीचा वाङ्मयीन अभ्यास करणे.
२. 'भाकरी आणि फूल' कादंबरीचा सामाजिक सांस्कृतिक, राजकीय तसेच भाषिक अंगाने अभ्यास करणे.
३. कोकणातील दलित समाजाचे चित्रण कसे होते. यांचा अभ्यास करणे.
४. दलित नवीन पिढीमधील संघर्षाचे चित्रण कसे झाले यांचा अभ्यास करणे.
५. 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील व्यक्तिरेखा समजावून घेणे.

## २.१ प्रस्तावना

अभ्यास पत्रिका क्र. दोन साठी 'भाकरी आणि फूल' मधु मंगेश कर्णिक यांची कांदबरी अभ्यासाला आहे या कादंबरीतून दलित पिढीतील दलित संघर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ. या चळवळीचा अस्पृश्य समाजावर झालेला परिणाम. अस्पृश्य तरुणांमधील बदलती विचारसरणी त्यांना लाभलेले आत्मभान दिसून येत आहे.

## २.२ 'भाकरी आणि फूल' या कादंबरी विषयी मधू मगेंश कर्णिक यांचा परिचय

२८ एप्रिल १९३३, मध्ये जन्म झाला. ते मराठी साहित्यातील जेष्ठ कथाकार, कादंबरीकार, कवी म्हणून प्रसिद्ध त्यांचे शिक्षण कणकली येथे झाले. राज्य परिवहन खात्यात त्यांनी नोकरी केली. तर काही काळ गोवा सरकारच्या प्रसिद्धी खात्यात माहिती अधिकारी व नंतर मुंबई येथे जनसंपर्कधिकारी म्हणून पदभार सांभाळला. त्यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेची स्थापना.

१९५५ साली कोल्हापूर येथील शांतीदूत मासिकाच्या कथास्पर्धेत त्यांच्या '**पवित्र पातक**' या कथेला प्रथम पारितोषिक कोंकणी ग वस्ती (१९५८) हा त्यांचा पहिला प्रकाशित कथासंग्रह, आजपर्यंत त्यांचे पंचवीसहून अधिक कथासंग्रह व अनेक कादंबऱ्या, एक नाटक ललित लेखसंग्रह इत्यादी साहित्य प्रसिद्ध झाली आहे.

कोकणातील ग्रामीण जीवन आणि मुंबईतील महानगरीय जीवनावर त्यांनी कथालेखन, कादंबरी लेखन केले आहे. तोरण (१९६३), भूईचाका (१९६४), तहान (१९६६), झुंबर (१९६९), केवडा (१९७३), काळे कातळ तांबडी माती (१९७८), लामण दिवा (१९८३), दखल (१९८४), चटक चांदणी (१९८५) इत्यादी कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या काही कथासंग्रहाना महाराष्ट्र राज्य सरकारची पारितोषिक ही प्राप्त झाली आहेत.

देवकी (१९६२), माहिमची खाडी (१९६९), सनद (१९८६), कातळ (१९८६), वाखळ (१९८८) या कादंबऱ्या मधून समाज जीवनाची वेगवेगळी अंगे आणि स्तर यातील वैचित्र्य, वैविध्य टिपणाऱ्या लेखनीच्या भेदक, कलात्मक व द्ददल अविष्कारामुळे वैशिष्ट्यपूर्ण झाल्या आहेत. त्यांनी कादंबरीलेखन सामाजिक दृष्टी ठेवून केलेली आहे. स्त्री-पुरुष संबंधातील गहनगुढता, कॉर्पोरेट संस्थातील गुंतागुंत, राजकारण, दलित समाज जीवन चित्रण, महानगरातील झोपडपट्टीतील जीवन या विषयावर त्यांनी कथा कादंबरीलेखन केले आहे. त्यांच्या विविध साहित्यकृतीतील महाराष्ट्र राज्य पुरस्कारही प्राप्त झाले आहे. १९६० नंतरचे मराठी साहित्यातील महत्त्वाचे साहित्यिक म्हणून त्यांचा विचार करावा लागेल. सध्या महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत.

'भाकरी आणि फूल' ही कादंबरी 'मधू मगेंश कर्णिक' यांची आहे. या कादंबरीचे लिखाण १९७२ सालीच लिहून पूर्ण झाले. परंतु ती प्रकाशित व्हायला १९८२ साल उजाडले. मानवी जीवनाबद्दल कर्णिकांच्या मनात प्रचंड कुतूहल आहे. त्या कारणाने त्यांच्या कादंबऱ्यातून मानवी जीवनाचे विविधांगीदर्शन घडते. हा अनुभव 'भाकरी आणि फूल' मध्ये सुद्धा अनुभवायला भेटतो. 'भाकरी आणि फूल' ही दलित समाजवास्तव मांडणारी कादंबरी आहे. ही कादंबरी कोकणातील महार समाजाचे जीवन वास्तव मांडताना दिसते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेने शहरात राहत असलेल्या दलितांचे जीवन चित्रणही करते. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या २५ वर्षात दलित समाजामध्ये कोणकोणती स्थित्यंतरे झाली ?

खरेच त्यांच्या जीवनामध्ये बदल झाला आहे का? झाला असल्यास त्याचे स्वरुप कसे आहे? तो पुरेसा आहे का? तो विधायक आहे की विघातक आहे? दलित समाजातील जुनी पिढी आणि नवीन पिढी यांचे संबंध कसे आहे? या प्रश्नांच्या मांडणीतून एकूणच दलित समाज जीवनात झालेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक भौतिक स्थित्यंतराचा आलेख या कादंबरीच्या अवकाशात मांडलेला आहे.

मधू मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तीन पिढ्याच्या व जीवन संघर्षाचे चित्रण आलेल्या आहेत. या तीन पिढ्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीरेखांच्या माध्यमातून कर्णिकांनी एका अस्पृश्य कुटूंबावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा परिणाम कसा झाला यांचा आढावा घेतला आहे.

गावकुसाबाहेरच्या दलित वस्तीचे वास्तव मांडताना 'महार' या दलित समाजाच्या दरिद्री झोपड्या त्यांचे राहणीमान, दारिद्र्याने गांजलेल्या जीवनाचे समग्र प्रतिबिंब या कादंबरीत पहायला मिळते. या कादंबरीत दलित वस्तीचे प्रतिनिधीत्व करणारे 'शिवनाक महारचे' कुटूंब आहे. या कादंबरीच्या सुरुवातीलाच दलित समाजातील भीषण वास्तव म्हणजे भूक याचे चित्रण येते. दारिद्र्यामुळे येणारी उपासमार, अन्न मिळाले तरी ते गावाने वाढलेले शिळे निकृष्ट दर्जाचे याचे चित्रण कादंबरीत येते. सुरुवातीलाच शिवनाकाच्या घरात धुपंताचे बाळंतपण सुरु असताना गोंद्या व पुतळीला खूप भूक लागते. त्यावेळी पांडुरंग त्यांना अबील करुन देतो. या कादंबरीत रेखाटलेले कुटुंब म्हणजे शिवनाक महार, त्याची पत्नी धुर्पता, मुलगा गोपाळ, पांडुरंग, गोविंद, आनंदा, पुतळी, वेणू ही सर्व पात्रे या कादंबरीत आपली भूमिका बजावताना दिसतात. या पात्रासमवेत अन्य पात्रेही या कादंबरीतील कथानकाला पूर्ण करण्याचा भार उचलतात.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार समाजातील सुशिक्षित अशा गोपाळ, पांडुरंग व आनंदा या तरुणांनी मुंबई व आपल्या खेडेगावी चालवलेल्या दलित चळवळीचे चित्रण पहावयास मिळते. आंबेडकरी समकालाचे प्रतिनिधीत्व 'भाकरी आणि फूल' मध्ये गोपाळच्या रुपाने आले आहे. गोपाळ ही व्यक्तीरेखा धर्मभावना व अंधश्रद्धेमध्ये थोडीशी गुरफटलेली दिसून येते. ज्यावेळी गोपाळ आपल्या घरी येतो त्यावेळी आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेला गोपाळ आपल्या घरातील सदस्यांना पड खाण्यास नाकारतो. व इथून पुढे आपण हे टाकून दिले पाहिजे अशी शपथ घेण्यास घरातील व्यक्तींना तो प्रवृत्त करतो. नागपूरला जाऊन गोपाळने धर्मांतर केल्यानंतर गावातील महारांनी बौद्ध धर्म स्वीकारावा यासाठी तो प्रयत्न करताना दिसतो. महार समाजचे जेवण, त्यांची भूक, भूकेपोटी आलेली लाचारी, लालसा व लोभ त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा अवाढव्य प्रश्न त्यांची स्वच्छता, अस्वच्छता, त्यांचे कपडेलत्ते, झोपड्यांची दुर्दशा, त्यांच्या धार्मिक अंधश्रद्धा, गावातील अठरापगड समाजाशी असलेले त्यांचे चिवट नाते त्या नात्याशी असलेली विवशता, त्यांच्या शिक्षणाचे प्रश्न, समाजाच्या वरच्या जातीकडून मिळणारी अपमानाची वागणूक व सवयीने त्यात निर्माण झालेला निगरगदटपणा, निलाजरेपणा, देवळाशी व सार्वजनिक उत्सवाशी संबंधितांनी त्यांना धूर्तपणे दिलेले मानाचे पान, बाळांतिणीचे हाल, ऊन-पाऊस-थंडी यांच्याशी त्यांचा चाललेला संघर्ष, रिकाम्यापोटी वाजवावी

लागणारी सनई, बडवावे लागणारे ढोल-ताशे, गावपंचायतीने त्यांच्यावर लावलेले ढोर फोडण्याचे काम, बायकांना सहन करावी लागणारी विटंबना या सर्व दलित समाज वास्तवाचे कादंबरीत आलेले चित्रण भयावह आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) मधु मगेंश कर्णिक यांच्या एकूण साहित्य लेखनाची थोडक्यात माहिती द्या.

## २.३ 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचे कथानक

'भाकरी आणि फूल' या कादंबरीत सुरुवातीलाच दलित वस्तीचे चित्रण पहायला मिळते. धुर्पती बाळंतिन झालेली आहे. पहिला स्वातंत्र्यदिन साजरा होण्याच्या दिवशीच आनंदाचा जन्म झाला आहे. शिवनाकासोबत घरातील सर्व खूष आहेत. पांडुरंग, गोंद्या व पुतळी शाळेत स्वातंत्र्यांच्या प्रभातफेरीत सामिल झालेले आहे. तिथे काहीतरी गोडधोड खायला मिळेल या आशेने पांडुरंग, गोंद्या व पुतळीला आपल्या सोबत घेऊन जातो. या स्वातंत्र्यादिनाच्या निमित्ताने आपल्या घरात काहीतरी गोडधोड येईल अशी आशा सगळ्यांनाच वाटत असते. त्यानंतर गोपाळचे आगमन, घरात पड आणल्याचा प्रसंग, गोपाळने या गोष्टीसाठी केलेला विरोध आपल्या नजरेस पडतो, गोपाळ पांडुरंगच्या शाळेत जातो. तिथे आपल्या भावाला, दलित मुलांना आपल्या जागेवर बसण्यास सांगतो. गावकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता रामेश्वराच्या गाभाऱ्यात प्रवेश करतो. इतकेच नव्हे तर संपूर्ण महारवाड्याला या रामेश्वराच्या गाभाऱ्यात घेऊन जाण्याची शपथ तो घेतो. आणि जर महारवाडा या गोष्टीला तयार नाही झाला तर निदान आपल्या कुटुंबाला तरी घेऊनच जाईल असे तो जाहीर करतो. परंतु मुंबईतील गिरणीकामगारात कामाला असणाऱ्या गोपाळला गिरणीकामरागांचा संप मिटल्याची तार येते व तातडीने मुंबईला जावे लागते. त्यानंतर त्याचा रामेश्वराच्या गाभाऱ्यात प्रवेश करण्याचा विचार कृतीत न उतरल्याचे दिसून येते. मुंबईला जाण्याअगोदर पांडुरंगसाठी तो कणकवलीचे छात्रालय पाहून येतो. व पांडुरंग आता या छात्रालयात शिकणार हे त्याला सांगतो. पांडुरंग छात्रालयात जायला तयार होतो. या वस्तीगृहात प्रवेश घेतल्यापासून त्याला स्वतःमध्ये खूप बदल झाल्यासारखे वाटतात. तिथे त्याचे अनेक मित्र बनतात. शाम शाळीग्रामची बहीण सुनंदा विषयी त्याला सुरुवातीपासूनच ओढ वाटत असते. आणि इथेच त्याचे अभिजन वर्गाकडे आकर्षित होणाऱ्या व्यक्तीमत्वातील मानसिकतेचे बीजरुपे पहायला मिळतात. शिक्षण घेत असताना पांडुरंगला अनेक चांगले-वाईट अनुभव येत असतात.

किसन नारिग्रेंकर याने पांडुरंगवर केलेला अत्याचार सहभोजनासाठी गेल्यावर आलेला प्रसंग, नेहमीच होत असलेली दलितपणाची जाणीव. या सर्व गोष्टींना त्याला सामोरे जावे लागते. हे करता-करता त्याचे शिक्षण पूर्ण होते व तो मुंबई गाठतो. तिथे पुन्हा शाम शाळीग्रामच्या मदतीने त्याला एस.टी. ऑफीसमध्ये नोकरी लागते. छात्रालयात भेटलेली सुनंदा त्याला पुन्हा भेटते. पांडुरंगला सुनंदा बद्दल नेहमीच आकर्षण वाटते. सुनंदाच्या मोकळ्या वागण्याचा पांडुरंग वेगळा अर्थ लावतो. सुनंदा आपल्या जातीतील माणसाशी विवाह करुन मोकळी होते या प्रसंगाने पांडुरंग हताश होतो.

पांडुरंग ज्यावेळी मुंबईत येतो त्यावेळी तो नोकरीच्या शोधात असतो. तो आपला दादा गोपाळ समवेत राहत असतो. गोपाळचे एव्हाना लग्न झालेले असते. नलिनी ही त्याची बायको असून ती शिक्षिका असते. गोपाळ हा सामाजिक कार्यकर्ता म्हणून स्थिर होत असतो. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कामात तो मग्न असतो. पांडुरंगला जोपर्यंत नोकरी नसते तो त्याच्या घरात रहात असतो. नोकरी मिळविण्याच्या वेळी पांडुरंगला वेगवेगळे अनुभव येतात. त्या अनुभवानी त्यांच्या मनामध्ये वेगळे विचार यायला लागतात. या कादंबरीत कोकणातील महार समाजाचे जीवन वास्तव असे मांडलेले आहे. तसेच शहरात राहत असलेल्या दलितांचे जीवन चित्रणही केले आहे. या कादंबरीमध्ये येणारे शहरातील दलित समाजाचे वास्तव हे दुहेरी स्वरुपाचे आहे. एक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने व प्रबुद्ध झालेला आपल्या समाजाच्या विकासाचा विचार करणारा आंबडेकरी चळवळीशी एकनिष्ठ असलेला भौतिक सुखसुविधांपेक्षा वैचारिकदृष्ट्या विकसित झालेला दलित दिसतो. तर दुसऱ्या बाजूला नोकरी, पैसा यामुळे आपल्या समाजाची लाजवाटणारा, त्यांच्याशी आस्था नसणारा उच्चवर्णिय समाजामध्ये राहणारा चळवळीपासून दूर गेलेला असणारा दलित ब्राह्मण येतो. कादंबरीत येणारे प्रा. सहदेव माने हे त्याचे ज्वलंत उदाहरण होय. एकूणच शहरात राहणाऱ्या दलितांचे जीवन, आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेले, चळवळीने व्यापलेले आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेले. गावापासून दूर राहण्याची मानसिकता ठेवलेले, आपल्याच माणसांविषयी लाज वाटणारे, दलितांमधील जातीयता, बौद्ध धर्माचा स्वीकार करुनही पारंपरिक पद्धतीने जगणारा दलित समाज या कादंबरीतून पहावयास मिळतो.

पांडुरंगचे एस.टी खात्यातील काम चालू असताना त्या कामाच्या ठिकाणी येणारे अनुभव त्यामुळे त्याच्या मनाला आलेली मर्गळ, सर्वण लोकांबद्दल वाटणारा अभिमान पांडुरंगच्या व्यक्तीरेखेतून, पहावयास मिळतो. या कादंबरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनाची बातमी कळताच सर्व दलित जनतेला आपला आधार गमावल्याचे दुःख जाणवतांना दिसते. पांडुरंग, गोपाळ, नलिनी हे व इतर बौद्ध धर्मातील लोक या घटनेने हताश होऊन जातात. याचे चित्रणही कर्णिकांनी केले आहे. त्यामुळे चळवळीच्या कामात त्याचे लक्ष लागेनासे झाले. या मध्यंतराच्या काळात शिवनाक व मोन्या महार आपल्या मोठ्या मुलाच्या घरी (गोपाळ) आले. परंपरेने ठरवून दिल्याप्रमाणे मोन्या महार व शिवनाकाने मुंबईतील आपल्या गावकऱ्यांच्या घरी जाऊन मराठ्यांच्या घरी जाऊन कपडेलत्ते, खाण्यापिण्याच्या वस्तू गोळा करण्याचे काम केले. मोन्या महारच्या मुलगा दवाखान्यात शेवटच्या घटका मोजत असताना त्याच्या निधनानंतर सरकारकडून किती पैसे

मिळतील याचा विचार करणारा एक विक्षिप्त बाप आपल्या नजरेस येतो. शिवनाक व मोन्या महाराने गोळा करुन आणलेले वस्तू पाहून पांडुरंग व गोपाळ चिडतात. व आपल्या जातीने आता यो गोष्टी सोडून दिल्या पाहिजे असे त्यांना सांगून परंतु मुंबईत स्थाईक झालेली मुले किती लक्ष आपल्या गावात राहणाऱ्या आई-वडिलांवर देतात? भावंडावर देतात? याची जाणीव शिवनाक त्यांना करुन देतो. त्यावेळी ते दोघेजण शांत राहतात. पुढे सुनंदाचे लग्न स्वजातीतील तरुणाशी झाल्यानंतर झालेल्या हताश अवस्थेत पांडुरंग नलिनीच्या सांगण्यावरुन तिच्या बहिणीशी लग्न करतो व आपला संसार थाटतो.

आंबेडकरांच्या तिसऱ्या पिढीचे नेतृत्व करणारी आनंदा ही व्यक्तीरेखा आपल्या भूमिकेसह ठळक होत जाते. आनंदा हा बी.ए. पर्यंत शिक्षण घेतो. आपल्या भावडांपैकी गोंद्या हा महार थळातील वारी घुमवण्यातच दंग आहे. आपली इतर भावंडे शिकली याच्याशी त्याचे काहीच देणे-घेणे नाही. वेणूचे तर अगोदरच लग्न झालेले असते. गोपाळ व पांडुरंग ज्यावेळी मुंबईत असतात. त्यावेळी पुतळीचेही लग्न उरकले जाते. आनंदाच्या डोळ्यातील चमक पाहून त्यालाही मुंबईला बोलावले जाते. मुंबईला आल्यानंतर आनंद दलित समाजाच्या तरुण पिढीचां प्रतिनिधी बनतो. अभ्यासाऐवजी तो तरुणांच्या अभ्यास वर्गात अधिक रमतो. त्याच्या तोंडी सतत राजकारण दलित चळवळीचे मनसुबे असतात. शिवनाक महाराच्या घरात कधीच एखादा लेखक-कवी जन्माला येऊ शकत नव्हता. परंतु आनंदाने हे कतृत्व करुन दाखवले. तो अतिशय विद्रोही विचारांचा होता. आनंदच्या बाबतीत राजकारणाशी संबंधित असणारे अनेक घटना-प्रसंग या कादंबरीत येताना दिसतात. या कादंबरीच्या शेवटी स्वातंत्र्यादिनाच्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने काळा झेंडा फडकविल्याबाबत आनंदला अटक केली जाते. हे वृत्त कळते तेव्हा पांडुरंग हा आपल्या गावी असतो. शिवनाकाचे निधन झालेले असते व त्याच्या दशक्रियेचा कार्यक्रम करण्यासाठी पांडुरंग थांबलेला असतो. आपल्या भावाला अटक केल्याचे वृत्त वाचताच तो त्या ठिकाणी अस्वस्थ होतो व इथेच कांदबरीचा शेवट होतो.

अशाप्रकारे ‘मधू मंगेश कर्णिक’ यांनी ‘भाकरी आणि फूल’ या कादंबरीत दलितांच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या तीन पिढ्यांचे चित्रण केलेले आपणास दिसून येते. पहिली पिढी गोपाळची जी भावनिक दृष्टीकोनातून डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाकडे वाहत असते. तर दुसऱ्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून पांडुरंगची व्यक्तीरेखा येते. आंबेडकरी काळातील ही पिढी असून तिची वैचारिक प्रगल्भता काळाशी जुळवून घेणारी तिची प्रवृत्ती त्यामुळे पहिली पिढी व तिसरी पिढी यादृष्टीने मधल्या पिढीशी होत असलेला अंतर्विरोध स्पष्ट होत गेला आहे. पांडुरंगची व्यक्तीरेखा आंबडेकरी चळवळीकडे तटस्थ भूमिकने पाहणारी अत्यंत संयमशील, स्वत:शी प्रामाणिक व आंबेडकर विचारांवर प्रेम करणारी आहे. स्वजीवनाविषयी काहीशी अपेक्षा बाळगणारी आहे. तर तिसऱ्या पिढीचे नेतृत्व करणारा आनंद यांच्यात वैचारिक प्रगल्भता नसल्याने अचूक आकलन जमत नाही. भरकटलेपणा हाच तिच्या आयुष्याच्या क्रम आहे. बंडखोरी वृत्ती अंगिकारल्यामुळेच कादंबरीच्या शेवटी त्याला अटक झालेली आहे. दलितांना स्वातंत्र्याबद्दल काय वाटते व स्वातंत्र्याच्या २५ वर्षात त्याला जर काहीच मिळाले नाही तर या देशातही काहीच मिळालेले नाही. याच खरेखुरे दर्शन या कादंबरीतून दिसून येते.

अशाप्रकारे शाळेची पहिल्या स्वातंत्र्यादिनी निघालेली प्रभातफेरी, शिवनाक महाराचे अमर्याद कुटुंब, स्वातंत्र्याच्या शुभ मुहुर्तावरील आनंदाचा जन्म, मृत जनावर ओढण्याचा प्रसंग, गोपाळच्या मंदिर प्रवेश, कणकवलीच्या वस्तीगृहातील पांडुरंगाचे जीवन, गोपाळचा विवाह, वेणूची विटंबना, पांडुरंगचे प्रेमसंबंध, आंबेडकरांचे धर्मांतर, स्वातंत्र्याचा निषेध करणारा आनंदा इ. घटना प्रसंगातून कर्णिकांनी दलितांची खरीखुरी व्यथा 'भाकरी आणि फूल' च्या माध्यमातून वाचकांसमोर मांडली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचा आशय थोडक्यात लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.४ 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील व्यक्तिरेखा

**१) शिवनाक :** शिवनाक ही व्यक्तीरेखा कादंबरीत पारंपरिक दलित जीवनाचे प्रतिनिधीत्व करते. शिवनाक हा मायनाक महाराचा मुलगा आहे. बाप बलदंड, ताकदवान होता. मात्र शिवनाक लुकडा होता. पिढ्यानपिढ्या आलेली गावकीची चाकरी तो करतो. ती कामे करण्यातच त्याला धन्यता वाटते. धूर्पता या आपल्या बायकोचे बाळंतपणात तोंड तिखट करण्यासाठी गावात मेलेल्या जनावराची पड तो घरात आणतो. मात्र गोपाळ याला विरोध करतो. याप्रसंगी शिवनाकची झालेली अवस्था त्याच्या व्यक्तीमत्वाची ओळख करुन देते. बाबासाहेब आंबेडकरांवर त्याची श्रद्धा आहे. मात्र विद्रोह करण्याची ताकद त्याच्यात नाही. पांडुरंगाचा दाखला शाळेतून काढण्यासाठी शाळेत गेल्यावर आणू खोत शिवनाकला शिव्या देतो. मात्र शिवनाक काही बोलत नाही. त्याच्या डोळ्यात पाणी येते. गावामध्ये यशाढामण हॉटेलात फुटक्या करवंटीतून चहा देतो. याचा राग पांडुरंगाला येतो. मात्र शिवनाक याला पिढ्यांपिढ्यांची परंपरा मानून गप्प बसतो. दारिद्र्यामुळे आलेली लाचारी शिवनाक सहन करत असते. आपली मुले मोठी होऊन आपल्याला आधार देतील. ही त्याची अपेक्षा आहे. मात्र शहरातील मुलांकडे काही दिवस राहण्यासाठी शिवनाक जातो तेव्हा पांडुरंग त्याला तुमचे रेशनकार्ड काढू का? असे उपहासात्मक बोलतो तेव्हा शिवनाक दुःखी होतो. आप्पा बामणाकडून आलेले कपडे, घेतलेले पैसे या गोष्टी तो जाणीवपूर्वक करत नाही. मात्र दारिद्र्यामुळे, परिस्थितीमुळे त्याला त्या कराव्या लागतात. एकूणच शिवनाक ही व्यक्तीरेखा कादंबरीत ग्रामव्यवस्थेतील दलितांचे प्रातिनिधीकरण म्हणून येते.

२) **गोपाळ :** गोपाळ ही कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तीरेखा आहे. शिवनाकचा हा मोठा मुलगा होय. मॅट्रीक पर्यंत शिक्षण घेतलेला गोपाळ मुंबईत गिरणीमध्ये काम करतो. महत्त्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा तो कार्यकर्ता आहे. कादंबरीत गोपाळची व्यक्तीरेखा ही प्रारंभापासून आंबडेकरी विचाराचे दिग्दर्शन करणारी आहे. दलित समाजातील सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीचे तो प्रातिनिधीकरुप आहे. तो खूप शिकलेला नसून मोठी नोकरी करत नसून डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत तो सहभागी आहे. बाबासाहेब ह्यात असतानांची चळवळ त्याने चालविलेली आहे. पांढरेशुभ्र कपडे, स्वच्छ भाषा, मनात आंबडेकरी विचार, स्वाभीमानी, करारी असे त्याच्या व्यक्तीमत्वाचे पैलु दिसतात. गावामध्ये असणाऱ्या दलित समाजात स्थित्यंतर झाले पाहिजे ही त्याची भुमिका आहे. पारंपरिक दलित जीवनाचा त्याग केला पाहिजे. आपल्याला असलेले हक्क मिळविले पाहिजे. अन्यायाला प्रतिकार केला पाहिजे व महत्त्वाचे म्हणजे शैक्षणाचा विचार पसरवला पाहिजे असे गोपाळचे विचार आहे. कादंबरीत उत्तरार्धात गोपाळची व्यक्तीरेखा बदललेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी चळवळीत आलेली स्थित्यंतरे गोपाळची निराशा करतात. बाबासाहेबांनी धर्मांतर करुन बौद्ध धर्माचा मार्ग सर्व दलितांना सांगितला मात्र आंबेडकरोत्तर काळात ही धर्मचळवळ गतिमान होऊ शकली नाही. दलितांच्या घरातील देव्हारे गेले नाही. गोपाळच्याही घरात मुल होत नाही म्हणून नलिनी श्रीसत्य साईबाबाची उपासना करत होती. गोपाळ तिला विरोध करत नव्हता. मात्र असे असले तरी श्रेष्ठ आंबेडकरी विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, त्याप्रमाणे गोपाळची व्यक्तीरेखा ही कादंबरीत बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी झपाटलेला परिस्थितीने कधी-कधी असहाय्य होऊन चरफडणारा आणि मग देशाविरुद्ध, धर्मग्रंथाविरुद्ध, धर्माविरुद्ध बंडाची भाषा बोलणारा अशी येते.

३) **पांडुरंग :** पांडुरंग ही या कादंबरीतील दूसरी महत्त्वाची व्यक्तीरेखा आहे. पांडुरंग हा गोपाळच्या विचारकार्याने प्रभावित झालेला आहे. आंबेडकरवादी विद्रोहाची ठिणगी पांडुरंगमध्ये लहानपणापासूनच आहे. शिक्षण घेऊन मोठे व्हायचे ही प्रेरणा त्याला गोपाळ देतो. ही व्यक्तीरेखा आंबेडकरी चळवळीकडे तटस्थ भूमिकेने पाहणारी अत्यंत संयमशील स्वतःशी प्रामाणिक व आंबेडकरविचारांवर प्रेम करणारी अशी आहे. ही व्यक्तीरेखा स्व-जीवनाविषयी काही अपेक्षा बाळगणारी, आंबेडकरी चळवळीवर भाष्य करणारी आहे. मात्र एका कार्यकर्त्याची भूमिका बजावणारी पांडुरंग ही व्यक्तीरेखा सार्वजनिक जीवनात प्रत्यक्ष संघर्ष व कृती करत नाही. लेखकांनी पांडुरंग या व्यक्तीरेखेची एकूण मानसिक जडणघडण मांडली आहे. कणकवलीला शिक्षण घेत असताना गोपाळ त्याला पत्र पाठवून शिक्षण घेणे कसे महत्त्वाचे आहे हे सांगतो. शिक्षण घेऊन एस.टी. खात्यामध्ये नोकरीला असणारा पांडुरंग अस्वस्थ आहे. एका बाजूला गोपाळच्या व्यक्तीमत्त्वामध्ये होणारा बदल, बहिणीचा आपल्या घरच्या पासूनचा दुरावा, समाजामधील शिक्षित लोकांमधील वाढत चाललेला पांढरपेशा वर्ग तर दुसऱ्या बाजूला सुनंदा या ब्राह्मण मुलीवर जडलेले प्रेम, तिच्याविषयीच्या तरल भावना, पत्नी म्हणून तिच्या मनोमन केलेला स्वीकार मात्र आपल्याला दलित ब्राह्मण करेल काय? याची वाटणारी भिती, सुनदांच्या लग्नानंतरची अस्वस्थता, या सर्व अवस्थामधून पांडुरंगची व्यक्तीरेखा अभिव्यक्त होते. पांडुरंग

आपल्या वहिणीच्या बहिणीशी म्हणजेच स्वजातीतील स्त्रीबरोबर विवाह करतो. विवाहानंतर एखाद्या पांढरपेशा मध्यमवर्गीय माणसाप्रमाणे पांडुरंग व मालती राहू लागतात. दलित वर्गातून आलेल्या व महानगरात येऊन स्थिर झालेल्या एका वेगळ्या व्यक्तीमत्वाची ओळख पांडुरंगच्या व्यक्तीमत्त्वातून होते. आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाची ओळख, आठवण या गोष्टी पांडुरंग जाणीवपूर्वक नष्ट करु पाहत असल्याचे दिसून येते. उच्च-वर्गियात स्थान मिळाले नाही तर मध्यमवर्गीय पांढरपेशाचे संकुचित जीवन हे लोक कसे जगु पाहतात. त्यासाठी त्याची धडपड कशी असते याची जाणीव पांडुरंग या व्यक्तीरेखेतून सहज स्पष्ट होते.

तात्पर्य दलित / उपेक्षित जातीत जन्मास आलेले व्यक्तीमत्व आपल्या भावी जीवनाची मागणी करताना मध्यमवर्गीय पांढरपेशा जीवनाकडे जाणीवपूर्वक आकर्षित होतात. अशा जीवनाचा हव्यास बाळगता परिणामी आप्त, स्वकीय, स्वजातीय माणसाशी नाळ तोडण्याची प्रवृत्ती कशी रुजते याचे मार्मीक दर्शन कर्णिक पांडुरंगच्या व्यक्तीरेखेतून दाखवून देतात.

४) **आनंदा :** आनंद ही कादंबरीतील विद्रोही भूमिका वठवणारी व्यक्तीरेखा आहे. बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेतलेला आनंद दलित समाजातील सुशिक्षितांच्या तिसऱ्या पिढीचे प्रातिनिधीक रुप होय. शिवनाक, गोपाळ, पांडुरंग या व्यक्तीरेखापेक्षा आनंद हा संवेदनशील आहे. आंबेडकरवादाचे ज्वलंतरुप त्याच्या व्यक्तीरेखेतून लेखकाने उभारलेले आहे. कुटुंब, प्रेम, नातेसंबंध यासारख्या बेड्यांमध्ये न अडकता तो आंबेडकरी चळवळीला नवी आयडेंटिटी देऊ इच्छितो. समकालीन दलित, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक समस्येविषयीची तळमळ व महत्त्वाचे म्हणजे यावरील उपाया विषयीची त्याची भूमिका दलित पँथरचे प्रतिनिधीत्व करते. आनंदचे व्यक्तीमत्व मांडताना कादंबरीत वर्णन येते.

२५ वर्ष वयाचा आनंद देहाने पहाणासारखा धिप्पाड झाला होता. पावणे सहा फूट उंची, खाणदानी महाराचा तजेलदार काळाकुळकूळीत रंग, रेखीव शूभ्र दात, घनदाट केसांची बेबंद झुलपे तांबुस उग्र डोळे, रुंद खांदे, पिळदार स्नायू, एखाद्या दगडी पुतळ्यासारखा तो दिसे. त्याला पाहून गोपाळला आपल्या आण्णाची म्हणजे मायनाक महाराची आठवण होई.

कादंबरीत आलेला हा योगायोग नाही तर महार समाजाच्या सामाजिक इतिहासातील नागवंशिय रुप आनंदच्या व्यक्तीरेखेतून उभे राहते. आनंदचे रुप जसे करारी आहे तसे त्याचे विचार व भाषा ही सुद्धा विद्रोही आहे. आनंद डायरी लिहीत असतो. त्याची ती डायरी म्हणजे वैयक्तिक घटनांची जंत्री नव्हती. तर सामाजिक विचारांचा दस्तऐवज होती. आंबेडकर, अब्राहम लिंकन, मार्टिन ल्युथर हे त्याचे आदर्श होते. आनंदचे विचार म्हणजे आंबेडकरवादाची तत्त्वे होय. ज्या समाजव्यवस्थेने, धर्मव्यवस्थेने दलितांचे शोषण केले त्याच्या विषयीची चीड आनंदने व्यक्त करणे साहजिकच आहे.

आनंद जसा आपल्या भूतकाळाला दोष देतो तसाच तो समकालिन व्यवस्थेचेही वस्त्रहरण करतो. स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव साजरा केला जात असताना मुख्यमंत्री सभा

बोलवितात त्या सभेत आनंद अनेक प्रश्न निर्माण करतो. अभिमान वाटावा असे काय घडलय या देशात गेल्या २५ वर्षामध्ये ? समतेवर आधारलेली राज्यघटना ज्यांनी तुम्हांला लिहून दिली त्या आंबेडकरांच्या बांधवासाठी तुम्ही गेल्या २५ वर्षात काय केले आहे ? काय देण लागतो आम्ही या देशाचे ? कसली भाकरी आणि कसले फूल ? आनंदचे हे प्रश्न स्वातंत्र्य नंतरच्या दलित समाजाचे वास्तव मांडतात. आनंदच्या प्रश्नाची बीजे आंबेडकरी विचारात आहे. समाजात चाललेला भ्रष्टाचार, वाढता हिंसाचार, साहित्य क्षेत्रात वाढत चाललेली लाचारी, बेकारी काल्पनिक जीवनाभिव्यक्ती, वाढती महागाई, दलितांवरील अत्याचार, वशिलेबाजी, लाचखोरी, ऐठीपणा, ढोंगीपणा, याविषयी आनंदला प्रचंड चीड आहे. एकूणच आनंदची व्यक्तीरेखा ही दलित समाजातील विद्रोही जाणिवांची अभिव्यक्ती करणारी, सामाजिक जाणीव, आंबेडकरी विचार, सामाजिक परिवर्तनाचा ध्यास असणारी आहे.

**कादंबरीतील इतर पात्र :**

'भाकरी आणि फूल' या कादंबरीत याबरोबर गावगाड्या मध्ये शिवनाकाला मदत करणारी धुर्पता, गावातील बाळंतपण करणारी जिजीमहारीण, ब्राह्मण नसूनही दलितांच्या मदतीला धावून येणारी ताईबामीण, दलितांवर अत्याचार करणारा आनू खोत, पांडुरंगच्या शाळेतील ब्राह्मण असणारा शाम शाळीग्राम, शामची बहीण व पांडुरंग जिच्यावर जीवापाड प्रेम करतो व जी त्याच्याबरोबर एस.टी. खात्यात कामाला असणारी सुनंदा, महार रेजिमेंट मध्ये असणारा व कुणालाही न भिणारा गणू मामा, पांडुरंगवर अत्याचार करणारा किसन नार्गिंग्रेकर, गोपाळची पत्नी जी गावाकडे कधी गेली नव्हती व घाटावरील दलित समाजातील असल्याने घाटाखालील दलितांचा द्वेश करणारी नलिनी, दलित असूनही पांढरपेशा झालेला प्रा. सहदेव माने, मुलाच्या मृत्युनंतर त्याच्या फंडाच्या पैशाचा विचार करणारा मोन्या महार, एस.टी. खात्यातील भ्रष्ट अधिकारी ॲड. सुनिल निलेकर इ. व्यक्तीरेखा कादंबरीत आलेल्या आहेत. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत आलेल्या सर्व मुख्य गौण व्यक्तीरेखा दलित-दलितेत्तर व्यक्तीरेखा आपल्या वृत्ती-प्रवृत्तीनुसार आलेल्या आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'आनंद'या व्यक्तिरेखे विषयी थोडक्यात माहिती द्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२)	'गोपाळ' या व्यक्तिरेखे विषयी थोडक्यात माहिती द्या.

३)	'पाडुरंग' या व्यक्तिरेखे विषयी थोडक्यात माहिती द्या.

## २.५ 'भाकरी आणि फूल' मधील घटनाप्रसंग

कादंबरीतील कथात्मकतेतील महत्त्वाचा घटक म्हणजे घटना प्रसंगांची केलेली मांडणी होय. घटना प्रसंगांची सहेतुक, क्रमबद्ध मांडणी करुन कादंबरीकार काही सांगत असतो. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग हा सहजतेने उद्‌भवत असतो. हे घटना प्रसंग परस्परांशी निगडीत असतात. लेखकाच्या सभोवती अनेक प्रसंग घडत असतात. सर्वच प्रसंग तो कादंबरीत आणू शकत नाही. कादंबरीतून विशिष्ट जीवनशोध घेण्यासाठी त्याला त्यातील काही घटना प्रसंगांची निवड करावी लागते. असे प्रसंग निवडक भूत-भविष्य व वर्तमानकाळाने तो जोडतो व त्यातून कादंबरीचे अवकाश तयार होते.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीत आलेले अनेक प्रसंग वास्तवाच्या कलात्मक मांडणीमुळे हृदयस्पर्श झालेले आहे. त्यामध्ये धुर्पतेच्या बाळंतपणाचा प्रसंग, गावगाड्यातील दलित समाजातील विदारक घटना, गोपाळचा रामेश्वर मंदिर प्रवेश, पांडुरंग-सुनंदा यांच्यातील प्रेमसंबधातील प्रसंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाचा प्रसंग व स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित मुख्यमंत्र्यातील सभेतील प्रसंग या काही निवडक घटना-प्रसंगाचा विचार करता येईल. कादंबरीच्या प्रारंभीच शिवनाकची बायको धुर्पताच्या बाळंपणाचा प्रसंग चित्रीत होतो. धुर्पतेच्या पोटात कळा आल्यानंतर तिचे ओरडणे, तिची होणारी तगमग यातून या प्रसंगातील जीवघेणा अनुभव कर्णिक चितारतात. गावामध्ये पारंपरिक पद्धतीने बाळंतपण करण्यासाठी सुईण म्हणून जिजी महारीन येते. मात्र पोटात बाळ आडवे झाल्याने तिचेही काही चालत नाही. शेवटी गावातील ताई बामणीनीस बोलवावे लागते. ताई बामणीन

महारवाड्यात येते व धुर्पताचे बाळंतपण व्यवस्थित करते. १५ ऑगस्टला आनंदचा जन्म होतो. गावगाड्यात काही लोक ही जातीधर्माचा विचार न करता दलितांच्या मदतीस येतात. कर्णिकांनी हा प्रसंग अत्यंत ह्रदयस्पर्शी पद्धतीने कादंबरीत रेखाटलेला आहे. या प्रसंगामधून अण्णाभाऊ साठे यांच्या 'कळिस' या कादंबरीतील कुलकर्णीची आठवण येते.

ग्रामव्यवस्थेत दलितसमाज गावकुसाबाहेर राहतो. त्याची सावलीही पडणे सवर्ण लोक अपशकुन मानतात. मंदिरामध्ये दलितांना प्रवेश दिला जात नाही. मात्र या कादंबरीत आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेला शिवनाकचा थोरला मुलगा गोपाळ गावातील रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश करतो. गोपाळच्या मंदिर प्रवेशाची घटना अत्यंत नाट्यात्मक पद्धतीने कर्णिक चितारतात. दलितांनी कधीच रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश केला नव्हता. मात्र गोपाळ मंदिर प्रवेश करतो व रामेश्वराचे दर्शन घेतो. हा प्रसंग कादंबरीत अत्यंत संवेदनशिल पद्धतीने कर्णिक रेखाटतात. पुढे कादंबरीत पांडुरंगही गावात दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारावा यासाठी प्रयत्न करतो. मात्र अचानक मुंबईवरुन येणारा भिक्खुसंघ येत नाही. त्यामुळे धर्मांतराची घटना घडत नाही. वास्तविक प्रसंग घडले असते तर कादंबरीत नवे संदर्भ आले असते मात्र कर्णिक घटना प्रसंगाना कलाटणी देतात.

कादंबरीत पांडुरंग व सुनंदा यांच्यातील प्रेम संवेदनात्मक घटना प्रसंगाची मांडणी कर्णिकांनी प्रभावीपणे केली आहे. पांडुरंग हा दलित तर सुनंदा ही ब्राह्मण आहे. यांच्यात नोकरीच्या निमित्ताने जवळीक येते. सुनंदाचा स्वभाव स्वच्छंदी असल्याने पांडुरंगचे तिच्यावर प्रेम जडते. कादंबरीत त्यांच्या संदर्भातील घटना भावनाशील बनतात. पांडुरंगच्या मनात सुनंदाविषयीच्या प्रेमभावना अधिक वाढायला लागतात. जेव्हा ती त्याला घरी घेऊन जाते. मात्र पुढे सुनंदा आपल्याच जातीतील मुलाशी लग्न करते. त्यावेळी पांडुरंगाची विरहावस्था कादंबरीत चित्रित होते.

"आयुष्यात धक्के सोसायची सवय तशी लहानपणापासूनचीच पण हा धक्का पांडुरंगाला फार जाणवला, मन फार विव्हळ झाले. तहान-भूक उडाली, मनाची काहीली काही केल्या कमी होईना ......"

पांडुरंगाच्या अंतरंगातील प्रेमभावना, आशानिराशा या प्रेम संवेदनाबरोबरच कादंबरीत त्याच्या व्यक्तीमत्त्वामधील विद्रोही विचारांचे प्रतिनिधीत्व करणारे घटना प्रसंगही कादंबरीत आलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाचा प्रसंग मांडतांना कर्णिक दलित समाजाच्या मनातील आंबेडकरांच्या प्रति असणारी असामान्य भक्ती, त्यांच्या अंतरंगातील आद्रता व या महापुरुषाविषयीची श्रद्धा अचूकपणे टिपलेली आहे. बाबासाहेबांच्या जाण्यामुळे आपला आधारखंब हरवल्याची भावना सामान्य कार्यकर्त्यांची झाली. गोपाळ, पांडुरंग यांच्या मनावर तर मोठा आघात झाला. ज्यांच्या विचार चळवळीचे आपण वाटसरु आहोत तो विचार

देणारा महापुरुष हरपला त्यामुळे आता चळवळीचे काय होईल? ही शंका गोपाळच्या मनात येऊन जाते. कर्णिकांनी हा प्रसंग अतिशय ह्रदयस्पर्शी पद्धतीने मांडलेला आहे.

दलित चळवळीत विद्रोहाचा नवा आविष्कार आनंदाच्या रुपाने उदयास आला होता. विद्रोही तरुणांनी लेखणी व वाणीतून परत क्रांतीचा जयजयकार केला. आनंद हा विद्रोही क्रांतीचा नायक होता. त्यांच्या ज्वलंत व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलु कर्णिकांनी अत्यंत अचूकपणे मांडलेले आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवानिमित्त बोलविलेल्या बैठकीतील प्रसंग व तेथे आनंदने मांडलेले विचार अत्यंत वास्तववादी पद्धतीने कर्णिक मांडतात. एकूणच 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत आलेले अनेक प्रसंग वास्तववादी दलित जीवनाचा शोध घेणारे त्यांच्यातील मानसिक, भावनिक आंदोलने मांडणारे ह्रदयस्पर्शी आहेत.

या कादंबरीतील कथनात्मकतेतील महत्त्वाचा घटक म्हणजे निवेदकांने घटना-प्रसंगाची केलेली मांडणी होय. घटना प्रसंगांची सहेतूक, क्रमबद्ध मांडी करुन कादंबरीकार काही सांगत असतो. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग हा सहजतेने उद्धभवत असतो. हे घटना-प्रसंग परस्परांशी निगडित असतात. लेखकाच्या सभोवती अनेक प्रसंग घडत असतात. सर्वच प्रसंग तो कादंबरीत आणू शकत नाही. कादंबरीतून विशिष्ट जीवनशोध घेण्यासाठी याला त्यातील काही घटना-प्रसंगाची निवड करावी लागते. असे प्रसंग निवडक भूत-भविष्य आणि वर्तमानकाळाने जोडता आणि त्यातून कादंबरीचे अवकाश तयार होते.

या कादंबरीत अनेक प्रसंग वास्तवाच्या कलात्मक मांडणीमुळे ह्रदयस्पर्शी झालेले आहेत. त्यामध्ये धुर्पदेच्या बाळंतपणाचा प्रसंग, गावगाड्यात दलित समाजातील विदारक घटना, गोपाळच्या रामेश्वर मंदिर प्रवेश, पांडुरंग-सुनंदा यांच्यातील प्रेमसंबंधातील प्रसंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाचा प्रसंग आणि स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित मुख्यमंत्र्यांच्या सभेतील प्रसंग या काही निवडक घटना-प्रसंगांच्या विचार करता येईल. कादंबरीच्या प्रारंभच शिवनाकची बायको धुर्पदाच्या बाळंतपणाचा प्रसंग चित्रित होतो. धुर्पदेच्या पोटात कळा आल्यानंतर तिचे ओरडणे, तिची होणारी तगमग यातून या प्रसंगातील जिवघेणा अनुभव कर्णिक करतात. गावामध्ये पारंपरिक पद्धतीने बाळपण करण्यासाठी सुईण म्हणून जिजी येते. मात्र पोटात बाळ आडवे झाल्यामुळे तिचेही काही चालत नाही. शेवटी गावातील ताई वामणीनीस बोलवावे लागते. ताई बामणीन महारवाड्यात येते आणि धुर्पदाचे बाळपण व्यवस्थित करते. पंधरा ऑगस्ट ला आनंदाचा जन्म होतो. गावगाड्यामध्ये काही लोक ही जातीधर्माचा विचार न करता दलितांच्या मदतीस येतो. कर्णिकांनी हा प्रसंग अत्यंत ह्रदयस्पर्शी पद्धतीने कादंबरीत रेखाटलेला आहे. या प्रसंगामधून अण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा कादंबरीतील कुलकर्णीची आठवण येते.

ग्रामीण भागातील दलित समाज गावकुसाबाहेर राहतो. दलितांची सावलीही पडणे सवर्ण लोक अपशकुन मानतात. मंदिरामध्ये दलितांना प्रवेश दिला जात नाही. मात्र या कांदबरीत आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेला शिवनाकचा थोरला मुलगा गोपाळ गावातील रामेश्वराच्या

मंदिरात प्रवेश करतो. गोपाळच्या मंदिर प्रवेशाची घटना अत्यंत नाट्यात्मक पद्धतीने कर्णिक चित्रित केली आहे. श्रावणी सोमवार असल्यामुळे रामेश्वराच्या मंदिरात मोठी गर्दी झालेली होती. मंदिरामध्ये मराठे, सुतार, सोनार वैश्यांनी आणि दलितांनी कुठे बसायचे हे परंपरागत पद्धतीने ठरलेले असते. रामेश्वराचे मानकरी खोत मंडळी असल्यामुळे त्याची जागाच्या मंदिराच्या गाभाऱ्यासमोर होती. दलितांनी कधीच रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश नव्हता. मात्र गोपाळ मंदिर प्रवेश करतो. आणि रामेश्वराचे दर्शन गैतो. हा प्रसंग कादंबरी अत्यंत संवेदनशील पद्धतीने कर्णिक रेखाटतात. "गोपाळ सभामंडपाची पायरी एका दमात चढून तेथे पायात खिळे ठोकल्यासारखा घट्ट उभा राहिला. आणि खणखणीत शब्दात बोलला, अण्णा खोत! या गुरवाच्या अंगातही देवाचे वारे नि त्या कोपऱ्यातल्या काळ्या महाराच्या अंगातही देवाचेच वारे! मत तो महारांचा देव असा पायरीखाली दूर उभा का? म्हातारा अण्णा खोत स्तंभित होवून फक्त उभे होते. त्यांना शब्द सुचत नव्हता. तसा आबू खोत पुढे झाला. गोपग्या म्हारा! मायझया तू पैला हयसून खाली हो! हयं तुका येण्याचो अधिकार नाय. गोपाळ अणिक खंबीरपणे छाती काढून उभा राहिला. जळजळीत शब्दात तो कडाडला. आबू खोत! शिवागीळ करण्याचं कारण नाही. मलाहि खूप वाईट शिव्या देता येतील पण त्या देणार नाही. मला फक्त एवढंच सांगा, का म्हणून मला या पायरीवर उभे राहायचा अधिकार नाहि? गोपाळ सभामडंपाची आणखी एक पायरी चढून वर गेला. आणखी एक पायरी - मग सभामंडप - आणि त्यानंतर थेट रामेश्वराच्या नंदी ...... आणि मग रामेश्वराचा पाषाण।" गोपाळ रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश करतोच आणि आपल्या सर्व बांधवाना मंदिर प्रवेशाची घोषणा करतो. गोपाळची ही कृती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेल्या दलित मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे फलित आहे. दलित असून मंदिरात प्रवेश केला याचा प्रचंड राग उच्च वर्गीयांना येणे स्वाभाविक होते. कारण अशा पद्धतीचे परिवर्तन त्यांना मान्य नाही ते परंपरागत जाती व्यवस्था मानत आलेले आहे. त्यामुळे आपल्या स्वातंत्र्यावर हा एक प्रकारचा घाला आहे असे त्यांना वाटते. अचानक आदल्या दिवसी मुंबईतील गिरणी कामगारांचा संप मिटतो आणि गोपाळला ताबडतोब मुंबईला यावे लागते. गावामध्ये निर्माण होणारा संघर्ष होत नाही. कर्णिक इथे कलाटणी देतात. पुढे कादंबरी पांडुरंगही गावात दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारावा यासाठी प्रयत्न करतो मात्र अचानक मुंबईवरुन येणारा भिक्खू येत नाही. त्यामुळे धर्मांतराची घटना घडत नाही. वास्तविक प्रसंग घडले असते तर कादंबरीत नवे संदर्भ आले असते. मात्र कर्णिक घटना-प्रसंगाना कलाटणी देतात.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील पांडुरंग आणि सुनंदा यांच्यातील प्रेमसंवेदनात्मक घटना-प्रसंगांची मांडणी कर्णिकांनी प्रभाविपणे केलेली आहे. पांडुरंग हा दलित तर सुनंदा ही ब्राह्मण आहे. यांच्यामध्ये नोकरीच्या निमित्ताने जवळीक येते. सुनंदाच्या स्वभाव स्वच्छंदी असल्यामुळे तिच्या बरोबर एस.टी. खात्यात काम करणाऱ्या पांडुरंगचे प्रेम जडते. कादंबरीत त्यांच्यासंदर्भातील घडणाऱ्या घटना भावनाशील बनवतात. ऑफिसमध्ये सुनंदा पांडुरंगच्या हातातील घड्याळ पाहताना हातात हात घेते. आणि त्याच्या मजबूत मनगटाची प्रशंसा करते. त्यावेळी पांडुरंगच्या मनातील प्रेमसंवेदनाचे वर्णन करताना कर्णिक लिहितात, "पांडुरंगांच्या मनात सनईचे मंजुळ स्वर निनादून गेले" पांडुरंगच्या मनात सुनंदाविषयीच्या प्रेमभावना अधिक

वाढायला लागता जेव्हा ती त्याला घरी घेवून जाते. त्यावेळी सुनंदाच्या स्वच्छंदी वागण्याचे वर्णन कर्णिक प्रभावीपणे करतात. मात्र पुढे सुनंदा आपल्याच जातीतील मुलाशी लग्न करते. त्यावेळी पांडुरंगाची विरहावस्था कादंबरीत चित्रित होते. "आयुष्यात धक्के सोसायची सवय तशी लहानपणापासूनचीच पण हा धक्का पांडुरंगाला फार जाणवला, मन फार विव्हळ झाले. तहानभूक उडाल, मनाची काहिली काही केल्या कमी होईना ... सुनदांच्या लग्नाला तो संध्याकाळी ऑफिसात लोकांबरोबर एक कटु कर्तव्य म्हणून गेला. पण त्याचा देह जणू निष्प्राण होता. हालचालीत जिवंतपणा नव्हता. डोळ्यात कशाचीच ओळख नव्हती." पांडुरंगच्या अंतरंगातील प्रेमभावना, आशा-निराशा या प्रेमसंवेदनाबरोबरच कांदबरीत त्याच्या व्यक्तिमत्वामधील विद्रोही विचारांचे प्रतिनिधित्व करणारे घटना-प्रसंगही कादंबरी आलेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरची चळवळ आणि सामाजिक कार्य हे अवघ्या दलित समाजाचे उर्जास्त्रोत होते. या कादंबरीत आंबेडकरी विचारांचे दर्शन घडलेले आहे. तसेच डॉ. आंबेडकर यांच्या (६ डिसेंबर १९५६) महापरिनिर्वाण दिवशीचा प्रसंगही कादंबरीत कर्णिकांनी अत्यंत ह्रदयस्पर्शी पद्धतीने मांडलेला आहे. बाबासाहेबांच्या जाण्यामुळे आपला आधारवड हारवल्याची भावना सामान्य कार्यकर्त्यांची झाली. गोपाळ, पांडुरंग यांच्या मनावर तर मोठा आघात झाला. ज्यांच्या विचार चळवळीचे आपण वाटसरु आहोत तो विचार देणारा महापुरुषच हरपला. त्यामुळे चळवळीचे काय होईल ही शंका गोपाळच्या मनात येवून जाते. गोपाळ आणि इतरांच्या अवस्थेचे चित्रण करताना कर्णिक लिहितात, "गोपाळ एखाद्या पुतळयासारखा जमिनीला खिळला. पांडुरंगाला काहीच सुचेना. हे अकल्पित असं घडल बाबासाहेब गेले. आता आधार कोणाचा. आत आम्ही कोणाकडे पाहावे पांडुरंगाला एकदम कढ येवू लागले. समोर सुदाम रडत होता. नलिनी रडत होती. पांडुरंगाला हुंदका आवरेना." बाबासाहेबांच्या जाण्याने खेड्यापाड्यातील दलितांचा नेता हरपला होता. सहस्त्रवधी गरीब दलित जिवाच्या आकांताने राजगृहापाशी जमले होते. अलोट गर्दी उसळलेली होती. आपल्या बाबासाहेबांच शेवटच दर्शन घेण्यासाठी प्रत्येकाच मन इच्छा झाली होती. जमलेल्या लोकांचे वर्ण करताना कर्णिक लिहितात, "दादरच्या स्मशानभूमीवर त्यांच्या अत्यं संस्कारप्रसंगी लोटलेल्या दलित बंधुभगिनींचा महासागर पाहून शेजारचा हिंदी महासागर तर ओशाळला असेलच पण सृष्टीची पंचमहाभूतेही स्तिमित झाली असतील". डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाचा प्रसंग मांडताना कर्णिक दलित समाजाच्या मनातील आंबेडकरांच्या प्रती असणारी असामान्य भक्ती, त्यांच्या अंतरंगातील आद्रता, आणि या महापुरुषाविषयी श्रद्धा अचुकपणे टिपलेली आहे. म्हणून हा प्रसंग कादंबरीत महत्त्वाचा वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित चळवळी फूट पडली. शे. का. फे. च्या बरखास्तीनंतर निर्माण झालेल्या आर. पी. आय.ची. शकले पडली. फक्त राजकीय स्वार्थासाठी आपले इमान प्रत्येकाने बाजारात विकायला सुरुवात केली. यामुळे जुन्या चळवळीतील कार्यकर्त्यांमधील उत्साह नाहीसा झाला. गोपाळच्या विचारातही सिथीलता आली. मात्र दलित चळवळीत विद्रोहाचा नवा आविष्कार आनंदाच्या रुपाने उदयास आला होता. विद्रोही तरुणांनी लेखणी आणि वाणीतून परत क्रांतीचा जयजयकार केला. आनंद या विद्रोही क्रांतीचा नायक होता. त्याच्या ज्वलंत व्यक्तिमत्वाचे विविध पैलू कर्णिकांनी अत्यंत अचूकपणे मांडलेले

आहेत. मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्याच्या रोप्यमहोत्सवानिमित्त बोलविलेल्या बैठकीतील प्रसंग आणि तेथे आनंदने मांडलेले विचार अत्यंत वास्तववादी पद्धतीने कर्णिक मांडतात. एकूणच 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत आलेले अनेक प्रसंग वास्तववादी, दलित जीवनाचा शोध घेणारे, त्याच्यातील मानसिक, भावनिक आंदोलने मांडणारे ह्रदयस्पर्शी आविष्कृत झालेले आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील १५ ऑगस्ट १९४७ रोजीचे वर्णन कसे केले आहे.

___

___

___

___

___

२) मधु मगेंश कर्णिक यांच्या एकूण साहित्य लेखनाची थोडक्यात माहिती द्या.

___

___

___

___

___

## २.६ 'भाकरी आणि फूल' मधील भाषाशैली :

कोणत्याही साहित्यकृतीमध्ये भाषेला अत्यंत महत्त्व असते. साहित्यात येणारा जीवनानुभव, सामाजिक वास्तव घटनाप्रसंग, व्यक्तीरेखा यांना दुग्गोचर भाषा करते. जास्तीत जास्त अधोरेखित लेखकागणिक साहित्यकृतीची भाषा बदलत असते. कादंबरीमध्ये तर भाषा हा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. भाकरी आणि फूल या कादंबरीतील भाषा सौष्ठवाचा शोध घेतांना त्यातील निवेदन, निवेदनाची भाषा, संवादाची भाषा त्यातील शब्दसौष्ठव यांचा विचार करावा लागेल.

'भाकरी आणि फूल' मध्ये मधू मंगेश कर्णिक यांनी तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. कादंबरीत आलेल्या निवेदनाचे वैशिष्ट्य म्हणजे दलितांचे समाजशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशाश्त्र चांगल्या पद्धतीने कर्णिकांनी रेखाटलेले आहे.

'भाकरी आणि फूल' मधील भाषेचा विचार करता निवेदनाची भाषा व संवादाची भाषा असा दुहेरी विचार करावा लागेल. निवेदनाची भाषा ही मुख्यतः प्रमाण भाषा आहे. तर संवाद हे कोकणातील लोकभाषेतील आलेले आहे. निवेदनाच्या भाषेत पात्रांच्या उक्तीकृतींचे तपशील कर्णिक देतात.

उदा. "तेवढ्यात गोपाळ बाहेरुन आला. सुनंदाला पाहून तो किंचीत चमकला. नलिनीने ओळख करुन दिली. गोपाळ विशेष काही न बोलता बसून राहीला. विचारग्रस्तता अलिकडे त्याने गिरणीतून रजा घेतली होती. नि वरळी, भोईवाडा, डिलाईल रोड, भायखळा इ. भागातील अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन तो व त्याचे शे. का. फे. मधील सहकारी धर्मांतर म्हणजे काय? हा निर्णय आपण का घेतला? त्याची अंमलबजावणी कशी करायची इ. गोष्टींचा प्रचार करीत होते. गोपाळ परतला होता. अपरिचित सुनंदाशी काय बोलावे हे न कळल्याने तो स्वस्थ बसला होता."

कथानकाला गती देण्याचे काम निवेदनातील भाषेतून घडून आलेले आहे. मुख्यतः वस्तुनिष्ठ पद्धतीने शब्दांचा वापर निवेदनातील भाषेत झालेले दिसते.

कादंबरीत आलेली संवादाची भाषा ही वैविध्यपूर्ण आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच कोकणी भाषेतील संवाद येतात. शिवनाव, त्याची बायको धुर्पता व गावातील लोक कोकणी भाषा बोलतात.

उदा. "पुतळीं नि गोंद्या त्याल येवून बिलले, आमका भूक लागली. बाबा, आल्के बरां कदवा वाटतला? आमका जेवन -, रे मेलग्या, जेवान कसला? आवशीचो जीव हकडे इलो जावोक! निवात्त खा, जिजी बाहेर येऊन ओरडली नी हताश आवाजात शिवनाकाला म्हणाली शिवनाका बाळंत अडलीहा! प्योर आडव्या हाताहा, माझो काय विला चालत नाही."

कादंबरीत आलेली संवादाची भाषा पात्रसदृश्य झालेली आहे. कादंबरीत वरिष्ठ वर्ग व दलितवर्ग यांच्यातील संवाद आलेले आहे. त्यामधील भाषेचा प्रयोग लेखकाने अत्यंत परिणामकारक पद्धतीने शब्दबद्ध केला आहे.

या कादंबरीत आणु खोताची भाषा ही शिवराळ, एकेरी, द्वेषात्मक, जहाल व दडपशाहीची भाषा आहे. मात्र त्या बदल्यात दलित समाजातील व्यक्ती त्याच्यांशी मवाळ भाषेत बोलतो. कादंबरीत आलेले संवाद कौटुंबिक पातळीवरील आहे. तसेच वैचारिक वाद-विवाद घडवून आणणारे व सामाजिक असे मांडणारे आहे. गोपाळ व नलिनी यांच्यातील संवाद त्यापद्धतीचे आहे. कादंबरीत आलेल्या भाषेत जातीय संकेत मांडणारे संवाद आलेले आहे.

उदा. "विठोबा चौळेकराची नि पांडुरंगाची विशेष मैत्री जमली. एक दिवस ते जानवली नदीवर आंघोळीला गेले असता विठोबाने विचारले, 'पांडुरंग तू आमच्यातीलच ना? म्हणजे तू 'म' की 'च' म्हणजे? म्हणजे तुझं कदम हे आडनाव 'म' मधल की 'च' मधल? 'म' म्हणजे महार नि 'च' म्हणजे चांभार! तू कोण? मी 'म' पैकी — मग मी ही तुझ्यातलाच. "

संकेतपूर्ण भाषेचा प्रयोग कर्णिक अत्यंत प्रभावीपणे करतात. लोकव्यवहार अशी गुप्त भाषेतील सांकेतिक प्रयोग नेहमी केले जातात. अशा प्रकारे कादंबरीत आलेली संवाद भाषा ही व्यक्तीसापेक्ष, कोकण प्रदेशातील लोकभाषेतील आहे.

या कादंबरीतील शब्दसौष्ठव अत्यंत परिणामकारक आहे. ग्रामीण जीवनात सर्रास वापरले जाणारे लोकभाषेतील शब्द येथे वापरले आहेत.

उदा. झील – (मुलगा), कडवेकरांदे – (महारांचे मिरगाच्या दिवसातील अन्न), सागोती – (मटन), थारले – (पड मेलेल्या जनावराचे मटन), आयदणे – (बांबुपासून केल्या जाणाऱ्या वस्तू), आफड - (शिवाशीव / विटाळ) इ.

याचप्रमाणे कादंबरीत म्हणी, वाक्यप्रचारांचा वापर केलेला दिसतो.

एकूणच ख्यातनाम साहित्यीक, 'मधू मंगेश कर्णिक' यांची 'भाकरी आणि फूल' यांची कादंबरी मराठी साहित्यात एक महत्त्वाची कादंबरी म्हणून नोंदवली जाते. दलित जीवनाच्या चिंतनातून ही कादंबरी लिहिलेली असून बदलत्या दलित जीवनाचा शोध या कादंबरीत वास्तववादी पद्धतीने घेतला आहे.

## २.७ 'भाकरी आणि फूल' मधील दलित जीवनाची चित्रण

मधू मंगेश कर्णिक हे स्वतः ब्राह्मण जातीचे, अत्यंत हळवे व संवेदनशिल वृत्तीचे लेखक तसेच एकूणच अभावग्रस्ताबद्दल प्रचंड अनुकंपा बाळगणारे बहुजनवादी लेखक म्हणून ते सर्वश्रुत आहे. कादंबरीतील करुळचा महारवाडा त्यांनी जवळून पाहिला. करुळच्या महारवाड्याच्या धर्तीवर कर्णिकांनी 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी लिहीली. कादंबरीच्या प्रारंभीच करुळच्या महारवाड्याचे चित्रण येते. महारवाड्याच्या दर्शनाने कोकणातील समग्र दलितांच्या व्यथेची कथा रसिकाला समजू शकते. तेथील महारांच्या दरिद्री झोपड्या, त्यांचे लाचार जिणे, परंपरेच्या नावाखाली वाडी मागणे, रामेश्वराच्या मंदिरासमोर रात्रभर भजन गाणे, सार्वजनिक उत्सवात वाद्य वाजविणे, कोकणातील खोताची पडेल ती कामे करणे इ. प्रकारच्या कामातून त्यांच्या दरिद्री लाचार जीवनाची ओळख होते. महारवाड्याचे चित्रण करताना कर्णिक लिहीतात.

कादंबरीच्या सुरवातीस दलित समाजांच्या गावपातळीवरील वस्तीचे चित्रण कर्णिक करतात, "पावसाळ्यातल्या बारीकसारीक ओहोळांनी आणि जमिनीबाहेर धुपत पडलेल्या पाळामुळांनी महारवाड्याची सारी पाणंद भरुन गेली होती. गुराढोरांच्या खुरांनी तेथील चिखल एकत्र बरबटत होता. शेणामुताचा एकच काला झाला होता. पाणंदीवर चिवारींनी छत घरले होत...पाणंद संपते तिथेच महारवाड्याला सुरुवात होते. पहिलेच घर शिवनाकाचे. त्याल खेटून मोन्या महाराचे ... सारी आढदहा घरे. पण कोंबडीच्या रवणीसारखी एकमेकात खुपसून राहिलेली." ग्रामव्यवस्थेत दलित समाजाची वस्ती गावकुसाबाहेर असते. तेथील अवस्था म्हणजे दारिद्याने, अस्वच्छतेने माखलेली. दलित समाजातील भिषण वास्तव म्हणजे भूक होय.

दारिद्यामुळे येणारी उपासमार, अन्न मिळाले तरी ते गावाने वाढलेले, शिळे, निकृष्ठ दर्जाचे असते. याचे चित्रण कादंबरी कर्णिक करतात. शिवनाकाच्या घरात धुर्पदाचे बाळंतपण सुरु असताना गोंद्या आणि पुतळीला खूप भूक लागते. त्यावेळी पांडुरंग त्यांना आंबिल करुन देतो. “पांडुरंगाने गाडग्यात नाचणीचे पीठ कालवून चुलीवर ठेवले. त्यात मिठाचे चार दाणे टाकले नि तो आंबील शिजवू लागला. जराशाने आंबील रटमटली तशी ती त्याने दोन्ही भांवडांसमोर मातीच्या परळातून ठेवली, थोडी आपण घेतली नि उरलेले गाडगे बाबासाठी झाकून ठेवून तो बाहेर आला.” ग्रामव्यवस्थेतील दलितांमध्ये दारिद्यामुळे सततची उपासमार, अन्नासाठी करावी लागणारी लाचारी, पड खाण्याची येणारी वेळ या सर्व दलित समाजातील वास्तवाचे चित्रण कर्णिक कादंबरी करतात. गावातील महारांचा व्यवसाय गावाची चाकरी करणे हाच होता. परंपरेने आलेली कामे प्रत्येकाला गुमान करावी लागत. त्यात कसूर झाल्यास वरिष्ठ वर्गाच्या शिव्या, माराला सामोरे जावे लागत. याविषयीचे चित्रण कादंबरीत येते, “चाकरीच्या महाराला गावाची नि देवाची सार्वजनिक कामे करावी लागत. गावात ताकीद करुन महत्त्वाची बातमी देणे, मयताची ताकीद, गावमेळ्याची ताकीद, पारधीची ताकीद - देवाच्या वार्षिकाची ताकीद अशा ताकीद असत. शिवाय बाळ-बाळंतीणीचे मयत झाले तर खड्डा खोदणे, ढोर मेले तर ते ओढणे. बाहेरगावच्या देवस्थांनाना वाजंत्री नेणे अशी कितीतरी कामे चाकरीच्या महाराला करावी लागत.” गावगाड्यात दलित समाजची उपेक्षा सतत केली जात. वरच्या वर्गातील लोक त्यांची सावली सुद्धा पडून घेत नाही. शाळेत मुलांना वेगळे बसवणे, त्यांना पाणी वरुन वाढणे. इ. गावव्यवस्थेतील दलित समाजाच्या वाट्याला आलेल्या जीवनघेण्या अवस्थेचे चित्रण कर्णिक कादंबरीत करतात. एकूणच ग्रामव्यवस्थेतील दलित समाज वास्तव हे पारंपरिक जीवनव्यवहार, व्यवसाय, राहणीमान असणारे आणि दारिद्र्य, उपासमार, भूक, लाचारी, अवहेलना, उपेक्षा, अन्याय, वरच्या वर्गाच्या शोषणाला बळी पडलेले कादंबरीत आलेले आहे.

‘भाकरी आणि फूल’ ही कादंबरीत कोकणातील महार समाजचे जीवन वास्वत जसे मांडलेले आहे तसेच शहरात राहत असलेल्या दलितांचे जीवन चित्रणही करते. कादंबरीमध्ये शहरातील दलित समाजाचे वास्तव हे दुहेरी स्वरुपाचे मांडलेले आहे. एक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या विचाराने प्रबुद्ध झालेला, आपल्या समाजाच्या विकासाचा विचार करणारा, आंबडेकरी चळवळीशी एकनिष्ठ, भौतिक सुख-सुविधापेक्षा वैचारिकदृष्ट्या विकसित झालेला दलित येतो. तर दुसऱ्या बाजुला नोकरी, पैसा यामुळे आपल्या समाजाची लाज वाटणारा, त्यांच्याशी आस्था नसणारा, उच्च वर्णीय समाजामध्ये राहणारा, चळवळीपासून दूर गेला आलेला दलित ब्राह्मण झालेला दलित येतो. कादंबरी येणारे प्राध्यापक सहदेव माने हे त्यांचे ज्वलंत उदाहरण होय. एकूणच शहरात राहणाऱ्या दलितांचे जीवन, आंबडेकरी विचाराने प्रभावित झालेले, चळवळीने व्यापलेले, आर्थिक दृष्ट्या संपन्न, गावापासून दूर राहण्याची मानसिकता, आपल्याच माणसांविषयी वाटणारी लाज, मरगळलेली चळवळ, दलितांमधील जातीयता, बौद्ध धर्माचा स्वीकार करुनही पारंपरिक पद्धतीने जगणारा दलित समाज या विविध वास्तवानी व्यापलेले आहे.

## २.८ समारोप

'भाकरी आणि फूल' ही कादंबरी १९७२ साली माहेरच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. या कादंबरीच्या निर्मितीला कारणही तसेच घडली. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची प्रसिद्ध अधिकारी म्हणून कर्णिक त्यावेळी काम करीत होते. स्वातंत्र्यांचा रौप्य महोत्सव कसा साजरा करावा याविषयी विचार विनिमय करण्यासाठी सचिवालयात साहित्यिक, कलावंत आणि पत्रकार यांची बैठक मुख्यमंत्र्यांनी बोलावली होती. त्यावेळी एका सहित्यिकाने पुढील सूचना केली – स्वातंत्र्यांची पंचवीस वर्षे चित्रित करणारा एक सुरेख चित्रपट शासनाने तयार करावा. आणि त्याचे नाव ठेवावे. 'भाकरी आणि फूल' भाकरी समृद्धीचे आणि फूल संस्कृतीचे प्रतिक! त्या वेळी कर्णिकांना आपल्या 'करुळ' गावातील महारांचे जीवन आठवले. तिथला कृष्णा, मोना महार, संपूर्ण महारवाडा यांच्यासाठी 'भाकरी आणि फूल' अप्राप्तच होती. पंचवीस वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर 'करुण' गावचा महारवाडा, आहे तसाच राहिला होता. कादंबरीच्या प्रस्तावनेत सविस्तर हकीकत आलेला आहे. या कादंबरीत तीन पिढ्याचा दलित संघर्ष दिसून येतो. अस्पृश्य समाजाला स्वातंत्र्याबद्दल काय वाटते? स्वातंत्र्याच्या पंचविस वर्षात त्यांना काय मिळाले? त्याच्या प्रमाणे या देशाला काय मिळाले? याचे वास्तव दर्शन या कादंबरीतून घडते. या कादंबरीत दलित तीन पिढ्याचा आढावा घेता पहिली पिढी अशिक्षित कार्यकर्त्यांनी, दुसरी पिढी बौद्धिक प्रगल्भ झालेल्या कार्यकर्त्यांची तर तिसरी पिढी स्वातंत्र्यानंतर काहीच न मिळाल्यामुळे अस्वस्थ झालेल्या कार्यकर्त्यांच्या मानसिकतेचे चित्रण या कादंबरीतून व्यक्त होते.

मधू मंगेश कर्णिक हे साहित्याचे सामाजिक दृष्टिकोनातून पाहणारे साहित्यिक आहेत. म्हणूनच त्यांनी दलित समाजातील तीन पिढ्याचे चित्रण या कादंबरीतून करुन स्वातंत्र्यां नंतर दलित समाजामध्ये व देशामध्ये कोणत्या बदल झाला. याचे चिनंतानत्मक चित्रण या कादंबरीतून चित्रित केले आहे.

या कादंबरीविषयी वि.श. चौघूले म्हणतात की, "ही कांदबरी करुळ गावचा शिवनाक महार व गोपाळ, पांडुरंग आणि आनंद या तीन मुलांची आहे. ही कादंबरी केवळ कुटुंबकथाच नव्हे, समाजकथन ही आहे. भाकरी आणि फूलचे वेशिष्ट्य, दलित पात्रांची अतिशय सूक्ष्म असे स्तरभेद लेखकाने उभे केले आहेत. "

## २.९ प्रश्नावली

१. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतून अस्पृश्य समाजाचा झालेल्या चित्रणाचा आढावा घ्या.

२. दलितांच्या जगण्याचे आणि परिवर्तनाचे प्रतिनिधित्व 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतून होते. या विधानाचा साधार परामर्श घ्या.

३. दलित तीन पिढ्याच्या संघर्षाचे चित्रण मधु मंगेश कर्णिक यांनी कसे केले आहे ते स्पष्ट करा.

४. 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील व्यक्तिरेखाचा आढावा घ्या.

❖❖❖❖

# ३. तूर्तास (कविता संग्रह)

: दासू वैद्य

प्रा. राजेंद्र आचार्य

# ३

# तूर्तास

**पाठ्यरचना :**

३.० प्रस्तावना
३.१ अभ्यासाची उद्दिष्ट्ये
३.२ तूर्तास काव्य संग्रहाची वैशिष्ट्ये
    ३.२.१ समकालीन समाजवास्तव टिपणारी कविता
    ३.२.२ कवीची नैतिकता मांडणारी कविता
    ३.२.३ वारी करणाऱ्या शेतकऱ्यांची कविता
    ३.२.४ स्त्रीवादी जाणिवेची कविता
    ३.२.५ मृत्युविषयक कविता
३.३ तूर्तास काव्यसंग्रहातील भाषाशैली
३.४ समारोप
३.५ संदर्भसूची

## ३.० प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात येऊ घातलेल्या मूल्यविहीन समाजवास्तवाला विरोध करीत मानवतावादी मूल्यांच्या पडझडीने विघटित होत चाललेल्या सांस्कृतिक विनाशाविरुद्धची तीव्र प्रतिक्रिया भालचंद्र नेमाडे, वसंत डहाके, सतिश काळसेकर, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, अरुण कोल्हटकर, तुळशी परब, मनोहर शहाणे, वसंत गुर्जर, आदींच्या कवितांमधून व्यक्त झालेली आहे. आधुनिकता विरुद्ध मानवी मूल्यांची जपणूक करणे असे या संघर्षाचे स्वरुप होते.

मागील पंचवीस वर्षाच्या कालखंडात लिहिणाऱ्या कवींनी सुद्धा यंत्रयुगातील मानवी विघटन, सांस्कृतिक ऱ्हास, कलांचा ऱ्हास, व्यवस्थेतील साचलेपणाविषयी नकारात्मक प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. त्यात श्रीकृष्ण राऊत, श्रीकांत देशमुख, जयराम खेडेकर, अशोक कोतवाल, प्रवीण बांदेकर, अरुण काळे, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, प्रमोद कोपर्डेकर, लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम, अनुराधा पाटील, विश्वास वसेकर, प्रकाश किनगावकर, निरजा, कविता महाजन आदीचा उल्लेख करता येईल.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर नव्याने उदयाला आलेल्या पिढीने तर जागतिकीकरण आणि आधुनिकीकरण यांच्या विरुद्ध कमालीचे उपहासयुद्धच पुकारलेले आहे. त्यात नैतिक

मूल्यांचा ऱ्हास, गरीबांचे शोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेत होणारे सामान्याचे शोषण, त्यांचे मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम जसे नात्यात झालेले बदल, मानसिक अशांतता, ताणतणाव, भौतिक सुविधाचा फोलपणा, तुटलेपण-एकाकांपण - परात्मता - नाराजी - वैफल्य - निराशा आदीच्या विरोधात उपहासयुक्त नकार देत विद्रोही पद्धतीने आपली देशीय अस्मिता सजगतेने साकार केली आहे.

"दलित ग्रामीण आदिवासी आणि स्त्री आदींच्या शोषणाच्या प्रभावी आविष्कारात या सगळयांच्या परिवेषात न येणारा पुन्हा एक सामान्य माणूस असतोच. विशेषतः नागर समाजातील हा सामान्य माणूस सहसा कवितेतून फार प्रभावीपणे व्यक्त होतो असे नाही. अशा हा सामान्य माणूस एकेकाळी बिनचेहऱ्याचा म्हणून संबोधला गेला," अशा या उपेक्षित किंवा काहीसा दुर्लक्षित चेहरा सदानंद रेगे, वसंत डहाके यांनी फार प्रभावीपणे प्रकट केला आहे. अशा या बिनचेहऱ्यांच्या सामान्य माणसांच जिणं अत्यंत संवेदनशील वृत्तीने हास् वैद्य यांनी अधोरेखित केले आहे. त्याचा 'तूर्तास' हा पहिलाच कवितासंग्रह जुलै २००३ मध्ये प्रकाशित झाला. त्यातील एकूण ६८ कवितांमधून भवतालचा समाजवासवाचा उभा-आडवा - तिरकस छेद दासू वैद्य यांनी घेतला आहे.

या कवितासंग्रहाचे नाव 'तूर्तास' असे आहे. तूर्तास म्हणजे वर्तमान. तूर्तास म्हणजे सध्या एवढेच पूरे. त्यामुळे भविष्यात निश्चितपणे यापेक्षा सक्षम, अर्चपूर्ण कविता काव्यसंग्रहाचा रुपाने भेट दिला जाईल. अशी ग्वाही देणारे हे शीर्षक आहे. असे म्हटले तर उचितच ठरेल. या कवितासंग्रहाचे शीर्षक जसे उत्कंठावर्धक आहे. त्याप्रमाणेच या कवितासंग्रहातील प्रत्येक कवितेचे शीर्षकसुद्धा औत्सुक्य निर्माण करणारे रसिकाचे मन वेधून घेणारे आहे.

## ३.१ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. मराठी कवितेमध्ये होणाऱ्या बदलाचा आढावा घेणे.

२. १९८० ते २००२ पर्यंत समासवास्तव कवितेत कसे चित्रित झाले यांचा अभ्यास करणे.

३. आधुनिक काळातील बदल समाज जीवन कवितेतून कसे व्यक्त होते यांचा अभ्यास करणे.

४. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, स्त्रीवादी जाणिवा, जीवनाविषयी चित्रण कवितेत कसे व्यक्त होते ते पाहिले.

५. तर्तास या कविता संग्रहाचे वैशिष्ट्ये जाणून घेणे.

### ३.१.१ दासू वैद्य यांचा परिचय

गेल्या पिढीतील मराठवाड्यातील एक आघाडीचे कवी ना. धो. महानोर, प्रकाश कामतीकर, फ. मु. शिंदे, लक्ष्मीकांत तांबोळी, महावीर जोंधळे, अनुराधा पाटील, विश्वास वसेकर यांच्यानंतर नव्या पिढीचे प्रतिभासंपन्न कवी म्हणून त्यांच्या आवर्जून उल्लेख करावा लागेल.

नांदेड जिल्ह्यातील मुदखेडचे दासोपंत हरिहरराव वैद्य उर्फ दासू वैद्य ग्रामीण भागात शिकले आणि पदव्यत्तर शिक्षणासाठी औरंगाबादला आले. नंतर जालना येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. सध्या ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे प्रपाठक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने त्यांच्या शहरी संस्कृतीशी परिचय झाला असला तरी ते शहरी वातावरणात मात्र रमले नाहीत. शहरी वातावरणात ग्रामीण आणि गुणात्मक संस्कार वाहून जातात यावर त्यांचा विश्वास असल्याने ते जालना येथेच स्थायिक झाले. ते १९८७ पासून वाङ्मयीन नियतकालिकांमधून नियमित लेखन करतात. प्रा. दासू वैद्य हे केवळ कविताच करतात असे नव्हे तर नभोनाट्य, एकांकिका, गीतगायन या प्रांतातही त्यांनी भटकंती केली आहे. त्याबरोबरीनेच बालसाहित्य, जाहिरातपट, स्तंभलेखन, मालिका, चित्रपट यांचे लेखनही त्यांना वर्ज्य नाही. 'तूर्तास' हा त्याचा पहिलाच कवितासंग्रह १९८९-२००२ या काळातील कवितांचा संग्रह आहे. तो जुलै २००३ मध्ये प्रकाशित झाला. त्यामुळे दासू वैद्य हे नाव केवळ मराठवाड्याचे न राहता अवघ्या महारष्ट्रात परिचित झाले आहे.

**पुरस्कार -**

- दासू वैद्य यांना आकाशवाणीच्या अखिल भारतीय नभोनाट्य लेखन स्पर्धेत पारितोषिक.
- महाराष्ट्रातील अनेक एकांकिका स्पर्धेतून लेखन व दिग्दर्शनाची अनेक पारितोषिके व साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती प्राप्त.
- साहित्य अकादमीच्या राष्ट्रीय कविता महोत्सवात कविता वाचन.
- साहित्य अकादमीच्या मराठी-मल्यायम कविता महोत्सवात कविता वाचन.
- कवितांचे हिन्दी-इंग्रजी-मल्यायम-तेलगू आणि उर्दू भाषात अनुवाद.
- अल्फा गौरव, मटा सन्मान आणि महाराष्ट्र राज्यशासन पुरस्कार.
- बालकविताचे वाचन जेष्ठ नाटककार विजय तेंडूलकर, यांचेकडून.
- 'तूर्तास' या कविता संग्रहाला 'इंदिरा संत पुरस्कार' प्राप्त.

## ३.२ तूर्तास काव्यसंग्रहाची वैशिष्ट्ये

### ३.२.१ समकालीन समाजवास्तव टिपणारी कविता :

समकालीन वास्तवाला सामोरे जात असताना स्वतःच्या जगण्यासह भोवतालच्या सांस्कृतिक - सामाजिक - राजकीय - वैचारिक परिसराला ओवून घेत स्वतःची जीवनजाणीव संपन्न करीत जाणारी ही कविता आहे. वरवर पाहता तिचे विवरण अगदी सहजपणे करता येईल असे वाटावे इतका या कवितेचा चेहरा साधा-अनलंकृत आणि समंजस आहे. पण जसजसा तिच्या अंतःप्रवृत्तीतील जिवंपणाचा आपण शोध घेऊ लागलो तसेतसे मानवी मनाचे, आयुष्याच्या अस्तित्वाचे संदर्भ व्यामिश्र होत जातात. जीवनाच्या त्वचेला चिटकून असणाऱ्या बहुपेढी अंतःस्तरांना स्पर्श करणारी ही कविता कवीच्या मनाच्या उत्कटतेचा संवेदनशीलतेचा प्रत्यय देते. ती वस्तुनिष्ठपणे आसपासच्या परिस्थिती विषयीची आपली निरीक्षणे नोंदवते. तरीही ती

केवळ निवेदनाच्या पातळीवर रेंगाळत नाही. कितीदा तरी या परिस्थितीचा - राजकारणाचा - निसर्गाचा क्रुरपणा पाहून ती हताश होते. नाते संबधाचे धागे उसवलेले ती पाहते. पण तरीही या अनुभवाचे सांकेतिक रुढ आवर्तने ती करीत नाही. कधी नदीच्या पात्राचा कोरडेपणा कवीला अंतःबाह्य हादरवतो. तर कधी शेतकऱ्यांच्या अपयशी कष्टाचा जाब विचारु पाहते. विलक्षण संवेदनशीलतेने भरलेला हा पिंड ज्या लोभास घाटातून आपल्या अर्थपूर्ण अनुभवाची मांडणी करतो त्यात कोणतेही नियोजन नाही किंवा जाणीवपूर्वकताही दिसत नाही. उलट त्यातील उत्स्फुर्ततेचे नाते लोकसाहित्यातील सुक्ष्म अंगभूत रुचीशी जुळलेले आहे. त्यांच्यावर लोकसंस्कृतीचा श्राव्यसंस्कार होता. अशा या स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणाऱ्या, वर्तमान समकालीन वास्तवाचे कालभान असणाऱ्या, जगण्याशी सम साधणाऱ्या, निरंतर समकालीन कवितेचे रस ग्रहण पुढील घटकाच्या आधारे करता येईल -

दासू वैद्य यांची कविता निरंतर समकालीन समाज वास्तवाला भिडणारी कविता आहे. त्याचबरोबर “सर्वसामान्य म्हटल्या जाणाऱ्या माणसाची कविता आहे. ९५% भारतीय हे याच कोटीतले आहेत! या ९५% माणसांच्या चिंता, काळज्या, संकटे, स्थिती-गती, भवितव्य या विषयीच्याच या कविता आहेत. त्याचबरोबर ५% लोकांच्या जगण्यातली कृत्रिमता व्यक्त करणारी सुद्धा ही कविता आहे.” सामान्य माणसाच्या जैविक आणि मानसिक कोलाहलाचा यात वेध घेतला आहे. त्याचबरोबर समाजात असलेले अनेक अंतविरोध आणि अंधारात लपलेल्या अनेक गोष्टी यातून उजागर झाल्या आहेत. या अंतर्गत विरोधाची रेलचेल दासू वैद्य यांच्या अनेक कवितामधून दिसून येते.

त्यांच्या सुरुवातीच्याच ‘राजघाट’ या कवितेत असामान्य आणि सर्वसामान्य यांच्यातला भेद व्यक्त झाला आहे. असामान्याचे जगणे जसे दांभिक असते. तसे “असामान्याचे मरणही कृत्रिम औपचारिकतांनी वेढलेले असते तर सर्वसामान्य माणसाच्या मरणाला आतड्याचा पीळ असतो.” सामान्य आणि असामान्य याच्यातील फरक व्यक्त करताना कवी दासू वैद्य लिहतात.

काहीही म्हणा .....
चंदनाच्या चितेत जळण्याची
मजा काही औरच असते
आम्ही मात्र खांदेकऱ्यानाही जड होतो
आमचा राजघाट म्हणजे
गावचा नदीकाठ
बाकी आमच्यासाठी चंदनाची लाकडं नसतात
सर्वधर्मिय प्रार्थना होत नाहीत
फक्त त्यादिवशी
गोठ्यातील चंद्री गाय
कडब्याला तोंड लावत नाही
बस एवढंच ! (पृ. ३-४)

वर्तमानकाळात लोक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणसाला काहीही किंमत नसल्याची जाणीव 'अहवाल' या कवितेत अतिशय भेदकतेने व्यक्त झाली आहे. झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, डास, मांजरी, कुत्री या गोष्टी फार झाल्याने जगणे कसे असह्य झालेले आहे हे कवितेच्या प्रारंभी कवी सांगतो तर कवितेच्या शेवटच्या परिच्छेदात तो म्हणतो -

"माणसे फार झालीयत आता
पण ... आपणच काय बोलावे
आपल्याबद्दल.
बाकी ढेकणांचा, उंदराचा
कुत्र्या मांजराचा डासांचा पालीचा
तातडीने बंदोबस्त करायला हवा
माणसाचं पाहू पूढच्या योजनेत"

(प. ३१-३२) कवीने येथे नकारात्मक पद्धतीने ढेकुण, उंदीर कुत्री, मांजरी, डास, पाली यांच्या प्रमाणेच माणसाच्या नाशाची ही योजना आखली जाऊ शकते. हे सुचविले आहे.

मूल्यात्मकतेला वर्तमानामध्ये कसलीही किंमत राहिलेली नाही. म्हणून सामान्याचे जगणे अर्थहीन, निसत्व, क्षुल्लक झाले आहे. याची जाणीव 'विध्वंसाचे भजन' या कवितेतूनही सूचकपणे व्यक्त केले आहे. उदा.

कुठेच काही जळत नाही
मग हा जळक्या मांसासारखा
वास कसा ? (पृ. ४९)

यात जगण्यातील ताण-तणावाची तीव्र अनुभूती व्यक्त केली आहे. वातावरणातील हिंस्त्रता या कवितेतून व्यक्त होते. या ओळी वरवर पाहता अत्यंत साध्या-सोप्या आहेत. परंतु न जळताही मांसाचा वास कसा ? हा अंत:विरोध असलेला प्रश्न भोवतीच्या वातावरणाचे भयप्रद रुप प्रत्ययकारी तर करुन जातेच शिवाय आंतर्मुखही करते.

"आयुष्याचा इत्यर्थ म्हणजे केवळ ऐकत राहणे! असाही एक अनुभव ते व्यक्त करतात. नाही तर सामान्य माणूस ऐकण्यापलिकडे काय करु शकतो ? असे ऐकता ऐकताच आयुष्याचा शेवट होतो जणू काही त्याचा ऐकण्यासाठीच जन्म असावा. अशी ही आवस्था, एक प्रकारे दयेस पात्र असणारे हे जगणे असते. पण या जगण्याचा स्वीकार करण्याशिवाय सामान्य माणसाच्या हातात दुसरे काही ही असत नाही. ही कमालीची हतबलता शेवटी कवटी फुटल्यावरच संपते." हे सत्य 'ऐकत राहतो' या कवितेत मांडतना कवी लिहितात. उदा.

"मी ऐकतो
ऐकल्यासारखे करतो
ऐकतच राहतो

शेवटी
गावाबाहेरच्या पत्र्याच्या शेडखाली
पेटत्या लाकडात
मला एकट्याला सगळे सोडून जातात
तेव्हा मी कवटीचं फुटण ही ऐकतो"

सामान्य माणसाच्या जगण्याची विविध परिमाणे आजच्या वर्तमान वास्तवासह वैद्य यांनी फार प्रत्ययकारी रीतीने प्रकट केली आहेत. तोच तो पणा आणि संवेदनविहिनता ही आजच्या वर्तमानकाळाची ठळक वैशिष्ट्ये आहेत हे 'माझ्या करमणुकीला बद्धकोष्ट झालाय' या कवितेतून तीव्रपणे व्यक्त होते, कुठंच काही करमत नाही म्हणून इतस्तः भटकणारा घरी येतो. तेव्हा त्याला जाणीव होते की दारात खुपशा मुंग्या आहेत. म्हणून तो त्या मुंग्याभोवती फेव्हीकॉलचे वर्तूळ काढते. त्यामुळे मुंग्या वर्तूळाच्या आत फिरत राहतात. वर्तूळाला स्पर्श होताच चिकटतात. मग त्याच्या लक्षात येते की, आपल्याभोवती तर वर्तूळ काढण्याची सुद्धा गरज नाही. आपणच आखून घेतलेल्या किंवा कुणीतरी आखून दिलेल्या वर्तूळातच फिरत राहणे हे सामान्य माणसाच्या जगण्याचे सूत्र असते. उदा.

तुम्ही एक दो एक म्हणा
मी कदमताल करीन
मी डावीकडे उजवीकडे वळेन
मी झुलझुल झेंडा झुल
मी वर्तूळाच्या रेषेला
स्पर्शही न करता चालेन

नैसर्गिक रुप हरवलेले, स्वभावगुण हरवलेले जगणे माणसाला जगावे लागते. असल्या निसत्व जगण्याच्या वेदना कवी पदोपदी व्यक्त करतो. जीवनाचे निर्रथकत्व आणि त्यामागची वेदना 'ड्रायव्हर पिळतो स्टेअरींगच शेपूट...' या कवितेतून स्पष्ट झाले आहे. या कवितेला ड्रायव्हर इतका चाकोरीत अडकलेला असतो की घरचा विचार करायला, मुलाबाळांचा, बायकोचा विचार करायला त्याला वेळच नसतो. या कवितेत तो फक्त ड्रायव्हर राहात नाही तर चाकोरीतील आयुष्य जगणारी, आपल्या वैयक्तिक भावभावना बधीर करुन जगणाऱ्या असंख्य माणसाच्या 'प्रतिनिधी' होऊन जातो. उदा.

वायपरसारखा ड्रायव्हर प्रवासतो
या गावाहून त्या गावाला
त्या गावाहून या गावाला
पण पोहचत नाही कुठेच

"मिलेनियमच्या युगात खेड्यापाड्यातील आणि लहान शहरातील जगण्याचे प्रश्न अधिकच भीषण झाले. ज्या लोकांना प्यायला अजूनही शुद्ध पाणी नाही. पोटाला पोटभर भाकर

मिळत नाही त्यांच्या दुःखाचा विचार कुणी करावा? अन्न वस्त्र निवारा वीज या मूलभूत गरजा जर या युगात पूर्ण हात नसतील तर त्यांच्या समस्याकडे कुणी पहावं. आजही खेड्यातले प्रश्न आणि शहर, महानगरातले जगण्याचे प्रश्न भिन्न भिन्न आहेत. आणि अजुनही शहरातल्या प्रश्नांची तड लावताना खेड्यातल्या सार्वजनिक प्रश्नांना डोळ्याआड करण्याचे राजकारणही सुरु आहे." कवी या विषमतेकडे पाहताना 'मिलेनियमच्या स्वागताच गाणं' लिहणाऱ्या कवीस डुगडुगती मान हालवीत कापऱ्या स्वरात म्हातारी म्हणते -

अरे बाबा, ते मिलेनियम आलं म्हणून
काय वरडतुस
त्यापरीस नळाला पाणी आलं असतं
तर बेस झालं असतं

वर्तमान वास्तवामध्ये सगळ्याच नात्यांना संभ्रमाची आवस्था प्राप्त झाल्याची जाणीव येथे प्रकट होते. त्याचप्रमाणे एकुणच जगण्याला एक विपरीत आवस्था कशी प्राप्त झाली आहे याचे दर्शन 'कसं वाटतंय आता' या कवितेतून व्यक्त झाले आहे. उदा.

रस्त्याने चालताना प्रत्येक दिवस
बंदूक घेऊन पाठलाग केल्यासारखा.
पोराला बोलताना अपराध्यासारखं
बापाशी बोलताना तिऱ्हाइतासारखं
प्रियसीशी बोलताना हरल्यासारखं
बायकोशी बोलताना गुदमरल्यासारखं
चालताना तरंगल्यासारखं
तरंगताना बुडल्यासारखे
झोपल्यावर जाग असल्यासारखे
बोलताना विसरल्यासारख
गाण ऐकताना उदासल्यासारखं
पेटताना विझल्यासारखं
नी नाकात चिलट जातं
तेव्हा श्वास घेतल्यासारखं वाटतं
एवढ सगळं मी एका दमात सांगून टाकलं
डॉक्टरानी जेव्हा नाडी तपासताना
कसं वाटतंय आता? (पृ.९९-१००)

संवेदनाविहीन, हतबल, दयेस पात्र असणारे जगणे याचा अर्थच हे जगणे मानवी स्वभावधर्म विसरलेले जगणे असते. अशा मानवी स्वभावधर्म विसरलेल्या जगण्याचे भेदक दर्शन कवी 'लोकांसाठी गोष्ट' या कवितेत घडवतो. "लोकांना नाग हवे असतात फणा उगारणारे पण

दंश न करणारे! अशा नागांचीच पूजा होते आणि त्याचे विष काढण्याची मोफत व्यवस्था असते. पण नागाना ठरवायचे असते की, आपली पूजा करुन घ्यायची की आपले धाक दाखविणारे नैसर्गिक रुप दाखवायचे." र्दुदैवाने सारेच नाग लव्हाळी सारखे डोलत राहतात. मग कुणीतरी एखादा नाग निदान 'लोकांसाठी गोष्ट' होण्यासाठी म्हणतो -

आता मी ठरवलंय
या टोपलीत हळदीकुंकू
वाहून घेण्यापेक्षा
चार काठ्या अंगावर पडल्या
तरी चालेल
पण या गारुड्याची
पुंगी हिसकावून निसटायच
जास्तीत जास्त काय होईल
मुंग्यासह सरफटत - फरफटत
मी काळ्या मातीच्या वारुळात जाऊन मरेन. (पृ.२३-२४)

'वाहत्या रस्त्यावर' ही एक कविता वर्तमानाचे निर्विकार, निर्दय, दगडी मनाची प्रतिमा साकारते. बासऱ्याचा गुच्छ काठीला लावून हिंडणारा हा विक्रेता, वाहनाचा धवका लागल्याने रस्त्यावर पडलेल्या बासऱ्या, त्या चिरडून टाकणारी कार, पोलीसाच्या भीतीने गर्दीत लपलेला बासरीवाला, तो दिसत नाही पण त्याची बासरी रोवलेली काठी गर्दीच्या डोक्यावर दिसत राहते. एवढीच घटना या कवितेत आहे. तरीही ही कविता मन सुन्न करते.

एक वेगवान कार
सराईतपणे चिरडून गेलेली
रस्त्याच्या मनोमध असलेला बासरीला
जन्माआधीच
चिरडल्या गेलेल्या
चिमकुल्या स्वरांचे मृतदेहही
हाती लागले नाहीत.

जगण्याच्या चुकलेल्या गणिताचा हिशेब पुष्कळ मराठी कवीनी मांडला आहे. मर्ढेकरांनी तर मरणामध्येच जगण्याचा कशिदा पाहिलेला आहे. दासू वैद्य यांनाही जगण्याचे गणित चुकल्याची, त्रैराशिकामध्ये गोंधळ उडाल्याचे जाणवते. हे 'आयुष्य' या कवितेतून व्यक्त झाले आहे.

या त्रैराशिकाच्या गोंधळात
गणित चूकलेल्या विद्यार्थ्यांन
छडी खाण्यासाठी

डोळे मिटून हात पुढे करावा
तसा मी उभा आहे.
पाच फुट सहा इंचाच्या बाकावर

"इथे गणित चूकलेला विद्यार्थी आणि मी यांना होणाऱ्या शिक्षेचा अनुबंध जोडला आहे. छडी खाण्यासाठी निमुटपणे अपराधी भावनेने हात पुढे करणारा विद्यार्थी आणि मी सारखेच दुखावले जातात. पुस्तकातील गणित आणि आयुष्याचे गणित अशी साम्य व्यवस्था येथे आहे. शिक्षेतील निमुटपणा व अपरिहार्यता या दोन्ही ठिकाणी सारखीच आहे 'मी उभा आहे पाच फुट सहा इंचाच्या बाकावर' या सहजसुलभ वाटणाऱ्या ओळीवर मात्र ध्यान आकर्षित केले जाते. मी आणि विद्यार्थी यातले वेगळेपण येथे निर्देशित होते. दोघांची जीवन-जाणीव भिन्न ठरते. पाच फुट सहा इंचाचे बाक म्हणजे 'मी' चा देह हा अर्थ येथे प्रतीत होतो. ही अर्थप्रतीती पाच फूट सहा इंच या परिणामदर्शक शब्दजुळणीतून सहज झाली आहे. शिक्षा म्हणून विद्यार्थ्याला छडीसाठी हात पुढे करावा लागणे, बाकावर उभे राहावे लागणे. या परिचित घटनांचा 'मी' च्या संदर्भात नवा पैलू मिळतो. मी आयुष्याचे गणित सोडवू शकत नाही. त्यामुळे देहात वावरण्याची अतिभीषण शिक्षा त्याला भोगावी लागते. "

"नैतिक मूल्यांची झालेली पडझड आणि त्यामुळे जीवनात प्रकटलेली हिंस्त्रता येथील जगण्याला अधिकच हीन दीन करुन टाकते. सत्वहीन आणि विरुप करुन टाकते. 'आदिम अंधार' या सारख्या कवितेतून शतकानुशतकाचा हिंसाचार वाचकाना आंतर्मुख करुन जातो. आज लहान मुलांच्या हातात खेळणी म्हणुन खोट्या का होईना बंदूका आल्या आहेत. या बंदूकाच्या निमित्ताने वर्तमानाच्या वास्तवाचा वैद्य यांनी घेतलेला वेध चिंतनीय झाला आहे. "

... पण चिमुकल्याच्या डोळ्यात
हिंस्त्रतेचा आविर्भाव पाहून
हातातली खोटी बंदूक
कधीही खरी होण्याची भीती
मेंदूत आरपार घुसत गेली (पृ.१८)

सामान्याच्या जगण्याशी बाजारपेठीय मूल्यव्यवस्थेचे कसे काय जुळणार? हा समकालीन प्रश्न 'एक्सचेंज ऑफर' या कवितेतून येतो उदा.

इकडे साबणाच्या जाहिरातीत
लवलवणारी उत्ताण तरुणी
थिरकत असते
महाकाय धबधब्याच्या पार्श्वभूमीवर
ही जाहिरात मूळी साबणाची
नसतेच आमच्यासाठी
जूनी कोरडी विहीर देऊन

त्या बदल्यात जाहिरातीतला
नवा धबधबा
आणण्याच्या कल्पना रंगत असतात
गावकऱ्यांच्या स्वप्नाळू डोळ्यात.
कवीचे हे कालभान मौल्यवान आहे

प्रश्न १) वर्तमानाची कविता म्हणून 'तूर्तास' या कविता संग्रहाचा थोडक्यात आढावा घ्या.

२) तूर्तास हा कवितासंग्रह म्हणजे समकालीन समाज वास्तवाचा घेतलेला शोध आहे. हे विधान स्पष्ट करा.

### ३.२.२ कवीची नैतिकता मांडणारी कविता :

दासू वैद्य यांनी पडझड झालेल्या समाजवास्तवाचा वेध घेताना कवीची नैतिकता मोलाची मानली आहे. "कवीने केवळ कविता लिहण्याला त्यांच्या लेखी कवडीचेही महत्त्व नाही. शेकडो कवी कचऱ्यासारखी कविता लिहतात आणि ती दुसऱ्याच दिवशी वर्तमान पत्राच्या रद्दीत जमा होते. संत तुकारामांनी जसे समाजाचे शल्यचिकित्सक बनून समाजाचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी कविता लिहित होते. तो कवीचा आदर्शही असतो आणि कवीचे प्रातिभही असते. ही सजग चौकस नैतिकता मानणाऱ्यापैकी दासू वैद्य हे एक कवी आहेत." हे त्यांच्या लेखनातून प्रकर्षाने जाणवते. या दृष्टीने 'कवी' पाणवठ्यावरच्या बायकांप्रमाणे 'विशुद्ध प्रेमाची कविता लिहणाऱ्या एका कवीसाठी', 'भोवताल उजळून टाकणाऱ्या लेकीचा बाप', 'औदुंबराचे पाय' या कवितांमधून ही जाणीव प्रकर्षाने जाणवते.

'तूर्तास' या कविता संग्रहातील 'कवी' या पहिल्याच कवितेत कवीच्या नैतिकतेची खोलवर व गंभीर चिकित्सा केली आहे. उदा.

कवीच्या कवितेत
चिमण्या चिवचिवतात
पण कधी स्वतःच्या घरात
चिमण्यांना खोपा करु देत नाही
तसा त्याचा फारसा विरोध नसतो
चिमण्याच्या खोप्याला
होत काय, खोप्यातून कचरा खाली पडतो
आणि कवीची बायको वैतागते
झाडावर कविता लिहणारा कवी
झाडाची मूळं भिंत पोखरतात
म्हणून हिरवंगार झाड तोडतो
शाळेच्या वर्गात
कवीची कविता

उदात्त भावना वगैरे म्हणुन शिकविली जाते
दरम्यान कुठल्यातरी अनामिक स्टेशनावर
कवीचा छिन्नविछिन्न देह रुळावर सापडतो
भक्कम चाकाची रेलगाडी आपल्या अजस्त्र पायांनी
तुडवून गेलेली असते कवीला
पंचनाम्यात कवीच्या खिशात
किराणामालाची यादी
आणि रेलगाडीवरची
एक लोभस कविता सापडते.

'कवी' या कवितेत चिमण्यांवर कविता लिहणं परंतु खोप्याला विरोध करणे. झाडांवर कविता लिहण परंतु झाडाची मूळ भींत पोखरतात म्हणून हिरवंगार झाड तोडून टाकणं, बायकोच्या रापलेल्या चेहऱ्यांच वास्तव न स्वीकारता सखीच खोट चित्र उभ करण. शाळेतल्या मुलांना कवीच्या कवितेतील उदात्त भावना शिकविली जाणे आणि कुठल्यातरी अनामिक स्टेशनावर कवीचा मृतदेहच सापडणे. या घटना प्रसंगातून जगण्यातल वास्तव आणि कवितेतल वास्तव भिन्न भिन्न आहे. व्यवहारवादी जग आणि कवीनिर्मित सृजनशील जग याची सांगड बसत नाही. हे व्यवहारवादी जग कवीचा बळी घेते. निर्मितीशीलतेच्या बळी घेणारी समकालीन व्यवस्था कृतघ्न व हिंस्त्र झाल्याचे इथे व्यक्त झाले आहे. केवळ काव्यविश्वालाच नव्हे तर प्रतिमाधर्माशी संबंधित असणाऱ्या सर्वानाच ही कविता आत्मचिंतन करायला भाग पाडते.

खोटा मुखवटा लावून कवितेचाच बाजार मांडलेल्या बाजारु कविंनाही दासू वैद्य यांनी उपरोधिकतेने फटकारले आहे. प्रश्नावली, पाणवठयावरच्या बायकांप्रमाणे, रोगनिदान, भोवताल उजळवून टाकणाऱ्या लेकीचा बाप, तुकोबा , विशुद्ध प्रेमाची कविता,...औंदुबर, पारवा या कविता त्याची साक्ष देतात. उदा.

मान्यताप्राप्त संपादकांच्या

डोळ्याला रुचेल असाच

पोशाख नेसवावा मी माझ्या

कवितेला.

साचेबंद संवेदनशीलतेच्या आहारी जाऊन आणि मागणी तसा पुरवठा : असा साचेबंद कविता लिहून कवितेचा चेहरा विद्रूप करणाऱ्या प्रवृत्तीवर कविता लिहून निषेध नोंदविण्याची एक वेगळी पद्धत दासू वैद्य यांनी इथे अवलंबिली आहे.

कवीच्या जीवनातली प्रश्नावली मांडताना कविता लिहून आनंद मिळतो. हे ठीक पण प्रश्नांची उत्तरे मिळतात का ? कवितेला पोशाख नेसवणाऱ्या कवीची तिरकस चिकित्सा करताना कवी स्वतःसह, सुसंस्कृत झाल्यांच तावातावानं सिद्ध करणाऱ्या कवी मित्रांसमोर नैतिक प्रश्न

उपस्थित करतो. कवीच्या न - नैतिकतेचं रोगनिदान करतो. 'पाणवठ्यावरच्या बायकांप्रमाण' या कवितेत कवी पाण्याच्या खेपा रिचवतात तेव्हा सगळ्या सोशिक कवितांची कीव वाटणे स्वाभाविक आहे.

या सगळ्या सोशिक कविता
बाहेरच्या पायऱ्यावर बसून
एकमेकींचे हात हातात घेऊन
सुख दुःखाच बोलतील
पाणवठ्यावरच्या बायकांप्रमाणे (पृ. ५२)

'तुकोबा' ही कवितासुद्धा या बाबतीत महत्त्वाची वाटते. संत तुकारामांना उद्देशून लिहलेली ही कविता आहे. या कवितांतून एकूणच वर्तमानकालीन कवीच्या व्यवहाराचा फज्जा उडविला आहे. यात कवी तुकारामानाच थेट विचारतो -

एक खाजगी विचारु तुकोबा
सगळ्याच विद्यापीठातून
तुझे अभंग अभ्यासक्रमाला
असतात
यासाठी तू काही विशेष प्रयत्न करतोस का ?
नाही कवी म्हणून हे सर्व माहित असायला हव बाबा

तुकारामाचं जगणं आणि लिहण यात अंतर नव्हत. 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे ते वंदनीय ठरले. संवादाच्या अंगाने जाणारी ही कविता कवितिक व्यवहार आणि थेट विद्यापीठीय राजकारणापर्यंत सगळ्यांवरच एक तिखट प्रकाशझोत टाकतात.

याच कवितेत त्यांनी तुकोबाच्या काव्यपरंपरेचा गौरव केला आहे. जसे -

तुझी कविता म्हणजे कातडीसारखी जगण्याला चिकटलेली
आम्ही तयार करतो वाफे
त्यात काही तुझ्यासारखं पेटावं म्हणून
पण महापूरात आमचे शब्द
मातीला घट्ट धरु शकत नाहीत
जगण्याचा अंत:प्रवाह
कवितेकडे वळविता आला पाहिजे
आमच्या श्वासाची लय कवितेत उतरत नाही
.......
आता आम्हाला कळायला हवं
नुसत तुझ नाव घेऊन
कविता मोठी होत नसते

त्याकरिता
जगण्याची सम साधायला
शिकल पाहिजे. (पृ. १३-१४)

शब्दाचं आकाश भरण्यासाठी तुकोबाच्या नावाचा वापर करुन अनेक लटपटी करणाऱ्या आणि कवितेच बारमाही पीक घेणाऱ्या बेगडी कवीचा त्यांनी धिक्कार केला आहे. नुसतेच तुकोबांच नाव घेऊन कविता मोठी होत नसते तर जगण्याची सम साधायला शिकले पाहिजे याचं भान कवीला असलं पाहिजे.

'विशुद्ध प्रेमाची कविता लिहणाऱ्या एका कवीसाठी' या कवितेत सुद्धा कविता आणि जगण्याच्या क्षणाची सोयरिक केली आहे.

पानाचं हिरवेपण ही जमीनीखालच्या
मूळाची ख्याली खुशाली असते.
या अविनाशी सख्या
कस सोडतील तुझ्या हाताच बोट?
तुझ चंदनी अस्तित्व या प्रियांनी
कधीच दडवून ठेवलय पदराआड
जिथे पोहचू शकत नाही कोणताच अग्निसंस्कार
जोपर्यंत कुणाला तरी कुणाची
प्राणातून याद येते
तो पर्यंत उगवत राहिल
तुझ्या शब्दातून पोपटी गवत (पृ. १७-१८)

अशा आशावादी आत्मविश्‍वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

'भोवताल उजळवून टाकणाऱ्या लेकीचा बाप' या कवितेत पूर्वार्धात सजग असणाऱ्या कवीला शब्द-अर्थ अन्वयाचे भान व्यक्त होते नंतर संपादकाने पत्र अंगणात येऊन पडले की, कविता कवीपासून अलग होऊन वाङमयीन वातावरणात पाऊल टाकते आणि रसिकाची दाद मिळाल्यावर कवी कृतार्थ होतो.

कधी भाजीसाठी आणलेला बटाट्याला
टोपलीत फुटतात हिरवे कोंभ
तसा अर्थ नको तिथं शेवाळतो
पर्यायाने घसरतो कवितेचा पाय
तरी कवी कवितेला प्राणातून सावरतो
शब्दातून घडवतो
अर्थातून वाढवतो
आता तिला कमी पडतं कवीच अंगण
तिला हाका मारतात दूरच्या नागमोडी वाटा

कविता कवीपासून अलग होऊन वाङमयीन वातावरणात पाऊल टाकते आणि रसिकांची दाद मिळाल्यावर कवी कृतार्थ होतो.

कवी आता स्वतःच्या अस्तित्वाने भोवताल
उजळवून टाकणाऱ्या लेकीचा बाप होतो.

प्रत्येक माणसाला जीवनात नवीनता हवी असते. पाण्याखालचे पाय शाबूत म्हणून इतके दिवस औंदुबराच्या पायाकडे कुणीच लक्ष दिल नाही. जळात पाय टाकून बसण्यालाही आता कित्येक वर्ष लोटलीत. 'औंदुबराचे पाय' या कवितेत कवी म्हणतो -

नद्याचे उगम बदलले
वाहत्या पाण्याचे स्वभाव बदलले
गंगेत डोळे झाकून ओंजळीत पाणी घ्यावं
आणि हातात एक सडका अवयव यावा
तसंच झालय डोळ्यांना
पाण्याखाली दोन सापळे लोंबकळतायत
औंदुबराचे पाय केव्हाच टोकरुन खाल्लेत
किड्यांनी, माशांनी

ही बातमी बालकवींनाही कळवायला हरकत नाही. पण बालकवींनी हिरव्या गालिच्याची, खिन्न पारव्यांची, उद्धवस्त धर्मशाळेची, फुलराणीची निळ्या-सावळ्या झऱ्यांची विचारपुस केली तर आपण काय सांगावं? वर्तमानात बालकवीचा निसर्ग हरवल्याची खंत व्यक्त करताना कवी जून्यांच अस हादरुन सोडणार नव रुप मांडतात.

ही त्यांनी कवी आणि कवितेची केलेली मीमांसा होय. केवळ मराठी कवितेपुरंत हे भाष्य मर्यादित नाही तर तमाम कवी आणि कवितेच्या निर्मात्याविषयीच आत्मभग्न आणि आत्ममग्न भान कवीने आपल्या उपरोक्त कवितांमधून निर्माण केले आहे. कवितेचा आणि कवीच्या नैतिकतेच्या कणा कसा असावा? या प्रश्नाचे उत्तर हवे असेल तर दासू वैद्य यांना कवितांना मॉडेल म्हणून समोर ठेवायला हरकत नाही. कवीच्या पिढीचं हे वर्तमान निर्भयपणे त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे.

आजच्या ग्लोबल युगात भाषा-संस्कृती याचा विनाश होत असल्याचा प्रतिक्रिया कवी तर विचारवंतही व्यक्त करतात. परंतु या ग्लोबल युगात माणूसकीचा ऱ्हास होत चालला आहे आणि शब्दाचे मूके घेणारे कवीही आपसात युद्धखोर झाले आहेत. सिलिकॉन सीटीत कविता पोहचविण्याच्या शर्यतीत असलेल्या कवीचही जीवन ग्लोबल व्हायरसमधून सुटलेलं नाही.

संस्कृती म्हातारी झाली म्हणून
तिला खाटकाला इकणार का?
बसू दे तिला बिचारीला कोपऱ्यात

लई दिवसाची सोबती न्हाई
कव्हा- बव्हा चापाणी देत जा तिला
(पोएट मिलेनियमच...)

या सारख्या ओळीमधून कवीने बदलत्या युगाची स्पंदने टिपली आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १ 'तूर्तास' या कविता संग्रहामध्ये कवीबद्दलच्या कोणत्या कविता आल्या आहेत ते थोडक्यात लिहा.

---

प्र. २ कवीची नैतिकता मांडणाऱ्या कवितांचा आशय व्यक्त करा.

---

प्र. ३ कवीबद्दलच्या कवितांचे रसग्रहण करा.

---

## ३.२.३ वारी करणाऱ्या शेतकऱ्यांची कविता

एखाद आदिम तत्वज्ञान रुजवावं तस शेतकऱ्यांनी संतांच बळ असलेलं वारकरी बी जमीनीच्या पोटात पेरुन दिलेल असतं. त्यानंतर वाट चुकल्या भ्रमिष्ट माणसासारखा अचानक पाऊस बेपत्ता झाल्यावर जन्मतःच दगावलेलं पोपटी अंकुर, शेतांच उजाडपण माथ्यावर भिरकावून विमनस्कपणे बांधावर उभा राहून शेतकरी पावसाची वाट पाहतो. हे 'पाऊस

हरवलेल्या माणसाची गोष्ट' या कवितेतून रोजच्या जगण्यातील प्रश्न सोप्या प्रतीकामधून व दैनंदिन व्यवहारातील बोलीभाषेतून अधोरेखित केले आहे. पावसाचे हे हरवलेपण व्यक्त करताना कवी लिहतो -

पाऊस हरवलेल्या माणसाची गोष्ट
तशी खूप अवघड असते समजायला
आणि तशी खूप सोपीही असते
तूर्त एवढचं.

सनातन काळापासून शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेल्या मरणकळा मांडताना कवी 'मरुन पडलेला पांडुरंग' या कवितेत लिहतो -

लांबवर टाळ मृदंगाच्या गजरात
पंढरपुराकडे निघालेली दिंडी
आणि इथं काळया शेतात
भरुन पडलेला पांडुरंग!

'शेतकरी हाच वारकरी आणि वारकरी हाच शेतकरी' हे एक अतूट समीकरण आहे. त्याची वारी चूकत नाही आणि त्याच्या नशीबी आलेली मरणकळाही कधी चूकत नाही. पिकातच पांडुरंग पाहणारे आमचे संत. पीक मेल म्हणजे पांडुरंगच मरुन पडल्याची अवस्था शेतकरी जीवनाला हादरुन टाकणारी आणि वाचकालाही सून्न करणारी मरुन पडलेल्या पांडूरंगाची प्रतिमा, कवीच्या मनात शेती आणि वारीतल्या दुःखाचा सम साधून आलेली आहे.

'मरुन पडलेला पांडुरंग' या कवितेतीलच सूर त्यांच्या 'दुबार पेरणीचे अभंग' या कवितेतून आळविलेला आहे. यात देह झाला ताटी, चंद्रभागा आटली, देवाचा सेंदूर झडलेला, वाजताना मृदंग फाटलेला, जनीचं जातं थांबलेलं, कणगीत वर्दळ उंदराची, माहेर ओस पडलेलं, चिरा निखळला, पार ढासळला, भजनात टाळ मुळमुळ, गाणं हरवलं, पान माती , उदासलं धान, सैरभैर रानं, मातीचे हबंरणे आर्त झाले, कणीस फुंटना, दाणाही भेटंना, तुक्याचा विठ्ठलही भेटंना यासारख्या प्रतिमातून या करुण विश्वाची निर्मिती करुन कवीने वारकऱ्याचे एक खेडे आपल्यासमोर उभे केले आहे.

मंद झाली नाडी करपली खेडी

डोळ्याच्या खाचा आभाळात ...

तरीसुद्धा बळीराजा हरलेला नसतो. कारण तो तर सृष्टीचा तारणदार, राष्ट्राचा पोशिंदा, साक्षात विठूमाऊलीच. जगबुडीचे सनातन दुःख उरात पेलतानाही तो म्हणतो -

घडू दे गा वारी लेक नांदू दे सासरी

माहेर ओस पडलेल ...

चिंतामुक्त, प्रसंगी जीवनमुक्त, तरीसुद्धा वारीचा नेम चुकवत नाही. कारण वारी जन्ममरणाचा पेरा. जन्म उगवला तरी ठीक, मरण उगवल तरी ठीक, शेवटी बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल,

करावा विठ्ठल जीवभावे. असा हा जीवभाव जपणारा शेतकरी-वारकरी, वारी आणि भक्तीचा अन्योन्य संबंध. हेच त्यांच्या जगण्यांच संतबळ. जगण्याची मरणावर ताण करणारी संजिवक प्रेरक शक्ती.

खेड्यातल्या लोकांच्या सूख दू:खाशी, पीडेच्या- आनंदाच्या क्षणाशी या कवितेच नाते जुळलेल आहे. ‘नवा पोळा’ या कवितेत कवीच्या मनोविश्वाशी एकरुप झालेली निसर्गाची प्रतिमासृष्टी साकारताना -

बाजा वाजतोय
आवाज घुमेना
ढगात पाऊस
लोपलेला

याच कवितेतून वर्तमान विरुप जीवनांच वास्तवसुद्धा कवी मांडतो. शेतकऱ्याच्या जीवनात त्याचा सखा असलेला ढवळ्या-पवळ्या शेवटी बाजारात उभा राहतो. जीवनातील आदिमांपासून अंतापर्यतचा हा संघर्ष कवीने मोठ्या खूषीने उभा केला आहे.

शिंगे रंगविली बाशिंगे बांधिली
जोडी उभी केली अंगणात ...
शिंग रंगविले बाशिंग बांधले
एक बैल उभा बाजारात ...

पावसाअभावी ओसाडपणा, शेतकऱ्याची सोशिकता, स्त्रियांची सहनशीलता, झाडाची पानगुळ, धरणामुळे कोरड्या झालेल्या नद्या असे सारे तपशील त्यांच्या कवितेला समृद्ध करतात. **उदा.**

दिवसाचं धड फरफटत गेलं
काळाच्या बैलगाडीमार्ग
धरणं उठली
झाड तुटली
पाऊस रुसला (नदी)

गावकरी, कष्टकऱ्याची अवकळा ‘पाऊस एके दिवशी’ या कवितेमधूनही व्यक्त झाली आहे. पावसाचा लहरीपणा आणि गावकऱ्याची, कष्टकऱ्याी अवस्था व्यक्त करताना कवी लिहतो

झोपमोड झालेला पाऊस डोळे चोळतच उठला
सोबत सगळ्या विध्वसंक चाली,
मग वेड्यासारख्या कोसळत राहिला बराच वेळ
शेवटी मूळच उघडी पडल्यावर
झाडांनी अंग टाकलं
बुडत्या बोटीसारखी झोपड्यांची अवस्था.

रोजच्या जगण्याच्या गतीच त्यांच भाव आणि त्यांच्या कवितेच्या नव्या वाटाचे केंद्र पाहताना एका शास्त्रीय सत्याचा धागा जोडून घ्यावासा वाटतो. बिटू सहगल हे 'सेन्चुरी' या मासिकाचे संपादक पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण करणारे कार्यकर्ते आहेत. आपल्या एका लेखात ते म्हणतात -

"Like the body heals its own wounds, the earth to has power to heal it self. All it asks of us, is to stop further damage."

(Eco-Logial, Times of India, 6th Jan 2001)

या बिटू सहगल यांच्या प्रतिपादनातून जमीनीची स्वतःवर उपचार करुन घेण्याची शक्ती आपल्या लक्षात येते. राजस्थानातील रणथंबोरच्या अभयारण्यात हे अशा स्वउपचाराचे चांगले उदाहरण आहे. चर्नोबिल येथील अणुशक्ती केंद्रात स्फोट झाल्यानंतर तिथली ओसाड झालेली जमीन वीसवर्षानंतर पुन्हा पशूपक्षाच्या आवाजाने सचेतन झाली हे सुद्धा आपल्या अनुभवाला आले आहे. मातीची ही अनोखी नवनिर्माणक्षमता आहे. आणि कवीची सर्जनशक्ती तिच्याशी नाते सांगणारी आहे. दोघांच्या अनुबंधातून कवीला जणूकाही जीवनाच्या गुढाची उकल झाली आहे. तो म्हणतो -

फुटलेल्या मृदंगाच्या साथीनं
पाय कापलेल्या माणसाची उमेदही
लंगडतेय गावभर
पण यातही एक दृश्य आहे आश्वासक ...
उरलेल्या काही माणसाचा समुह
सोबत हिरव्या रंग घेऊन निघालाय
फाटलेल्या जमीनीला लावण्यासाठी
ते पुन्हा एकदा सजवू ईच्छितात
ह्या मातीत माणसे आदिमपण (पृथ्वी नावाच्या पौगंड मुलीला)

विकसित होत जाणारा कवी म्हणून त्यांच्या नव्या दिशांचे संवेदनाचे अधिष्ठान येथे सापडते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १ शेतकऱ्याच्या व्यथा-वेदनांचे चित्रण 'तूर्तास' या कविता संग्रहात कसे आले आहे ते लिहा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

प्र. २ शेतकऱ्यांच्या अपयशी कष्टाचा जाब विचारणाऱ्या अनेक कविता 'तूर्तास' या कविता संग्रहात आल्या आहेत हे विधान साधार स्पष्ट करा.

प्र. ३ दासू वैद्य यांच्या कवितेतून कृषिसंस्कृतीचे दर्शन कसे घडविले आहे ते लिहा.

## ३.२.४ स्त्रीवादी जाणिवेची कविता

'तूर्तास' मधून व्यक्त होणाऱ्या स्त्रीवादी जाणीवांचाही स्वतंत्रपणे विचार करावा लागेल. विविध नात्यांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेला सामोरे जाणाऱ्या, पारंपारिक मूल्य व नाते व्यवहार जिवापाड जपणाऱ्या स्त्रीविषयी दासू वैद्य यांना विशेष ममत्त्वाची भावना आहे - त्यांच्या 'स्त्रीसुक्त' या कवितेत ते लिहतात -

स्त्री काय करते
आपल्या अस्तित्वाचा बर्नर
देते ठेवून पुरुषाच्या रक्त साठ्याखाली
रक्त उकळू लागते.
डोळ्यातली वटवाघळ
अधिकच हेलकावे खातात
भोवताल वितळून जातो
फक्त निळी ज्योत शिल्लक राहते.
बाकी सगळा अंधार असतो

या कवितेचा विचार करण्यापूर्वी काही गोष्टी इथे स्पष्ट केल्या पाहिजेत, त्या अशा की, ही कविता १, २ अशा क्रमांकाने दोन तुकड्यांत विभागलेली आहे. यात पहिल्या क्रमांकाच्या

तुकड्याच्या आशयाचा दुसऱ्या तुकड्यातील आशयाशी संबंध आढळत नाही. दोन्ही तुकडे स्वतंत्र कविता म्हणून वेगळ्या करता आल्या असत्या. पण असो, इथे फक्त पहिल्या क्रमांकाचा तुकडाच उदाहरणादाखल घेतला आहे. या कवितेच्या बीजापासून पूर्णपणे विभक्त आहे. या कवितेचे जे बीज आहे ते पहिल्या तीन ओळीत आहे आणि या तीन ओळी अतिशय समर्थपणे स्त्रीजीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. स्त्रीची सोशिकता, तिचे समर्पण आणि पुरुषी व्यवस्थेत तिचे अस्तित्व असा विविध पातळीवरचा आशय या तीनच ओळीमधून व्यक्त होतो.

"त्यांच्या कवितेत भारतीय परंपरेतल्या कवितेप्रमाणे स्त्रीत्वाचा गौरव किंवा रीतीवादी कवितेतल्याप्रमाणे स्त्री विषयी सौंदर्यात्मक दृष्टिकोन न आढळता तुळशीसमोर दिवा लावताना हातावरच्या तवा पोळलेला खुणा अधिक स्पष्ट दिसाव्यात तसा स्त्री दुःखाविषयी सहानुभूती व्यक्त करणारा प्रलय येतो." या कवितासंग्रहात वेदनेच्या नावाखाली ओरडणारी आई, काळाबरोबर वाहताना थकलेली गंगामाय, जून्या आवडणाऱ्या कवितेसारखी किंवा प्रत्येक मुलासाठी कविताच असलेली तरीही न सांगताच निघून जाणारी आई, स्वतःच्या अस्तित्वाचा बर्नर पुरुषाच्या रक्त साठ्याखाली ठेवून देत रक्ताला उकळी आणणारी स्त्री, एकमेकीचे हात हातात घेऊन, पाणवठ्यावरच्या बायकांप्रमाणे सुख दूःखाच बोलणाऱ्या कविता, रांगोळीतला मोर निसटलेली पोर, नवऱ्याच्या अकाली निधनानंतर जिद्दीने जगणारी मित्राची तरुण बायको, नकळत दुधापर्यंत मांजर पोचाव तशी अलगद माझ्यात शिरलेली कविता, पावसासारखी दिसणारी, पावसासारखी हसणारी, पाऊस हरवलेली ती, हिरव्या बांगड्या, कपाळभर मळवट भरुन, नदीच्यावर धूर होऊन निघून गेलेली आई, न्हालेला केसांभोवती साईबाबासारख्या टॉवेल गुंडाळून आवराआवर, झाडलोट करीत घरभर भिरभिरणारी बायको, स्वतःच्या अस्तित्वाने भवताल उजळून टाकणारी लेक, दुथडीभरुन वाहणारी नदी गावात शिरु नये म्हणून तिची खणा नारळांन ओटी भरणारी पोलीस पाटलीण, मिलेनियमचं गाणं लिहणाऱ्या पोएटची पाण्यासाठी तरसणारी म्हातारी, त्याच्यासाठी पेग भरुन देणारी आज्ञाधारक बाईल अशा विविध रुपाने विशेषतः आई, पत्नी, सखी, लेक, कविता अशा नात्यांनी दासू वैद्य यांच्या कवितेतली स्त्री आपल्याला भेटते.

दासू वैद्य यांनी कुटुंबातील घटकांना काव्यात्म पातळीवर नेले आहे. कौटुंबिक अनुभव व्यक्त करताना तो तटस्थपणे पाहणे अत्यंत अवघड असते परंतु अशा अनुभवांकडेही ते तटस्थपणे पाहतात. म्हणूनच कुटुंबातील व्यक्तीही कलात्मक होऊन जातात. उदा. 'न सांगताच आई निघून गेली म्हणून' या कवितेमधील आईच्या निर्वाणाचे दुःख, पण तो जीवनानुभवाच्या पातळीवर जातो म्हणून ते वैयक्तिक न राहता काव्यात्म होत जातो. उदा.

प्रत्येक आईचा मुलगा
कवी असूच शकत नाही
पण प्रत्येक मुलाची आई
त्यासाठी एक कविता असते
न विसरणारी. (पृ.२१)

हाच अनुभव आई गेल्यानंतरचे वडील, माझ्या मित्राने आत्महत्या केली आदी कवितामध्येसुद्धा प्रत्ययास येतो.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न. 'तूर्तास' या कविता संग्रहातील स्त्रीवादी जाणीवा व्यक्त करणाऱ्या कविताचे रसग्रहण करा.

## ३.२.५ मृत्युविषयक कविता :

मृत्यूविषयक किंवा अस्तित्व संपवून टाकले जाण्याच्या अस्वस्थ करणाऱ्या जीवन विषयक अनेक कविता अनेक आधुनिक कवीनी लिहल्या आहेत. दासू वैद्य यांच्या कवितेत मात्र मृत्यूचे उदात्तीकरण करण्याऐवजी समंजसपणे जीवनातील आदिम अटळ सत्य म्हणून स्वीकारण्याची दृष्टी आढळते. 'तूर्तास' मधील कवितांमधून मृत्यूचे संदर्भ कधी थेटपणे तर कधी सूचकतेने येतात. हे सर्व संदर्भ अस्वस्थ करणारे आहेत. मनाला चटका लावणारे आहेत. संवेदनक्षम बायकांना घेरणारे हे व्याकुळपण व्यवहारी व्यवस्थेकडून किंवा सर्जनशील वृत्तीचा, सोशिकतेचा, कौंटुबिक नातेसंबंधाचा, सुसंस्कृत व कुटुंबवस्तल व्यक्तिमत्वाचा अनपेक्षितपणा गळा घोटला जाण्याच्या कृत्यामुळे येतो हे जाणवले. उदा. रेलगाडीखाली बेवारशासारखा चिरडला गेलेला कवी हीच जाणीव ऐकत राहतो. या कवितेतूनही व्यक्त झाली आहे. उदा.

... मी ऐकतो
ऐकल्यासारखे करतो
ऐकतच राहतो,
शेवटी पत्र्याच्या शेडखाली
पेटत्या लाकडात
मला एकट्याला सगळे सोडून जातात
तेव्हा मी कवटीचं फुटणंही ऐकतो

या शब्दबंधामधून लादलेली असहाय्यता कारुण्यात रुपांतरीत झाली आहे.

वर्तमानकाळातील हिंसाचार दहशतवाद वाचकांना अंतर्मुख करुन जातो. आज लहानमुलांच्या हातात खेळणी म्हणून खोट्या का होईना बंदूका आल्या आहेत. या बंदूकाच्या निमित्ताने आलेली हिंस्त्रता जगण्याला अधिकच हीनदीन करुन टाकते.

मुल कुठ खेळतात खेळपाणी
खेळतात युद्ध-युद्ध
बैठकीतल्या उशाचा बांध रचून
पोरांनी एकदा
माझ्यावरच रोखली स्टेनगन
गोळीला घाबरलो नाही
पण चिमुकल्या डोळ्यात
हिंस्त्रंतेचा अविर्भाव पाहून,
हातातली खोटी बंदूक
कधीही खरी होण्याची भीती
मेंदुत आरपार घुसत गेली (पृ. १८)

याशिवाय न सांगताच निघून गेलेली आई, किटकनाशक पिऊन मरणोत्सव मांडणारा मित्र (माझ्या मित्राने आत्महत्या केली) शब्दातून पोपटी गवत रुजविणारा कवी (विशुद्ध प्रेमाची कविता लिहणाऱ्या...) या सारख्या कवितांमधून थेटपणे संदर्भ येतात. तर राजघाट, आई गेल्यानंतरचे वडील, पृथ्वी नावाच्या पौगंड मुलीस, वर्तमान, आईचे हरवलेल डोळ, विध्वसांचे भजन, भीती मेंदूत आरपार, मरुन पडलेला पांडुरंग इत्यादी कवितांमधून सूचकपणे मृत्यूचे विनाशकारी संदर्भ येत राहतात.

'मृत्यू' या घटनेचे मानवाला प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष रुपाने कायम संवेदनशील ठेवले आहे. जीवनाबद्दलचे अनेक पातळीवरील चिंतन हे मृत्यूकेंद्रीच असते मग ते कधी

हे अनामिका
आकाशस्थ दयाळा
तुझ्या कृत्याचा रंग का रे काळा

असे असेल तर कधी

या त्रैराशिकाच्या गोंधळात
गणित चूकलेल्या विद्यार्थ्याने
छडी खाण्यासाठी
डोळे मिटून हात पुढे करावा
तसा मी उभा आहे.
पाचफूट सहा इंचाच्या बाकावर

या प्रकारे परवशशरणतेचे असेल. पण या एकूण चिंतनाला मृत्यूचे भय चिकटलेले असते. याच भयाची बोच कमी करण्यासाठी व त्यातून समाधान शोधण्यासाठी

तोच धागा तोच कपडा

फक्त नव्याने पांघरणे

अशी मनाची समजूत केली जाते. पण या 'चितंनाचे मुख्य केंद्र मृत्यू' हेच असते. पण मूळात ही 'व्यक्तिगत' बाब असल्याने या अनुषंगाने व्यक्त होणारे चिंतन आत्मनिष्ठ रुप घेऊन व्यक्त होते. ही मृत्यूची बोच कमी करण्यासाठी जीवनाची सार्थकता वाढवत जाणे ही या मृत्यूचीच पण सार्वत्रिक होऊ पाहणारी प्रतिक्रिया आहे. एखादे चिंतन जेव्हा 'मी उभा आहे पाचफूट सहा इंचाच्या बाकावर' या चिंतनापासून 'हे अनामिका आकाशस्थ दयाळा। तुझ्या कृत्याचा रंग का रे काळा।।' या चिंतनापर्यत येते. तेव्हा हे चिंतन व्यक्तिगततेकडून सार्वजनिकतेकडे सरकते आहे असे दिसते. दासू वैद्य यांच्या कवितेतील आत्मनिष्ठ चिंतनाला अशी सार्वजनिक दिशेने प्रवास करण्याची क्षमता आहे. 'हे गंगामाय' या कवितेतसुद्धा प्रत्ययास येते. या प्रकारचे चिंतन आत्मनिष्ठेकडून जीवननिष्ठेकडे अधिक वळते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १ 'तूर्तास' या कवितासंग्रहातील मृत्यूविषयक कवितांचा आशय स्पष्ट करा.

प्र. २ 'तूर्तास' या कवितासंग्रहातील मृत्यूविषयक कविताचे रसग्रहण करा.

प्र. ३ 'तूर्तास' या कवितासंग्रहात मृत्यूबद्दलचा कोणत्या कविता आल्या आहेत ते लिहा.

## ३.३ 'तुर्तास' या कविता संग्रहातील भाषाशैली

मध्यमवर्गीय सामान्य माणसाचे जगणे काव्यात्म करणाऱ्या 'तुर्तास' या कवितासंग्रहाच्या प्रथमदर्शनी जाणवणारा महत्त्वाचा विशेष म्हणजे त्याला स्वतःचा असा चेहरा मोहरा, दंग आणि स्वतःची एक स्वतंत्र भाषाशैली आहे. संदर्भ संपन्नता आणि संवादात्मकता या कवितेला लाभली आहे. कवी या पहिल्याच कवितेपासून ते पोएट मिलेनियमच गाण लिहतो. तेव्हा या उपान्त कवितेतील भाषा प्रवाही, जोमदार, प्रसन्न आणि उपहास उपरोधपूर्ण आली आहे. त्यामुळे वाचकांच्या मनात ती थेटपणे उतरते. त्याचवेळी कवीला जाणवलेले प्रश्न वाचकांच्या मनात पेरुन जाते. त्याचप्रमाणे ग्रामीण मराठीच्या शब्दयोजनेमुळे ही कविता प्रलयकारी होते. उदा.

चंद्रभागा आटली

पताका फाटली

भजनात टाळ मूळ मूळ

विसंगती आणि विरोध ही त्यांची शक्तिस्थाने आहेत. माणसाच्या वर्तनातून त्यांची प्रतिमासृष्टी घडते. उरबडव्या भावना शब्दबंबाळ करण्यापेक्षा ते आपल्या भावना अलिप्त, कोरड्या आणि क्वचित मिस्किल कथानतून व्यक्त करतात. यात माणसाचे जग निसर्गाचे जग आणि बदलते जीवनस्वरुप, त्यातून बदललेली जीवनमूल्ये अत्यंत प्रवाही, प्रसन्न अशा भाषेतून व्यक्त झाली आहेत. वाचकांना आंतर्मुख करण्याची मोठी शक्ती या कवितेत सामावलेली आहे.

लोकगीतांशी अभंग - ओव्यांशी या कवितेचे नाते जुळलेले आहे. हे त्यांच्या अभंगातील अंगभूत लयीतून प्रकटताना दिसते. आपल्या कवितेवरील हे संस्कार कवी खालील शब्दात व्यक्त करतो.

ग्यानबा - तुकारामाच्या शब्दांच
नाक - डोळ घेऊन जलमलेले शब्द आहे.
किवा
बाजा वाजतोय
आवाज घुमेना
ढगात पाऊस
लोपलेला (नवा पोळा).

अर्थपूर्णता आणि अर्थवाहकता यातील कवितेच्या शब्दाशब्दात आढळते - उदा.
मुल आता पुंग्या विकत घेत नाहीत
घेतात प्रकाशमान होताना धडाडणारी बंदूक
मुल कुठ खेळतात खेळपाणी
खेळतात युद्ध युद्ध
किवा

प्रत्येक आईचा मुलगा
कवी असूच शकत नाही
पण प्रत्येक मुलाची आई
त्याच्यासाठी एक कविता असते
न विसरणारी

बोलभाषा, संदर्भसंपन्न भाषा, मानवी संवादाची भाषा, अशी नानास्वरुपी भाषा सहजतेने कवीने योजली आहे. बऱ्याचवेळा उपहास उपरोधाचाही आधार दासू वैद्य यांनी घेतला आहे या संदर्भात सुहास जेवळीकर म्हणतात -

"सभोवतालातील राजकीय, सामाजिक वास्तवातील विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवण्यासाठी उपरोध या शस्त्राचा जितका आधुनिक हिंदी कवितेत प्रभावीपणे वापर केला जातो, तितका मराठी कवितेत होत नाही. उपरोध हे दुधारी शस्त्र असते ते संयमाने वापरता आल नाही, तर वापरणाऱ्याच्या अंगावरच उलटण्याची शक्यता असते. उपरोधाला हास्याच्या पातळीवर न जाऊ देता दासू वैद्य या शस्त्राचा वापर आपल्या कवितेत प्रभावीपणे करतात."

'तूर्तास' मधील प्रतिमासृष्टीसुध्दा लक्षणीय आहे. रोजच्या जगण्यातील वस्तूनी क्रियांनी ती व्यापलेली आहे. जसे -

सर्वधर्मीय प्रार्थनाचे लोट, अंगावर धावून येणारे दिवस, समुद्राच उन्मत जनावर, बेवारशी म्हाताऱ्यासारख्या अंधार, पोट गेल पाठी, झोपमोड झालेला पाऊस, सरपटणारी रात्र, फणा आपटणारा अंधार, उदासल धान, देह झाला तारी, मातीचे हंबरणे आर्त झाले, कणीस फुटंना, जनीचं जातं थांबलेल, तक्याच्या विठ्ठल भेटना, माहेर पडलेल या प्रतिमाविश्वाची निर्मिती करुन कवीने वारकऱ्याचे खेडे उभारले आहे. तसेच यातून दीःखद वर्तमानाची भंगलेली प्रतिबिंब उमटतात, 'दासू वैद्य यांची कविता ही सर्वसामान्य म्हटल्या जाणाऱ्या कॉमन मॅनची कविता आहे. त्यांच्या जैविक आणि मानसिक कोलाहलाचा वेध घेणारी ही कविता आहे. एका अर्थाने मर्ढेकरांची वाट ते सुकर करतात. परंतु मर्ढेकरांनी संत कवितेच्या रचना अंगीकार करुन आपल्या कालखंडातल्या सामान्य माणसांच दुःख कवितेतून मांडले होते तर वैद्य यांनी मुक्त छंद या मुक्त शैलीचं बळ वापरुन काव्याभिव्यक्तीला महत्त्व दिल आहे.'

## ३.४ समारोप

दासू वैद्य लिखित 'तुर्तास' हा काव्यसंग्रह विविध विषयांना स्पर्श करुन त्यातील विवरण - विसंगतीसह अभिव्यक्त होतो. उदा.

भांग काढतना रुंगण्यावर
डोक्यातला कोंडा चमकतो
तरीही मी सिंहाची आयाळ खाजवण्याची
गोष्ट सांगावी

माणसाच्या कृती व वर्तन यातून कवीची काव्य प्रतिभा विलक्षण सजग झालेली आहे. व या सजगतेतूनच हा कविता संग्रह निर्माण झाला आहे. "निरंतर समकालीन ठरण्याची कुवत असणारा हा कवितासंग्रह आहे. म्हणूनच कवितेची जातकुळी शोधू पहाणाऱ्या समीक्षकीय अट्टहासाला फारशी दाद न देता ही कविता मार्गस्थ होते. ती स्वतःच स्वतःच्या वाटेने बहिवारेच्या मार्गाशी फारशी सलगी न दाखवता पुढे जाते. म्हणून टी.एस. इलियट म्हणतो." भावना आणि विचार याचा तोल जो लीलया सांभाळू शकतो तो मेजर पोएट इलियरच्या निष्कर्षात तंतोतंत बसणारा हा मेजर पोएट आहे. तरीही प्रवीण बांदेकर यांनी "कवितेचे विशुद्ध रुप जाणीवपूर्वक कायम राखण्याच्या नादात काही वेळा ही कविता काही मोहाच्या क्षणाला बळी पडण्याचा धोकाही जाणवत राहतो. रुपवादी रुप नाकारतानाच परिणामकारक शेवट, भावव्याकुळता, सत्यकथा शैलीतील टोकदारपणा, एखाद्याच मध्यवर्ती कल्पनेचा विस्तार, स्वच्छंदवादी कवीप्रमाणे गतकाळाच्या वैभवाच्या ऱ्हासाने हळहळणे, सांकेतिक जाणिवांचा पुनर्वापर इत्यादी क्लूप्त्या कवितेच्या आधुनिकीकरणास मारक ठरु शकतात." हे तुर्तास च्या संदर्भात आवर्जून सांगितले आहे. त्याचबरोबर साध्या शब्दबंधाच्या, विधानाच्या, वक्तृत्पपूर्ण मांडणीमध्ये कधीकधी कविता गद्यप्राय होताना दिसते. उदा. माइला करमणुकीला बद्धकोष्ठ झालाय, पोष्ट मिलिनियमचं गाणं लिव्हतो तव्हा, माझ्या मित्राने आत्महत्या केली, ड्रायव्हर पिळतो स्टेअरींगचे शेपूट इ. दीर्घशीर्षक इत्यादी काही लहाणसहाण मर्यादा आहेत. या मर्यादा आगामी लेखनात हळूहळू निघून जातील. त्यामुळे नव्वदीच्या दशकातील महत्त्वाची कविता म्हणून तूर्तास हा कविता संग्रह महत्त्वपूर्ण ठरतो.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न 'तूर्तास' या कवितासंग्रहाचे भाषाशैली वाचकांच्या मनात थेटपर्यंत उतरते हे विधान स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ३.५ संदर्भ सूची


१. डॉ. कोत्तापल्ले नागनाथ - तूर्तास : दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने पृ. १२.

२. सौ. मांडवगणे शोभना - 'तूर्तास; शीर्षकापासून औचित', दै. देशदूत २ वि. एप्रिल २००४

३. डहाके वसंत आबाजी - स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणारी कविता : तूर्तास खेळ जाफेना २००५ पृ. २९

४. लोकनाथ यशवंत - अतिसुक्ष्मपणे समाजवास्तव टिपणारी कविता

५. डहाके वसंत आबाजी - स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणारी कविता : तूर्तास खेळ जाफेना २००५ पृ. २९

६. पगार एकनाथ - तूर्तास जीवनाशी सम साधणाऱ्या कविता. अनुष्ठूभ मे / जून २००४

७. डॉ. कोत्तापले नागनाथ - तूर्तास : दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने पृ. १४

८. पगार एकनाथ - 'तूर्तास : जीवनाशी सम साधणाऱ्या कविता.' अनुष्ठुभ मे / जुन २००४

९. डॉ. कोतापल्ले नागनाथ - तूर्तास : दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने पृ. ११-२१.

१०. डॉ. किशोर सानप - तूर्तास : कवीची नैतिकता मांडणारी कविता पृ. ५

११. तत्रैव पृ. ३

१२. बांदेकर प्रवीण - साक्षात जुऑस २००४ पृ. २१

१३. तत्रैव

१४. तत्रैव

१५. मून संजय - तूर्तास : समकालीन कवितेचे प्रारुप देणारी कविता.

१६. बोरकर मनोज - तूर्तास : निरंतर समकालीन कविता. दै. लोकमत १९ जुलै २००३

१७. बांदेकर प्रवीण - साक्षात, जुऑस २००४ पृ. २१

❖❖❖❖

# ४. वैचारिक गद्य

: डॉ. वसंत शेकडे, डॉ. धनाजी गुरव,

प्रा. श्रद्धा राणे, प्रा. राजेंद्र डोंगरदिवे

प्रा. दौलत कांबळे

# ४

# वैचारिक गद्य

## - संपादित ग्रंथ

**पाठ्यरचना :**

४.० प्रस्तावना

४.१ अभ्यासाची उद्दिष्ठे

४.२ मराठी वैचारिक गद्याची पाश्र्वभूमी

४.३ वैचारिक गद्य मधील लेख

- ४.३.१ आपला धंदा कोणता व कसा करावा
- ४.३.२ स्त्री विद्याभ्यासः शंका निवारण
- ४.३.३ 'गुलामगिरी' ची प्रस्तावना
- ४.३.४ विनंती पत्र
- ४.३.५ सामाजिक समता
- ४.३.६ शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय
- ४.३.७ अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया
- ४.३.८ संस्कृती म्हणजे काय ?

४.४ वैचारिक गद्य मधील लेख

- ४.४.१ सख्यत्वासाठी
- ४.४.२ बुवाबाजी भस्मासूर
- ४.४.३ भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी
- ४.४.४ बुद्धीचा महिमा
- ४.४.५ मुंबई : १९९९
- ४.४.६ आधुनिकरण आणि जागतिकिकरण
- ४.४.७ कोरड

४.५ वैचारिक गद्यातील लेखांचा आशय

४.६ समारोप

## ४.० प्रस्तावना

(द्वितीय वर्ष कला) मराठी विषय - पेपर क्र. दोन साठी 'वैचारिक गद्य' लेख अभ्यासासाठी आहेत. 'वैचारिक गद्य' या ग्रंथात पंधरा वैचारिक लेखाचा समावेश करण्यात आला आहे. हा वैचारिक गद्य संपादित आहे. वैचारिक गद्याचा अभ्यास करण्यापूर्वी वैचारिक गद्य लेखन म्हणजे काय आणि मराठी साहित्यात वैचारिक गद्य लेखन कसे सुरु झाले त्याचे स्वरुप कसे होते याचा अभ्यास करण्यासाठी पहिल्यांदा मराठी वैचारिक गद्याचा पाश्र्वभूमी समजावून घ्यावी लागेल ही पुढीलप्रमाणे आहे.

## ४.१ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. मराठी वैचारिक गद्य समजावून घेणे.

२. मराठी वैचारिक गद्यातील समाजजीवनाचे झालेले चित्रण यांचा अभ्यास करणे.

३. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिती जाणून घेणे.

४. वैचारिक गद्याचा आशय जाणून घेणे.

५. समाज सुधारकांचे विचार किती थोर होते हे लक्षात घेणे.

## ४.२ मराठी वैचारिक गद्याची पाश्र्वभूमी :

इ.स. १८१८ मध्ये पेशव्यांच्या पराभवानंतर मराठी सत्तेचा अस्त झाला आणि भारतात इंग्रजांची सत्ता खऱ्या अर्थाने स्थिर झाली. महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता स्थिर झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात राज्यकारभाराची सूत्रे एलफिन्स्टन, माल्कम यासारख्या दूरदर्शी, कर्त्यव्यतत्पर व मुत्सद्दी अधिकाऱ्यांच्या हाती आली. आपल्या राजकारभाराच्या व धोरणांच्याद्वारे येथील समाजाचा विकास संपादन करण्याच्या कार्याला त्यांनी प्राधान्य दिले. भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार चालू असताना तेथील राज्यांच्या उत्पन्नातून काही रक्कम एतद्देशीय लोकांच्या शिक्षणासाठी कंपनीने खर्च केली पाहिजे हे ब्रिटिश पार्लमेंटने १८१३ मध्येच ठरविले आणि नवी सनद कंपनीला देताना दरवर्षी कंपनीने कमीतकमी एक लाख रुपये हिंदी लोकांच्या शिक्षणासाठी खर्च केलेच पाहिजे. असे एक कलम घातले होते. पुढे ही रक्कम बंगाल, मुंबई व मद्रास प्रांतांना वाटून देण्यात आली. त्यातूनच त्या त्या प्रांतांच्या गव्हर्नररांनी शिक्षणव्यवस्था सुरु केली. मुंबईत एलफिन्स्टन गव्हर्नर होते. मुंबईला एक इंजिनियरींग व एक वैद्यकीय अशी दोन कॉलेजस आणि पुण्याला एक हिंदू कॉलेज सुरु केले होते. एलफिन्स्टन देशी भाषेतूनच शिक्षण दिले जावे या मताचे होते. ज्ञान प्रसारासाठी इंग्रजीतल्या उत्तम ग्रंथांची भाषांतरे छापण्यासाठी त्यांनी भाषांतर खाते सुरु केले. गोडबोले, जांभेकर, हरी केशवजी वगैरे विद्वानांची त्यावर त्यांनी नेमणूक केली. ह्याच संस्थेला बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी असे पुढे नाव प्राप्त झाले. इ.स. १८५७ मध्ये मुंबई विश्वविद्यालयाची कायद्याने स्थापना झाली. नवीन नवीन हायस्कूले आणि कॉलेजे उघडून त्याला जोडण्यात आली. अशा प्रकारे ब्रिटिशांनी भारतात शिक्षणप्रसाराला

चालना दिली. महाराष्ट्रातही विविध संस्थांची स्थापना करण्यात आली. या कार्यत प्रारंभीच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठे कार्य केले. हे नाकारता येणार नाही.

शिक्षणाच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात नवशिक्षित तरुणांची एक नवी पिढी उदयास आली. पाश्चिमात्य संस्कृती, त्यांनी केलेली भौतिक प्रगती, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता यासारख्या आधुनिक विचारांचे, तत्त्वांचे या तरुणांना ज्ञान प्राप्त झाले. त्यांनी भारतातील आपल्या धार्मिक व सामाजिक जीवनाकडे चिकित्सक भूमिकेतून, आत्मपरीक्षणाच्या जाणिवेतून पाहण्यास सुरुवात केली. त्यातूनच सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना गती मिळाली. समाजातील अनिष्ठ सामाजिक व धार्मिक परंपरावर टीका करण्याबरोबरच आपल्या विचार, लेखन व कृतीच्या द्वारे समाजात परिवर्तन घडवून आणण्यास या समाजसुधारकांनी सुरुवात केली. त्यात जगन्नाथ शंकरशेठ बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, भाऊ दाजी लाड, विष्णुशास्त्री पंडित, महात्मा जोतीराव फुले इत्यादी समाजसुधारकांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

समाजसुधारणेची तळमळ असलेल्या तरुणांनी वृत्तपत्रे व ग्रंथांच्या माध्यमाचा मोठा उपयोग केला. ब्रिटिश शासनामुळे उपलब्ध झालेल्या मुद्रणकलेचा व विचारस्वातंत्र्याचा उपयोग करुन त्यांनी निरनिराळी वृत्तपत्रे सुरु केली. (उदा. 'दर्पण' - संपादक - बाळशास्त्री जांभेकर, 'शतपत्रे' - संपादक - लोकहितवादी, 'निंबंधमाला' - विष्णुशास्त्री चिपळूणकर, 'केसरी' - लोकमान्य टिळक, 'सुधारक'- आगरकर आणि महात्मा फुले, 'शेतकऱ्यांचा असूड', 'इशारा' व 'सार्वजनिक सत्यधर्म' यासारखे वैचारिक लेखन) या वृत्तपत्रांतून परंपरागत आचार, रुढी, अंधश्रद्धा यावर प्रखर टीका करण्याबरोबरच त्यांनी समाजाला नवविचारांचे ज्ञान करुन देण्याचा प्रयत्न केला. आपल्या ग्रंथामधून स्त्रीयांच्या समस्या, विधवा स्त्रीयांची दयनीय अवस्था, अस्पृश्यांवरील बंधने यावर टीका करण्याबरोबरच नवसमाजाच्या निर्मितीसाठी कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यासाठी नवीन संघटनांची निर्मिती केली गेली. शिक्षणसंस्था सुरु करणे, विधवांचे पुनर्विवाह घडवून आणणे यासारख्या प्रत्यक्ष कार्यालाही त्यांनी चालना दिली. भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या गरजेचे प्रतिपादन करण्याबरोबरच ब्रिटिशांच्या अयोग्य धोरणावरही त्यांनी टीका केली.

सारांश, इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणामुळे भारतीय समाजजीवनात आमुलाग्र बदल झाला. एकोणिसावे शतक हे प्रबोधनाचे युग मानले गेले. ह्याच काळात मानवतावाद, लोकशाहीमुल्ये, व्यक्ती स्वातंत्र्य, वैज्ञानिकता, सामाजिक आणि धार्मिक दास्यविमोचन त्यासाठी चळवळी झाल्या. 'शिक्षण आणि सामाजिक सुधारणा' ह्याचे महत्त्व त्या काळातील पिढीला कळाले होते. शिक्षण हे अखंडपणे समाज घडविण्याचे कार्य आहे. माणूस घडविणारे शिक्षण मिळाले पाहिजे आणि शिक्षणाने समाजात समानता आली पाहिजे ह्या ध्येयाने प्रेरीत होऊन महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांनी कार्य केले.

## ४.३ वैचारिक गद्य मधील लेख

**१) आपला धंदा कोणता व कसा करावा - दादोबा पांडुरंग तर्खडकर**

**२) स्त्री विद्याभ्यासः शंका निवारण - बाबापदमनजी**

**३) 'गुलामगिरी' ची प्रस्तावना - जोतीराव गोविंदराव फुले**

**४) विनंती पत्र - गोपाळ बाबा वलंगकर**

**५) सामाजिक समता - मे. पु. रेगे**

**६) शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय - मुकुंदराव पाटील**

**७) अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर**

**८) संस्कृति म्हणजे काय? - इरावती कर्वे**

**९) सख्यत्वासाठी - शांता किर्लोस्कर**

**१०) बुवाबाजी भस्मासूर - दि. के. बेडेकर**

**११) भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी - श्रीपाद महादेव माटे**

**१२) बुद्धीचा महिमा - पांडुरंग सदाशिव साने**

**१३) मुंबई : १९९९ - वसंत बापट**

**१४) आधुनिकरण आणि जागतिकिकरण - दिलीप पुरुषोत्तम चित्रे**

**१५) कोरड - अतुल देऊळगावकर**

### ४.३.१ आपला धंदा कोणता व कसा करावा? - दादोबा तर्खडकर

१९ वे शतक हे भारताच्या दृष्टीने ज्ञानाचे नवनवीन जाणीवेचे शतक होते. या नव्या जाणीवा पाश्चिमात्यांमुळे आपल्या समाजात निर्माण झाल्या. याच कालावधीत ब्रिटीशांनी भारताचे आर्थिक शोषण करण्यास प्रारंभ केला. उत्पादनाच्या नवनवीन पद्धती व आधुनिक तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने त्याने औद्योगिक क्रांती सुरू केली. परिणामी त्यांच्या मालाचा दर्जा चांगला असल्याने त्यांचा खप वाढला परंतु याचा उलटा परिणाम मात्र भारतीय कामगार व कारागिरांवर झाला. याच कालावधीत प्रारंभी मुंबई शहराला महत्त्व प्राप्त झाले. तसेच मुंबईत शिक्षणाचे वारे मोठ्या प्रमाणात वाहू लागले परिस्थितीला अनुसरून अनेक साहित्यीकांनी लेखन केले त्यामुळे दादोबा पांडुरंग तर्खडकर, बाळशास्त्री जांभेकर, परशुराम तात्या गोडबोले, नारायण विष्णू पडवळ, बापू छत्रे, हरि केशवजी पठारे, गोाविंद नारायण माडगावकर असे अनेक विद्वान साहित्यिक मुंबईतच निर्माण झाले. त्यापैकी दादोबा तर्खडकर यांनी आर्थिक गोष्टींवर आधारित लेखन करण्यास भर दिला त्यातूनच आपला धंदा कोणता व कसा करावा या संदर्भात त्यांनी वैचारिक लेखन केले आहे.

सुरूवातीलाच तर्खडकर यांनी नमुद केले आहे की मनुष्यामध्ये जातीला महत्त्व नाही आणि असल्यास ते देऊ नये. तसेच धंद्यातही उच्चनिच्च अशी कोणतीही जात नसते. मात्र पूर्वीपासून धंद्यावरून जात भेद मानला गेल्याने जातीमध्ये भेद वाढत चालला आहे. तुम्ही

कोणतेही काम करा पण ते मनापासून करा. त्या कामाचा जातीशी कोणताही संबंध नसावा. उदा. एकाने कागदावर सुंदर अक्षर लिहीले आहे व दुसऱ्याने कागदावर सुंदर चित्र काढले आहे व तिसऱ्याने नकाशा काढला आहे. यापैकी अक्षर लिहीणारा कारकून उच्च धंद्याचा व जातीचा बाकीचे मात्र निच धंद्याचे हे समजणे फार चुकीचे आहे.

आपला दैनंदिन चरित्र चालविण्यासा ही आपण जो धंदा स्विकारला असेल तो मोठ्या सचोटिने, श्रमाने, हुशारीने व लक्षपूर्वक चालविला पाहिजे. अशा गुणांनी आपले गुणांचे परिक्षण व गिऱ्हाईक यांची मने प्रसन्न ठेवली पाहिजेत म्हणजेच आपला धंदा व लौकिक वाढवून पैसा मिळतो त्या शिवाय कोणताही धंदा स्वतंत्रपणे करण्यास लाज न बाळगता उलट प्रतिष्ठा मानून व्यवस्थितपणे केला पाहिजे. आपल्या देशात कारागिरी स्वतंत्र धंदा व दुकानदारी, गायन, वाद्य इ. मनोरंजन कला यांना मान नसल्याने ही सर्व कामे लोक हलकी समजतात व फक्त लिहीणे कारकूनी करून कचेरीत रोजगार मिळविणे ही मोठ्या प्रतिष्ठेची कामे समजली जातात त्यामुळे देशाची फार हानी होते.

आपल्याकडे फावला वेळे असेल तर कोणतेही काम अगर धंदा करण्यास लाजू नये असे दादोबा तर्खडकर व्यक्त करतात. ते म्हणतात उदा. सोन्याचे दागिने घडविणे, अंगरखा शिवणे, जोडे शिवणे व इतर छोट्या-मोठ्या वस्तू बनविणे ही कामे करायला हवीत, उलट छोटी कामे करण्यात मनुष्यास लौकीक प्राप्त होतो. उदाहरणा दाखल सांगायचे झाले तर पुण्यातील मोरे शास्त्री साठे हे पाठशाळेत मुख्याध्यापक असताना स्वतःच्या घरी रिकाम्या वेळेत ते महिलांचे दागिने स्वतःच्या हाताने घडवत असत व इतर कामे ही ते करत असत. या कारणास्तव पुष्कळ प्रतिष्ठीत लोक त्यांची निंदा करत परंतु तर्खडकर यांनी मात्र त्यांची स्तुती केली आहे.

सर्वसाधारणपणे प्रत्येक मनुष्याने आपल्याला ज्या धंद्यात रस आहे, जो धंदा आवडीचा आहे तो धंदा आवडीचा आहे तो धंदा करायला लाजू नये. कोणाला हस्तकलेची आवड असते. कोणाला गाण्याची, वाद्य वाजवण्यांची तर कोणाला व्यापार-धंद्याची आवड असते प्रत्येक मनुष्याच्या युद्धाचे कल निरनिराळे असतात. ते लहानपणी मुलांमध्ये समजून येतात. मग आपण तसे कल पाहून मुलांना योग्य ती दिशा दिली पाहिजे. त्यांना आवडत्या कलेनुसार त्यांना शिक्षण दिले पाहिजे. धंदा व व्यवसायातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नितीमत्ता होय. कोणतेही काम करताना मन प्रसन्न ठेवावे तसेच मनाशी प्रामाणिक राहून सचोटीने व्यवहार करावा.

आपले ग्राहक दुःखी होणार नाही याचा विचार करून धंदा करावा. केवळ अतिरिक्त नात्यापोटी समोरच्या व्यक्तीशी व्यवहार करून नये. हीच गोष्ट आपण आपल्या पुढील पिढीस शिकवणे गरजेचे आहे. एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची ती म्हणजे पैसा व धंदा रोजगार मिळविण्यात आळस, धर्म, परस्परांचा द्वेष या गोष्टी आडव्या येता कामा नये जेणे करून आपल्याच हातून आपले व देशाचे आपण नुकसान करू शकणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. धंदा, व्यवसाय याची निवड कशी करावी आणि ते कोणत्या पद्धतीने करावे या संबंधीचे उपदेश, विचार दादोबा तर्खडकर यांनी या वैचारिक लेखातून सांगितले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'आपला धंदा कोणता व कसा करावा' या वैचारिक लेखातील आशय थोडक्यात लिहा.

## ४.३.२ स्त्रीविद्याभ्यास : शंकानिवारण - बाबा पद्मनजी

'स्त्रीविद्याभ्यास - शंका निवारण' हा वैचारिक लेख बाबा पदमनजी यांनी लिहिला. या लेखात स्त्रीस्वातंत्र्याचा, स्त्रीशिक्षणाचा व समतेचा पुरस्कार त्यांनी केला आहे. बाबा पद्मनजी हे स्त्री समाज सुधारक, प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते होते. मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' बाबा पदमनजी यांनीच लिहिली म्हणून त्यांना मराठीतील पहिले कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. त्यातही त्यांनी तत्कालीन समाजातील विधवांच्या दु:स्थिती संदर्भात लिहिले होते.

बाबा पदमनजी यांनी या लेखातून तरूण विद्वान व वृद्ध गृहस्थ जो परंपरा मानणारा आहे. याचे सती संदर्भात लिहिले होते. बाबा पदमनजी यांनी या लेखातून तरूण विद्वान व वृद्ध गृहस्थ जो परंपरा मानणारा आहे. याचे संभाषण यात व्यक्त होतो. तरूण वृद्ध गृहस्थाला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. तर वृद्ध गृहस्थ ते नकारतो हे या लेखातून व्यक्त होते. तत्कालीन सरकारनेच स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी जो कोणी पुस्तके लिहिले त्याला पन्नास रुपयांचे बक्षीस जाहिर केल्याचे सांगतो. पण वृद्धाला ही बातमी आवडत नाही कारण पैशाच्या अमिषाने लोक अशी पुस्तके लिहितील. घरोघरच्या बायका ती वाचतील किंवा पुरुष ती वाचून बायकांना शिकण्यास प्रोत्साहन देतील आणि त्यामुळे अनर्थ ओढवेल असे त्या वृद्धाला वाटते आहे. त्या वृद्धाच्या मते जे हजारो वर्षापासून चालत आलेल्या धर्मग्रंथात सांगितले नाही ते स्त्रीशिक्षण आपण दिल्यास ते धर्मग्रंथाचा अपमान केल्यासारखे होईल असे त्या वृद्धाला वाटते.

तरुण विद्वानाला मात्र वाटते की जे हजारो वर्षात कुणाला सुचले नाही ते जर आता शिकलेल्या लोकांना सुचले असेल तर धर्मशास्त्रात बदल केला धर्मशास्त्र, परंपरा मानणारा वृद्धाला वाटते की स्त्रिया अशिक्षित असल्यानेच संसारात संतुष्ट व तृप्त आहेत. तो तरुण विद्वान त्यांना समजावण्याचा प्रयत्न करतो की, तुम्ही स्त्रियांची उत्तम स्थिती पाहिलेलीच नाही म्हणून तुम्ही त्यांना तृप्त, संतुष्ट समजता. ज्या स्त्रियांच्या मानेवर जन्मापासून मरणापर्यंत सतत पुरुषांचे वर्चस्वआहे, त्यांना स्वातंत्र मिळालेले नाही तर त्या सुखी समाधानी कशा होणार? स्त्रिया मनोमन सुखी नाहीत पण पुरुषांना त्यांनी दासीप्रमाणे वागावे असेच वाटत असल्याने त्या तशाच समाधानी आहेत असे पुरुष सोयीस्करपणे समजत आहेत.

स्त्रिया पुरुषांचे जुलूम, अन्या मुकाट्याने सहन करताना दिसत आहेत. कारण त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही. शिक्षण दिले तर त्या स्वतंत्रपणे जगू लागतील, अन्याय अत्याचार सहन करणार नाहीत. आज त्यांच्यात आणि चार पायांच्या पशूत काही अंतर नाही, त्या गायी गुरांप्रमाणे जणू पुरुषांच्या दावणीला बांधल्या गेल्या आहेत, असे सांगून तरुण विद्वान वृद्ध सनातनी माणसाला "विद्या विहिनः पशु:" या संस्कृत वचनाची आठवण देतो.

त्या तरुणाचे वृद्ध माणसाला म्हणणे पटले तरी त्यांच्या मनात अनेक शंका आहेत. कारण त्याला पुर्वपरंपरागत चालत आलेली व्यवस्था पुढे ही चालावी असे वाटते. त्या वृद्धाला वाटते की स्त्रियांच्या व पुरुषांच्या गुणधर्मात फरक आहे. स्त्रिया म्हणजे जणू सापासारख्या आहेत, सापाला जसे दुध पाजले तरी त्याचे विषच होते. तसेच स्त्रियांना शिक्षण दिले तरी त्या दुष्ट, कपटी, नीचच राहतील असे वृद्धाला वाटते. तो तरुण त्या वृद्धाला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी. तेव्हा तरुण त्यांना परोपरीने समजावून सांगतो की स्त्रिया व पुरुषांचे स्वभाव सारखेच असतात. देवानेच जर स्त्री-पुरुष या दोघांना निर्माण केले असे धर्मशास्त्र सांगते तर त्या दोघांत देव मुद्दाम वेगळे गुणधर्म का ठेवेल? एकाला श्रेष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ का बनवेल? तरुणाच्या मते बायकांचा स्वभाव वेगळा नसतो, तर त्यांना सरावाने अनुभवाने घरकामात गती असते आणि पुरुषांना सतत घराबाहेरचे अनुभव घेण्याची सवय असल्याने ते त्यात पारंगत असतात.

त्या तरुणाच्या म्हणणाल्या त्या तरुणाचे एकच विधान वृद्ध गृहस्थ उचलतो की, "स्त्रिया घरकामात योग्य आहेत" त्यांनी तेच काम करावे असा युक्तिवाद करतो. जर स्त्रिया घरकामच करणार असतील तर त्यांना विद्या देण्याची गरज काय? त्यांना काही नोकरी-धंदा करुन पैसे तर मिळवायचेच नसतात आणि सभेत वादविवादही करायचा नसतो, मग त्यांना विद्या शिकवणे वायाच जाणार असे वृद्धाला वाटते. तरूण त्यावर म्हणतो, की विद्येचा उपयोग केवळ पोट भरण्यासाठी पैसे कमावणे किंवा वादविवाद घालणे एवढाच नसतो. विद्येने माणूस हुशार होतो, स्त्रियां शिकल्यावर विद्वान होतील ते योग्य नाही असे तो वृद्धाला सांगतो की त्याने आपला दुराग्रह सोडून विचारपूर्वक बोलावे.

तो वृद्ध धर्मशास्त्र मानणारा आहे म्हणून तो म्हणता जे धर्मशास्त्रात सांगितलेले नाही ते आपण करू नये असेच ठासून सांगतो. तरूण वृद्धाचा राग शांत करण्यासाठी गोड बोलतो आणि आपली धर्मशास्त्रे म्हणजे केवळ रूढी-परंपरा, चाली-रिती यांचा गोंधळ आहे. हे समजावून घेणे गरजेचे आहेत. नव्या युगात काहीच कारण नाही असे आपले मत मांडतो, त्यांच्या मते माणसांनी देशकाल परिस्थिती पाहून वागले पाहिजे. इंग्रजी तरुण विद्वानच्या या स्पष्ट बोलण्याने वृद्ध सनातनी भानावर येतो. पण त्याच वेळी त्याच्या घरातील पुजाअर्चा करणारा उपाध्याय तिथे येतो आणि संभाषणात भाग घेतो. त्याच्या मते स्त्रियांनी पती हाच परमेश्वर मानला पाहिजे, त्याची सर्वकाळ सेवाचाकरी केली पाहिजे, मग तो पती अशक्त, वेडा, व्यसनी, रोगी, वृद्ध कसाही असला तरी चालेल. पुरुषांनी स्त्रियांना कोणतीही महत्त्वाची गोष्ट सांगू नये, त्यांना शिक्षण देऊ नये, शिक्षणापासून त्यांना अलिप्त ठेवावे असे त्या वृद्धाला वाटते.

तरुण विद्वान त्या वृद्धाला सांगतो की तो ज्या धर्मशास्त्रांचे पुरावे देतो आहे तीही माणसांनी, त्यातही पूर्वजांनीच लिहिली असून स्वाभाविकच स्वतःचा स्वार्थच त्यांनी पाहिला आहे. दुसरे म्हणजे स्त्रीचा पती देव झाल्यास खऱ्या देवाची पुजा कोण करेल? माणसे देव कशी होतील? तरुण आपल्या उपाध्यायांशी वाद घालू लागले अशी चिन्हे दिसताच वृद्ध सनातनी उपाध्यायाला घरी जाण्यास सांगतो. या संवादातून शेवटी वृद्ध त्याच्या पूर्वभ्रमाहातून बाहेर काढून स्त्रीशिक्षण हे कसे आवश्यक, हितकारक आहे हे त्याला पटवून देण्यात तरूण विद्वान यशस्वी झाला आहे. पण तरीही स्त्रियांनी शिकून पुरुषांशी बरोबरी करणे हे भविष्य त्या सनातनी वृद्धांना फारसे आवडणार नाही, असेही ते कबूल करतात.

तरुण त्यांना सांगतो की हा केवळ सवयीचा भाग आहे. एकदा का स्त्रिया शिकून स्वतंत्रपणे वावरणार, आपली मते विचार मांडणार हे आपण स्वीकारले की मग त्या पुरुषांशी बरोबरी करतात याने आपला अहंकार दुखावणार नाही. त्यामुळे आता धर्मशास्त्रांनी स्त्रियांची निंदा केली आहे वगैरे समजूती सोडून देऊन आपण स्त्रियांना शिकण्याची स्वतंत्र होण्याची संधी दिली पाहिजे. वृद्ध सनातनीही शेवटी तरूण विद्यानांची स्त्रीशिक्षणाविषयीची कळकळीने मांडलेली मते समजून घेतो व त्याचे मतपरिवर्तन होते असे बाबा पदमनजी यांनी या वैचारिक लेखातून दाखवले आहे. समाज परिवर्तनांसाठी स्त्री शिक्षण महत्त्व आहे असे या लेखातून व्यक्त होते.

या लेखातून बाबा पद्मनजी यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे. स्त्री सुशिक्षित झाल्याशिवाय समाजव्यवस्थेत सुधारणा होणार नाही. स्त्रीयांवरील अन्याय कमी होणार नाही असे त्यांना या लेखातून व्यक्त करायचे आहे.

### ४.३.३ गुलामगिरीची प्रस्तावना - जोतीराव गोविंद फुले

महात्मा ज्योतिराव फुले यांनी गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला असून या ग्रंथाचे प्रयोजन ग्रंथलेखनाविषमचे मत प्रस्तावनेत व्यक्त केले आहे. 'गुलामगिरी' या ग्रंथाची प्रस्तावना म्हणजे हा वैचारित लेख आहे. म. फुले यांनी सर्वप्रथम दलितांच्या प्रश्नाला वाचा फोडली. विशेषतः दलितांवरील अन्यायाला हिंदू धर्मव्यवस्था, चातुर्वण्य व्यवस्था यांनी केलेले अन्याय नियम कारणीभूत आहेत आणि अशा प्रकारे व्यवस्था निर्माण करण्यामागे सवर्ण ब्राह्मणांचा स्वार्थ आहे. याप्रकारचे स्पष्ट मत मांडण्याचे धाडस महात्मा फुले यांनी केले. हिंदू धर्मव्यवस्थेचे सत्य स्वरूप शोधून काढण्याच्या उद्देशानेच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' हे ग्रंथ त्यांनी लिहिले.

ब्राह्मण धर्मव्यवस्थेने शुद्रातीशूद्रांना हेतूतःच अज्ञानी ठेवले आणि त्यांची भौतिक, अध्यात्मिक प्रगती रोखली असा स्पष्ट आरोपच महात्मा फुले यांनी केला आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी म. फुले म्हणतात.

'विद्येविना मती गेली
मतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले

वित्ताविना शूद्र खचले
इतके सगळे अनर्थ
एका अविद्येने केले'

महात्मा फुले यांनी लिहिलेल्या 'गुलामगिरी' या निबंधात आणि त्याच्या प्रस्तावनेतूनही त्यांची अस्पृश्यांच्या उद्धारासाठीची कळकळ दिसून येते. विशेषतः अतिशय घणाघाती भाषेत फुले यांनी सवर्णांनी अस्पृश्यांवर चालवलेल्या अन्यायाचा चांगला समाचार घेतला आहे. शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही असे ते म्हणतात. 'गुलामगिरी' च्या प्रस्तावनेत म. फुले लिहितात-

"आज शेकडो वर्षे शूद्रातीशूद्र, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दुःखे सोशीत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत. तर या गोष्टींकडे त्या सर्वांचे लक्ष लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथुन पुढे भटब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काळ तो आहे".

म. फुले यांच्या मते ब्राह्मण मंडळी आपली पोटे भरण्यासाठी शूद्रातिशूद्रांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना व्रत-वैकल्ये, पूजा करायला भाग पाडतात व स्वतः दक्षिणा उकळतात. त्यांनी मुद्दामच धर्मग्रंथात स्वतःबद्दल इतके काही लिहून ठेवले आहे आणि शूद्रांनी ब्राह्मणांस आदर दर्शवणे बंधनकारक करून ठेवले आहे की शूद्र त्याला फसून, त्यांना घाबरू लागले आणि स्वतःला कमी लेखू लागले. हे तत्कालीन वास्तव प्रस्तावनेमधून व्यक्त केले आहे.

बहुजन समाजासाठी स्वातंत्र्याचा, समतेचा विचार आपण का धरतो हे स्पष्ट करताना महात्मा फुले म्हणतात, ". . . जेव्हा मनुष्य स्वतंत्र असतो तेव्हा त्यास आपले मनात उद्‌भवलेले विचार स्पष्ट रीतीने इतर लोकांस बोलून अथवा लिहून दाखविता येतात. तेच विचार त्यास स्वतंत्रता नसल्यामुळे मोठे महत्त्वाचे असून लोकांचे हितावह का असेनात, तथापि ते त्यास दुसरे कोणास कळविता येत नाहीत आणि असे झाले म्हणजे काही काळाने ते सर्व विचार लयास जातात. . ." आपल्या देशात अस्पृश्यांच्या संदर्भात घडत असल्याने म. फुले यांनी अस्पृश्यांना स्वातंत्र्य मिळवून देणे, त्यांना विचारप्रवृत्त करणे, त्यांच्यात स्वाभिमान जागा करणे आपल्या चळवळीचे ध्येय ठेवले होते. ही चळवळ सुरू करताना द. अमेरिका व आफ्रिका या देशातील निग्रोंना अमेरिकन लोक गुलामासारखे वागवत असता, तेथे कशा चळवळी सुरू झाल्या आहेत याची माहिती फुले यांना होती.

म. फुले यांनी अमेरिकेतील गुलामगिरीचे उदाहरण दिले आहे. अमेरिकेत अब्राहम लिंकनने गुलामगिरी प्रथा नष्ट करून टाकली होती. इतरही काही समाजसुधारक गुलामगिरीला विरोध करत होते. त्यांचे म. फुले कौतुक करतात. आपल्या देशातील वर्ण व्यवस्था नाहीशी झाली पाहिजे, दास्य प्रथेलाही असाच विरोध केला पाहिजे व अस्पृश्यतेची दुष्ट रूढी नष्ट केली पाहिजे असे फुले यांना वाटते. अस्पृश्यांवर सवर्णांनी केलेल्या अत्याचाराच्या नोंदी कशा हेतूतः इतिहासातून वगळल्या आहेत त्याबद्दल खंत व्यक्त करताना महात्मा फुले लिहितात- "आम्ही जे जे हिंदुस्थानचे इतिहास लिहिले. त्यांतील हा एक मोठा अतिमहत्त्वाचा भाग गाळला. त्यांस त्यांचे

दुःखाची माहिती एकदा झाली म्हणजे फार वाईट वाटून आपल्या ग्रंथात, जेथे अतिनिकृष्ट दशेस येऊन पोहचलेले व दुष्ट लोकांनी गांजलेले, ज्यांचे दुःखास पारावार नाही अशा लोकांचे स्थितीची उपमा देणे झाल्यास, शुद्रादि अतिशूद्रांच्याच स्थितीची उपमा योग्य साजेल असे वाटेल.''

म. फुले म्हणतात की, "कवींना दुःखाच्या कविता लिहिताना दलितांच्या दुःखद स्थितीचा उपयोग उपमेसारखा करता येईल कारण त्यांनी उपमा सुचत नसतात"! परशुरामाने संपूर्ण भूमी निःक्षत्रीय केली होती हा पौराणिक संदर्भ फुले देतात. ते म्हणतात की हा परशुराम-ब्राह्मणांचा प्रतिनिधी इतका दुष्ट होता की त्याने केवळ क्षत्रिय पुरुषच संपवले नाहीत तर स्त्रियांना, अर्भकांना, मुलांना, गर्भवतींनाही ठार मारले. अर्थात पुढे त्याने केलेल्या त्या अत्याचारांचे वर्णन ज्यांनी इतिहास लिहिला त्या सवार्णांनी मुद्दामच गाळला असणार. म. फुले यांच्या मते परशुरामाच्या हत्याकांडानंतरही उरलेल्या मूठभर शूद्रातीशूद्रांना भटाब्राह्मणांनी भरपूर छळले असावे. त्यासंदर्भात ते वर्णन करतात.

. . . जातीव्यवस्थेचे उदाहरण देताना म. फुले यांनी नदीवरच्या प्रसंगाचे चित्रण दिले आहे. ''जर कोणी शूद्र नदीकाठांवर आपली वस्त्रे धूत असता त्या स्थळी जर एखादा भट आला, तर शूद्रांस आपली सर्व वस्त्रे गोळा करून, बऱ्याच दूर अंतरावर, जेथून भटाच्या अंगावर पाण्याचा शिंतोडा येण्याचा संभव नसेल, अशा स्थळी जाऊन आपली सर्व वस्त्रे धुवावी लागत असे, अथवा आला असा खोटा भास झाला, तर त्या भटाने अग्नीसारखे रागाने तप्त होऊन जवळचे भांडे त्याचे मस्तक रोखून मोठे त्वेषाने मारावे. त्यामुळे त्याचे मस्तक रक्तबंबाळ होऊन मुर्च्छित होत्साता जमिनीवर धाडकन पडावे, पुढे काही वेळाने शुद्धीवर येऊन आपली रक्ताने भरलेली वस्त्रे घेऊन निमूटपणे घरी जावे, सरकारास जर कळवावे तर सर्व भटशाई पडली, उलटी त्यासच सजा देणार!'' अशी अस्पश्यांना वागणूक दिली जात होती.

समाजव्यवस्थेकडून दलितांवर जे अत्याचार पेशवाईत केले गेले, त्याचे वर्णन महात्मा फुले यांनी केले आहे. त्यानंतर ते म्हणतात की दलितांमध्ये अज्ञान असल्यामुळे एक वाक्यता नाही, त्याचा गैरफायदा ब्राह्मण घेतात. शिवाय ब्राह्मणांनी शूद्र व अन्य अवर्ण जातींमध्ये मुद्दामच भांडणे लावून दिली आहेत जेणेकरून त्यांच्यात कधी एकजूट होणार नाही. कारण शूद्रातीशूद्र सगळे एकवटले तर ते बहुसंख्य होतील, आणि ब्राह्मण अल्पसंख्य ठरतील. त्याची ब्राह्मणांना भीती वाटते. जातीभेद ही शूद्रातीशूद्रांत एकजूट होऊ नये यासाठी योजलेली क्लृप्ती आहे.

शेवटी म. फुले इंग्रजी राजवटीत शूद्रांची अस्पृश्यतेच्या मानहानीकारक जुलमी रूढीपासून सुटका झाली असली तरी इंग्रज सरकारने दलितांची शिक्षणाची सोय केली तरच खऱ्या अर्थाने ते स्वतंत्र होतील अशी आशा या लेखातून व्यक्त केली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) अस्पृश्य समाजाबद्दलची म. फुले ची भूमिका स्पष्ट करा.

२) म. फुलेचे शैक्षणिक दृष्टीकोन स्पष्ट करा.

**४.३.४ विनंतीपत्र - गोपाळ बाबा वलंगकर**

गोपाळ बाबा वलंगकर यांना या विनंती पत्रातून कोकणातील अस्पृश्य समाजाची व्यथा, जाति व्यवस्था, उच्च वर्णीय समाजाकडून होणारी तत्कालीन अन्याय व्यक्त केला आहे. त्याचे हे पत्र म्हणजे कोकणातील महार समाजाची व्यथा आहे. त्यांच्या पत्रातील मजकु पुढील प्रमाणे आहे. हिंदू धर्माच्या सर्व जातीला एक शास्त्र म्हणून नाही, तर हिंदू धर्मात नाना शास्त्रे व नाना पुराणे, नाना मते, नाना पंथ जातींच्या अनेकत्वामुळे झाली आहेत. त्या सर्वांत जाती धर्म हे महाशास्त्र होऊन बसले आहे. हिंदू लोक सहा शास्त्रे व अठरा पुराणे ही एकीकडे गुंडाळून ठेवतील पण जाती नियमरुप शास्त्र त्यांच्या डोळ्यापुढे सर्वदा उघडे असते व त्याचा अंमल त्यांजवर निरंतर चालत आहे असे गोपाळ बाबा वलंगकंर यांना वाटते.

गोपाळबाबा वलंगकर म्हणतात रावणाचे राज्य गेले, रामाचे, कृष्णाचे, पांडवांचे, यवनांचे व पेशव्यांचे मराठी राज्य गेले; आणि सर्व एक ब्रह्म जाणणाऱ्या इंग्रज सरकारचे राज्य उदयास आणले; पण जातीचे राज्य अद्यापही चालतच आहे त्याचा जुलूम मोगलाई जुलूमापेक्षा इतर कोणत्याही जातीच्या लोकांवर नसता कोकणातील महारांवर फार कडक रीतीने अंमल करीत आहे; कारण त्यापासून आमचे फारच नुकसान होत असून आम्ही सर्वस्वास मुकले जात आहोत. याची खंत व्यक्त करतात -

आपल्या अस्पर्शत्वाच्या जुलमामुळे आम्हास कोणत्याही शाळेत जाऊन विद्याज्ञान संपादन करुन त्यापासून होणारे कलाकौशल्यादी लाभ करुन घेण्याविषयी इतर जातीप्रमाणे सरळ

मनाने जाता येत नसल्याने आम्ही व आमची संतती ह्या लाभास मुकून अज्ञान स्थितीत राहिलो. आम्हास प्रवासास जाताना, उतरावयास जाण्याची, पाण्याची व अन्नाची सोई कोठे मोकळ्या मनाने होण्यासारखी नसल्याने पशूही न राहण्यासारख्या जागेत राहून अनेक दुःखे व अडचणी भोगाव्या लागतात. आमच्या दयाळू सरकारने सर्व मनुष्यप्राण्याचे सुखसोयीकरिता मार्गात धर्मशाळा, पाण्याचे नळ वगैरे बांधिलेले असून तेथेसुद्धा आम्हांस हे जुलमी लोक राहू न देता व पाणी पिण्यास न मिळू देता धर्मशाळेच्या बाहेर थंडीवाऱ्यावर पडावे लागून अन्नपाण्यावाचून उपाशी राहून काळ क्रमावा लागतो.

आमचे लोक क्षत्रिय धर्माप्रमाणे जिवाची आशा न धरिता हातावर शिरे धरुन लष्करी खात्यात चाकरी करुन जमादार, सुभेदार मेजर, बहादूर, सरदार बहादूर, इ. पदव्या सरकारपासून मिळवून व पुष्कळ पैसाही कमाऊन आलेले असून तो वाढविण्याचे जे साधन व्यापार व उदीम तो करण्याची मोकळीक (नसल्याने) आपल्या ज्या जुलमाने त्याची वाढ न होता तो धुळीस मिळून आम्हांस, आमच्या संततीस दारिद्रावस्थेत राहणे भाग पडले.

इ.स. १८५८ तील राणी सरकारचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे की, आमच्या रयत लोकांपैकी जे कोणी विद्येने, हुषारीने व प्रामाणिकपणाने जी जी सरकारी कामे यथाशक्ती चालविण्यास लायक असतील ती ती कामे सवड असेल त्याप्रमाणे बिनदिक्कत व निःपक्षपाताने त्या लोकांस ज्ञात किंवा धर्म मनात न आणता द्यावी. तरी आम्हांस मिलिटरी खात्याशिवाय इतर सवलती व सिव्हिल खात्यात (Civil) थोडीबहुत इंग्रजी-मराठी विद्या (तिची मलई तर प्राप्त न होता खरपुडी मात्र) प्राप्त झाली असून कोठे ऑफिसात, पोलिसात, रेल्वे खात्यात, पोस्टात, पट्टेवाल्यात किंवा दुकानदारापाशी चाकरी न मिळाल्यामुळे व्यापार कसा करावा, कलाकौशल्याचे ज्ञान कसे करुन घ्यावे व सिव्हिल खात्यातील राजकीय माहिती व कायदेकानून कसे आहेत, ह्याचे काहीच ज्ञान ह्या आपल्या जुलमामुळे होत नसून फारच हलक्या व नीच चाकऱ्या कराव्या लागतात. कोणीतरी विचार करुन पहा की, चांगली चाकरी मिळत असता कोणी जाणूनबुजून हलकी चाकरी पतकरील काय? असा प्रश्न गोपाळ बाबा वलंगकर व्यक्त करतात.

दलितांची व्यथा मांडतना ते म्हणतात आम्हांस कोकणातील बाजारहाटात किंवा वाणी गुजराच्या दुकानावर काही माल, सवदा अगर कापड वगैरे घ्यावयाचे असल्यास ते चांगले पाहून पारखून, आपल्या हाती मोजून मापून व सूत वगैरे घ्यावयास मिळत नसल्याने व्यापाऱ्याने एक माल लांबून दाखववा आणि दुसरा माल ठरविलेल्या किंमतीपेक्षा अर्ध्या किंमतीचा पदरात टाकावा. कारण एकदा शिवलेला माल मी परत घेणार नाही हे त्यास पक्के माहीत असते. जर कोणी फिर्याद केल्यास मामलेदार, पोलीस फौजदार, शिपाई वगैरे पवित्र हिंदू असल्याने बिचाऱ्या महारासच लबाड, लुच्चा अशी दुर्वचने बोलून काही दाद न लागू देता २ किंवा ४ दिवस एर्वि घालवून तू शिवलेला माल परत कसा घेता येईल, असे म्हणून हाकून देतात. असे आहे म्हणून कोणी फिर्यादीच्या भरीस न पडता मुकाट्याने जो तो आपापल्या घरची वाट धरतो. अशा रीतीने आम्ही अधिकच दरिद्री होऊन आमच्या पैशावर कोकणचे व्यापारी सधन होऊन चैन भोगीत आहेत.

आम्हांस चांगले घर अगर अंगभर कापडे वापरण्यास अधिकार नाही. जर केले तर महार माजला म्हणून खोत, पाटील लोकांचा डोळा त्याजवर बसून कोणत्याही प्रकारे संकट त्याजवर आणून तो अगदी राखेच्या पुंजीवर बसेपर्यंत त्याचा पाठलाग करतील तेव्हा त्यांस सोडतील.

आम्हांस कोठे एका गावाहून दुसऱ्या गावास आपल्या आप्तास भेटण्यास अथवा तो आजारी असल्यास त्यास औषध वगैरे लवकर घेऊन जाणे असल्यास किंवा कोणी मेला त्यास मुठमाती देण्यास जाण्याचे असल्यास व त्यामध्ये मोठी नदी किंवा खाडी आडवी आली असली व तेथे आपणांस पवित्र मानणाऱ्या हिंदूंची स्वारी असल्यास ते सर्व उतरुन जात तोपर्यंत आम्हांस तेथे तिष्ठावे लागते. अशा हरकतीमुळे आजारी असेल त्याने मरावे वा मेला असेल त्याने माती व्हावी. याप्रमाणे लोकांच्या अभिमानाच्या जुलूमाप्रमाणे आमचे अनेक प्रकारचे नुकसान होते आहे ते विस्तारभयास्तव येथे अधिक न दाखविता थोडेच दिले आहे.

गोपाळ वलंगकर म्हणतात की, महार हा गरीब, विश्वासू, मेहनती आहे हे सर्वांस प्रसिद्ध आहे, तर ह्याच्या मेहनतीचे फळ आम्ही पवित्र वर्णांनी घ्यावे व ह्यास असाच गरिबीत, दारिद्र अवस्थेत ठेऊन ह्याने गुलामाप्रमाणे आमची सेवासुश्रूषा करावी म्हणून काहीतरी त्यास दूषण ठेऊन देऊन दूर ठेवावा व आपले व्यवहारकार्य साधावे. जर आपण ह्यास जवळ केला तर आपला सर्व व्यवहार त्याच्या लक्षात येऊन हा हुषार झाल्यावर उद्धट होऊन विश्वासू राहणार नाही असे समजून किंवा ह्यांच्या पूर्वजांचे आणि महारांच्या पूर्वजांचे काही कारणांवरुन हाडवैर पडले म्हणून त्यांनी ह्यास दूर करण्याचा प्रयत्न करीत गेले असे ते व्यक्त करतात.

ते म्हणतात उच्च वर्णीय लोक इतर जातीपेक्षा आपणास पवित्र समजून आमचा तिरस्कार करतात तर करतातच; पण इतरधर्मी लोकांस किंवा शूद्रादी अगदी लहान जातीच्या लोकांसदेखील त्याप्रमाणे करण्यास उत्तेजन देतात. म्हणजे ह्या कोकणस्थान वा कोकणात महार, चांभार व मांग ह्याशिवाय वर दर्शविलेल्या सर्व जाती ब्राह्मणांप्रमाणे पवित्र असून, छायास्पर्शांचा वीट मानितात. तर हा नीतीविरुद्ध, बुद्धीचार, सद्धर्माविरुद्ध व सृष्टीविरुद्ध जुलूम आहे यात संशय आहे काय ?

आमच्या ह्या विनंतीपत्रांचा विचार राष्ट्रीय सभेतही झाला पाहिजे. कारण मागील वर्षाच्या सभेत लॉर्ड डफरीन साहेबाने केलेला उपदेश वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाला आहे की, राजकीय मागण्या मागण्यापेक्षा अगोदर सामाजिक सुधारणेचा विचार करावा. लग्नकार्यात शक्तीबाहेर खर्च करणे, व्यापार वाढविणे, ओंगळ चाली टाकणे, यांचा विचार करा. आमच्या ह्या विनंतीचा विचार झाल्यास इंग्रजी लोकांस कळून येईल की, सामाजिक सुधारणेचा विचार ह्या सभेत होत असतो. आम्हा अज्ञजनांसही वाटेल की, सभा आमच्या हिताची आहे. म्हणून सभेचा कोणत्याही प्रकारे मोड न होता वर्षानुवर्षे हिची अधिकाधिक भरभराट होऊन ती चिरायू होवो.

आणखी आमची विनंती आहे की, महाराच्या छायेने सर्व कोकणस्थ पवित्र हिंदूंचे डोके, पोट दुखत असेल अथवा शरीर पोळून त्यावर फोड येत असतील किंवा महाज्वर होत असेल व स्पर्शाने पटापटा मरुन नरकात जात असल्यास आमच्या पत्राचा विचार न करता ते परत पाठवावे

किंवा फाडून टाकून आम्हांस कळवावे की, असे खरोखर होते. म्हणजे आम्ही सर्व कोकणस्थ महार हा प्रांत सोडून जेथे हिंदूंचा वाराही लागणार नाही अशा देशात जाऊन राहण्याविषयी सरकारास अर्ज देऊ. पण आपणा सर्व जातीच्या हिंदूंस असे दुःख देणार नाही.

विनंतीपत्र या लेखातून गोपाळ बाबा वलंगकर यांना दलिताच्या जगण्याची शोकांतिका वेदना आणि वास्तव प्रश्न मांडले आहे त्यांना न्याय मिळावा अशी त्याची अपेक्षा आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) विनंती पत्रातून कोणती मागणी केली आहे. थोडक्यात सांगा.

## ४.३.५ सामाजिक समता - मे. पु. रेगे

'सामाजिक समता' या लेखातून मे. पु. रेगे या समाजातील सामाजिक बांधिलकी मानवाचे वर्तन कसे असावे या विषयी विवेचन केले आहे. 'सामाजिक समता', कायद्याने, सवलतीने मिळू शकते का? या प्रश्नावर चर्चा होऊ लागली. मे. पु. रेगे यांनी आपल्या लेखात त्या संदर्भातच तार्किक युक्तिवाद केलेला दिसतो.

मे. पु. रेगे यांच्या मते एखाद्या सामान्य नियमाखाली येणाऱ्या दोन व्यक्तींना जर आपण सारखी वागणून दिली नाही तर आपण त्यांच्यात भेदभाव केला असे होईल. पण काही वेळा नियमच पक्षपाती असतील तर त्यांच्या अंमलबजावणीने समानता येणार नाही. उदा. सर्व ब्राह्मणांना अध्ययनाचा अधिकार आहे पण कुणाही अस्पृश्याला अध्ययनाचा अधिकार नाही हा नियमच पक्षपाती आहे त्यामुळे तो निःपक्षपातीपणे राबवल्याचा समता येण्याळेवजी असमानताच अधिक येईल. समतेच्या तत्त्वाला आदर्शाचा पाया असण्याऐवजी मानवतेचा पाया असला पाहिजे. माणसामाणसांत त्यांच्या इच्छा-आकांक्षा, आवडी-निवडी, शक्ती यांच्यात फरक असणारच. तसा तो नसावा असा आग्रह धरणे हा अतिरेक आहे त्यामुळे आदर्श समाज निर्माण होईल हा गैरसमज आहे. माणसे एकमेकांसारखी बनवणे हे समतेच्या तत्त्वाचे उद्दिष्ट नसते. तर माणसे एकमेकांसाठी नसली तरी त्यांना समतेने वागावा असे हे तत्त्व सांगते.

रेगेच्या मते दोन माणसांना वेगळी वागणूक देण्याची कोणती कारणे प्रस्तुत हे मानवी तत्त्वांवर ठरवले पाहिजे म्हणजे आजारी व निरोगी माणसांना वेगळे वागवणे हे आपण मानवी तत्त्वांनी सांगू शकतो पण काळ्या-गोऱ्यांना किंवा ब्राह्मण-दलितांना वेगळे वागवणे हे अमानवी, अमानुष आहे म्हणूनच ते अप्रस्तुत ठरेल. प्रत्येक माणसांकडे बुद्धी असतेच आणि त्यामुळे प्रत्येकजण आपल्या हिताचा विचार करू शकतो. त्याअर्थी माणसे स्वायत्त असतात आणि इतर

कोणतीही माणसे आपल्यासारखीच स्वायत्त आहेत हेही त्यांना कळत असते. समाजात एकत्र राहताना स्वाभाविकच व्यक्तीच्या हिताला मर्यादा पडतात. प्रत्येकाचे हित इतरांच्या हिताशी सुसंगत असावे लागते. आपल्या हितावर येणाऱ्या मर्यादा सर्वांनी स्वेच्छेने स्वीकारलेल्या असाव्या लागतात. त्या जर इतरांनी त्याच्यावर लादल्या तर तिथे विषमता निर्माण होते, असंतोष निर्माण होतो. उदा. दलितांना शिक्षण न देणे म्हणजे त्यांना त्यांच्या स्वहिताचे, विकासाचे मार्ग बंद करणे. पण ही रीत हिंदू धर्मातील विशिष्ट लोकांनी स्वतःचे सर्वाधिक हित साधण्यासाठी मुद्दाम राबवली त्यामुळे दलितांना विषम वागणूक मिळाली.

मे. पु. रेगे म्हणतात, ''व्यक्ती-व्यक्तींत निष्कारण भेद करता कामा नये, एवढेच समतेच्या तत्त्वाचे म्हणणे नसते. माणसे एकमेकांपासून कितीही भिन्न असली तरी ती मूलतः सारखी आहेत व म्हणून त्यांना लाभकारी वागणूक मूलतःसारखी असली पाहिजे असे काही तरी समतेच्या तत्वाचे म्हणणे असले पाहिजे.''

समाजातील माणसामाणसात आवडी-निवडी, इच्छा-आकांक्षा, शक्ती-बुद्धी या वेगवेगळ्या असलेल्या तरी काही मूलभूत गोष्टी माणसांत सारख्याच असतात. प्रत्येकाला जगण्याचा, मालमत्ता, याविषयीचा करार करण्याचा विचार करण्याचा हक्क असणे हे मूलभूत सारखेपण म्हणावे लागेल. या मूलभूत सारखेपणाला कुठे बाधा आणली गेली तर विषमता निर्माण होते. अर्थात सर्वांना समान मूलभूत हक्क मिळाले तरी एक विषमता शिल्लक राहतेच. ती म्हणजे आर्थिक विषमता. त्यामुळे संपूर्ण समता कोणत्याही समाजात अशक्य ठरते.

'सामाजिक समता' या वैचारिक लेखाच्या अभ्यास करताना लेखक मे. पु. रेगे यांनी सामाजिक समतेबाबतची विचारसरणी मांडली आहे. ती उल्लेखनीय आहे. सामाजिक समता याचा अर्थ सर्वांना समान लेखन, दुजाभाव न करणे, ज्या संधी उपलब्ध असतील त्याची वाटणी समान करणे तसेच सर्व माणसांना समान वागणूक देणे. समता या अनेक प्रकारच्या असतात. उदा. आर्थिक समता, राजकीय समता, सामाजिक समता कोणत्याही प्रकारची समता समाजातप्रस्थापित करत असताना प्रथमतः मानवानेच पाया रचणे आवश्यक आहे. परंतु माणसा-माणसात फरक असल्याने सर्वांना सारखी वागणूक मिळतेच असे नाही. समाजात सामाजिक समता, प्रस्थापित करताना जात, पंथ, धर्म, वंश, भाषा, प्रदेश या गोष्टी दुर्लक्षीत कराव्या लागतात. कोणत्याही गोष्टीचा निकाल निपक्षपातीपणे लावावा लागतो. परंतु जर हे नियम प्रत्यक्षात पाळले गेले नाही तर मात्र समाजात विषमता वाढते.

सामाजिक समतेची आवश्यकता पटवण्यासाठी ''सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत म्हणून ती समान आहेत'' असे आध्यात्मिक विधान अनावश्यक आहेत. त्यापेक्षा प्रत्येकाने स्वतःला मिळालेले मूलभूत मानवी हक्क दुसऱ्यालाही मिळतात ना हे पाहिले पाहिजे. स्वतःचे आचरण समान वागणूक देणारे ठेवले पाहिजे असे मे. पु. रेगे यांना वाटते.

प्रत्येकाला स्वतःचे हित साधण्याचे स्वातंत्र्य आहे. हे सामाजिक समतेसाठी अत्यावश्यक ठरते असा निष्कर्ष मे. पु. रेगे काढतात. त्यानंतर ते माणसांतील आर्थिक विषमतेचा तार्किक पद्धतीने शोध घेतात. त्यांच्या सांगण्यानुसार विचारवंत समाजातील विशिष्ट माणसांना

वापरून जर एखाद्याने अधिकाधिक सुख मिळविले तरी त्याला विरोध करणार नाहीत कारण समाजात सुख निर्माण होण्यासाठी, मालमत्ता निर्माण होण्यासाठी काही माणसांना विषय वागणूक मिळणे त्यांना अन्याय वाटत नाही पण मानवतावादी, समतावादी दृष्टीने ही भूमिका चुकीची आहे. समाजात मालमत्ता निर्माण व्हायला पाहिजे, पण त्यासाठी सर्वांचे परिश्रम महत्त्वाचे आहेत आणि मिळालेल्या मालमत्तेचा किंवा सुखाचा सर्वाधिक वाटा एकाच माणसाला म्हणजे भांडवलदारीला मिळणे त्यापेक्षा अन्यायकारक आहे. संपत्ती, मालमत्ता, सुख मिळवण्याचा हक्क कष्ट करणाऱ्यांचाही आहे तो केवळ भांडवदारांनाच असून चालणार नाही असे मे. पु. रेगे स्पष्ट करतात. त्यांच्या मत्ते ज्यांना कंटाळवाणे, कष्टाचे काम करावे लागते त्यांना पगार जास्त मिळाले पाहिजे आणि ज्यांना केवळ बुद्धिचा वापर करून काम करावे लागते आहे त्यांना कमी पगार मिळाला पाहिजे. रेगे या लेखातून सामाजिक समतेबद्दलची मते व्यक्त करतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'सामाजिक समता' या वैचारिक लेखाचा आशय थोडक्यात लिहा.

___

___

___

___

___

२) मे. पु. रेगेची समते बद्दलची भूमिका थोडक्यात सांगा.

___

___

___

___

___

### ४.३.६ शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालवण्याचे उपाय - मुकुंदराव पाटील

शेतकरी हा स्वतः उत्पादक असून त्याला कधीकधी पुरेसे अन्नधान्य मिळत नाही. देशाच्या आर्थिक उलाढालीत तसेच व्यापारात शेतीचा प्रमुख वाटा आहे, असे असूनही शेतीकडे शासनाचा पाहण्याचा दृष्टीकोन योग्य नाही. त्यामुळे अलिकडच्या शेतकऱ्यांची स्थिती फारच खालावलेली आहे असे मुकुंदराव पाटिल यांच्या वैचारिक लेखनातून व्यक्त होते.

प्रामुख्याने शेतकऱ्यांची पूर्वीची पार्श्वभूमी पाहिल्यास असे दिसते की त्यावेळचा शेतकरी आजच्या शेतकऱ्यांच्या मानाने समृद्ध नसला तरी खाऊन-पिऊन तो सुखी जीवन जगत होता. कारण त्याकाळी जमिनीच्या वाटण्या नव्हत्या, महागाई नव्हती, शेतकऱ्यांचा काही अपवाद सोडला तर व्यसनाधिनतेचे प्रमाणही कमी होते शिवाय ते घेत असलेले कर्जाचे प्रमाणही कमी

होते. त्यामुळे त्याकाळी पैशाचे एवढे मोल नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण ही वस्तुच्या स्वरूपात होत असे. समाजात सुतार, लोहार, चांभार, कुंभार, नाव्ही, परीट (धोबी) यासारखे बारा बलुतेदार असल्याने तेव्हाच्या शेतकऱ्यास आताच्या शेतकऱ्याप्रमाणे पोटभर अन्न मिळवण्याची चिंता नव्हती. शिवाय नैसर्गिकदृष्ट्या हवामानही उत्तम प्रकारे होते. शेतकऱ्यांच्या शेतात चांगले पिक येत होते त्यावेळी दळणवळणाची सुविधापू नसल्याने खेड्यातील धान्य बहुदा खेड्यातच राहत असे. पूर्वीच्या शेतकऱ्यांच्या गरजाही कमी आणि मर्यादित होत्या. आताच्यासारखे कपडे त्यांना नव्हते. त्यामुळे त्यांच्या खर्चाचे प्रमाणही कमी होते. शेतात उत्पादित केलेल्या पिकावर त्यांच्या गरजा पूर्ण होत होत्या पूर्वीचा शेतकरी आताच्या शेतकऱ्याच्या तुलनेने समाधानी होता. पण आताच्या काळात त्याचे स्वरुप बदलले आहे.

पण आता शेतकरी कुटुंबाच्या लग्नात दिवा-बत्ती, पान-सुपारी, वाजंत्री याचा जिका खर्च होतो तितक्याच खर्चात पूर्वीच्या शेतकऱ्यांचे सगळे लग्न होत असे. एखाद्या कित्येकदा गरीबांची दोन-दोन लग्नसुद्धा होत असत. आताच्या सारखे सत्यनारायणाची पुजा, पंढरपुर, काशी यासारख्या तिर्थक्षेत्रांची यात्रा करणे हे प्रकार पूर्वीचे शेतकरी करत नसत आणि त्यांना परवडत नसे. त्यांचा वायफळ खर्च नसे. परंतु हल्लीचे शेतकरी मात्र कोणत्याही सन समारंभाला, लग्न प्रसंगी मोठे खर्च करतात. त्यांना मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतुद करावी लागते. तसेच अनियमित पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. कोरडा पावसाळा, सतत पावसाळा यामुळे दुष्काळासारखी परिस्थिती उद्‌भवते. अलिकडच्या काळात निसर्गाचे संतुलन बिघडल्याने पिकांचे नुकसान होते. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती खालावते.

अलिकडच्या शेतकऱ्यांमध्ये ज्या प्रमाणात ज्ञान, विद्या हवी आहे त्याप्रमाणात त्यांचा विकास झाला नाही. स्वतःच्या शेताचा विकास करण्यासाठी त्यांच्याकडून योग्य त्या उपाययोजना केल्या जात नाहीत. शेतकऱ्यांनी शेतीची सुधारणा करायची असेल तर बी-बियाणे, रासायनिक खते, आधुनिक तंत्रज्ञान, नवीन अवजारे या सर्व गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक आहे. परंतु शेतकरी मात्र आपल्या पारंपारिक पद्धतीनेच शेती करतात. त्यामुळे त्यांच्या शेतीचा विकास होत नाही. त्यांना योग्य त्या पद्धतीत उत्पादन मिळत नाही असे म्हणावे लागेल. शेतकऱ्यांमध्ये एकजूटीचा अभाव आढळतो. त्यामुळे त्यांच्या समस्या सोडविण्यसाठी कोणी ही पुढे येत नाही. एकजुटीच्या अभावामुळे ते उच्च पातळीवर आपल्या संघटना निर्माण करू शकत नाही, जेणे करून त्यांना न्याय मिळत नाही.

ग्रामीण भागातील शेतकरी लोकांमध्ये जातीसंबंधी एखादा तंत्रा किंवा जातीविरुद्ध एखादी गोष्ट घडल्यास त्याचा फैसला पंचांमार्फत होत असतो. हे पंच म्हणजे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती असतात. समाजाच्या सोयीच्या दृष्टीने पाहिले असता जातीमध्ये दुवर्तन वगैरे प्रकार होऊ नयेत, त्यांच्यावर दबाव टाकावा म्हणून ही पंचांची योजना फारच भक्कम आहे. परंतु यथा राजा तथा प्रजा या न्यायाने खुद्द पंचच दुवर्तनी असले म्हणजे मग जाती प्रकरणाच्या फैसल्याची गोष्ट विचारायलाच नको भारतीय शेतकऱ्यांची सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे शिक्षण, प्राचीन काळापासून आजपर्यंत शेतकऱ्यांमध्ये म्हणावा तसा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदललेला

नाही. तो बदलणे आजच्या काळाची गरज असते. शेतकऱ्यांमधील शिक्षणाचा अभाव विचारात घेऊन सावकार, जमिनदार, पाटील, कुलकर्णी यासारखे लोक त्यांचा गैरफायदा घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांना शिक्षणाची नितांत गरज आहे असे मत मुकुंदराव पाटील यांनी या लेखातून व्यक्त केले आहे.

शेतऱ्यांच्या परिस्थितीला त्यांच्या काही इतर गोष्टीही अवलंबून आहेत त्या म्हणजे त्यांची व्यसनाधिनता, अंधश्रद्धा या व्यसेनच्या आहारी गेल्यामुळे त्यांच्या विकासाला खिळ बसते. परिणामी त्यांना कर्जबाजारी व्हावे लागते. या सर्वांतून मुक्ती घडायची असेल तर शेतकऱ्यांचे शिक्षण महत्त्वाचे आहे. शेतकरी संघटना निर्माण झाल्या पाहिजेत, शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर त्यांनी आवाज उठवला पाहिजे त्याचबरोबर आधुनिक पद्धतीने शेती करून आपल्या शेतातून अधिकाधिक उत्पादन घेतल्यास व्यापारी दृष्टीकोनातून शेती केल्यास जगातल्या स्पर्धेत त्याच्या मालाला योग्य भाव मिळेल यासाठी प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**आपली प्रगती तपासा :**

१) शेतकऱ्यांची 'निकृष्ट स्थिती आणि ती घालवण्याचे उपाय' या वैचारिक लेखातून मुकुंदराव पाटीलाची भूमिका थोडक्यात सांगा.

२) शेतकऱ्यांच्या निकृष्ट स्थितीला कारणीभूत असणाऱ्या गोष्टीची थोडक्यात माहिती द्या.

### ४.३.७ अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

अस्पश्योन्नतीचा आर्थिक पाया हा डॉ. आंबेडकर यांचा लेख आहे. या लेखाला महाडच्या चवदार तळ्यावर डॉ. आंबेडकरांनी हजारों दलित बांधवाच्या सहकार्याने केलेल्या सत्याग्रहाची पार्श्वभूमी आहे. या सत्याग्रहानंतर चित्राववशास्त्री नावाच्या गृहस्थानी अस्पृश्यांनी

स्पृश्यांशी संघर्ष करु नये कारण त्यांची उपजिवीकाच स्पृश्यांनी त्यांना दिलेल्या लहान मोठ्या कामांवर अवलंबून असल्याने स्पृश्यांनी बहिष्कार टाकल्यास अस्पृश्यांना जगणेच कठीण होईल असे विधान केले होते. डॉ. आंबेडकरांनी या विधानाचा आपलेमत व्यक्त करण्यासाठी अस्पृश्यांची आर्थिक स्थिती दुबळी असण्याची कारणे स्पृश्यांनी त्यांना प्रगतीची संधी हेतूपूर्वक नाकारणे यातच आहेत हे लक्षात आणून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांना सत्याग्रह करायला लावून जणू काही त्यांना मोठ्या अडचणीत आणले असा सूर मुंबईच्या तत्कालीन वर्तमानपत्रातील एका संपादकाने लावला होता. दलित सत्याग्रह करतील तर स्पृश्य त्यांना कामे नाकारतील आणि त्यांचीच उपासमार होईल अशी भीती या संपादकाने व्यक्त केली होती. डॉ. आंबेडकरांनी या लेखातून त्या संपादकाचा समाचार घेतला आहे. त्यांना दलिताबद्दलची भूमिका व्यक्त केली आहे.

डॉ. आंबेडकर चित्रावशास्त्री व तथाकथित सुधारकांना असा प्रश्न विचारतात की, मुंबईतील कामगारांनी भांडवलदारांविरुद्ध संप केला तर तुम्ही त्यांना प्रोत्साहन देता आणि भांडवलदारांनी कामगारांची पिळवणूक तात्काळ थांबवावी म्हणता पण दुसऱ्या बाजूला अस्पृश्यांना मात्र सत्याग्रह न करण्याचा सल्ला देता व त्यांची पिळवणूक करणाऱ्या त्यांना मूलभूत हक्क नाकारणाऱ्या ब्राह्मण सवर्ण लोकांना मात्र "दलितांची पिळवणूक थांबवा" असे सांगण्याऐवजी दलितांनाच घाबरवता हा दुटप्पीपणाच म्हणावा लागेल असे मार्मिक विधान करुन डॉ. आंबेडकरांनी तथाकथित सुधारकांचा हा कावेबाजपणा त्यांच्या लक्षात आणून देतात.

समाजातील दलित वर्गाला सवर्णांचा गुलाम बनवायचे नसेल तर त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाले पाहिजे. तसे ते झाले तर कुणीही त्यांची पिळवणूक करु शकणार नाही आणि अपमानही करु शकणार नाही. असे भाकित डॉ. आंबेडकर वर्तवतात. त्यानंतर ते दलितांच्या गुलामीची चिकित्सक, तार्किक कारणमीमांसा करतात. ते म्हणतात की भारतीय समाजात पारंपरिक व्यवसाय करण्याची पद्धत आहे पण महारांना बलुतेदारीत स्वतंत्र असा धंदा, व्यवसाय मुद्दामच दिलेला नसावा. त्यांनी त्रैवर्णिकांची सेवा करावी असे धर्म सांगतो, ते सरकारी वतनदार आहेत असे पूर्वापार म्हटले जात असले तरी त्यांच्यावर अधिकार चालतो तो सवर्णीयांचाच म्हणजे 'सरकार' सर्व लोकांचे आहे त्यामुळे ते म्हणतील ती सर्व कामे - ती अप्रतिष्ठेची असली तरी महारांना मुकाट्याने करावी लागत आहेत. महारांना न्याय देणारे ही सवर्ण आहेत त्यामुळे महारांनी त्यांना सांगितले गेलेले काम नाकारले तर त्यांच्यावर अत्याचार करण्याचे, त्यांना अघोरी शिक्षा करण्याचे सगळे अधिकारही सर्व शासनकर्त्यांच्याच हाती आहेत. त्यामुळे नाईलाजाने महारांना न आवडणारी, न पटणारी गलिच्छ कामेही मुकाटपणे करावीच लागतात.

डॉ. आंबेडकरांनी हिंदु धर्मियांची जुलमी विषमतेवर आधारलेली चातुर्वर्ण्य व्यवस्थाच दलितांसाठी प्रगतीचे दरवाजे बंद करणारी आहे. त्याला विरोध करतात. डॉ. आंबेडकर म्हणतात एखादा मुसलमान किंवा पारशी जर गावाचा मुख्य असला तर त्याने दलितांवर अन्याय केला नसता पण गावोगावी हिंदूचेच पाटील सरपंच धुरीण आहेत त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींसाठीही दलितांवर अन्याय होतो. दलितांनी चांगला पोशाख केला, मेलेल्या गुरांचे मांस खाल्ले नाही तरी त्यांना पाटील शिक्षा करतात, तेव्हा हिंदु धर्मियांनी त्या पाटलांना सवर्ण म्हणून दिलेले अधिकारच

त्यांना तसे वागायला प्रवृत्त करतात, असे डॉ. आंबेडकरांना जाणवते. म्हणून महारांनी वतने सोडवित बलुते मागणे सोडावे तरच त्यांची गुलामगिरी, स्पृश्यावलंबी जगणे संपेल असे डॉ. आंबेडकर सांगतात.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर दलितांचा सत्याग्रह हा त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठीही आहे असे आंबडेकर सांगतात. अस्पृश्य सत्याग्रहाच्या परिणामांना घाबरणार नाहीत असा आंबेडकरांना विश्वास वाटतो. स्वतःच्या स्वांतत्र्याचे समान हक्काचे ध्येय दलितांना सत्याग्रहाचे परिणाम सोसण्याचे बळ देईल अशी खात्री डॉ. आंबेडकरांना वाटते. ज्याप्रमाणे सगळे भारतीय इंग्रजांनी चालवलेल्या पिळवणूकीचा बहिष्कार म्हणून परदेशी कापड, वस्तू यांवर बहिष्कार टाकतात त्याप्रमाणेच दलित स्वतःच सवर्णावर बहिष्कार टाकतील. सर्व कामे देऊन आपल्यावर उपकार करत नसून तेही आपल्या सेवेवर अवलंबून आहेत याची आठवण दलित सवर्ण मंडळींना करुन देतील. डॉ. आंबेडकर सांगतात की दलित त्यांच्या वल्गनांना घाबरणार नाहीत. दलितांना सवर्णीयांनी गुलाम केले आहे. आर्थिक दृष्ट्या स्वतःवर अवलंबून ठेवले आहे हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी महाभारतातील एका प्रसंगाचा संदर्भ देऊन भीष्म, द्रोण व शल्यही कौरवाचे गुलाम बनले होते हे केवळ पैशांमुळेच याची आठवण देणारा श्लोक उधृत केला आहे. त्यावरुन त्यांचा व्यासंग जाणवतो.

दलितांच्या वतन व्यवस्थे विषयी डॉ. आंबेडकर सांगतात की जन्माला येणारा प्रत्येक माणूस काही आपला धंदा सोबत घेऊन जन्माला येत नाही. त्याला आपली उपजिविका करण्यासाठी धंदा शोधावाच लागतो हे लक्षात घेऊन महारांनी स्वतःचे वेगळे व्यवसाय, उद्योग सुरु करावेत. त्यांना तो अधिकार आहेच पण धर्मभोळेपणामुळे बरेच महार स्वतंत्र व्यवसाय करायला घाबरतात. ही भीती दूर टाकून महारांनी सर्वणपासून दूर आपल्या स्वतंत्र वसाहती उभ्या केल्या पाहिजेत तर ते निर्भयपणे आपला वेगळा व्यवसाय सुरु करु शकतील असे डॉ. आंबेडकर सांगतात सवर्णीयांपासून दूर गेल्याने महार स्वतंत्र होतील, स्वेच्छेने आपला व्यवसाय शोधतील, कोणी दुकान सुरु करेल, कुणी शिंपी बनेल पण मानाने जगेल. ते स्वतःच्या जगण्याचा मार्ग शोधतील.

म्हैसूर संस्थांनाच्या राजाने दलितांना स्वतंत्र वसाहत उभी करण्यास मदत केली त्यामूळे त्यांची स्थिती सुधारली हे उदाहरण देऊन डॉ. आंबेडकर इतर गावांतील दलितांसाठी तेथील सवर्णियांनी मदत केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतात. महारांनी शेतीवरच संपूर्ण भार टाकू नये तर त्याखेरीज अन्य व्यवसाय शोधावेत असे डॉ. आंबडेकर सुचवतात महारांना असा स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य पटकन मिळणार नाही पण तरीही प्रयत्नपूर्वक त्यांनी छोटा - मोठा धंदा करावा असे आंबडेकर सुचवतात. महारांनी घरोघरी खादी विणावी, अन्य महारांनी ती विकत घ्यावी असे करत करत महारांनी आपले मूलभूत मानवी हक्क मिळवायचे असतील तर त्यांनी सवर्णांनी लादलेली आर्थिक गुलामगिरी व परावलंबीत्व सोडले पाहिजे या मुद्यावर डॉ. आंबेडकर भर देतात.

अशाप्रकारे दादोबा पांडुरंग, मुकुंदराव पाटील व डॉ. आंबेडकर यांनी सर्वसामान्य भारतीय, शेतकरी व दलित यांच्या आर्थिक स्वावलंबनासंबंधी, दारिद्र्य निर्मुलना संबधीविचार मांडले आहेत. आजही ते उद्बोधक आहेत.

### ४.३.८ संस्कृती म्हणजे काय? - इरावती कर्वे

इरावती कर्वे यांनी 'संस्कृती म्हणजे काय ?' या लेखातून संस्कृतीबद्दलचे विवेचन केले आहे. मानसशास्त्र आणि मानववंशशास्त्र यासारख्या विषयामध्ये संशोधन करून ग्रंथाची निर्मिती केली. मराठी साहित्यातील उल्लेखनीय लेखिका म्हणून 'डॉ. इरावती कर्वेना ओळखले जाते' स्त्रीवादी साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. मराठी साहित्यातील - स्त्रीवादी लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. आपले दैनंदिन जीवन जगत असताना आपल्या संस्कृतीला किती महत्त्वाचे स्थान दिले गेले पाहिजे हा विचार त्यांनी ''संस्कृति म्हणजे काय ?'' या वैचारिक गद्यात लेखातून व्यक्त केला आहे.

''संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती'' अशी संस्कृतीची ढोबळमानाने व्याख्या करता येईल. पृथ्वीवरील सर्व वस्तुंवर संस्कार घडत असतात. सर्व वस्तु एकमेकांवर क्रियाप्रक्रिया करत असतात.

उदा. पावसाने दगड झिजतो, माती भिजते, बीज अंकुरते, उन्हाने दगड फुटतात, बीज वाढीस लागते, शेवाळते दगडावर दगड आपटतो, फुटतो, नदीच्या प्रवाहाने वाहत जावून त्याचे गोठे होतात. पृथ्वीचे व पदार्थाचे रूप या संस्कारामुळे सारखे पालटत असते. पण आज ज्या संस्कारांचा आपणास विचार करावयाचा आहे ते हे नव्हते. ही सदैव पालटणारी पृथ्वी मनुष्याच्या संस्कारीत जीवनाची पार्श्वभूमी आहे.

इरावती कर्वे संस्कृती बदल माहिती देताना त्या पक्ष्यांच्या जगण्याचे उदाहरण देतात. पक्षी थंडी-वाऱ्यापासून पिलांचे संरक्षण करण्यासाठी घरटी बांधतात. पिल्लांना चारा भरवतात. त्यांना उडणे, भक्ष शोधणे यासारखे महत्त्वाचे शिक्षण देतात. कित्येक पक्षी दरवर्षी त्याच-त्याच ठिकाणी येवून घरटी बांधतात. बरेच पक्षी संघ करून राहतात. त्यांच्यामध्ये म्होरक्या असा एखादा पक्षी असतो. पक्षांप्रमाणेच पशुजातीमध्येही असा जीवन क्रम सदैव चालत असतो. व्यक्ती-व्यक्तीची व गटा-गटांची वागणूक ठरलेल्या साचेबद्ध बांधीव मार्गाने होते. मग ज्यांना संस्कार म्हटले पाहिजेत ते हे नव्हते. कारण; सजीवाचा पिढ्यांपिढ्या तोच जीवनक्रम चालू आहे, त्याला एक चाकोरीबद्ध चौकट आहे परंतु ते बदल अपेक्षित आहेत ते मात्र होत नाहीत. संस्कृती ही समाजाची निर्मिती आहे. एकट्या दुकट्या व्यक्तीच्या जीवनक्रमात संस्कृतीची निर्मिती होणे अशक्य आहे. ज्याच्यात नवनिर्मिती नाही, संचय नाही व संक्रमण ही नाही त्याला संस्कृती म्हणता येणार नाही. एकांतात राहीलेला रॉबीन्सन क्रुरनी। गीरी कंदरी वास करणारे ऋषीमुळे समाजातील विषमता वाढेल. तेव्हा केवळ पण निपक्षपातीपणे अंमलबजावणी करून राहिलेले नाही. हे नियम समतेच्या तत्वांशी संस्कार त्यावर आधारलेले असले पाहिजेत. जीवन तत्वांशी संस्कार त्यावर आधारलेले असले पाहिजेत.

कितीही भिन्न समाजातील संस्कृतीच्या अंगोपोगाची निर्मिती म्हणून व्यक्तीद्वारे होत असते. परंतु व्यक्तीला त्याचे कर्तव्याला श्रेय देता येत नाही. संस्कृतीत बदल होण्यासाठी त्या संस्कृतीत जन्मलेल्या व्यक्तीचे गुण व वर्तन जसे कारणीभूत आहे तसे इतर संस्कृतीशी संबंध आला म्हणजे परिवर्तनास मदत होते. मनुष्य निर्मित पदार्थमय जग व कल्पनामय जग म्हणजे संस्कृती. इतर प्राण्यांप्रमाणे मनुष्यही पोटाच्या विवंचनेत काळ घालवतो व विवंचनेतूनच आजच्या संस्कृतीमय जीवनाची निर्मिती झाली आहे.

संस्कृती बद्दल इरावती कर्वे म्हणतात, संस्कृती म्हणजे फक्त संस्कारच नव्हे तर आपल्या शरीरातील सर्व इंद्रीयांना म्हणजेच ज्ञानेद्रिये, कर्मद्रीये व बुद्धी या सर्वांना वळण लावणारे ते एक महत्त्वाचे साधन आहे. जर आपण जगाचा विचार केला तर या जगात अनेक संस्कृत्या होऊन गेल्या प्रत्येक देशाच्या संस्कृतीमध्ये वेगवेगळेपणा जाणवतो. संस्कृती निर्मितीचे श्रेय तसेच कर्तृत्व हे बऱ्याच अंशी ईश्वरालाही द्यावे लागते कारण; प्रत्येक राजा जेव्हा राज्य करतो तेव्हा तो आपले शासन ईश्वरप्रणीत आहे हे सांगत असतो. संस्कृती म्हणजे केवळ एक शब्द नसून मनुष्य जीवनाची पूर्व पिढी ते शेवट असा संपूर्ण प्रवास असतो. त्यामुळेच करत असतात. उदा. पावसाने दगड झिजतो, माती भिजते या सर्व उन्हाने दगड फुटतात, बीज वाढीस लागते. शेवाळे ते दगडावर दगड आपटतो, फुटतो, नदीच्या प्रवाहाने वाहत जावून त्याचे गोटे होतात. पृथ्वीचे व पदार्थाचे रूप या संस्कारामुळे सारखे पालटत असते. उदा. 'सर्व ब्राह्मणांना अध्ययनाचा अधिकार आहे व कोणत्याही अस्पृश्याला अध्ययनाचा अधिकार नाही' हे नियम जर निपक्षपातीपणे लावण्यात आले तर त्यामुळे समाजातील विषमता वाढेल. तेव्हा केवळ नियमाची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी करून भागणार नाही. हे नियम समतेच्या बाबतीत दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्ती व्यक्तीत निष्कारण भेद करता कामा नयेत.

माणसे एकमेकांपासून कितीही भिन्न असली तरीही मुलतः सारखी आहेत म्हणून त्यांना लाभणारी वागणूक मुलतः सारखी असली पाहिजे असे समतेच्या तत्वाचे म्हणणे असेल पाहिजे. सर्व माणसे ही ईश्वराची मुले आहेत व म्हणून त्यांची ऐहिक परिस्थिती व तीव्र स्वरूप कितीही भिन्न असले तरी तो मुलतः समान आहे. त्यांची प्रतिष्ठा समान आहे असे जर प्रत्येक व्यक्तीने म्हटले व मानले तरच सामाजिक समता अस्थीत्वात येईल, देवाणे माणसाला अनेक नैसर्गिक हक्क दिले आहेत. उदा. जगण्याचा हक्क, मालमत्तेचा हक्क, करार करण्याचा हक्क विचार स्वातंत्र्याचा हक्क इ. हक्क बहाल केले आहेत. हे हक्क आपल्या देशाच्या राज्यघटनेत सुद्धा नमुद केलेले आहेत.

त्यामुळे एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचे हक्क वापरण्यास हस्तक्षेप करू नयेत. स्वतःचे हीत साधण्याचे स्वातंत्र्य हे देखील समतेचे मुलभूत तत्व आहे. माणसाना आपले हीत साधण्यासाठी साधन सामग्री लागते. त्यासाठी संपत्ती वाढवणे आवश्यक तसेच योग्य आहे. तेव्हा माणसांना विषम वागणूक देऊन जर त्यामुळे समाजातील संपत्ती वाढणार असेल तर अशी विषम वागणुक देणे योग्य ठरेल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाजातील संपत्तीचे न्याय वाटप झाले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गुणवत्तेच्या प्रमाणात संपत्तीचा वाटा मिळाला पाहिजे तसेच

सर्वांना समान वागणुक दिली परंतु कधी कधी व्यक्तीच्या कर्मानुसार त्यांना विषम वागणुक द्यावी लागले व ती बऱ्याचदा योग्य ही ठरते. उदा. ज्यांना कंटाळवाणे काम करावे लागते.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'संस्कृती' बद्दलचे इरावती कर्वेची भूमिका थोडक्यात सांगा.

२) आपली संस्कृती टिकावी असे इरावती कर्वेना का वाटते ?

## ४.४ वैचारिक गद्य मधील लेख

### ४.४.१ संख्यत्वासाठी - शांता किर्लोस्कर :

संख्यत्वासाठी या लेखातून शांता किर्लोस्कर यांनी 'स्त्री-पुरुष' समानाता यावर लेखातून प्रकाश टाकला आहे. 'संख्यत्वासाठी' या शांताबाई किर्लोस्कर यांचा लेख १९७५ सालातील असला तरी त्यातही पुरुषांनी स्त्रियांचे शिकणे, स्वतंत्र होणे अजून फारसे मानवलेले नाही हेच प्रकर्षाने जाणवते.

स्त्रियांचे राज्य निर्माण होईल अशी काल्पनिक भीती पुरुषांच्या मनात असते कारण त्यांना आपल्या हातची सत्ता जाऊ द्यायची नसते. हे लक्षात घेऊन शांताबाई किर्लोस्कर म्हणतात, की स्त्री-पुरुषांचे नातेच मुळी नैसर्गिक आकर्षणावर आधारलेले आहे. 'तुझे-माझे जमेना पण तुझ्यावाचून करमेना' असा त्यांच्यातील अहकाराचा खेळ चालू असतो. पण हे अहंकार केवळ शारीरिक आकर्षणाचे परिणाम नसून ते समाज व्यवस्थेतील विषमतेचेही परिणाम आहेत असेही शांताबाई स्पष्ट करतात.

समाजातील प्रत्येक स्त्रीला स्वतःचे वेगळे असे अस्तित्व, स्वतःची वेगळी ओळख हवी असते आणि तीच आपल्या विषम व्यवस्थेत तिला नाकारली जात असल्याने ती अतृप्त, असमाधानी असते. कामगार मजूर म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांना आपल्या नवऱ्यापेक्षा कमी मजुरी मिळते. शिवाय तिला मिळणाऱ्या मजुरीचा वापर तिला संसाराचा गाडा रेटण्यासाठीच करावा लागतो. त्या पैशातून तिला स्वतःचा विकास साधता येतच नाही. मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशात कसेबसे जीव जगवताना शिक्षण, औषधपाणी या गोष्टी तिच्यासाठी चैनीच्या गोष्टी ठरतात आणि कारकून, शिक्षक, छोटे उद्योगधंदे करणाऱ्या स्त्रियांची परिस्थितीही काही फारशी वेगळी नसते. स्त्रीने अर्थार्जन करावे असे या स्त्रियांच्या घरातील पुरुषांना वाटत असते पण तिच्या पैशांचा संसार चालवताना वापर केल्यावर तिला तिचा स्वतःचा विकास साधण्यास वेळ मोकळीक द्यायला मात्र पुरुष नकार देतात. कारण त्यांना स्त्री स्वातंत्र्य नको आहे. स्त्री ही पुरुषांच्या मर्जी प्रमाणे वागावी अशी त्यांची आस्था असते.

स्त्रिया नवरा शोधताना नेहमी आपल्यापेक्षा वरचढ पुरुष शोधतात आणि मग तक्रार करतात असे पुरुषांचे म्हणणे असते. तर स्त्रियांना असे अनुभव येतात की त्यांना अधिकारी होऊ देण्याची संधी पुरुष हेतूतः नाकारतात. या दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत. अजूनही स्त्री आपला विकासाचा मार्ग शोधताना गोंधळलेली असते. कधी ती आपला दुबळेपणा शस्त्रासारखा वापरते तर कधी आपले सामर्थ्य वापरते. शांताबाईच्या मते पुरुषही स्त्रीला समजून घेताना गोंधळलेला असतो. कधी त्याला वाटते की स्त्री त्याला जाळ्यात पकडते आहे आणि त्यामुळे त्याच्या विकासात अडथळा येतो आहे. दुसऱ्या बाजूला काही स्त्रिया पुरुषांची शिकार होण्यात धन्यता मानताना दिसतात आणि मग आपल्याला पुरुष अडवून ठेवतात म्हणून त्याच तक्रार करतात! शांताबाई किर्लोस्करांच्या मते स्त्री-पुरुषांमधील हे सनातन संघर्ष व्यक्तिगत असले तरी ते समाज व्यवस्थेच्या पक्षपाती विचारांतून उध्दभवलेले असतात.

स्त्रियांना एकीकडे अधिकार हवे असतात, मोठेपणा हवा असतो आणि त्याचवेळी स्त्री दाक्षिण्याचीही गरज वाटत असते. शांताबाई स्त्री पुरुषांमधील या पेचांना दुष्ट वर्तुळ म्हणतात. स्वातंत्र्य हवे आणि तरीही एकमेकांचा सहवास, जवळीकही हवी असा हा विचित्र तिढा असतो. कधी स्त्रियांना सर्वस्वी पुरुषांचे होण्यात आनंद वाटतो तर कधी पुरुषांना स्त्रीने सर्वस्वी आपलेच असावे यात आनंद वाटतो. एकूण स्त्री-पुरुष दोघेही परस्परांच्या अस्मितेचे बळी असतात.

शांता किर्लोस्कर म्हणतात की, समाजातील ''प्रत्येक माणूस हे दुहेरी व्यक्तित्व असते. एक तो असतो आणि एक दिसावा असे त्याला वाटत असते. कारण जसे दिसावे असे त्याला वाटते, त्या प्रतिमेची जसे असते त्या प्रतिमेवर सतत जबरदस्ती सुरु असते. त्यासाठी तो केवढा खटाटोप करीत असतो आणि तरीही दाखवण्याची प्रतिमासारखी धोक्यात असते. याबाबतीतले पुरुषांचे यश मोठ्या प्रमाणात स्त्रियांच्या मान्यतेवर अवलंबून असते आणि ती अनुकूल ठेवण्यासाठी तो अखंड जागरुक असतो आपण पुरुषी दिसावे, यशस्वी ठरावे, रुबाबदार दिसावे, आहे ह्या श्रेणीपेक्षा वरच्या श्रेणीचे दिसावे असे बहाणे तो करीत असतो व स्त्रीने शरणतेचा, मान्यतेचाच प्रतिसाद द्यावा ही त्याची अपेक्षा असते.''

शांताबाई किर्लोस्कर म्हणतात जर स्त्रिया मुक्त झाल्या तर स्त्रियांपुढे आपली एक उजळ प्रतिमा निर्माण करण्याच्या खटाटोपातून पुरुषही मुक्त होतील. पण प्रत्यक्षात अजूनही तसे घडताना दिसत नाही. शांताबाई किर्लोस्करांच्या मते स्त्रीची जीवनदृष्टीच आपली समाजव्यवस्था दुबळी बनवून ठेवते, त्यामुळे तिचे विचारही भ्रष्ट होतात. तिला जबाबदाऱ्या टाळाव्याशा वाटतात, ती आळशी बनते. पण हे तिच्या इच्छेने घडत नसते तर हा तिला घडविताना मुद्दाम दडपण्याचा परिणाम असतो. स्त्री इतरांचे संरक्षण, प्रेम, सुरक्षा यावर अवलंबून राहायला शिकते. कधीतरी तिला तिचे परावलंबीत्व जाणवते तेव्हा ती पुरुषाला दोष देते पण तेव्हा पुरुष तिलाच कमी लेखतो. शांताबाईच्या मते या साऱ्यात स्त्री व पुरुष दोघेही दोषी असतात. एकाची हुकूमशाही व दुसऱ्याची वीरूपता लपवण्यासाठी मुळातील विषमता तशीच ठेवून समता सिद्ध करण्याचे वेडे प्रयत्न चालतात, ते चुकीचे आहे ते थांबले पाहिजेत.

स्त्री आपले मनोरंजन कसे करावे हे कळत नाही. तिला सतत मनोरंजनासाठी पुरुषाची गरज भासते. पुरुषाला स्त्रीकडून शरीरसुख हवे असते पण तिचे मन झिजवण्यासाठी वेळ देण्याची त्याची तयारी नसते. शांताबाई किर्लोस्कर म्हणतात, समाजातील की काही पुरुष स्त्रियांना औदार्याने वागवणारेही असतात. त्यांना त्या औदार्याचा अभिमानही वाटतो. पण संघर्षाचा प्रसंग उद्‌भवला की हेच पुरुष त्या स्त्रियांनाच कृतघ्न ठरवतात. स्त्रीला स्वतःच्या गुणांची आणि पात्रतेची जाणीव असते तिला अशा पुरुषाचा अनुनय करणे हे भीक मागण्यासारखे वाटते. आत्मसमर्थन करताना मग स्त्री दुष्टही होऊ शकते. असे शांताबाई किर्लोस्करांना वाटते.

पुरुष स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाने कळवळतो पण स्त्रिया मात्र बरेचवेळी पुरुष कर्तृत्वशून्य असला तरी त्यांचाच अधिकार मानणे भाग्याचे समजतात. हे चूकीचे आहे ते स्पष्ट करतात. स्वतः सक्षम असतानाही अधिकाराचा वापर करत नाहीत. स्त्रिया पुरुषांना बांडगुळासारख्या चिकटतात. त्यांचे शोषण करतात असेही दृश्य दिसते. स्त्रियांना स्वावलंबी, स्वतंत्र केले तरच हे प्रश्न सुटतील. त्यासाठी स्त्रीला शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्याची संधी मिळणे जरूरीचे आहे तसेच तिला तिचे निर्णयस्वातंत्र्यही असले पाहिजे. शेवटी स्त्रीत्व म्हणजे आगळेवेगळे काही नसून समाजाने घडवलेली ती स्त्रीची मानसिकता असते आणि मुलींना लहानपणापासून 'सख्यत्वासाठी' या लेखातून शांताबाई किर्लोस्कर यांनी स्त्री समस्या, स्त्रीचे जगणे, तिची शोकांतिक, आणि परंपरागत समाज व्यवस्थेने तिला दिलेला दय्यमपणा, लेखातून व्यक्त होतो. शांताबाई किर्लोस्कर यांनी या लेखात स्त्री आत्मभान, आत्मसन्मान जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्री मुक्ती बद्दलच्या शांताबाई किर्लोस्कर यांची भूमिका स्पष्ट करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

### ४.४.२ बुवाबाजीचा भस्मासूर - दि. के. बेडेकर

समाजामध्ये वाढलेली बुवाबाजीपणा यावर प्रकाश टाकण्यासाठी 'बुवाबाजीचा भस्मासूर' हा दि. के. बेडेकर यांचा लेख लिहिला आहे. हे दोन्ही लेख सुमारे ५० वर्षांपूर्वीचे आहेत. समाजात शिक्षणाचा प्रसार होऊनही बुवाबाजी, अंधश्रद्धा यांचा समूळ नायनाट का होत नाही ? असा प्रश्न दि. के. बेडेकर यांना पडला आहे आणि त्या अनुषंगाने ते कारणमीमांसा करतात.

दि. के. बेडेकर नवयुग दिवाळी अंक (१९६४)तील आचार्य अत्रे यांच्या लेखाचा संदर्भ देऊन नारायण महाराजांच्या दुष्कृत्यांचा अत्रे यांनी पर्दाफाश केला होता याची आठवण देतात. तसेच 'सत्यकथा' (दिवाळी १९६४) मासिकातील शरदचंद्र चिरमुले यांच्या 'श्रीशिल्लक' या कथेतही अंधश्रद्धेचे जे विदारक दर्शन घडते त्याबद्दल ते खेद व्यक्त करतात. तसेच ही अंधश्रद्धा किंवा बुवाबाजी केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच नसते तर राजकीय क्षेत्रातही या गैरप्रकारांचा प्रादुर्भाव झाला आहे असे दि. के. बेडेकर सांगतात. पुष्कळसे राजे, लोकसेवक, पुढारी हेही स्वार्थसाधूच झाले आहेत या वास्तवाकडे बेडेकर यांनी लक्ष वेधले आहे. 'बुवा' होण्याची आणि लोकांची 'पिळवणूक' करण्याची जी प्रवृत्ती असते त्या संदर्भात बेडेकर म्हणतात - ''या ना त्या अमिषाने किंवा धाकाने दुबळ्या माणसांना 'नादी' लावण्याची किमया ज्यांच्या अंगी असते तो आपल्या क्षेत्रात किंवा व्यवसायात 'बुवा' बनतो. त्याचे भोळेव धूर्त शिष्य त्याची आरती करतात. भोळे शिष्य लुबाडले जातात. धूर्त शिष्य बोवांची व आपली तुंबडी भरून घेतात. सारांश बुवाबाजीचा प्रकार सगळ्या मानवी व्यवहारात सदासर्वदा चालू आहे. विभूतिपूजेचे स्तोम माजणे हे बुवाबाजीच्या रोगाचे मूळ आहे.''

दि. के. बेडेकरांचे असे निरीक्षण आहे की अध्यात्म, तत्त्वज्ञान किंवा काही गूढ असामान्य असे अनुभव मिळविण्याची जिज्ञासा अनेकांना असते व ती श्रद्धान्वित असते. ही श्रद्धा नसलेल्या माणसाला नास्तिक, पाखंडी, संसारात गुरफटलेला म्हणून हिणवले जाते. या भाविकांचे असे म्हणणे असते की नुसत्या बुद्धीने किंवा तर्काने विश्वाचे कोडे सुट नाही. भावनेला व अनुभवाला महत्त्व आहे.

दि. के. बेडेकर प्रश्न उपस्थित करतात की भाविकांना नेमके काय हवे असते ? कोण म्हणतो मला ब्रह्मज्ञान हवे आहे, कुणाला देवाची कृपा हवी असते. पण मग एका सामान्य भाविकाशी बोलल्यावर दि. के. बेडेकर या निष्कर्षाला येतात की खऱ्या साधकाला पूर्ण समाधान मिळते. त्याच्या मनात कोणतीही इच्छा उरत नाही किंवा असल्यास ईश्वर ती पूर्ण करतो.

दि. के. बेडेकर आध्यात्मिक साधनेतील गुरू-शिष्यांच्या नात्याबद्दल म्हणतात, ''. . . हे नाते लौकिक तऱ्हेचे नसते — नुसते शिक्षक व विद्यार्थी यांचे नसते. त्यात एक वेगळाच एकरूपतेचा संबंध असतो. एकदा असा संबंध मानला की गुरूशिष्यातल्या संबंधांना लौकिक अर्थाने आदर, प्रेम इ. भावनांपेक्षा जास्त दृढता येते आणि मग असे एक वातावरण निर्माण होते की बुवाबाजीच्या कमी-अधिक ओंगळ प्रकारांना वाव मिळू शकतो. प्रत्यक्षात घडलेल्या प्रकारांना चव्हाट्यावर आणूनही बुवाबाजीचे प्रकार नित्य नवे घडतच राहतात, याचे रहस्य या वातावरणात आहे व पर्यायाने आध्यात्मिक साधनेच्या मूलभूत उद्दिष्टांत आहे.'' असे त्यांना वाटते.

बेडेकर सांगतात की, "अध्यात्म मार्गाकडे नेणारी श्रद्धायुक्त बुद्धी अनुभवावर आधारलेली असते आणि हा अनुभव त्या साधकाला आलेला नसतो तर त्यांच्या मार्गदर्शक गुरूला आलेला असतो आणि अनुभव कुणालाही कुठल्याही म्हणजे बौद्धिक किंवा काल्पनिक पातळीवरचा आलेला असू शकतो. त्यामुळे कोणाचाही अनुभव नाकारता येत नाही. नास्तिकांनी भाविकांना ईश्वराचा अनुभव आलेलाच नाही असे म्हणणे त्यामुळेच अयोग्य ठरते. अस्तिकांना आपला अनुभव नेमक्या शब्दात वर्णन करता येत नाही हेही स्वाभाविकच मानले पाहिजे कारण हा अनुभव भावनिक, मनाच्या पातळीवरचा असू शकतो".

सर्व सामान्य माणसाविषयी बेडेकर सांगतात की, "सर्वसामान्य संसारी माणसांना पूर्ण समाधानाचे आकर्षण असते. ते ज्या गुरूकडे खेचले जातात त्यांना असे पूर्ण समाधान लाभले आहे यावर साधकांची श्रद्धा असते. हे साधक या गोष्टींवर विश्वास ठेवत असतात की संपूर्ण विश्व ईश्वराने निर्माण केलेले आहे आणि आपल्या बाबतीत जे काही घडते आहे ते केवळ ईश्वराच्या इच्छेनेच घडते आहे. आपल्या गुरूंना ईश्वराबद्दल सगळे काही माहीत आहे आणि ईश्वराला प्रसन्न कसे करायचे हे तेच आपल्याला सांगू शकतील अशी खात्री साधकांना वाटत असते". बेडेकरांच्या मते गुरू-शिष्यांच्या अलौकिक नात्यातील वातावरणात तोडगा सांगणे कठीण आहे.

त्यामुळेच बुवाबाजीला आळा घालणे कठीण आहे. बेडेकरांच्या मते भोंदू बुवांच्या पापाला चव्हाट्यावर आणून त्यांचा भांडाफोड करणे हा एक मार्ग असू शकतो की ज्याने अंधश्रद्धाळू भानावर येतील पण तोच एकमेव मार्ग असू शकत नाही. बेडेकरांना वाटते की पूर्ण समाधान, पूर्ण ज्ञान, पूर्ण सामर्थ्य या पूर्णतेच्या उद्दिष्टाबद्दल आपण गंभीरपणे विचार करायला हवा. त्यांच्या मते जीवनात येणारा अपूर्णतेचा अनुभवच सर्वात मोलाचा असतो. प्रत्येक समाधानात थोडे असमाधान असणारच आणि कोणतेही समाधान थोडा काळच टिकते. त्यामुळे अपूर्णता, असामाधान या गोष्टींना स्वाभाविक म्हणून स्वीकारणेच योग्य असते. उलट अशी अपूर्णता कसली आहे ते प्रत्येकाने नीट ओळखले पाहिजे.

बेडेकरांना वाटते की अपूर्णतेचा अनुभव पचवून येईल त्या संकटाला सामोरे जाणे, जीवन संघर्ष करत राहणे हाच मार्ग खऱ्या अर्थाने सुखाचा असतो पण ढोंगी बुवांची, दुबळ्या माणासांची जीवनसंघर्षाची, झगडण्याची प्रेरणाच जणू काही संपलेली असते. ईश्वर पाहिलेला नसणे हा काही माणसांना नकारात्मक अनुभव वाटतो तर मानवतावादींना तोच अनुभव विवेकाचा वाटतो. तरीही आपल्या व्यवहारात अविवेकाचाच भाग अधिक असल्याने ढोंगी साधूंचे फावते.

बेडेकरांच्या मते अपूर्णतेचा अनुभव श्रेष्ठ आहे कारण अपूर्णता जाणवते म्हणूनच आपण जीवनाला वळण लावण्याच्या प्रयत्न करतो. अपूर्णतेला तुच्छ मानू नये उलट अपूर्णता स्वीकारून नम्र व्हावे, इतरांशी सहकार्याने वागावे, भलत्याच आशाआकांक्षांच्या स्वप्नात अडकू नये. त्यामुळेच शांत-समतोल वृत्ती निर्माण होईल. बुवाबाजीच्या आकर्षणातून बाहेर येतील असे त्यांना वाटते. ते म्हणतात- ''मानवी ज्ञानाच्या व सामर्थ्याच्या अपूर्णतेची नम्र जाणीव जर बहुसंख्य लोकांमध्ये दृढमूल झाली तर पूर्णत्वाच्या कल्पनेकडे लोक डोळसपणे पाहू लागतील. साहजिकच पूर्ण ज्ञानाचा किंवा अलौकिक सामर्थ्याचा लाभ अमक्याला झाला आहे व म्हणून त्याला परतत्व गुरू मानून आपले कोटकल्याण होणे शक्य आहे, ही अशी आशा कोणाच्याही मनात उद्‌भवणे

कठीण होईल. आजही आपण जेव्हा एखाद्या विषयातील तज्ज्ञ माणसाकडे सल्ला घ्यावयास जातो तेव्हा त्याला सर्वज्ञ समजत नाही. एक तज्ज्ञाचे मत दुसऱ्या तज्ज्ञाशी जोडू पाहतो, ते चुकीचे आहे. हा व्यवहार अपूर्णतेच्या जाणिवेमुळे होणारा डोळस व्यवहार आहे.''

बेडेकरांच्या मते एवढा डोळस व्यवहार केल्यास बुवाबद्दल एखाद्याला आकर्षण वाटणार नाही. पण तसे झाले नाही तर मात्र या ना त्या स्वरूपात बुवाबाजी चालूच राहील. असे त्यांना वाटते.

**आपली प्रगती तपासा :**

१) बुवा बाजी बद्दल दि. के. बेडेकर यांचे मत थोडक्यात सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

१) बुवाबाजी बद्दल समाजात असणारा गैरसमज कोणता ते सांगा ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

### ४.४.३ भाषा भिवृद्धीची सामाजिक दृष्टी - श्रीपाद महादेव माटे

श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' आपल्या समाजातील तळागाळातील लोकांच्या दुःखाकडे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष वेधले होते. मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी लिहिलेल्या लेखातूनही त्यांची सामाजिक दृष्टी प्रकर्षाने जाणवते. भाषाशास्त्र ही ज्ञानशाखा खरे तर त्याकाळी परिचीत नव्हती. पण श्री. म. माटे यांच्या लेखातील भूमिका समाजशास्त्रीय भाषावैज्ञानिकांची आहे.

भाषेबद्दल मत व्यक्त करताना श्री. म. माटे म्हणतात, कोणतीही भाषा कधीच स्थिर नसते किंवा एका स्थिर भाषेत अनेक अस्थिर भाषा अस्तित्वात असतात. कारण भाषा व्यक्तीचे लिंग, वय, जात, व्यवसाय, शिक्षण, प्रदेश, काळ अशा ना घटकांमुळे सतत बदलत असते. यालाच भाषेतील स्तरभेद असेही म्हटले जाते. श्री. म. माटे यांच्या मते भाषेतील हे स्तरभेद जपले पाहिजेत. विविध स्तरातील माणसांच्या बोलीतील शब्द प्रमाण मराठीत समाविष्ट झाले

पाहिजेत. आपले म्हणणे अधिक स्पष्ट करताना माटे यांनी विविध उदाहरणे दिली आहेत. जसे 'ताणणे' हा शब्द आपण कसा वापरतो त्याबद्दल ते सांगतात. कवळ-कवटाळणे हे शब्द कसे व्युत्पन्न झाले असतील त्याबद्दल सांगतात. त्यानंतर हडकणे - वाळणे या शब्दाचे अर्थ परिवर्तन कसे झाले आणि रुपकात्मक अर्थ त्याला कसा होता याबद्दलही माटे सांगतात. 'हरताळ' या शब्दात 'हाट' म्हणजे बाजार आणि 'टाळा' म्हणजे कुलूप असे दोन शब्द आहेत आणि बाजाराचे व्यवहार बंद असणे म्हणजे 'हरताळ' अशी व्युत्पत्ती श्री. म. माटे सांगतात.

जिल्ह्यात धाब्याची घरे असतात. वीज कडाडली की 'धाबे दणाणते'. त्यावरुन प्रदेश, घराचा प्रकार याचाही परिणाम भाषेवर होत असतो आणि मग असे शब्द रुपकात्मक पद्धतीने कवितेत, साहित्यात वापरले की ते रुढ होतात हे माटे नोंदवतात. मराठी भाषेच्या स्वरुपावर ब्राह्मणांचाच प्रभाव आजवर अधिक आहे हे स्पष्ट करताना माटे म्हणतात -

माटे यांच्या मते आता भाषा अधिक व्यापक करायची असेल, वाढवायची असेल तर फक्त ब्राह्मणांच्या वापरातले शब्दच त्यात असून चालणार नाही. विविध धंदे, व्यवसाय करणारे, बलुतेदार, अलुतेदार, वेगवेगळ्या जातींचे लोक जे व्यवहार करतात त्या व्यवहारांशी निगडीत मराठी शब्द जर आता मराठीत समाविष्ट करुन घेतले तर भाषा वाढेल, टिकेल असा आशावाद माटे व्यक्त करतात. 'इंगा फिरवणे' हा शब्द चर्मकाराच्या भाषेतून, 'ठिय्या देणे' सुताराच्या भाषेतून, 'कमान' गवंड्याच्या भाषेतून, 'सुरकुती न पडणे' पराटीच्या भाषेतून, 'घाला नीट न होणे' तेलाच्या भाषेतून, 'समेवर येणे' गवयाच्या भाषेतून असे विविध शब्द व वाक्यप्रचार विविध स्तरांवरील व्यक्ती मराठी भाषेला देऊ शकतात; असे त्यांना वाटत होते.

श्री. म. माटे म्हणतात, "मराठी भाषेतील बहुतेक नागर व प्रौढ रचना ब्राह्मणांनीच केलेली आहे. अर्थात, त्यांना परिचित अशी जी रुपके तीच त्यांनी आरंभी योजिली. त्यांना पुढे साध्या शब्दांची रुपे आली व भाषा समृद्ध झाली." श्री. म. माटे सुतक सोडताना 'स्नान करुन मोकळे होत'ही ब्राह्मणी रुढी होत. प्रारंभी टिळक, चिपळूणकर, आगरकर, परांजपे हेच लेखक लिहित असल्याने या प्रथेचा उल्लेख रुपकात्मक पद्धतीने त्यांनी त्यांच्या लेखात केला आहे. त्यावेळी वाचकही ब्राह्मणच असल्याने 'अवभृथस्नान' हा शब्द त्यांना कळला. यज्ञ संपल्यानंतरचे ते स्नान असते. पण पुढच्या पिढ्यांना हा शब्द अनाकलनीय वाटेल. 'सव्यापसव्य' म्हणजे पूर्वी श्राद्धात करावयाचा एक विधी होता. पण पुढे तो ब्राह्मणांच्या लेखात रुपकासारखा वापरला गेला आणि प्रचलीत झाला.

श्री. म. माटे सांगतात, 'चटपाटणे', 'पाणी लावून तयार असणे', न्हाव्याच्या भाषेतून, 'खळ लावणे' कोष्ट्याच्या भाषेतून, 'सळंग' कोळ्याच्या भाषेतून, 'किरण साधणे' शिकाऱ्याच्या भाषेतून असे बरेच आदान विविध स्तरांतून भाषेत होत असते. शेतकरी 'साधे गडी', 'पिक पोटऱ्यात येणे', 'पिक करपून जाणे', रंगारी 'हात मारणे' हे शब्द प्रमाण भाषेला देऊ शकतील असे सांगून हे बोलीभाषेकडून प्रमाणभाषेत होणारे आदान कसे घडू शकेल याबद्दल श्री. म. माटे सांगतात - "आपल्या समाजात शिक्षण फैलावले पाहिजे व लिहिणे, बोलणे हे व्यवसाय एकाच वर्गाकडे आहेत ते सर्व वर्गात फैलावले पाहिजे. तसे झाले म्हणजे सर्व समाजांच्या निरनिराळ्या वासना, त्यांचे रागलोभ, त्यांच्या आकांक्षा, चित्रविचित्र रुपकांची रुपे धारण करुन पुढे होतील.

एकीकडे सर्व समाजाचे मनोगत व्यक्त होण्याचे कार्य होईल व दुसरीकडे शब्दकोश पुष्ट होत जाईल."

श्री. म. माटे यांच्या लेखातून भाषा बद्दलचा समाजाच्या दृष्टीकोन कसा असावा भाषा. भाषा स्विकारावी असेल तर व्यवहारासाठी आणि शिक्षण, प्रशासकीय कार्यालयामध्ये भाषांचा वापर केला जावा असे मत ते व्यक्त करतात.

**४.४.४ बुद्धीचा महिमा - पाडुरंग सदाशिव साने**

कोकणातील पालखंड या खेडेगावात साने गुरुजीचा जन्म झाला. लहानपणापासूनच शिक्षणाची त्यांना आवड होती. उत्कृष्ट जिवन जगायचे असेल तर विद्या संपादन करणे आवश्यक आहे. असे त्यांचे मत होते. त्यामुळे बिकट परिस्थितही त्यांनी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. 'भारतीय तत्वज्ञान व संस्कृती' यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अनेक ग्रंथाचे सखोल वाचन केले. त्यामुळे त्यांनी तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांमधून M.A. ची पदवी संपादन केली. 'श्यामची आई' हे त्यांचे सर्वांत जास्त गाजलेले पुस्तक पुढे काही काळ महाविद्यालयीन स्तरावर व कालांतराने शालेय स्तरावर त्यांनी मराठीचे अध्यापन केले.

साने गुरुजींच्या मते वेद हा भारतीय संस्कृतीचा पाया मानला जातो. वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे आणि आपली भव्य संस्कृती ही ज्ञानावरच उभारलेली आहे. भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धेला स्थान नाही. परंतू अजूनही काही खेड्यांमध्ये अज्ञानापोटी अंधश्रद्धा पाळल्या जातात. जर संस्कृतीला नवनिर्वाचीत व आधुनिक बनवायचे असेल तर अंधश्रद्धेचे उच्चाटन होणे आवश्यक आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत वेद अनंत आहेत. जसे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद इ. जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. काळ व ज्ञान अंनत आहेत. नवीन ज्ञान जसे उदयास येईल तस तसे भारतीय संस्कृती त्याचा स्वीकार करेल. कारण भारतीय संस्कृतीला ज्ञानाहुन दुसरे काहीही पवित्र वाटत नाही. तसेच ज्ञानोपासका बद्दल भारतीय संस्कृतीला नितांत आदर आहे.

साने गुरुजी भारतीय संस्कृती बद्दलचा दाखला देताना ते ऋषीमुनींचा दाखला देतात. भारतीय संस्कृतीत असे अनेक ऋषिमुनी झाले की ज्यांनी केवळ वेद, उपनिशदे, पुराने यांची निर्मितीच केली नाही, तर अखंड तप करुन मोठ्या प्रमाणात ज्ञानार्जन केले. साने गुरुजीच्या मते वेदाला मानणे म्हणजे बुद्धीला मानणे बदलत्या काळानुसार नवीन नवीन विचार उत्पन्न होतात. ज्यांच्यामुळे आपणास नवीन नवीन ज्ञान मिळते. उदा. युरेनेस व नेपच्युन हे ग्रह पूर्वी दिसत नव्हते. परंतु आता ते दिसु लागले. ज्याप्रमाणे प्रत्येक विषयात नवनवीन शोध लागतात जीवनाच्या शास्त्रातही नवीन नवीन विचार उत्पन्न होत असतात.

भारतीय संस्कृती बद्दलच्या वेदांचे महत्त्व सांगताना साने गुरुजी बुद्धीलाही तेवढेच महत्त्व देतात. त्यांच्यामते वेदाला मानणे म्हणजे बुद्धीला मानणे वेदातील सर्वात पवित्र मंत्र म्हणजे गायत्रीमंत्र या मंत्राची उपासना करुनच मनुष्याच्या पुर्नजन्म होतो. कारण या मंत्रात बुद्धीची

निर्मळता मागितली आहे. बुद्धीवान मनुष्य कोणत्याही प्रकारची अजोड कामगिरी करु शकतो. वेद उपनिशद यांच्या आचारे तो आपली संस्कृती जगासमोर मांडू शकतो. वेदधर्म म्हणजे विचाराप्रमाणे वागणे बुद्धीसांगेल त्याप्रमाणे वागणे त्यामुळेच "अंतरीचा ज्ञान दुवा मालवू नको रे" असे भारतीय संस्कृती आपणास सांगते. त्याचाच अर्थ तुझ्या स्वतःच्या ह्रदयातील बुद्धी काय सांगेल ते बघ त्या बुद्धीचा जो आवाज येईल त्याप्रमाणे वाग अमुक ऋषी सांगतो, तमुक तत्त्वज्ञानी सांगतो म्हणून काही तर तुझ्या मनाला जे योग्य व पवित्र वाटेल ते तू कर तसेच तू तुझ्या आत्म्याचा अपमान करु नकोस व बुद्धीचा गळा दाबू नकोस. असे मौलिक विचार भारतीय संस्कृतीच्या साहित्यकृतीमध्ये नमुद केले आहेत.

**४.४.५ मुंबई १९१९ - वसंत बापट :**

मराठी साहित्यातील ज्येष्ठ नाककार म्हणून वसंत बापट यांना ओळखले जाते. वसंत बापट यांनी १९१९ साली मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनात केलेले अध्यक्षीय केले या भाषण मराठी भाषेच्या प्रेमाने भरलेले होते. भाषेच्या वर्तमान स्थितीतील दुरवस्थेमुळे जी हानी होते आहे त्याबद्दल खंत व्यक्त करुन बापट यांनी भाषेच्या वाढीसाठी काही उपाय सुचवले होते. त्यांच्या भाषणाच्या हा लेख आहे.

मराठी भाषेच्या, महाराष्ट्रातील जनतेच्या मातृभाषेच्या अवहेलनेमुळे समाजाचं प्रचंड नुकसान होत आहे. असे त्यांनी भाषणातून व्यक्त केले. या वास्तवाकडे वसंत बापट वाचकांचे लक्ष वेधतात. केवळ साहित्यावरच चर्चा करण्यापेक्षा साहित्या ज्या भाषेमुळे निर्माण झाले त्या भाषेच्या दुरवस्थेबद्दल आधी चर्चा व्हायला हवी अशी भूमिका बापट घेतात. ते म्हणतात, "साहित्य संमेलनात साहित्याच्या विकासाचा आढावा घेणं, त्यातील आकृतीबंधांची चिकित्सा करणं, साहित्यातलं सरस-नीरस कोणतं त्याच्यावर बोट ठेवण हीच काम प्राधान्यांन व्हायला हवीत असं विचारवंत म्हणतात... पण साहित्याचा संसार ज्या भाषेच्या अस्तित्वावर उभा राहतो ते अस्तित्वच जर धोक्यात येताना दिसू लागलं तर साहित्यिकांनी अस्वस्थ होणं स्वाभाविक नाही का ? मराठी भाषा जर मुमुर्णू झाली, मराठी संस्कृतीला, समाजाला जर घरघर लागली तर मराठी साहित्याचं भविष्य वेगळं सांगाव लागणार नाही."

वंसत बापट म्हणतात - "बालकुमारांच्या शिक्षणाचं आदर्श माध्यम म्हणजे त्यांची मातृभाषा. हे जगातल्या मोठमोठ्या शिक्षणतज्ञांच सांगणं. मातृभाषेत शिक्षण घेण्याचा प्रत्येक बालकाला जन्मसिद्ध अधिकार आहे. तो नाकारण्याचा पालकांना काय अधिकार? आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात कोंबण्याचा प्रकार आपण केव्हा थांबवणार ?"

प्राथमिक शिक्षण व्यवस्थेकडून मराठी भाषेचा गळा चेपला जातो हे व्यक्त करताना वसंत बापट म्हणतात, प्राथमिक शिक्षणापासूनच मराठीची हेळसांड करण्याची रीत आपल्या शिक्षणव्यवस्थेत आहे. त्यांच्या मते प्राथमिक शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आपण मुलांना अनेक भाषा शिकवल्या पाहिजेत. केवळ विज्ञान आणि गणितालाच महत्त्व आपण अभ्यासक्रमात देतो ते चुकीचे आहे. विज्ञान, गणितातलेच गुण महाविद्यालयातील प्रवेशाचे वेळी मोजणंही चुकीचे आहे. भाषेतील प्राविण्यही तेवढेच गरजेचे आहे. वैद्यक, स्थापत्य, तंत्रज्ञान या विद्याशाखांत मराठी

भाषेची गरज नाही हे मानणे चुकीचे आहे. समाजात काम करणाऱ्या सर्वांना त्या समाजाची लोकभाषा येणे आवश्यकच आहे.

मराठींच स्थान शिक्षण, शासन आणि लौकिक व्यवहार या प्रत्येक क्षेत्रात मागे पडत चालले आहे. याबद्दल वसंत बापट खंत व्यक्त करतात. बालकांना आपखूशीने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवणाऱ्या पालकांबद्दल बापटांना चीड व्यक्त करतात. आता बाळांसाठी अंगाईही आया मराठीत गात नाहीत तर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झाला आहे असे कसे म्हणतात येईल? आणि मुले सुद्धा काऊ-चिऊची गाणी म्हणण्याऐवजी 'टिंक्कल् टिंक्कलं' सारखी इंग्रजी बालगीत म्हणतात. पालकांना आपली मुले ए. बी, सी, डी म्हणतात, वन, टू हंड्रेड म्हणतो म्हणून बाळांचे कौतुक करतात.

बापट म्हणतात की, मराठी लिपीच लहान मुलांना शिकवली नाही तर ती मुले मराठी साहित्य सागरात प्रवेश तरी कसा करणार? असा सवाल बापट विचारतात. इंग्रजी वाचणारी मुलेही केवळ रहस्यकथा, शृंगारकथा वाचतात किंवा कॉमिक्स वाचतात हे पाहून वसंत बापटांना त्यांच्या आकलनाची, परिपक्वतेची शंकाच येते. त्यांना वाटते की इंग्रजी शिकणारी काही मुले विदेशी विद्यापीठात शिकायला जातील पण बाकीच्या गळाठ्याच काय? ती मुले नीट इंग्रजीही बोलू शकणारी नसतील आणि त्यांना मराठीही नीट येत नसेल. या गोंधळेलेल्या मुलांच भविष्य काय असेल असा प्रश्न उपस्थित करतात.

वंसत बापटांना वाटते की शासनाने कायद्यानेच मुलांच्या मातृभाषेच्या शाळेत घालण्याचे बंधन पालकांवर घातले पाहिजे. पालकांना दिलेले व्यक्तिस्वातंत्र्य या गोष्टींपुरते तरी थांबवले पाहिजे. कारण बहुसंख्य पालकांना स्वतःचा विचार करता येत नाही. शिवाय कोणत्याही विद्याशाखेत उच्चशिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांने प्रवेश केला तरी त्या अभ्यासक्रमात त्याला एक प्रश्नपत्रिका मराठी भाषा व साहित्याची अनिवार्यपणे अभ्यासावी लागावी. आपल्याकडे सर्व विद्याशाखेचे शिक्षण केवळ इंग्रजीत दिले जाते आणि मराठीत ते देणे शक्य नाही असे म्हटले जाते. पण बापटांच्या मते हा केवळ भ्रम आहे.

ते म्हणतात की, दुनियेमध्ये किती तरी देशांत सर्व प्रकारच्या शिक्षणशाखांत इंग्रजीची कुबडी घेण्याची गरज भासलेली नाही. इंग्लिश भाषेची सुविधा आपल्याला उपलब्ध आहे तर तिचा उपयोग का करुन घेऊ नये, हा प्रश्न फसवा आहे. आपल्या भाषेच्या ज्ञानकक्षा वाढवण्याऐवजी निमूटपणे भाषेची कोंडी करणारा आहे. वादासाठी इंग्लिश भाषेचा अभ्यास आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधासाठी जरुरीचा आहे असं मानलं तरी त्याचा अर्थ एवढाच की इंग्लिश भाषा हा विषय म्हणून उत्तम शिकला पाहिजे. माध्यम म्हणून इंग्रजीची गरज नाही अगदी प्राथमिक स्तरापासून मातृभाषेबरोबर इंग्रजी भाषा शिकवावी पण माध्यम म्हणून स्वीकारु नये असे त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. वंसत बापट यांच्या भाषणातून मराठी भाषेची दुरवस्था आपली मराठी भाषा शिकली पाहिजेत. भाषा ही टिकवायसाठी योग्य त्या गोष्टींची अमंलबजावणी झाली पाहिजे असे मत केले आहे.

### ४.४.६ आधुनिकिकरण आणि जागतिकिकरण - दिलीप पुरुषोत्तम चित्रे :

दिलीप पुरुषोत्तम चित्रे मुळात कवी, कथाकार समीक्षालेखन व वैचारिक लेखक आहेत. आधुनिकिकरण आणि जागतिकीकरण या लेखातून मानवी प्रगती, बदलती समाजव्यवस्था यांचा आढावा घेतला आहे.

चित्रे म्हणतात आधुनिकिकरण म्हणजे नेमक काय? यांचा शोध घेताना आधुनिकीकरण म्हणजे माणसाने आपल्या गरजांची पूर्ती करण्यासाठी लावलेले नवे शोध. उदा. दगडापासून शस्त्रे, लाकडापासून शस्त्रे, गारगोष्टी घासून ठिणगी व त्यातून निर्माण करणे हे शोध देखील माणसाला आधुनिक बनवून गेले.

दिलीप चित्रे म्हणतात - "प्रयोगसिद्धतेवर आणि स्वानुभवाचे रुपांतर 'स्व'तंत्रेवर करण्यात मानवाची आधुनिकता हीच त्याची वैज्ञानिक आणि तंत्रवैज्ञानिक परंपरा बनली." शेतीचा शोध आणि भाषेद्वारा परस्परसंवाद करण्याच्या क्षमतेची वाढ यातून माणसाच्या टोळ्यांचे सामाजिकीकरण होऊ लागले. संस्कृतीचा उगम झाला. त्यानंतर परस्परांवर आक्रमण करण्याच्या पाशवी प्रवृत्तीतून माणसांनी सत्ता व राष्ट्रे निर्माण केली. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या मते जागतिकीकरण ही संकल्पनाही एकात्म समाज व्यवस्थेचा, एकात्म जगाच्या इच्छेतून निर्माण झाली आहे.

उत्क्रांतीनेच मानव प्राण्याला सर्वात आधुनिक बनवले आहे त्यानंतर माणसांच्या टोळीवादातून आजचा साम्राज्यवाद उदयाला आला आहे. दोन महायुद्धानंतर शीतयुद्ध हा नवा प्रकार सुरु झाला. प्रत्यक्ष समोरासमोर युद्ध न करता शस्त्रास्त्र स्पर्धेच्या आणि लष्करी बळाच्या आधारे जगावर वर्चस्व मिळवण्यासाठी सोविएत महासंघ व त्याची साथीदार कम्युनिस्ट राष्ट्रे एका बाजूला तर अमेरिका, ग्रेट ब्रिटन आणि पश्चिम युरोपातील लोकशाही भांडवलदार राष्ट्रे दुसरीकडे असा हा संघर्ष होता. अमेरिका आणि सोविएत महासंघ ह्या दोन महासत्ता त्यात मुख्य होत्या. या दोन्ही महासत्ता अण्वस्त्रसज्ज झाल्या, क्षेपणास्त्र सज्ज झाल्या, अंतराळ-तंत्रज्ञानात इतर राष्ट्राच्या फार पुढे गेल्या, आरमारी आणि हवाई युद्धात महासक्षम बनल्या. मग दोन्ही महासत्तांनी कोरिया व व्हिएतनाममध्ये आपली शस्त्रास्त्रक्षमता आजमावली. आपापल्या शास्त्रस्त्रांना गिऱ्हाईक, बाजारपेठा मिळवल्या. पण शेवटी अंतर्गत आर्थिक अव्यवस्थेमुळे सोविएत युनियन खिळखिळे होत गेले आणि त्याचे विघटन झाले. त्याच सुमारास युरोपातल्या प्रमुख राष्ट्रसत्तांनी आपले संयुक्त मंडळ 'युरोपियन व इकॉनॉमिक कम्युनिटी' च्या रुपात आर्थिक महासत्ता बनण्याच्या पायावर उभे केले.

जगात काही मूठभर देश अत्यंत आधुनिक, विकसीत आहेत तर बहुसंख्य देश मागासलेले, अविकसीत आहेत. अविकसीत देशांत विकसित अर्थव्यवस्था, भांडवली, बळ, कुशल वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ आजसुद्धा नाहीत. त्या देशांचे आधुनिकीकरण झालेले नाही.

दिलीप चित्रे म्हणतात - "आता पन्नास कोटींपेक्षाही कमी लोकसंख्या असलेल्या अमेरिकन राष्ट्रसत्तेला पृथ्वीवरच्या सहाशे कोटी मानवजातीत परमबलाढ्य 'टोळी' चे स्थान प्राप्त झालेले आहे, असेही म्हणता येईल." 'द एन्ड ऑफ हिस्टरी' आणि 'क्लॅश ऑफ

सिव्हिलायझेशन' या दोन पुस्तकांचा चित्रे यांनी उल्लेख केला आहे. कुकुयामांच्या मते लोकशाही समाजवाद्याच्या अंगाने जगातल्या बहुसंख्य लोकांची वाटचाल सुरु असून त्याच दिशेने ती चालू राहील. मात्र वेगवेगळ्या देशांतील सांस्कृतिक विविधता त्यामुळे नष्ट होण्याचे भय नसून त्यांच्या परंपरांनुसार ते देश आपापली लोकशाही एका जागतिक सामान्य पातळीवर आणतील.

चित्रे एक गोष्ट सांगून हे पटवतात की, "नरमांसभक्षक माणसांपेक्षा आपण स्वतःला श्रेष्ठ समजतो पण नरमांसभक्षक पोटाची भूक भागवण्यासाठीच माणसे मारुन खातात आणि आपण युद्धांत लाखो लोकांचा बळी घेतो व केवळ सत्तेच्या हव्यासासाठी. त्यामुळे खर तर, नरमांस भक्षकापेक्षा युद्धे करणारा, स्वतःला आधुनिक समजणारा माणूसच अधिक पशू पातळीवरचा, मागासलेला आहे. आजही आपण इतर माणसांना राबवतो, त्यांच्या कष्टांचा पुरेसा मोबदला त्यांना देत नाही, त्यांना पशुतुल्य मानतो हे मानवतेला अशोभनीय आहे."

चित्रे यांच्या मते जागतिकीकरणात माहिती-तंत्रज्ञान महत्त्वाचा वाटा निभावते आहे. या माहिती-तंत्रज्ञान क्रांतीमुळे माणसामाणसातले अंतर झपाट्याने कमी होत चालले आहे. चित्रे म्हणतात - "आपण एक वैशिष्ट्यपूर्ण प्राणी आहोत आणि इतर प्राण्यामध्ये आणि आपल्यात जे साम्य आहे त्यापेक्षा आपले एकमेकांशी साम्य आहे, हे माणसाला कळते. पण ही उपजत क्षमता असली तरी सर्व माणसे स्वतःमध्ये आणि इतरांमध्ये जे फरक करतात, तो करण्याची त्यांची गरजसुद्धा उपजत असते आत्मकेंद्रितपण हे माणसाचे उपजत ज्ञान आहे, क्षमता आहे. मात्र उपजत क्षमतांचा विकास होण्यात माणसामाणसात आणि माणसांच्या समूहासमूहात फरक पडतात."

अथेन्ससारख्या देशातील आदर्श लोकशाहीतली गुलामगिरी होती. हे चित्रे यांना आश्चर्यकारक वाटते. या गुलामांना पाळीव पशूंसारखे वागवले जाई. त्यांना कोणतेही हक्क नसत आणि मालकाच्या उपकारावर जगावे लागे. हे माणुसकीला शोभणारे नव्हते. चित्रे यांना वाटते की इतर वंशाच्या लोकांना गुलाम किंवा हीन दर्जाचे मानण्याची परंपरा सुसंस्कृत समाजाने या ना त्या रुपात चालूच ठेवलेली आहे. भारतात, महाराष्ट्रातही मालकी वृत्ती आहे आणि त्यामुळे पिळवणूक, दडपशाही, विषम वागणुक आहे हे वास्तव चित्रे स्पष्ट करतात.

आजही दलितांना व स्त्रियांना सर्वत्र समान वागणुक मिळत नाही यांची खंत त्यांना वाटते हे दाखवून चित्रे म्हणतात -

"वर्णव्यवस्थेद्वारे मानवी पिळवणूकीचे समर्थन केले जाते. 'आपण' आणि 'इतर' यांच्यातल्या फरकावरच पिळवणूकीच्या व्यवस्था उभारल्या गेल्या आहेत. इतरांच्या मानवतेकडे कानाडोळा करणे ही आक्रमक प्रवृत्ती याच्या मुळाशी आहे. संकुचित स्वार्थ आक्रमणाचे आणि हिंसेचे समर्थन करतो, आणि त्याला सुधारणेचे नाव दिले, तरी समग्र मानवजातीच्या कल्याणाचा विचार तेथे नसतो." असे त्यांना वाटते हे आजच्या आधुनिक युगात बदलले पाहिजे असे त्यांना वाटते.

आपल्या लेखाच्या अखेरीस दिलीप चित्रे म्हणतात की जागतिकीकरणामुळे आणि आधुनिकीकरणामुळे समग्र मानवतेचे कल्याण होणारच आहे असा दावा पाश्चिमात्य धोरणकर्त्यांद्वारा केला जात आहे. तो आपल्याला तपासून पारखावा लागेल.

या लेखातून दिलीप चित्रे यांनी मानवाची प्रगती, बदलती समाजव्यवस्था, आजचे दलिताचे गंभीर समस्या, स्त्रीयांच्या शोषण, स्त्रीयांना दिली जाणारी वागणूक यांचा आढावा या लेखातून घेतला आहे.

**४.४.७ कोरड - अतुल देऊळगावकर :**

'कोरड' हा अतुल देऊळगावकर यांचा लेख आहे. झपाट्याने होणारी वृक्षतोड, पर्यावरणाचा ऱ्हास, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे नजिकच्या भविष्यकाळात सर्वांना पाणी पुरवणे ही जगापुढील भीषण समस्या बनणार आहे असे देऊळगावकर यांना वाटते. २०१२ सालापर्यंत जगातील तहानलेल्यांची संख्या निम्म्यावर आणण्याचे संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवले असले तरी हे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकत नाही असे मत देऊळगावकर व्यक्त करतात. त्यांच्या मते गाव-शहर, गरीब-श्रीमंत, दोन राज्ये, दोन देश यांच्यात पाण्याच्या प्रश्नावरुन रक्तपात होऊ शकेल.

भारतात केवळ शंभर तास पाऊस पडतो आणि त्याचे पाणी वर्षभर पुरवावे लागते. त्यामुळे ती एक मोठीच कसोटी असते. पाण्यावरुन राजकारण सुरु होण्याचे कारण पाण्याचे दुर्भिक्ष, कमतरता हेच आहे. अशावेळी राजकारणातली वैज्ञानिकता, तार्किकता वापरली तरच आपला निभाव लागेल असे देऊळगावकर सुचवतात. भारत-नेपाळ, भारत-बांगलादेश आणि भारत-पाकिस्तान यांच्यात पाणी प्रश्नावरुन वाद आहेत. चीन आणि भारतातही ब्रह्मपुत्रा नदीवरील धरणामुळे वाद वाढणार आहेत. ब्राह्मपुत्रेचे पाणी या धरणामुळे अधिकाधिक चीनच्या वापरात येणार आहे आणि बांगलादेश व भारताला मात्र ते फारसे वापरता येणार नाही. त्यामुळे संघर्ष वाढणार आहे.

देऊळगावकर म्हणतात की युद्धातून मार्ग निघत नसतात. सामंजस्यानेच पाणी प्रश्नावर तोडगा काढावा लागेल. तसेच पाण्याचे व निसर्गातील कोणत्याही घटकासंबंधीचे प्रश्न यापुढे जागतिक पातळीवरच सोडवावे लागतील असेही देऊळगावकरांना वाटते.

जलदारिद्र्य हा शब्द प्रयोग देऊळकर वापरतात. मूळात ती कॅरोलिन सुलिव्हान व जेर्मी मेग यांनी मांडली आहे. उपलब्ध जलसंपदा, पाण्यापर्यंत पोहोच, पाणी खरेदी करण्याची क्षमता, पाणी वापराची कार्यक्षमता आणि पर्यावरण या पाच निकषांवरुन एखाद्या प्रदेशाच्या जलनिर्देशांक ठरविला जातो. त्यानुसार पुढे सूक्ष्म आराखडा करुन जलदारिद्र्य हटवण्याच्या योजना केल्या जातात. भारतात जलदारिद्र्य निर्देशांक जगात ५३ वा आहे. पाण्याच्या बाबतीत सर्वात समृद्ध देश फिनलंड आहे. अमेरिकेचाही क्रमांक २३ वा आहे. त्यामानाने इंग्लंडमध्ये पाण्याच्या संदर्भात समृद्धी आहे.

पाण्याचा वेगवेगळ्या कारणाने अतीउपसा झाला की भूजलपातळी खूपच कमी जाते. १९९८ साली केरळमधील एका जिल्ह्यात कोका-कोलाने आपला प्रकल्प उभारला. त्यांना पाणी

उपसण्यासाठी कोणताही परवाना घेण्याची गरज नव्हती. त्यामुळे त्यांनी भरपूर पाणी उपसले. परिणामी इतरांच्या विहीरी, कूपनलिका आटल्या. शेवटी ग्रामस्थांनी मोर्चे काढून कोका-कोलाचे उत्पादन बंद पाडले. तेव्हा कुठे त्यांना त्यांचे पाणी परत मिळाले. पण असे प्रकार वरचेवर घडतात हे दुःखकारकच म्हणावे लागेल.

पाण्याचे व्यवस्थापन ही काळजी आहे. ही गरज अशा प्रसंगामुळे प्रकर्षाने जाणवते. गेल्या काही वर्षापासून पिण्याचे व शेताचे पाणी मोजून देणारा ऑस्ट्रेलिया हा एकमेव देश आहे. पाण्यावर जबरदस्त कर लावले तर लोकांना पाण्याची किंमत समजेल अशीही एक भूमिका आहे.

देऊळगावकर म्हणतात की, "मनुष्य विकास निर्देशांक अतिशय कमी असल्यास जलदारिद्र्य तीव्र असणे स्वाभाविक आहे. पाण्याचे धोरण आखताना यांचे भान ठेवले तर भविष्यातील भीषण पाणी समस्येला सामोरे जाता येईल". आपल्या देशातील ८०% ग्रामीण जनतेला पाणीपुरवठ्याची सोय स्वतः करावी लागते. कुठलीही यंत्रणा त्यांच्यापर्यंत शाश्वत पाणी घेऊन जात नाही. पूर्वी विहीरींचा वापरलोक पाण्यासाठी करत पण १९७० नंतर कूपनलिकांचा वारेमाप प्रसार झाला आणि त्यामुळे 'भूजलाचा उत्पादक विध्वंस' झाला असे भूजलतज्ञ तुषार शहा यांचे मत देऊळगावकरांनी उदधृत केले आहे. कूपनलिकांचे पाणी प्रदूषित व सार्वजनिक आरोग्यास हानीकारक ठरते असे ते सांगतात. कूपनलिकांतून पाणी सहज उपलब्ध होते असे वाटल्याने शेतकऱ्यांनी कूपनलिका घेतल्या पण त्यामुळे त्यांची दिशाभूलच झाली असे देऊळगावकरांना वाटते. कूपनलिका जितक्या खोल खणल्या जातात तितके त्यांच्या पाण्यात भूगर्भातील फ्लोसाईड, अर्सेनिक, नायट्रेट या विषारी रसायनांनी मिसळलेले पाणी मिसळले जाते ते माणसाच्या जीवाला घातक ठरते. शिवाय दुष्काळात या कूपनलिका उपयोगी ठरत नाहीतच. एकंदर पुढील पिढ्यांना केवळ दूषित पाणी देण्याचे पाप आपण करत आहोत असे देऊळगावकरांना वाटते.

जलविद्युत प्रकल्प, औष्णिक प्रकल्प, विद्युतप्रकल्पा पेक्षा निसर्गाची कमी हानी करणारी असल्याने मोठी धरणे बांधण्याकडे जगभरातील शासनकर्त्यांचा कल असतो. पण प्रत्यक्षात अशी धरणे लौकरच गाळाने भरुन निरुपयोगी ठरतात. त्यामुळे छोटी धरणे, लहानतळ्यांची साखळी असे मार्ग शोधणे योग्य असे देऊळगावकर सुचवतात. पाणलोट क्षेत्राच्या विकासाकरता पंचक्रोशीतील गावांनी एकजुटीने काम केले पाहिजे असेही देऊळगावकर सुचवतात. सलग समतल चर खणून पाणी साठवा, पाणी जिरवा तंत्राने भूजल पातळी वाढवता येणे शक्य आहे. अशा प्रकारचे चर एकट्याने खणून प्रयोग यशस्वी करणारे वसंतराव टाकळकर कोणत्याही बक्षीसाची अपेक्षा न करता निरलसपणे कार्य करत आहेत याबद्दल देऊळगावकरांना कौतुक वाटते.

शेवटी कॉफी, दूध, गहू तांदूळ व मांस यांच्या उत्पादनात किती लिटर पाणी लागते याची आकडेवारी देऊन देऊळगावकर म्हणतात - "महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत दूध व साखरेला मध्यवर्ती स्थान आहे. ऊसाला नेमके किती पाणी लागते. कमी पाण्यात ऊस घेण्याची पद्धत कोणती आहे ? वेगवेगळ्या विभागातं ऊसाचा भूजलावर नेमका काय परिणाम होतो आहे ? याचा अभ्यास करण्याची आपल्याला गरज वाटत नाही. त्यामुळे आपण जलकार्यक्षम होण्याची शक्यता

नाही. काळाचे महाभयंकर आव्हान आपण कसे पेलणार? ऱ्हासपर्वाची गती वाढत आहे. ती पाहता काळाच्या ओघात आपली घोडदौड चीन वा सिंगापूरच्या दिशेने नव्हे तर सोमनिया, इथिओपिथाकडे आहे."

एकंदर भारतापुढील व जगापुढील भविष्यातील पाण्याच्या गंभीर समस्या, पाण्याचे नियोजन अतुल देऊळगावकर यांनी या लेखात व्यक्त केले. पाणी संकट टाळण्याचे लहान बंधारे, तळ्यांची साखळी, समतल चर असे उपायही सुचवले आहेत.

या लेखातून पाण्याची समस्या, पाणी म्हणजे जीवन त्याचे योग्य व्यवस्थापन झाले पाहिजे. असे या लेखातून अतूल देऊळगावकर यांनी व्यक्त केले आहे. पाणी साठवण्याची योग्य तळे, बंधारे बांधले गेले पाहिजेत, असे त्यांना वाटते.

## ४.५ वैचारिक गद्य ग्रंथातील लेखांचा आशय :

मराठीतील निबंध हा इंग्रजाच्या आगमनानंतर बेकन, मेकॉले यासारख्यांच्या निबंधलेखनावरुन हळूहळू मराठी साहित्यात जन्माला व आकाराला आला. बेकन, मेकॉले यांचे लेखन औपचारिक स्वरुपाचे असल्याने सुरुवातीला वैचारिक निबंधाला औपचारिक निबंध म्हटले जात असे. मराठीतले पहिले औपचारिक निबंध मराठी 'ज्ञानप्रसारक' या मासिकात १८५० ते १८६६ या कालखंडात प्रसिद्ध झाले. पण ते पुरेसे बांधीव नव्हते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वैचारिक निबंधाचे जनक म्हणता येईल. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे निबंध पत्ररुप होते. जे प्रभाकर या नियतकालिकात 'शतपत्रे' या नावाने १८४८ ते १८५० या दोन वर्षात प्रसिद्ध झाले. पुढे १८५७ ला विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर १८६०-६५ च्या सुमारास वैचारिक गद्य अधिक समर्थ बनले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'तील लेखामुळे वैचारिक गद्य या प्रकाराला प्रतिष्ठा लाभली.

इंग्रजांचे भारतातील आगमन भारतीयांना पारतंत्र्यात टाकणारे असले तरी त्यांनी विविध ज्ञानशाखांची, उद्योगांची आणि विचारप्रवाहांची सुरुवात भारतात झाली हे नाकारता येणार नाही. इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात 'बुद्धियुग' जन्माला आले. त्यातून पारलौकिला महत्व देणारी देव-दैववादी दृष्टी दूर ठेवून आपण इहवादी, प्रयत्नवादी, समतावादी झाले पाहिजे असे भारतीय समाजसुधारकांना, नवशिक्षितांना वाटू लागले. वैचारिक गद्यात हाच समतावादी, इहवादी विचार प्रामुख्याने मांडला गेलेला दिसतो. लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, टिळक, शि.म.परांजपे, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर, सावरकर, प्रबोधनकार ठाकरे, साने गुरुजी, ना.ग. गोरे, गं.बा. सरदार, श्री. म. माटे यांच्यापासून ते अलीकडच्या प्राचार्य शिवाजीराव सावंत, हरि नरके, आ. ह. साळुंखे, अरुण टिकेकर, नीळकंठ खाडीलकर, रा.ग.जाधव, सुहास पळशीकर आनंद तेलतुंबडे, अतुल देऊळगावकर, हेंमत देसाई या विचारवंतापर्यंत एक खूप मोठी वैचारिक लेखन करणाऱ्यांची परंपरा मराठी वैचारिक निबंधाला लागला आहे. महाराष्ट्रातील समाजाला विचाराने, बुद्धीने सबळ करणाऱ्यांचे काम वैचारिक गद्य

आजवर करते आहे. देशांत आणि महाराष्ट्र सामाजिक सांस्कृतिक घडणाऱ्या घटनाचा वेध वैचारिक लेखन नियतकालिकांतन प्रसिद्ध होते आहे.

इंग्रज भारतात आले तेव्हा भारतातील सर्वसामान्य जनता शेतकरी आणि दलित यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झालेली होती. हि परिस्थिती घालवण्यासाठी कोणते मार्ग अवलंबले पाहिजेत हे समजण्याची वैचारिक प्रगल्भता, बुद्धिसामर्थ्य या गोरगरीबांत नव्हते. त्यामुळे प्रारंभीच्या समाजसुधारकांनी व विचारवंतानी सर्वसामान्यांचे विशेषतः शेतकरी व दलितांचे दारिद्र्य दूर करणे, स्त्री समस्या दुर करणे, सामाजिक वास्तव जाणिव करुन देणे. त्यांचे प्रबोधन आपल्या वैचारिक निबंधातून केलेले आढळते.

या वैचारिक ग्रंथातून स्त्री समस्या, दलित समाजाचे जगणे, त्यांच्या समस्या डॉ. बाबासाहेब आंडबेकराचे विचार, महात्मा फुले यांनी वर्णव्यवस्थेवर केलेला प्रहार, इरावर्ती कर्वे यांचे संस्कृती बद्दलीचे केलेली संशोधनात्मक मांडणी, वंसत बापटांचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मुंबई येथील भाषण, अतूल देऊळगावकर यांनी पाणी समस्या आणि पाण्याचे नियोजन अशा विविध विषयावर आधारित लेख या वैचारिक ग्रंथात आहेत.

'आपला धंदा कोणता व कसा करावा ?' या दादोबा पांडुरंग यांच्या लेखात त्यांनी एकूण आपल्या देशातील दारिद्र्य, बेकारी याची कारणे आपल्या पारंपराप्रिय, जुनाट दृष्टिकोनात आहेत हे पटवून दिले आहेत. त्यांच्या मते कोणतेही काम जे माणूस आपल्या उदरनिर्वाहासाठी करतो ते उच्च किंवा नीच नसते आणि धंद्यावरुन जातीश्रेष्ठता ठरवणे चुकीचे आहे. त्यांच्या मते कारकुनी वा भिक्षुकी करण्यापेक्षा सुतार, लोहार, सोनार, कासार, शिंपी, कोष्टी हे अधिक महत्त्वाचे कारण ते समाजाला उपायोगी वस्तू बनवितात. त्यामुळे कष्ट करणाऱ्याला, श्रमिकांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असे दादोबांना वाटते.

तर्खडकर म्हणतात, "फक्त लिहू-वाचू शकणारे अनेक असतील पण त्यांच्यातही श्रेणी आहे. म्हणजे जो ग्रंथ लिहितो, विद्वान आहे तोच श्रेष्ठ ठरतो. केवळ अक्षर ओळख असणारे बरेच असतील पण फक्त साक्षरता त्यांना रोजगार मिळवून देऊ शकत नाही. पैसे मिळविण्यासाठी साक्षरांनीही अन्य कला कौशल्ये शिकून घेतली पाहिजेत तर ते कमावते होतील अन्यथा सुशिक्षित बेकारच बनतील". असे दादोबा सांगतात. वादविवाद, तर्कशास्त्र यांचा अभ्यास प्रतिष्ठेचा ठरेल पण त्यापेक्षा एखादे यंत्र वा वस्तू तयार करणे अधिक उपयोगी ठरेल म्हणून सर्वसामान्य माणसांनी केवळ शिक्षणाच्या मागे लागण्यापेक्षा रोजगार मिळवण्यासाठी कारागिरी करावी. स्वतंत्र उद्योग सुरु करावेत असा मार्गही ते सुचवितात. सुशिक्षित होणे वाईट नाही पण सर्व सुशिक्षितांनी नोकऱ्या शोधण्याचे ठरवले तर त्यांना त्या मिळणार नाहीत. ते बेकार राहतील त्यामुळे सुशिक्षितांनीही सचोटीने, श्रमाने धंदा, व्यवसाय करावा तरच त्यांची आर्थिक प्रगती होईल असे दादोबा तर्खडकर या लेखातून सुचवतात.

इरावती कर्वे यांनी 'संस्कृती म्हणजे काय' ? या लेखातून संस्कृती बद्दल संशोधनात्मक मांडणी केली आहे. इरावती कर्वे यांनी संस्कृतीचे संशोधन केले आहे, त्या समाजशास्त्रज्ञ ही

आहेत. त्यांच्या मते संस्कारमय जीवन जगण्याची देशकात विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती किंवा प्रकृतीत बिघड होऊ नये म्हणून केल्या जाणाऱ्या विशिष्ट संस्काराच्या संच म्हणजे संस्कृती होय. अशी संस्कृतीबद्दलची मांडणी केली आहे. भाषेतून संस्कृती उत्पत्ती, जतन व संक्रमण होते असे त्यांना वाटते.

'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' हा डॉ. आंबेडकर यांचा लेख आहे. या लेखाला महाडच्या चवदार तळ्यावर डॉ. आंबेडकरांनी हजारो दलित बांधवांच्या सहकार्याने केलेल्या सत्याग्रहाची पार्श्वभूमी आहे. या सत्याग्रहानंतर चित्रावशास्त्री नावाच्या गृहस्थांनी अस्पृश्यांनी स्पृश्यांनी संघर्ष करु नये कारण त्यांची उपजिवीकाच स्पृश्यांनी त्यांना दिलेल्या लहान मोठ्या कामांवर अवलंबून आहे. स्पृश्यांनी बहिष्कार टाकल्यास अस्पृश्यांना जगणेच कठीण होईल असे विधान केले होते. डॉ. आंबेडकरांनी या विधानाचा प्रतिवाद करण्यासाठी अस्पृश्यांची आर्थिक स्थिती दुबळी असण्याची कारणे स्पृश्यांनी त्यांना प्रगतीची संधी हेतूपूर्वक नाकारणे यातच आहेत हे लक्षात आणून दिले. अर्थात डॉ. आंबेडकर निःपक्षपातीपणे दलितांना त्यांच्या चुकाही दाखवून देतात आणि सुधारण्याचा सल्ला देतात.

दलितांचा सत्याग्रह हा त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठीही आहे असे आंबेडकर सांगतात. अस्पृश्य सत्याग्रहाच्या परिणामांना घाबरणार नाहीत असा आंबेडकरांना विश्वास वाटतो. स्वतःच्या स्वातंत्र्याचे समान हकाचे ध्येय दलितांना सत्याग्रहाचे परिणाम सोसण्याचे बळ देईल अशी खात्री डॉ. आंबेडकरांना वाटते. ज्याप्रमाणे सगळे भारतीय इंग्रजांनी चालवलेल्या पिळवणूकीचा बहिष्कार म्हणून परदेशी कापड, वस्तू यावर बहिष्कार टाकतात त्याप्रमाणेच दलित स्वतःच सवर्णावर बहिष्कार टाकतील. तथाकथित सुधारकांना डॉ. आंबेडकर सांगतात की, दलित त्यांच्या दलितांना सवर्णीयांनी गुलाम केले आहे. आर्थिक दृष्ट्या स्वतःवर अवलंबून ठेवले आहे हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी महाभारतातील एका प्रसंगाचा संदर्भ देऊन भीष्म, द्रोण व शल्यही कौरवाचे गुलाम बनले होते ते केवळ पेशामुळेच याची आठवण करुन दिली आहे.

डॉ. आंबेडकर चित्रावशास्त्री व तथाकथित सुधारकांना असा प्रश्न विचारतात की मुंबईतल कामगारांनी भांडवलदाराविरुद्ध संप केला तर तुम्ही त्यांना प्रोत्साहन देता आणि भांडवलदारांनी कामगारांची पिळवणूक तात्काळ थांबवावी म्हणता, पण दुसऱ्या बाजूला अस्पृश्यांना मात्र सत्याग्रह न करण्याचा सल्ला देता व त्यांची पिळवणूक थांबवा असे सांगण्याऐवजी दलितांनाच घाबरवता हा दुटप्पीपणाच म्हणावा लागेल. डॉ. आंबेडकरांना तथाकथित सुधारकांचा हा कावेबाजपणा त्यांच्या धर्मवेडातून आलेला आहे हे लक्षात आणून देतात.

शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय मुकुंदराव पाटीलांनी आपल्या वैचारिक लेखातून व्यक्त केली आहे. दलितांच्या गुलामीची चिकित्सक आणि शेतकऱ्यांची परिस्थिती यांची तार्किक कारणमीमांसा हे मुकुंदराव पाटीलांनी केली आहे. आपल्या देशातील ८० टक्के लोक केवळ शेतीवर अवलंबून राहतात हेही त्यांना खटकते. वेगवेगळी कौशल्ये शिकून शेतकऱ्यांच्या मुलांनी स्वतंत्र उद्योग व्यवसाय केले पाहिजेत असे मुकुंदराव पाटीलांना वाटते. विशेषतः इंग्रजी राजवटीत व्यवसाय बदलाचे स्वातंत्र्य मिळालेले असताना शेतकऱ्यांनी

घरातल्या सर्वांना शेतीवर राबवण्याऐवजी काही कुटुंबीयांनी स्वतंत्र व्यवसाय करावा. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणारी तोंडे कमी होतील. आणि शेती फायदेशीर ठरेल असे पाटील सुचवतात.

शेतकऱ्याची समस्या, त्यांचे प्रश्न मुकुंदराव पाटीलांनी मांडले आहेत. शेतकरी शिकत नाहीत याबद्दल मुकुंदराव पाटील नाराजी व्यक्त करतात. केवळ नोकरी मिळवून देणारी साक्षरता त्यांना अपेक्षीत नाही. त्यांना शेतकऱ्यांनी विज्ञान तंत्रज्ञान शिकावे व ते शेतीत वापरावे असे वाटते. युरोप - अमेरिकेतील लोक छोट्या जमिनीत खंडोगणती पिक काढतात कारण ते विज्ञानाचा वापर करुन विचारपूर्वक शेती करतात पण आपल्या शेतकऱ्यांना दुसऱ्याचे ज्ञान नको आहे, आपल्या शेतकऱ्यांना परंपराप्रिय मानसिकतेने जगायचे आहे. त्यामुळे शेजाऱ्यांकडेही अधिक चांगले पिकते तो श्रीमंत झाला आहे हे दिसले तरी त्याचे ज्ञान, अनुभव शिकून घ्यावा नवे कौशल्य आत्मसात करावे अशी सकारात्मकता शेतकऱ्यांकडे नाही. यामुळेही ते मागासलेले राहतात, हे मुकुंदराव पाटील यांना जाणवते.

शेतकऱ्यांच्या घरी त्यांच्या स्त्रिया अडाणी त्यामुळे घरे अस्वच्छ, मुलेही अस्वच्छ, परिसर अस्वच्छ असतो, त्यामुळे रोगराई वाढते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या स्त्रीया साक्षर झाल्या पाहिजेत. तरच त्यांचे राहणीमान सुधारेल. सुसंस्कृतता हा प्रकार शेतकऱ्यात का नसावा? त्यांना त्यांचे राहाणीमान सुधारत आले तरच ते सुसंस्कृत होतील असे मुकुंदरावाना वाटते. शेतकऱ्यांच्या मुलांचे बालविवाह, विवाहावरचे अफाट खर्च हुंडा देण्याचे - घेण्याच्या पद्धती असल्यामुळे गोसावी फकिरांना दानधर्म करण्याची अंधश्रद्धा शेतकऱ्यांच्या मध्ये आहे. शेतकऱ्यांची पान-तंबाखूची दारुची व्यसने, तमासगिरणीकडे जाऊन पैसा उधळण्याची त्यांची सवय अशा नानाविधी गोष्टींच्या संदर्भात मुकुंदराव पाटील शेतकऱ्यांच्या दोषांकडे लक्ष वेधतात ते म्हणतात आपले शेतकरी जोपर्यंत आळस झटकणार नाहीत, शिकणार नाहीत, अंधश्रद्धा सोडणार नाहीत, परंपरांची ओझी फेकणार नाहीत, भाऊबंदकीत अडकणार नाहीत, वायफळ खर्च करणार नाहीत तोपर्यंत त्यांचे दारिद्र्य दूर होणार नाही याचा पुनरुच्चार करतात.

शेतकरी लग्नकार्यावर ऐपत नसतानाही वारेमाप पैसा खर्च करतात, सत्यनारायणाच्या पूजा, तीर्थस्थानांना भेटी देणे यात पैसा फुकट घालवतात आणि कर्जबाजारी होतात हे चित्र मुकुंदराव पाटील यांना अस्वस्थ करते. त्यातच काही धूर्त, चतूर शेतकरी इतर साध्याभोळ्या शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा गैरफायदा घेऊन त्यांना देशोधडीला लावतात याचीही त्यांना खंत वाटते. गावपंचायती निःपक्षपाती नाहीत त्या गरीब शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी मोठ्या जमिनदारांचाच फायदा पाहतात याचीही मुकुंदरावांना चीड येते. ग्रामपंचायती म्हणजे गावगुंडांची सत्तास्थाने झाली आहेत हे त्यांना खटकते.

शेती करताना नवी हत्यारे वापरणे, स्वावलंबी असणे, शेतमाल विकण्यासाठी व्यापाराचे तंत्र समजून घेणे ह्यामुळे भावी काळात शेती सुधारु शकेल असे मुकुंदरावाना वाटते तसेच शेतीविषयक माहिती, नवे प्रयोग नवी हत्यारे दाखवणारी प्रदर्शने ठिकठिकाणी भरली तर शेतकऱ्यांना शेतीत सुधारणा होईल असे मत व्यक्त करतात.

'कोरड' या लेखातून अतूल देऊळगावकर यांनी पाण्याची गंभीर समस्या आणि त्यावरील उपाय कोणते यावर मत व्यक्त केले आहे भविष्याने पाण्याचे नियोजन होणे ही काळाची गरज आहे असे देऊळगावकर यांना वाटते त्यासाठी बंधारे, धरणे बांधणे ही काळाची गरज आहे असे त्यांना वाटते.

शांताबाई किर्लोस्कर यांनी 'संख्यत्वासाठी' या लेखातून पुरुष प्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीचे असणारे स्थान, स्त्री समस्याचा वेध या लेखातून घेतला आहे. स्त्रियांना या समस्येतून बाहेर काढले पाहिजे. तिचेवर होणारे अन्याय कमी झाले पाहिजेत. असे मत शांताबाईनी या लेखातून व्यक्त करतात.

'आधुनिकिकरण आणि जागतिकिकरण' या लेखातून दिलीप चित्रे यांनी मानवाची उत्क्रांती, मानवाने बुद्धीच्या जोरावर जो विकास केला आहे यांचा आढावा घेऊन चित्रे यांनी आधुनिकिकरण आणि जागतिकिकरणाच्या नुसार बदलणारी मानवी मुले यांचे विवेचन केले आहे. यासाठी ते विविध विचारवंताचे दाखले देतात. बदलत्या समाजव्यवस्था, बदलती संस्कृती, आचार विचार यांचा आढावा या लेखातून घेतला आहे.

दलितांच्या स्वतंत्र वसाहती उभ्या राहाव्यात यासाठी इंग्रज सरकारने पुढाकार घेऊन त्याना मदत करावी असे डॉ. आंबेडकर सुचवतात. म्हैसूर संस्थांनच्या राजाने दलितांना स्वतंत्र वसाहत उभी करण्यास मदत केली त्यामुळे त्यांची स्थिती सुधारली हे उदाहरण देऊन डॉ. आंबेडकर इतर गावांतील दलितांनाही तेथील सवर्णियांनी मदत केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतात. महारांनी शेतीवरच संपूर्ण भार टाकू नये तर त्याखेरीज अन्य व्यवसाय शोधावेत असे डॉ. आंबेडकर सुचवतात महारांना असा स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य पटकन मिळणार नाही पण तरीही प्रयत्नपूर्वक त्यांनी छोटा-मोठा धंदा करावा असे आंबेडकर सुचवतात. महारांनी घरोघरी खादी विणावी, अन्य महारांनी ती विकत घ्यावी असे करत करत महारांनी आपले मूलभूत मानवी हक्क मिळवायचे असतील तर त्यांनी सवर्णांनी लादलेली आर्थिक गुलामगिरी व परावलंबीत्व सोडले पाहिजे या मुद्यावर डॉ. आंबेडकर भर देतात.

अशाप्रकारे दादोबा पांडुरंग, मुकुंदराव पाटील व डॉ. आंबेडकर यांनी सर्वसामान्य भारतीय, शेतकरी व दलित यांच्या आर्थिक स्वावलंबनासंबंधी, दारिद्र्य निर्मुलना संबधीविचार मांडले आहेत. आजही उद्‌बोधक आहेत. ते म्हणतात की भारतीय समाजात पारंपारिक व्यवसाय करण्याची पद्धत आहे पण महाराला बलुतेदारीत स्वंतत्र असा धंदा, व्यवसाय मुद्दामच दिलेला नसावा. त्यांनी त्रेवर्णिकांची सेवा करावी असे धर्म सांगतो, ते सरकारी वतनदार आहेत असे पूर्वापार म्हटले जात असले तरी त्यांच्यावर अधिकार चालतो तो सवर्णीयांचाच म्हणजे सरकार सर्व लोकांचे आहे त्यामुळे ते म्हणतील ती सर्व कामे ती अप्रतिष्ठेची असली तरी महारांना मुकाट्याने करावी लागत आहेत. महारांना न्याय देणारे ही सवर्ण आहेत त्यामुळे महारांनी त्यांना सांगितले गेलेले काम नाकारले तर त्यांच्यावर अत्याचार करण्याचे, त्यांना अघोरी शिक्षा करण्याचे सगळे अधिकारही सर्व शासनकर्त्यांच्याच हाती आहेत. त्यामुळे नाईलाजाने महारांना न

आवडणारी, न पटणारी गलिच्छ कामेही मुकाटपणे करावीच लागतात. नाही म्हणण्याच्या जणू त्यांना हक्कच नाही. अपमान झाला पिळवणूक झाली तरी ते तक्रार करुच शकत नाहीत.

हिंदू धर्मियांची जुलमी विषमतेवर आधारलेली चातुर्वर्ण्य व्यवस्थाच दलितांसाठी प्रगतीचे दरवाजे बंद करणारी आहे असे डॉ. आंबेडकर सांगतात. त्यांच्या मते एखादा मुसलमान किंवा पारशी जर गावाचा मुख्य असता तर त्याने दलितांवर अन्याय केला नसता पण गावोगावी हिंदूचेच पाटील सरपंच धुरीण आहेत त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींसाठीही दलितांवर अन्याय होतो. दलितांनी चांगला पोशाख केला, मेलेल्या गुरांचे मांस खाल्ले नाही तरी त्यांना पाटील शिक्षा करतात, तेव्हा हिंदू धर्मियांनी त्या पाटलांना सवर्ण म्हणून दिलेले अधिकारच त्यांना तसे वागायला प्रवृत्त करतात, असे डॉ. आंबेडकरांना जाणवते. म्हणून महारांनी वतने सोडवित, बलुते मागणे सोडावे तरच त्यांची गुलामगिरी, स्पृश्यावलंबी जगणे संपले असे डॉ. आंबेडकर सांगतात.

महारांना भीती वाटते की वतन सोडले तर जगावे कसे? त्यांना डॉ. आंबेडकर सांगतात की जन्माला येणारा प्रत्येक माणूस काही आपला धंदा सोबत घेऊन जन्माला येत नाही. त्याला आपली उपजिविका करण्यासाठी धंदा शोधावाच लागतो हे लक्षात घेऊन महारांनी स्वतःचे वेगळे व्यवसाय करायला घाबरतात. ही भीती दूर टाकून महारांनी सर्वणपासून दूर आपल्या स्वतंत्र वसाहती उभ्या केल्या पाहिजेत तर ते निर्भयपणे आपला वेगळा व्यवसाय सुरु करु शकतील असे डॉ. आंबेडकर सांगतात सवर्णीयांपासून दूर गेल्याने महार स्वतंत्र होतील, स्वेच्छेने आपला व्यवसाय शोधतील, कोणी दुकान सुरु करेल, कुणी शिंपी बनेल पण मानाने जगेल. स्वतःचा विकास साधू शकेल.

वैचारिक गद्य या गद्यग्रंथात पंधरा लेख आहेत. या लेखातून अस्पृश्यांच्या समस्या शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्री समस्या, समाजातील बुवाबाजी, समाजातील भ्रष्टाचार यांवर विचार प्रबोधनपर विवेचन केले आहे. समाजातील समस्यां आणि उपाय सूचविले आहेत.

## ४.६ समारोप

'वैचारिक गद्य' या संचालित ग्रंथात वैचारिक लेखाचा समावेश आहे. लेख आणि विचारवंत यांचे विविध विषयावरील लेख या ग्रंथात आहेत. या लेखातून व्यवसायाबद्दलची समाजाचा दृष्टीकोन, तर्खडकर व्यक्त करतात. तर स्त्री शिक्षणांची महत्त्व बाबा पद्मजनी यांनी मांडला आहे. गुलामगिरीची ग्रंथातील प्रस्वावने वरुन महात्मा फुलेंचे समाजाविषयीचे तत्कालीन वास्तवभान लक्षात येते. अस्पृश्यो उन्नतीचा पाया या लेखातून अस्पृश्य समाजाची स्थिती गती डॉ. बाबासाहेब यांच्या लेखातून व्यक्त केला आहे. संस्कृती बद्दलचे मत इरावती कर्वे व्यक्त करतात. या वैचारिक गद्यातून सामाजिक जाणीव समाज वास्तव, समाज परिवर्तन, सामाजिक बांधिलकी वैचारिक लेखातून व्यक्त होते.

❖❖❖❖

## अभ्यासपत्रिका क्र.दोन

## सरावासाठी प्रश्नपत्रिका

**गुण - १००**

**वेळ - ३ तास**

**सूचना :** १) प्रत्येक विभागातील प्रत्येकी एक प्रश्न सोडवा.
२) विभाग पाचवा सोडविणे आवश्यक.
३) एकूण पाच प्रश्न सोडवा.
४) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

### विभाग १

१. 'तूर्तास' या काव्यसंग्रहातून कवीची नैतिकता व समाज-वास्तव कसे प्रकट होते ते स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

'तूर्तास' या काव्यसंग्रहातून जीवनातील विरोधाभासाचे चित्रण दासू वैद्य यानी कसे स्पष्ट केले ते लिहा.

### विभाग २

२. 'भाकरी आणि फूल' या शीर्षकामुळे कादंबरीचा आशय अधिक व्यापक बनतो. हे विधान स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

'भाकरी आणि फूल' ही कादंबरी दलितांच्या सर्वस्तरीय शोषणाचे दर्शन घडविते, कसे ते साधार स्पष्ट करा.

### विभाग ३

३. 'कळप' या कादंबरीत लेखकाच्या नैतिक जाणीवेचे प्रत्यंतर अनेक घटनाप्रसगांतून दिसून येते कसे ते सांगा. (२०)

**किंवा**

देवदासींच्या जीवनातील दुःखभोग रेखाटणे तसेच अनिष्ट प्रथेच्या निर्मुलनासाठी चालवल्या जाणाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांच्या वर्तनातील विसंगती उघड करणे हे एक आशयसूत्र 'कळप'कादंबरीत दिसते. स्पष्ट करा.

### विभाग ४

४. 'वैचारिक गद्य' या संग्रहातून सामाजिक, सांस्कृतिक, भाषाविषयक, स्त्रीजीवन, अस्पृश्यता आणि शेतकरी जीवन इत्यादी जाणीवविषयक विचार कसे प्रगट झाले आहेत ते स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

'वैचारिक गद्य' वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट करुन सद्यस्थितीतील काही प्रश्नविषयक विचार दिलीप चित्रे, पांडुरंग माने आणि श्री. म. माटे यांच्या लेखनातून कसे प्रत्ययास येतात ते स्पष्ट करा.

**विभाग ५**

५. टिपा लिहा. (कोणत्याही चार, प्रत्येक पुस्तकावर एक टीप लिहिणे आवश्यक)

अ) 'राजघाट' कवितेतील विरोधाभास (२०)

**किंवा**

'ड्रायव्हर पिळतो स्टेअरींगचे शेपूट' कवितेतील व्यक्तिचित्र.

ब) 'भाकरी आणि फूल' मधील स्त्री व्यक्तिरेखा.

**किंवा**

'भाकरी आणि फूल' ची प्रतिकात्मक भाषा.

क) 'कळप' कादंबरीत दिसून येणारी नैतिक जाणीव.

**किंवा**

ग्रामीण समाजातील देवदासी प्रथा.

ड) गुलामगिरीची प्रस्तावना यातील समाजिक संदर्भ.

**किंवा**

मुकुंदराव पाटील यांच्या लेखातील शेतकऱ्यांचे दुःख.

❖❖❖❖

# अभ्यासपत्रिका क्र.दोन
# सरावासाठी प्रश्नपत्रिका

**गुण - १००**
**वेळ - ३ तास**

**सूचना :** १) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

१. "आधुनिकता विरुद्ध मानवी मूल्यांची जपवणूक करणे असे संघर्षाचे स्वरुप दासू वैद्यांच्या 'तूर्तास' मधील कवितांतून व्यक्त होते" स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

" 'तूर्तास' काव्य संग्रहातून ग्राम संस्कृतीचे वेगवेगळे रुप अभिव्यक्त करण्यास दासू वैद्यांची कविता समर्थ ठरली आहे." या विषयाचा परामर्श द्या.

२. कोकणातील दलितांचे चित्रण करतानाच दलित समाजातील आत्मभानाचा शोध मधु मंगेश कर्णिक यांनी 'भाकरी आणि फूल' मध्ये घेतला आहे. साधार लिहा. (२०)

**किंवा**

"मधु मंगेश कर्णिकांनी 'भाकरी आणि फूल' मध्ये चित्रीत केलेले दलित जीवनदर्शन वास्तवाशी समांतर आहे." या विधानाचा साधार परामर्श घ्या.

३. 'कळप' कादंबरीला कृषी परंपरेचा, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संदर्भाचा व भाषेचा पोत कशाप्रकारे प्राप्त झाला आहे ते सोदाहरण लिहा. (२०)

**किंवा**

'कळप' कादंबरीची स्वरुप वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४. "'वैचारिक गद्य' या संग्रहात समाविष्ट झालेला लेख विविध काळातील लेखकांचे असले तरी तत्कालीन समस्या जीवन विषय व विचार यावर नेटके बोट ठेवतात ". हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

'वैचारिक गद्य' या लेखसंग्रहातून सामाजिक, सांस्कृतिक आणि स्त्रीविषयक चित्रण कसे व्यक्त झाले आहे, ते लिहा.

५. पुढीलपैकी प्रत्येक गटातील एक टीप लिहा. (२०)

गट अ : 'रघू चिलमी' ची व्यक्तिरेखा **किंवा** 'कळप'मधील गौरी कुलकर्णी

गट ब : 'बुद्धीचा महिमा' लेखाचा मतितार्थ **किंवा** इरावती कर्वे यांनी सांगितलेली 'संस्कृती वैशिष्ट्ये'

गट क : 'तूर्तास' मधील स्त्रीभावविश्व **किंवा** 'ड्रायव्हर पिळतो स्टेअरींगचे शेपूट' कवितेचा आशय.

गट ड : 'सुनंदा शाळीग्राम' मधील आधुनिकता **किंवा** 'पांडुरंगाचे' छात्रालयातील दिवस.

❖❖❖❖